

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

# उपायवनवसंत

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः॥

श्री. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज व
श्री. प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज स्मारक ट्रस्ट, पुणे ४

सप्रेम भेट
२८।३।९२

# उपायवनवसंत

- संपादक -

डॉ. वासुदेव व्यं. देशमुख

श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर समग्र लेखन समिती

श्रीवासुदेव निवास, पुणे - ४.

**प्रकाशक**

श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर
समग्र लेखन समिती
श्रीवासुदेव निवास
४२/१७ एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४.

**संपादक**

डॉ. वासुदेव व्यं. देशमुख

**प्रकाशन दिन**

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज जन्मतिथी (पूर्वसंध्या)
माघ कृ ५ शके १९३२
मंगळवार २२ फेब्रुवारी, २०११

**मुद्रक**

प्रवरा ट्रेडर्स
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे - ५१

**मूल्य रु. १००/-**

© सर्व हक्क श्रीवासुदेवनिवास विश्वस्त मंडळ यांचेकडे सुरक्षित

## श्रीसद्गुरु प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर
## समग्र लेखन समिती

श्रीवासुदेव निवास

४२/१७ एरंडवणे, कर्वे रोड, पुणे - ४.

**प. पू. श्री नारायणकाका ढेकणे महाराज**

(अध्यक्ष) प्रधान विश्वस्त, वासुदेवनिवास, पुणे

**पू. श्री. मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर**

कार्याध्यक्ष

**विश्वस्त श्री. सुभाष दामले**

कोषाध्यक्ष

**सन्माननीय सदस्य**

**पू. डॉ. रा.ल.जोशी, डॉ. वा.व्यं.देशमुख,**
**पू. श्री.शरदराव जोशी, श्री.बाळासाहेब कुलकर्णी,**
**श्रीमती नीलाताई जोशी, श्रीमती सुशीलाताई मोडक,**
**श्रीमती आशाताई धारप, पू.प्र.ना.दीक्षित,**
**विश्वस्त, श्री.श्रीपादराव आघारकर, श्री.कमलाकर देशपांडे**

# प्रास्ताविक निवेदन

**सकल धर्मांमाजी धर्म। स्वरुपी रहाणे हा स्वधर्म**
**हेचि जाणिजे वर्म। साधू लक्षणाचे**

- समर्थ रामदासस्वामी

राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामीमहाराजांचे उक्तीप्रमाणे असे महान साधू शक्तिपातयोग पीठाधीश्वर, राष्ट्रीय पंडित प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर हे या पुण्य पावन नगरीत होऊन गेले. त्यांच्या कृती,प्रेरणा,आणि जीवननिष्ठा आजही सहस्रावधी भाविकांना, साधकांना,विद्वानांना अनुग्रहीतांना आणि शिष्यांना जीवनाचा आधार होऊन राहिले आहेत आणि पुढे ही दीर्घकाळ राहतील.

महाराष्ट्र ही संतांची खाण आहे. हजारो वर्षाची संतांची दिव्य परंपरा या महाराष्ट्राला लाभली आहे. त्याच परंपरेतील एक महान श्रीगणेशदत्तभक्त प.पू.श्रीदत्तमहाराज कवीश्वर आहेत. ज्यांचे वर्णन असे करता येईल -

**अक्रोध वैराग्य जितेंद्रियत्वं।दया क्षमा शांती जनप्रियत्वं।**
**निर्लोभ दाता भय शोकहर्ता । ज्ञानस्य चिन्हं दशलक्षणा ॥**

ज्यांना राग नाही, वैराग्य संपन्न जीवन, जितेंद्रिय आहेत, निर्लोभी आहेत, ज्यांच्या ठिकाणी दया आहे, जे क्षमाशील आहेत, अत्यंत शांत आहेत, लोकांच्या मनात त्यांच्याविषयी प्रेम आहे, ज्यांच्याठिकाणी दातृत्व आहे , त्यांना कशाचेही भय वाटत नाही, कशाचाही शोक नाही, ही ज्ञानी पुरुषाची दहा लक्षणे आहेत.

सर्वसामन्यांना परमार्थाची वाट दाखविणारे, सर्वार्थाने मार्गदर्शन करणारे, जनसामान्यांचे आध्यात्मिक जीवन उन्नत करणारे असे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवनकार्य ईश्वरी प्रेरणेनेच झाले असे दिसते. संतांचे चरित्र हे चित्त शुद्ध करणारे,स्थिर करणारे असे अलौकिक असते.

प. पू. ब्रह्मश्रीदत्तमहाराजांचे बृहत् चरित्र पण सध्या उपलब्ध असलेल्या चरित्रापेक्षा वेगळे असे निर्माण व्हावे, अशी इच्छा निर्माण झाली. मनाने संकल्प केला, पण एवढे मोठे कार्य कसे होणार, त्याची योजना काय करावी इ. विषयाचे चिंतन सुरु झाले. माझ्या मनातील हा चरित्र लेखनाचा विचार महान गुरुभक्त पू.दत्तमहाराजांचे सान्निध्य ज्यांना महाराजांच्या अखेरच्या क्षणापर्यंत लाभले असे अंतरंग शिष्य, पू.दत्तमहाराजांच्या आठवणीने त्या भावविश्वात रमून जातात व तो भाव ज्यांच्या नेत्रातून अश्रुद्वारा प्रकट होतो, असे आमचे डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख यांच्याशी बोललो. त्यांना ही कल्पना अत्यंत आवडली.

'आपण हे कार्य करु या, माझे पूर्ण सहकार्य राहील.' असे सांगीतल्यावर मला फार आनंद झाला. डॉ. देशमुखांप्रमाणेच गुरुभक्त नीलाताई जोशी(बोरिवली), गुरुभक्त डॉ.रा.ल.जोशी (सोलापूर), पंडित शरदराव जोशी (बार्शी), श्रीमती सुशीलाताई मोडक (पुणे) यांच्याशी बोललो, सर्वांनाच ही कल्पना आवडली. मग सर्वांनी एक निवेदन योगतपस्वी प.पू.नारायणकाका ढेकणे महाराज (प्रधान विश्वस्त श्रीवासुदेव निवास) यांना देऊन प्रार्थना केली. पू.काका महाराजांनी याला मान्यता देऊन हे कार्य होण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे सांगीतले. पू.दत्तमहाराज सर्वांना समजतील असे चरित्र व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

पू.नाराणकाका ढेकणे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली श्रीसद्गुरु **'प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर समग्र चरित्र लेखन समिती'** गुरुवार दि.५.५.२००५ चैत्र व ३० प.प.श्रीनारायणस्वामी महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी स्थापन झाली. सर्वानुमते या समितीचे कार्याध्यक्षपद पू. श्री मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांनी स्वीकारावे असे ठरले. कोषाध्यक्ष म्हणून विश्वस्त श्री. सुभाष दामले यांची नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. ज्येष्ठ व श्रेष्ठ विद्वान मंडळींचा या समितीत सदस्य म्हणून समावेश केला. संपूर्ण चरित्र संपादनाचे कार्य गुरुभक्त डॉ.वा.व्यं.देशमुख यांनी करावे असे ठरले व डॉक्टरांनी ते मान्य केले.

पू. श्रीनारायणकाका महाराजांनी या चरित्राचे जेवढे खंड होतील तेवढे तयार करा असे सांगून हे वासुदेव निवासाचे अधिकृत

प्रकाशन असेल. समितीने पूर्ण पुस्तक तयार करुन श्रीवासुदेव निवासाला द्यावे असे सांगितले व या कार्याची सर्व सूत्रे कार्याध्यक्ष श्री मोरेश्वरबुवा जोशी चऱ्होलीकर यांचेकडे सुपूर्त केली.

**चरित्र लेखन समितीचे चिंतन - वाटचाल**

प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे समग्र चरित्र लिहिण्यासाठी अनेक साधकांची,भक्तांची मदत लागणार होती. त्यासाठी काही प्रवास करुन माहिती मिळविण्याची आवश्यकता आहे. यासाठी समितीने प्रथमत: प.पू. श्री. अशोकमहाराज कवीश्वर यांचे आशिर्वाद घेतले.

सर्व भक्तांनी, साधकांनी जी माहिती पाठवली त्याप्रमाणे चरित्र लेखन समितीच्या प्रयत्नाने 'मूर्तीमंत भागवत' हा ग्रंथ प्रकाशित झाल्यावर प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे जे शिष्यवर आहेत; अशा भाग्यवंतांना प्रार्थना केली की आपण काही लिहून द्यावे, ज्यात पू. महाराजांचे दिव्य चरित्र समाजासमोर येईल, त्या लेखनाच्या आधाराने **'उपायवनवसंत'** हा ग्रंथ डॉ.वा. व्यं. देशमुख यांनी संपादित केला. त्याबद्दल त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

ईश्वर सेवा बुद्धीने, अत्यंत त्वरीत गतीने या चरित्राचे मुद्रण डी.टी.पी., छपाई , बायडिंग तसेच चरित्राचे मुखपृष्ठ इ. सर्व कामे श्री.प्रमोद पोटभरे व त्यांचे सहकारी यांनी अत्यंत आत्मीयतेने केले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करतो.

तसेच चरित्र ग्रंथात छापलेली छायाचित्रे ज्या गुरुभक्तांनी

उपलब्ध करुन दिली या सर्वांनी सद्गुरुंची सेवा या हेतुने हे सहकार्य केले. त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी थोडीच आहे.

शक्तिपात योग पीठाधीश्वर पुणे-नाशिक व वासुदेवनिवासचे प्रधान विश्वस्त, समितीचे अध्यक्ष,योगतपस्वी प.पू.श्रीनारायणकाका ढेकणे महाराज यांचे आशीर्वाद या ग्रंथास लाभले हे एक भाग्य आहे.

अशा प्रकारे गेली ७ वर्षे समितीच्या अथक परिश्रमाचे फळ म्हणजे ,श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे जन्मतिथीच्या पूर्वसंध्येला माघ कृष्ण ५ मंगळवार दिनांक २२ फेब्रुवारी,२०११ रोजी श्रीमद्जगद्गुरु शंकराचार्य प.प.श्रीकृष्णानंदतीर्थ स्वामी महाराज यांचे पवित्र करकमलाद्वारे तसेच योगतपस्वी प.पू.श्रीनारायणकाका ढेकणे महाराज यांचे अध्यक्षतेखाली **'उपायवनवसंत'** या ग्रंथाचे प्रकाशन पुण्यपावन क्षेत्री श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर द्विवर्षीय जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभ 'भरतनाट्य मंदिरात' संपन्न होत आहे ही एक सौभाग्याची साक्ष आहे.

विशेष म्हणजे संकल्पाप्रमाणे प.पू,श्रीनारायणकाका ढेकणे महाराजांच्या आशीर्वादाने प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा जन्मशताब्दी महोत्सव आणि प.पू. योगीराज गुळवणीमहाराज यांच्या १२५ व्या जयंती महोत्सव या पावन कालखंडात हे प्रकाशन व्हावे अशी इच्छा होती. हा संकल्प श्रीगणेशदत्तसद्गुरु यांच्याकृपेने संपन्न झाला.

या चरित्र लेखन कार्यात ज्या ज्या भक्तांचे सहकार्य लाभले आहे, त्या सर्वांचा नामोल्लेख विस्तारभयास्तव करणे अशक्य आहे, पण त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

श्रीसद्गुरु प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे अनुग्रहित, भक्त, शिष्य इतरही जिज्ञासू सज्जनवर्ग यांचेकडून या चरित्र ग्रंथाचे वाचन व चिंतन नित्य घडत राहून त्यांना शाश्वत समाधानाचा लाभ होवो व स्वकर्तव्यतेचे समाधान श्रीवासुदेवनिवास ट्रस्टच्या विश्वस्तांना व चरित्रलेखन समितीला लाभो हीच सद्गुरुचरणी प्रार्थना.

श्रीसद्गुरुचरणरज

नागनाथतनय

**मोरेश्वर नागनाथ जोशी-चऱ्होलीकर**

माघ कृ ५ शके १९३२

मंगळवार २२ फेब्रुवारी, २०११

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः।

# प्रस्तावना

**दत्तं कवीश्वरं वंदे गणेशं मानुषं परम।**
**प्राप्ता वामनयोगीशाद्दीक्षा वै येन शांभवी।।**
**निगूढतत्त्वं ते ज्ञातं यत्किञ्चिल्लोकदुर्ग्रहम।**
**चेष्टितं ते प्रसादोऽयं प्राक्पुण्यैर्मय्युपस्थितः।।**

द्वि.सा.गुरुचरित्रांतर्गता गुरुस्तुतिः ८५।।

तीन वर्षांपूर्वी प.पू. सद्गुरु ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या मननात्मक चरित्राचा प्रथम खंड '**मूर्तिमंत भागवत**' या नांवाने प्रसिद्ध झाला. तो श्रीदत्तमहाराजांच्या बहुसंख्य शिष्य, साधक, अनुयायी आणि चाहते यांना आवडला. आतां आम्ही त्यांच्याच बोधगर्भ चरित्राचे अवलोकन थोड्या वेगळ्या दृष्टीने करणारा हा द्वितीय खंड प्रसिद्ध करीत आहोंत. पहिल्या खंडांत श्रीदत्तमहाराजांच्या श्रीमद्भागवतनिरूपणाच्या माध्यमांतून झालेल्या लोकोद्धाराच्या कार्याची ओळख आपण त्यांच्या कांही प्रातिनिधिक भागवतसप्ताहातून करून घेतली. या खंडांत श्रीदत्तमहाराजांचे मार्गदर्शन लाभलेल्या त्यांच्या विविध क्षेत्रांतील शिष्यांकडून, त्यांना आलेल्या श्रीदत्तमहाराजांच्या गुरुत्वाच्या प्रचीतीची ओळख शक्य तों त्यांच्याच शब्दांत करून घेत आहोंत. ह्या खंडाचे नामकरण '**उपायवनवसंत**' असें केले आहे. त्यामागची आमची भूमिका आम्ही त्याच शीर्षकाच्या पहिल्या

लेखांतच केली आहे. त्याच लेखांत आम्ही श्रीदत्तमहाराजांच्या गुरुत्वाच्या विविध पैलूंचाही आढावा घेतला आहे. तसेच त्यांचे गुरुत्व कसे परिपूर्ण आणि सर्व अधिकारांच्या मुमुक्षूंना निःसंशय, शास्त्रशुद्ध आणि प्रत्ययकारी मार्गदर्शन करणारे आहे तेही थोडक्यात सांगितले आहे. इतर सर्व लेख हे श्रीदत्तमहाराजांच्या ह्याच बहुआयामी गुरुत्वाचे प्रातिनिधिक दर्शन घडविणारे आहेत.

पू.ब्रह्मश्री वे.भालचंद्रशास्त्री जोशी उप्पनबेटगिरी यांचा लेख विशेष अभ्यसनीय आहे. श्रीदत्तमहाराजांचे विद्यागुरु वे.मू.ब्रह्मश्री पंडितप्रवर श्रीनागेशशास्त्री यांचे ते सुपुत्र. श्रीदत्तमहाराजांपेक्षां ते सात-आठ वर्षेच लहान होते. श्रीदत्तमहाराज वयाच्या २२-२३ व्या वर्षी न्याय आणि वेदांतशास्त्रांच्या अध्ययनासाठी धारवाडच्या श्रीजगद्गुरु शंकराचार्य पाठशाळेत गेले तेव्हां भालचंद्रशास्त्रींचे वय १४- १५ वर्षांचे होते. तेव्हांपासून जवळपास ७०-७५ वर्षांचा त्यांचा आणि महाराजांचा ऋणानुबंध होता. ह्या काळांत ते महाराजांचे सहाध्यायी होते. पण त्यांनीच स्पष्ट केल्याप्रमाणे ते आणि इतर सहाध्यायी यांनासुद्धां श्रीदत्तमहाराज न्यायशास्त्राचे पाठ देत असत. हे सर्वही पुढे नामांकित विद्वान म्हणून प्रसिद्धीला आले. आणि सर्वही श्रीदत्तमहाराजांचा गुरुतुल्य आदर करीत. यावरून श्रीदत्तमहाराजांच्या अभिजात विद्वत्तेचे आणि विद्यागुरुत्वाचे श्रेष्ठत्व मनावर ठसते.

श्रीदत्तमहाराजांनी दीर्घकाळ टिळक महाविद्यालयांत अध्यापन केले. त्या सर्व विद्यार्थ्यांकडे ते किती आत्मीयतेने पहात होते आणि त्यांच्या व्यावहारिक आणि पारमार्थिक जीवनाकडे त्यांचे कसे लक्ष असे ते त्यांच्या कांही निकटच्या विद्यार्थ्यांच्या लेखांवरून कळून येते. केवळ विद्यालयाच्या वर्गांपुरते त्यांचे अध्यापकत्व मर्यादित्व नव्हते तर त्या विद्यार्थ्यांच्या जीवनाला व्यापून टाकणाऱ्या गुरुत्वांत ते परिणत झालेले आपल्याला ह्या लेखांतून दिसून येते. वेदांताच्या शब्दज्ञानाचे वितरण केवळ औपचारिक नव्हते तर त्या त्या विद्यार्थ्यांच्या अधिकारानुसार त्यांच्यावर भरीव, सकारात्मक आणि दूरगामी परिणाम करणारे होते. डॉ.रा.ल.जोशी, पं.वसंतरावगाडगीळ, डॉ.त्रि.ना.धर्माधिकारी, पं.दुर्गाराम शास्त्री उपाध्ये, पं. राजेश्वरशास्त्री उप्पनबेटगिरी, वे.मू.आनंदशास्त्री पारखी, डॉ. हर्डीकर, डॉ.श्रीकांत केळकर, डॉ.श्रीधर फ़डके, पं.जांभोरकर इत्यादि शिष्यांनी आपल्याला लाभलेल्या ह्या भाग्याची ग्वाही त्यांच्या लेखांतून दिलेली आहे.

ह्या सर्वांच्या योगदानानेंच हा ग्रंथ सिद्ध झाला आहे. त्या सर्वांचा मी वैयक्तिक आणि 'पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज समग्र चरित्र लेखन समिती'च्या वतीने अत्यंत कृतज्ञ आहे. त्यांच्या लेखनाच्या संपादनात कांही त्रुटि असल्यास ते उदार मनाने क्षमा करतीलच.

श्रीदत्तमहाराजांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ श्रीगुरुमहाराजांच्या (प.पू.योगिराज गुळवणीमहाराजांच्या) अनेक

शिष्यांना लाभलेला आहे. त्यांना ह्या दोन महापुरुषांच्या आंतरिक एकत्वाचे दर्शन झालेले आहे. आमचीही गणना अशा श्रीदत्तमहाराजांच्या भक्तांत करतां येईल. अशा त्यांच्या वात्सल्यपूर्ण गुरुत्वाची प्रचीती घेतलेले स्वामी श्रीगोविंददेव गिरी, सर्वश्री नीलाताई जोशी, सुशीलाताई मोडक, आशाताई धारप, ह्यांचे लेखही श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी असलेल्या व्यापक गुरुत्वाचा परिचय करून देत आहेत.

आमचे ज्येष्ठ गुरुबंधु व आश्रमाला वाहून घेतलेले गुरुभक्त नारायणराव दाते गुरुजी यांनी २०-२५ वर्षे पू. दत्तमहाराजाचे जीवन अगदी जवळून पाहिलेले आहे. श्रद्धायुक्त, संवेदनक्षम आणि विचक्षण मनाने त्यांनी टिपलेले श्रीदत्तमहाराजांचे हृद्य शब्दचित्र त्यांच्या 'सदा संतांपाशी जावे' या लेखांत आपल्याला पहायला मिळते.

श्रीदत्तमहाराजांच्या गुरुगौरवांत त्यांच्या सहधर्मचारिणी सौ.लक्ष्मीबाई (आईसाहेब) यांचा अंतर्भाव खूप महत्त्वाचा आहे. कांही लेखकांनी विशेषतः सुश्री सुशीलाताई मोडक आणि श्री.नीलाताई जोशी यांनी हा विषय उत्तम प्रकारे मांडला आहे. श्रीदत्तमहाराजांच्या सर्वच शिष्य-भक्तांवर ती. सौ.आईसाहेबांनी मायेची मुक्त पखरण केली होती. त्यांचा आध्यात्मिक अधिकार मोठा होता हे आपल्या निदर्शनास येते.

ह्या वैविध्यपूर्ण चरित्राचे संपादन करण्याच्या कार्यांतून आपल्या श्रीदत्तमहाराजांच्या स्वरूपाच्या ज्ञानांत लक्षणीय भर

पडली आहे आणि चित्तांतले मल क्षीण झाले आहेत. त्यामुळे तेवढी पात्रता नसतांनाही ही सुसंधि उपलब्ध करून दिल्याबद्दल प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज समग्र चरित्र समितीचा मी अतीव ऋणी आहे. विशेषतः अध्यक्ष ह.भ.प.पू. श्रीमोरेश्वरबुवा जोशी (चऱ्होलीकर) आणि कार्याध्यक्ष मा.वि.ग.जोशी यांनी या लेखांच्या संकलनासाठी केलेल्या सहकार्याशिवाय हे शक्यच झाले नसते. प.पू.योगतपस्वी श्री. नारायणकाका ढेकणे महाराजांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन या कार्यासाठी प्रेरणा आणि शक्ति प्रदान करणारे आहेत. त्यांच्याविषयी औपचारिक कृतज्ञता व्यक्त करण्याचाही संकोच वाटतो.

कर्म, योग, भक्ति आणि ज्ञान या सर्वच निष्ठांच्या सहस्रावधि साधकांना श्रीदत्तमहाराजांचे झालेले मार्गदर्शन महासागराप्रमाणे विशाल आहे, अपार आहे. 'मूर्तिमंत भागवत' आणि प्रस्तुत ग्रंथ यांच्या माध्यामांतून त्या सद्गुरुतीर्थाच्या फक्त चाळीस कावडीच आम्ही आमच्या 'धीपरिणामावधी'नुसार प्रस्तुत केल्या आहेत. त्यांच्या सेवनाने श्रीदत्तमहाराजांच्या भक्तांनी, शिष्यांनी, साधकांनी आणि चाहत्यांनी तोषावे आणि आपल्याबरोबरच आम्हांलाही श्रीगुरुचरणांच्या आश्रयाला न्यावे हीच प्रार्थना आहे.

**वासुदेव व्यंकटेश देशमुख**

पुणे

माघ शु॥५ शके १९३२, २२फेब्रुवारी,२०११

# अंतरंग


**उपायवनवसंत** १७

डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख

**पू.दत्तमहाराजांचे अलौकिक स्वरुप** ३८

पंडितप्रवर ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री उप्पनबेटगिरी

**सद्गुरु स्वरूप** ४६

पं.राजेश्वरशास्त्री उप्पनबेटगिरी

**भागवतस्वरूप ब्रह्मश्री दत्तमहाराज** ५३

स्वामी गोविंददेव गिरिजी

**पूजनीय दत्तमहाराज एक चालते बोलते शिक्षक** ६०

प्रा. डॉ. रा.ल. जोशी

**प. पू. दत्तमहाराज - स्मरण** ६५

- दुर्गाराम उपाध्ये

**जयन्ति सुकृतिनो योगसिद्धाः कवीश्वराः** ८४

-डॉ. श्रीधर शंकर फडके

**आमचे श्रद्धास्थान -**
**पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वरगुरुजी** ९२

-प्रा. अवधूत हर्डीकर

**स्व.ती. दत्तमहाराज कवीश्वर जन्मशताब्दीनिमित्त अभिवादन!** ९८
डॉ. श्रीकांत मधुकर केळकर

**दिव्य संदेश** ११९
पं. वसंत अ. गाडगीळ

**साक्षात्कारी संत- ब्रह्मीभूत पं. दत्तमहाराज कवीश्वर** १३२
पं. ल.पं. जांभोरकर

**चैतन्यदीप प्रज्वाळिला** १३६
प्रा. अजित कुलकर्णी

**शांतिब्रह्म ब्रह्मश्री प.पू.श्रीदत्तमहाराज** १४०
सुश्री सुशीला मोडक

**उपायवनवसंतु । जो आज्ञेचा अहेवतंतू** १६३
नीला जोशी

**शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्द वाटू धन जनलोका ।।** १८८
प्राचार्य वसंत कृष्ण नूलकर

**सदा संतांपासी जावे** १९७
श्री. नारायण दाते

**आनंदाचे डोही आनंद तरंग** २१२
श्रीमती आशा किशोर धारप

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः॥



श्री मयूरेश्वर



# भगवान श्रीदत्तात्रेय



## प. प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज



## प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज

दत्तमहाराजांचे मंत्रगुरु



प. पू. धुंडीराजशास्त्री कवीश्वर

# दत्तमहाराजांचे मोक्षगुरु




प. प. नृसिंहसरस्वती दीक्षितस्वामी महाराज

# दत्तमहाराजांचे विद्यागुरु



प. पू. नागेशशास्त्री उप्पनबेटगिरी

## दत्तमहाराजांचे दिक्षागुरु




## प. पू. योगिराज श्री वामनरावजी गुळवणी महाराज



प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर

## प. पू. योगतपस्वी श्रीकाकामहाराजांचा आशीर्वाद



'प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज समग्र चरित्र समिती' च्या माध्यमांतून प्रकाशित होणारा हा त्यांच्या चरित्राचा दुसरा भाग 'उपायवनवसंत' या नावाने प्रकाशित होत आहे. ह्या भागांत प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या गुरुत्वाचे विविध पैलू, त्यांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनाचे सौभाग्य लाभलेल्या साधक-भक्तांच्या मुखांतूनच आपल्याला वाचायला मिळत आहेत. श्रीदत्तमहाराजांचे सहाध्यायी पण त्यांचे शिष्य म्हणवून घेण्यांत धन्यता मानणारे, वयोवृद्ध, तपोवृद्ध व ज्ञानवृद्ध पू. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री जोशी, उप्पनबेटगिरी; श्रीमहाराजांच्या भागवतसेवेचा वारसा पुढे चालवणारे प्रा. डॉ. रा. ल. जोशी; वे. मू. भागवताचार्य आनंदशास्त्री पारखी; श्रीदत्तमहाराजांकडे न्याय आणि वेदांताचे अध्ययन केलेले पं. दुर्गारामशास्त्री, डॉ. धर्माधिकारी, डॉ. हर्डीकर, डॉ. केळकर, डॉ. फडके इत्यादि विद्वानांनी आपल्याला श्रीमहाराजांकडून मिळालेल्या ज्ञानाची आणि जीवनदृष्टीची साक्ष दिली आहे. सर्वच लेखक हे श्रीदत्तमहाराजांना जवळून पाहिलेले आणि त्यांच्या अंतरंगाच्या संपर्कात आलेले असे आहेत. त्यामुळे ह्या सर्वांचे लिखाण वाचकांच्या चित्तात श्रीमहाराजांची यथार्थ आणि प्रत्ययकारी प्रतिमा निश्चितच साकारतील असा विश्वास वाटतो.

श्रीदत्तमहाराजांची स्मृति आपल्या सर्वांच्या मनात नित्य प्रकाशत रहावी आणि आपल्या चित्तशुद्धीला कारक व्हावी हीच श्रीसद्गुरु स्वामी महाराजांच्या चरणी प्रार्थना आहे.

सर्वांचा कल्याणेच्छु

ना. य. ढेकणे प्रधान विश्वस्त

# उपायवनवसंत

-डॉ. वासुदेव व्यंकटेश देशमुख

स्मृतोऽप्यवति यो विघ्नं निघ्नमम्बासुत: स्तुत: ।
गन्धर्वस्थ: स हि कलौ सदा वसतु मे हृदि ॥
नमस्ते शारदे देवी वीणावादनतत्परे ।
सरस्वती जगन्माता सा मे बुद्धिं प्रचोदयात् ॥
वासुदेवयतिं वन्दे वामनं मम सद्गुरुम् ।
कवीश्वरं च दत्ताख्यं याचे मतिप्रकाशनम् ॥
दत्तं कवीश्वरं वंदे गणेशं मानुषं परम् ।
यस्य स्मरणमात्रेण चित्तं निर्विषयं भवेत् ।

**आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा आहेव तंतु ।**
**अमूर्तचि मूर्तु । कारूण्याचा ॥१॥**

अमृतानुभव २:१

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमहाराजांनी सद्गुरूंना वसंत ऋतूची उपमा दिली आहे. भगवान सदाशिवांनी मनाच्या लयाचे सव्वा लाख उपाय सांगितले आहेत, असे भगवत्पूज्यपाद योगतारावलीत म्हणतात. एक एक उपाय म्हणजे एक एक वृक्ष असे मानल्यास या सर्व उपायांचे एक मोठे वनच होईल! मानवांच्या रुचींच्या वैविध्याला

अनुलक्षून ऋजू आणि कुटिल असे नाना साधनमार्ग भगवंताने अत्यंत कृपाळूपणे प्रसिद्ध केले आहेत आणि या सर्व साधनरूपी तरूंना बहरून सपुष्पित आणि सुफलित करण्यासाठी सद्गुरुस्वरूपाने ते स्वत:च वेळोवेळा अवतरतात. अशा सद्गुरूंच्या संपर्कात येणाऱ्या साधकांचे साधनवृक्ष सहजच सफळ होतात. तेवढ्यासाठी सद्गुरूंना संतराजांनी 'उपायवनवसंत' असे म्हटले आहे. भ. पू. शंकराचार्यांनीही विवेकचूडामणीत 'शांतो महांतो निवसन्ति सन्ता:। वसन्तवल्लोकहितं चरन्त: ।' अशी वसंताचीच उपमा सद्गुरूंना दिली आहे. दुसऱ्या चरणात सद्गुरूंना, 'आज्ञेचा अहेव तंतु' म्हटले आहे. आज्ञा म्हणजेच कुंडलिनी शक्ती. सद्गुरूंच्या संकल्पमात्रे शिष्याचे संसारपाश तोडीत, षट्चक्रांचा भेद करीत त्याला परमशिवांत मिळवणारी 'चिति शक्ति' ! ह्या चिच्छक्तीचे सौभाग्यसूत्र म्हणजेच सद्गुरू असा दुसरा मार्मिक आणि यथार्थ दृष्टांत ज्ञानेश्वरमहाराजांनी दिला आहे. खरे तर हा सद्गुरू अमूर्त - निराकार आहे. पण तरीही परमकारुण्याची ओतीव मूर्तीच होऊन तो भक्तासाठी आविष्कृत होतो. आपल्या भक्ताविषयी वाटणारी करुणाच त्या अमूर्ताला मूर्त व्हायला भाग पाडते. असा माउलींचा अभिप्राय दिसतो. ह्या आशयघन ओवीच्या आधारे आपण अशाच एका सद्गुरुस्वरूपाचे प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या जीवनकार्याचे, यत्किंचित चिंतन करू.

## मूर्तू कारुण्याचा ...

समोर येणाऱ्या प्रत्येक जीवाला आपले म्हणणे, त्याचे दुःख आपलेपणाने समजून घेणे, त्याला दिलासा देणे आणि शक्य त्या सर्व प्रकारे त्याचे दुःख दूर करण्याचा प्रयत्न करणे, हे जणू श्रीदत्तमहाराजांनी घेतलेले व्रतच होते. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या मते हेच साधुत्वाचे किंवा संतत्वाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. ह्याच एका लक्षणाने संताची ओळख पटते असे त्यांचे प्रतिपादन आहे.

**जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुलें ।।१।।**
**तो चि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।धृ.।।**
**मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचे चित्त ।।२।।**
**ज्यासि आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयीं ।।३।।**
**दया करणे जें पुत्रासी । ते चि दासा आणि दासी ।।४।।**
**तुका म्हणे सांगु किती । तो चि भगवंताची मूर्ती ।।५।।**

श्रीमहाराज पुण्यात असले की दुपारी चार-साडेचारला न चुकता आश्रमात येऊन आपल्या नित्याच्या जागेवर बसत. अर्थात ही जागा त्यांच्या प्रकृतीमानाने बदलली. बरीच वर्षे ते माडीवर श्रीगुरुमहाराजांच्या कक्षाला लागून असलेल्या समोरच्या खोलीत बसत. पुढे डॉक्टरांनी त्यांना जिना चढायला प्रतिबंध केल्यावर ते खालच्या मुख्य दालनात उत्तराभिमुख बसत. हा त्यांचा नित्य नियमच होता. त्या वेळी बरेच भक्त-आर्त, अर्थार्थी आणि जिज्ञासू येत असत. यांत आर्तच अधिक प्रमाणात असत.

जीवनाच्या ओढगस्तीने रंजलेले, परिस्थितीने गांजलेले असत. क्वचित कुणी एकांतात बोलू इच्छित. त्यांना बाजूच्या खोलीत नेऊन त्यांच्याशी बोलत. प्रत्येकाशी ते अत्यंत आदराने वागत. जेव्हा मी स्वत: आर्त होऊन त्यांच्या चरणांच्या आश्रयाला आलो तेव्हा मला बाजूला बोलायचे आहे असे सुचविले. ते लगेच उठले आणि मला आतल्या खोलीत घेऊन गेले. स्वत: पाट घेऊन माझ्यासाठी मांडला आणि मला बसवूनच आपल्या जागेवर बसले. आपल्याकडे येणाऱ्या याचकांविषयीसुद्धा इतका आदर दाखविणाराच खरा साधू असू शकतो ! विद्यार्थ्यांनासुद्धा ते चुकूनही एकेरी बोलले नाहीत. त्यांच्या घरी अध्ययनाला जाणारे त्यांचे एक शिष्यप्रवर वे. शा. सं. भागवताचार्य पारखे शास्त्री सांगतात की, अध्ययनाच्या वेळी मधूनमधून येणाऱ्या आपल्या लहानग्या चिरंजीवांनाही ते आदरार्थी बहुवचनाची योजना करीत. समोरच्याचे दु:ख ते अतिशय जिव्हाळ्याने, सहानुभूतीने ऐकत. त्याला योग्य तो उपाय सांगत. थोडक्यात त्या उपायाचे माहात्म्य एखाद्या गोष्टीद्वारा त्याच्या मनावर बिंबवीत. ह्या उपायाने आपले दु:ख नक्की लवकरच कमी होईल असा आत्मविश्वास त्याच्या मनात जागवीत. त्यांचा निरोप घेताना त्या व्यक्तीचे दु:ख किती तरी हलके झालेले असायचे, दु:खाचा सामना करण्याचे धैर्य निर्माण व्हायचे आणि कालांतराने श्रीमहाराजांनी सांगितलेल्या उपायाने आर्तीचे निवारण होऊन त्याची श्रद्धा दृढतर झालेली असायची. प. पू. योगीराज गुळवणीमहाराजांच्या नंतर पंचवीस वर्षे त्यांनी

अखंडित हे आर्तत्राणाचे कार्य केले. हजारो भक्तांच्या जीवनाला ते आधारभूत झाले. यांपैकी अनेकांना चमत्कारांचीही प्रातिनिधिक अनुभूती आली. आपण इथे काही उदाहरणे पाहू या.

**पं.ल.पं.जांभोरकर** हे श्रीदत्तमहाराजांचे टिळक विद्यापीठातील एक प्रमुख आणि जवळचे विद्यार्थी. यांनीच प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या नावाची संस्कृत पाठशाळा पुण्यात चालविली आहे. विद्यार्थी अवस्थेत त्यांना विद्यापीठातच त्यांच्या मातु:श्री अत्यवस्थ असल्याची तार मिळाली. त्या वेळी ते विद्यापीठात एकटेच होते. बाकीचे सगळे सहाध्यायी गुपचुप गणपती मंदिरात यज्ञासाठी गेले होते. पंडितजींच्या जवळ पैसेही नव्हते. धावत धावतच ते गणपती मंदिरात आले तर इतकी गर्दी होती की मंदिरात प्रवेश करणेही अशक्य. आईच्या काळजीने त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. काही सुचत नव्हते. ते देवळाच्या दाराशीच स्तंभित होऊन उभे राहिले. इतक्यात प. पू. दत्तमहाराज त्यांच्यापुढे उभे असलेले दिसले. त्यांनी काही न बोलता त्यांच्या हातात शंभराची नोट ठेवली आणि एका विद्यार्थ्याला बरोबर देऊन स्टेशनवर पाठविले. जाता जाता आश्वासन दिले. 'काळजी करू नका, आईला बरे वाटेल!' त्याप्रमाणे जांभोरकर गावी जाऊन आईची शुश्रूषा करून महाराजांच्या आशीर्वादाने तिची प्रकृती सुधारताच परत आले. आपण तारेची वाच्यता कुठेच न करताही गुरुजींना ही हकीकत

कशी कळाली ह्याचे त्यांना फारच आश्चर्य वाटले.

**लोकनायक बापूजी अणे** हे सुप्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक आणि विदर्भाचे राजकीय पुढारी यांना मानेच्या मणक्यांचा क्षय झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. त्या काळी स्ट्रेप्टोमायसिन इत्यादी औषधे उपलब्ध नव्हती. त्यामुळे पूर्ण विश्रांती आणि पौष्टिक आहार यांच्यावरच भिस्त होती. प्रकृती सुधारण्याची आशा फारशी नव्हतीच. बापूजी पुण्यात येऊन राहिले. त्या वेळी त्यांना उपनिषदे श्रवण करण्याची इच्छा झाली. पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांचे नाव ऐकून त्यांनी त्यांना आपल्याला उपनिषदे ऐकविण्याची विनंती केली. वाचनाच्या आरंभीच बापूजींच्या तोंडून आपल्या प्रकृतीविषयी काही निराशाजनक शब्द बाहेर पडले. तेव्हा श्रीदत्तमहाराज म्हणाले, 'आपण आता हे वाचत आहोत ना! त्या पठणाच्या प्रभावाने आपली प्रकृती नक्की सुधारेल.' हे वाचन जवळजवळ वर्षभर चालले होते. त्यानंतर खरोखरच बापूजींची प्रकृती उत्तम सुधारून ते सक्रिय राजकारणात सहभागीही झाले. साधुसंतांची अहैतूक करुणा आणि त्यांची संकल्पशक्ती याचे हे उत्तम उदाहरण आहे.

अशी शेकडो- कदाचित् हजारोही उदाहरणे सांगता येतील. इथे फक्त श्रीदत्तमहाराजांच्या सहज अहैतुकी करुणेचाच विचार करायचा आहे. 'बुडती हे जन देखवेना डोळा, म्हणोनि कळवळा येतसे', ऐशा कळवळ्याच्या जातीवरूनच संतांचे संतत्व प्रत्ययाला येते. हे विश्वाचे आर्त त्यांच्या हृदयात प्रकटलेले असते. त्यामुळेच

ते अनाथ, निराश्रित, दीन जनांना पोटाशी घेतात. अगदी आपल्या पोटच्या मुलासारखी त्यांच्यावर माया करतात. त्यासाठीच तुकाराममहाराज त्यांना भगवंताच्या मूर्ती म्हणतात. श्रीदत्तमहाराज हे अशीच कारुण्याची मूर्ती होते.

## उपायवनवसंत ...

**हळूवार मार्गदर्शन-** अंधश्रद्धांची श्रद्धा जागवण्यासाठी, आणि श्रद्धावंतांची श्रद्धा वाढविण्यासाठी साधुसंत वरीलप्रमाणे त्यांचा प्रपंच नेटका करण्यात साह्यभूत होतात. हे खरे असले तरी त्यांचे आणि त्यांना भूतलावर पाठवणाऱ्या ईश्वराचे अंतिम उद्दिष्ट आपल्या भक्तांना जन्ममरणाच्या दुष्ट संसारचक्रातून सोडवण्याचेच असते. प्रापंचिक कारणामुळे का होईना, एकदा ईश्वराभिमुख झालेल्या भक्ताला क्रमाक्रमाने परमार्थाच्या मार्गाला लावून त्याला मुक्त करण्यासाठीच साधुसंतांचा अट्टाहास असतो. प. पू. योगीराज गुळवणीमहाराजांच्या एका ओळीच्या मृत्युपत्रातील आदेशानुसार 'श्रीदत्तमहाराजांनी' आजीवन 'मोक्षाचे मार्गदर्शन' केले. हजारो भक्त, जिज्ञासू, मुमुक्षू आणि साधकांना त्यांच्या अधिकारानुसार त्यांनी मोक्षाची वाट नुसती दाखविलीच नाही तर तिच्यावर अग्रेसर केले आहे. ज्याला जे साहवेल, निभेल तेच साधन त्याला देऊन, संत त्या साधकाची आध्यात्मिक शक्ती टप्प्याटप्प्याने विकसित करीत असतात. त्याची निष्ठा, उत्साह आणि प्रयत्न वाढवण्याकडेच श्रीदत्तमहाराजांचे लक्ष असायचे. त्यांचे मार्गदर्शन हळूवार असायचे. पण ते नेमके, प्रामाणिक आणि

प्रत्ययकारीही असायचे. त्यांच्यासमोर कोणी कितीही चुकीचा प्रश्न आणला तरी त्याला एकदम तोडीत नसत. बऱ्याच वेळा स्त्रिया आणि ब्राह्मणेतर भक्त श्रीगुरुचरित्राचे पठण करण्यास उत्सुक असत. काही स्त्रियांनी एकदा ह्यासाठी त्यांना आग्रहपूर्वक विनंती केली तेव्हा ते म्हणाले, ''वाचणे आणि ऐकणे यांत काय फरक आहे ? ऐकल्याने तेच फळ मिळणार आहे.'' एका ब्राह्मणेतर भक्ताला त्यांनी सांगितले, ''आपण ऐकावे.'' त्यांच्या उपदेशांत आग्रह नव्हता तशीच संदिग्धताही नव्हती. त्यांचा निषेध मृदु होता, बोचरा नव्हता. या त्यांच्या स्वभावाने काही लोकांची अशी समजूत व्हायची की श्रीदत्तमहाराज कुणाचा निषेधच करीत नाहीत. अर्थात हे खरे नव्हते. आपले मत इतरांच्या गळी उतरविण्याचा त्यांचा स्वभावच नव्हता. एकदा एक महिला अस्पृश्य अवस्थेत त्यांच्या घरी आल्या. कुणाला काही न सांगता त्या सगळीकडे वावरू लागल्या. त्यांना श्रीदत्तमहाराजांनी आपल्या खोलीत बोलावून, त्यांना सन्मानाने बसायला खूर्ची देऊन 'आपण इथे बसा,' असे सांगितले आणि त्या जाईपर्यंत तिथेच बसवून ठेवले. 'साच' आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे ॥' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणेच त्यांचे बोलणे असे.

अधिकारी साधकांनाही उपदेश करतांना ते निक्षून एखादे अनुष्ठान करण्यास सांगत नसत. त्याला संकेतानेच सुचवीत. 'रोज थोडे थोडे केले की होते. आपले प्रापंचिक काम सांभाळूनही रोज दोन हजार गायत्रीचा जप केला तर साडेतीन वर्षांत पुरश्चरण होते,'

असे त्यांनी त्यांचे प्रिय शिष्य डॉ. रा. ल. (राजाभाऊ) जोशी यांना एकदा म्हटले. पू. राजाभाऊंनीही तीच आज्ञा समजून आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकीय जबाबदाऱ्या सांभाळून पुरश्चरण पूर्ण केले. यात श्रीमहाराजांनी समोरच्याला जड वाटल्यास त्याला त्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायची सवलत दिलेली असे. त्याच्या मनावर कसलेही दडपण न येता त्याने आवडीने आणि उत्साहाने साधन करावे हेच त्यांना अभिप्रेत होते.

**आदिगुरूंची आयुधे** - अज्ञानी जीव विषयभ्रांतीला भुलून पुनः पुनः सुष्ट आणि दुष्ट कर्मे करतात आणि भवसागरात जन्ममरणरूपी डुबक्या खातात. त्यांच्या उद्धारासाठीच दत्तप्रभूंनी आदिगुरू हा नित्य अवतार धारण केला आहे. प. पू. श्रीदत्तमहाराजांसारखे संतमहात्मे ह्या सनातन आदिगुरूंचेच आविष्कार आहेत. अत्रिवरद या अवताराच्या वर्णनात प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांनी अत्रिवरद ह्या एकाच स्वरूपात दोन मूर्तींची कल्पना केली आहे. उजव्या बाजूचे स्वरूप आदिगुरू आहे तर डाव्या बाजूचे स्वरूप मायावी ईश्वराचे आहे. उजव्या तीन हातांत त्यांनी धारण केलेली आयुधे ही मुमुक्षूंसाठी धारण केली आहेत तर डाव्या बाजूच्या हातातील आयुधे जगताच्या स्थितीसाठी - पर्यायाने कर्मचक्राच्या परिवर्तनासाठी धारण केली आहेत. इथे आपण आदिगुरूंच्या आयुधांचाच विचार

श्रीदत्तमहाराजांच्या संदर्भात करू या.

**माला -**

**दक्षिणेऽस्याक्षमाला तु लसत्यादिगुरो: करे।**
**आदिक्षांता द्विपंचाशद्वर्णास्तैरक्षमालिका ।।३४।।**
**यत्किंचिन्मंत्रजातं तत्सर्वं वर्णात्मकं मतं।**
**सबीजं सरहस्यं तन्मोक्षसाधनमुच्यते ।।३५।।**
**निगमागमसंभूतं गृहीतं दक्षिणे करे ।**
**मुमुक्षुभ्योऽधिकारिभ्यो मंदेभ्यो दातुमेव तत् ।।३६।।**

अत्रिवरदांच्या खालच्या उजव्या हातात माळा शोभते आहे. अ ते क्ष असे बावन्न वर्ण हेच ह्या माळेतील मणी आहेत. सर्व मंत्र त्यांच्या बीज आणि रहस्यांसहित या वर्णांपासूनच झाले आहेत. वेद, शास्त्र, पुराणे, तंत्र यातून प्रकट झालेले हे मोक्षसाधन मंद अधिकाराच्या मुमुक्षूंसाठी आहे. श्रीदत्तमहाराजांचा मंत्रशास्त्रातील अधिकार सर्वश्रुत आहे. साध्या नाममंत्रापासून ते श्रीदत्तमालामंत्रापर्यंत अनेक मंत्र त्यांना सिद्ध होते. त्यांच्याकडून हे मंत्र घेऊन त्यांचा अनुभव घेणारे हजारो साधक आजही आहेत. कवीश्वर वंशपरंपरेत पिढ्यान्‌पिढ्या मंत्रशास्त्राचा अभ्यास आणि अनुष्ठाने होत आली आहेत. हा घराण्याचा वारसा श्रीदत्तमहाराजांनी समृद्ध तर केलाच, पण अधिकारानुसार त्यांचा प्रसारही मोठ्या प्रमाणावर केला. श्रीगणेश, श्रीदत्त, जगदंबा इत्यादी मंत्रांवर त्यांचा विशेष भर होता. कवीश्वरांना वंशपरंपरेने गुरू मानणारे हजारो भक्त आजही महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेले

आहेत. श्रीदत्तमहाराजांना ह्या परंपरेचे गुरुत्व १९७२ मध्ये त्यांच्या पिताजींकडून लाभले. त्याचा त्यांनी मुक्त हस्ताने प्रसार केला. पुण्यात तर ठिकठिकाणहून भक्त येतच असत. पण विशेषाने ते देऊळगाव वगैरे भागांत गेले की त्यांच्याकडे आसपासच्या गावांतून २०-२५ तरी मंत्रेच्छू रोज येत असत. एक्दा देऊळगावला देवाची महापूजा, महाराजाची पाद्यपूजा होऊन जेवायला तीन वाजून गेले होते. तरी मंत्रदीक्षेसाठी आलेल्या साधकांना मंत्र दिल्यावरच महाराज जेवायला उठले.

श्रीदत्तमहाराजांनी स्वत: तर गायत्रीमंत्राचे पुरश्चरण (चोवीस लक्ष जप आणि हवनादी अंगे) केले होतेच. पण त्यांनी अनेकांना असे पुरश्चरण करण्याची प्रेरणा व मार्गदर्शनही केले होते. प. पू. योगीराज गुळवणीमहाराजांनी अनेकांना श्रीदत्तमहाराजांकडून श्रीदत्तमालामंत्र घेऊन त्याचे अनुष्ठान करण्यास सांगितले होते. मंत्रशास्त्राविषयी प्रमाणसिद्ध मार्गदर्शन प्राप्त करण्यासाठी जिज्ञासू त्यांच्याकडे येत असत.

**डमरु -**

**तत उर्ध्वकरे चापि डमरुर्दक्षिणे गुरो :।**
**मुमुक्षभ्यो मध्यमाधिकारिभ्यो मोक्षहेतवे ॥३७॥**
**पूर्वपक्षादिरूपेण शब्दज्ञानप्रकाशकम् ।**
**वेदादिशास्त्र डमर्वायुधेन परिकल्पितम् ॥३८॥**
**नित्यानित्यविवेकाद्यैरुपायैस्तेन सर्वदा ।**
**अनुगृह्णाति भगवान्मुमुक्षुभ्योऽपि मध्यमान् ॥३९॥**

आदिगुरूंचे दुसरे आयुध डमरू आहे. नटराजरूपाने नृत्याचा समारोप करीत असताना याच डमरूतून त्यांनी चौदा नाद काढले. त्याच चतुर्दश विद्या (नृत्यावसाने नटराजराजो ननाद ढक्कां नवपंचवारम्।) हा डमरू हे शब्दब्रह्माचे प्रतीक आहे. वेद, शास्त्र आणि पुराणे यांच्या अध्ययनाने म्हणजेच परोक्ष ज्ञानाने मनुष्य मोक्षाचा अधिकारी होतो. वेदांच्या पूर्वांगातील विधींच्या अनुसार कर्माच्या निष्काम आणि परमेश्वरार्पण बुद्धीने केलेल्या अनुष्ठानाने चित्तशुद्धी होते. नित्यानित्यविवेक, इहामुत्रफलभोगविराग, शमदमादि षट् संपत् आणि तीव्र मुमुक्षा या साधनचतुष्ट्याची प्राप्ती होते. अशा अधिकारी शिष्याला सद्गुरू महावाक्यांचा उपदेश करतात. त्याचे श्रवण, मनन, निदिध्यासन करून जीवाला आत्मदर्शन म्हणजेच अपरोक्ष ज्ञान होते. असा हा ज्ञानमार्ग आहे. प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे या क्षेत्रातील प्रभुत्व हे सर्वविश्रृत आहे. त्यांच्या ज्ञानमार्गाच्या उपासनेवर स्वतंत्र लेखही लिहिला आहे. इथे त्यांच्या ह्या ज्ञानवैभवाचे वितरण त्यांनी अधिकारी शिष्यांना कसे केले ते पाहायचे आहे.

वेदान्ताच्या क्षेत्रात त्यांचे मोठे अधिकारी शिष्य आजही त्यांच्या गुरुत्वाच्या गरिमेची गौरवपूर्ण ग्वाही देत आहेत. त्यांचे वेदान्ताचे गुरू प्रकांड पंडित ब्रह्मश्री नागेशशास्त्री जोशी (उप्पनबेट्टिगिरी) यांचे चिरंजीव पंडितप्रवर ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री आणि नातू पं. राजेश्वरशास्त्री श्रीमच्छंकराचार्य पाठशाला, धारवाडचे विद्यमान प्राचार्य, हे त्यांच्या शिष्यांत अग्रगण्य आहेत.

प्रा. भागवताचार्य डॉ. रा. ल. (राजाभाऊ) जोशी, पं. वसंतराव गाडगीळ, पं. डॉ. त्रिविक्रम ना. धर्माधिकारी, महाराजश्रींचे धाकटे बंधू (कै.) पं. श्रीपादशास्त्री कवीश्वर, पु. विघ्नहरी देव ही काही नावे स्मरतात. या सर्वांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. ह्या सर्वांनी वेदान्ताच्या आणि संस्कृतच्या अध्यापनाचा श्रीमहाराजांचा वारसा आजीवन जोमाने आणि यशस्वीपणाने चालविला आहे. यांच्यापैकी काही शिष्यांचे विचार इथे अगदी संक्षेपाने पाहूया. पू. राजभाऊंना श्रीदत्तमहाराज मूर्तिमंत भागवतच वाटतात. त्यांचे सविस्तर विचार या पूर्वीच प्रसिद्ध झालेले आहेतच. डॉ. धर्माधिकारी म्हणतात की, 'शिकवताना श्रीदत्तमहाराजांच्या गोष्टीतून सतत अनुग्रहच पाझरत राही. ते कापूस पिंजावा तसा विषय पिंजून सांगत. गुरुजींचे ज्ञान सर्वांगीण असे, त्यांच्या सर्वच विद्यार्थ्यांना श्रीदत्तमहाराजांसारखा 'शाब्दे परे च निष्णात' असा गुरू लाभल्याबद्दल धन्यता वाटते. या ग्रंथात इतरत्र ह्या विद्वद्वरांचे लेख समाविष्ट आहेत.

**अनाग्रह आणि समन्वय** - ज्ञानदानाच्या कार्यात श्रीमहाराजांनी यत्किंचितही अभिनिवेश वा पक्षपात दाखविला नाही. श्रीदत्तमहाराज श्रीमच्छशंकराचार्यांच्या अद्वैत संप्रदायाचे निष्ठावंत अभ्यासक होते. पण ही निष्ठा इतर आचार्यांच्या वाङ्मयाच्या अभ्यासाच्या कधीच आड आली नाही. त्यांनी द्वैताद्वैतप्रवर्तक निंबार्काचार्यांच्या 'वेदान्तपरिजातसौरभः' या ग्रंथाचा मराठीत अनुवाद केला आहे. त्यातील भूमिकेत

श्रीमहाराजांची गुणग्राहकता, मतांतरसहिष्णुता आणि उदार दृष्टिकोन प्रत्ययाला येतात. दुसऱ्याचे मत खोडून काढण्यापेक्षा त्यातील सार ग्रहण करून त्याचा आपल्या मताशी समन्वय करण्याचीच त्यांची वृत्ती होती. असे गुरू लाभल्यामुळे त्यांच्या शिष्यातही सांप्रदायिक संकीर्णता नाही. श्रीमहाराज विद्यादानाच्या कार्यात किती उदार होते याचे एक उदाहरण येथे पाहण्यासारखे आहे.

**प्रा. इंगाल्स** - हार्वर्ड या ख्यातनाम अमेरिकी विद्यापीठातील संस्कृतचे प्राध्यापक डॉ. डेनियल इंगाल्स पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत १९५५ च्या आसपास एक वर्ष, भास्कर वेदान्ती यांच्या ब्रह्मसूत्रभाष्याचा अभ्यास करण्याकरिता येऊन राहिले होते. आपल्याला हा ग्रंथ समजावण्याची त्यांची विनंती श्रीमहाराजांनी मान्य केली. खरे तर भास्कर वेदान्ती कट्टर द्वैती. श्री भ. पू. पा. शंकराचार्यांच्या भाष्याचा अभ्यास करण्याचे सोडून ह्या फारशा विदित नसलेल्या द्वैती पंडिताचे भाष्य वाचण्याला त्यांनी संमती दिली हेच त्यांच्या मोठेपणाचे द्योतक आहे. परदेशी विद्वान, प्रामाणिक जिज्ञासेने वाचतो आहे तर करावी त्याला मदत, असाच श्रीमहाराजांचा हेतू असणार. इंगाल्स यांचे यासंबंधी एक पत्र नीलाताई जोशी (बोरिवली) ह्यांच्या 'प्रयाग' या चरित्रात यांनी प्रकाशित केले आहे. त्यांनीही भास्कर वेदान्तीच्या भाष्याला 'Wrong-headed interpretation' असे म्हटले आहे. पण श्रीदत्तमहाराजांच्या मनात काही किंतू

असलाच तर तो त्यांनी अजिबात दाखवला नाही. इंगाल्स यांना वर्षभर तो ग्रंथ शांतपणे विशद करून सांगितला. शेवटी इंगाल्सच म्हणाले की, "शंकराचार्यांचे भाष्य अधिक प्रभावी आणि सुंदर आहे." (Shankara's comment is more powerful and beautiful ....) त्यावर महाराज एवढेच म्हणाले, "शंकराचार्यांचे भाष्य हेच सत्य आहे; हे भास्कर वेदान्तीचे नाही !" (That of Shankaracharya is the truth. This is not. ) या नेमक्या, अनाग्रही शब्दांत श्रीदत्तमहाराजांनी व्यक्त केलेली निष्ठा इंगाल्स यांच्या कायम लक्षात राहिली. ते म्हणतात, "श्रीदत्तमहाराजांची स्मृती माझ्या मनात नित्य जागी राहील. केवळ मला त्यांनी दिलेल्या ज्ञानासाठीच नव्हे तर त्यांच्या प्रामाणिकतेमुळे आणि भारतीय परंपरांच्या सर्वोत्तम आदर्शांवरील त्यांच्या निष्ठेमुळे! (I cherish the memory of Shri DattaMaharaj Kavishwar not only for the knowledge he imparted to me but for the example I found in him of honesty and devotion for the best ideals of traditional Indian Scholarship)

**श्रीमद्भागवतनिरूपण** - श्रुतींचे उपबृंहण (amplification) करणे हेच पुराणांचे उद्दिष्ट असते. वेदांचा - विशेषत: वेदान्ताचा सांगोवा जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठीच व्यासांनी पुराणांची रचना केली. सोप्या भाषेत, रंजक कथांच्या आधारे हा वेदान्त भारताच्या कान्याकोपऱ्यांत पुराणांच्या माध्यमातून पसरला.

भागवत हे पुराण त्यांत सर्वांत श्रेष्ठ मानले गेले आहे. महाराष्ट्रातील संतपरंपरेनेही ह्या भागवत संप्रदायाचाच पुरस्कार आणि प्रचार केला आहे. श्रीदत्तमहाराजांनी अवघ्या सोळाव्या वर्षी आपले सद्गुरू प. प. नरसिंह सरस्वती (दीक्षित) स्वामी महाराजांच्या आज्ञेने पहिला भागवत सप्ताह केला. त्यानंतर आयुष्यभर त्यांनी आसेतुहिमाचल संचार करून भागवत सप्ताह केले. ह्या माध्यमांतून त्यांनी केलेल्या शब्दब्रह्माच्या प्रक्षेपणाचे मूल्यमापन अशक्य आहे. मुख्यत: भक्तियोगाचे पोषण करणारे हे साधन असते तरी त्यातून श्रीदत्तमहाराजांनी अत्यंत प्रभावीपणे अध्यात्मज्ञानाचे वितरण केले आहे. ह्या त्यांच्या कार्यावर सविस्तर प्रकाश टाकणारा 'मूर्तिमंत भागवत' हा ग्रंथ अलीकडेच प्रकाशित झाला आहे. जिज्ञासूंनी तो मुळातच पाहावा अशी विनंती आहे.

**आज्ञेचा आहेव तंतु....**

**चक्र -**

**तत ऊर्ध्वकरेणात्तं तेन चक्रं सुदर्शनम् ।**
**मुमुक्षुभ्योऽप्युत्तमाधिकारिभ्य: सद्य एव हि ।।४०।।**
**अज्ञानध्वान्तनाशेन मुक्तये सुतरां द्युमत् ।**
**सुदर्शनं द्वादशारं गृहीतं निशितं दृढम् ।।४१।।**
**अविद्याकामकर्मात्मभववृक्षनिकृन्तनं।**
**कर्मबंधछेदनेनाऽऽवरणापगमेन च ।।४२।।**
**स्वात्मज्योति:प्रकाशाय चक्रमेकमलं गुरो:।**
**एवं क्रमेण मोक्षोपयोगित्वाच्छ्री गुरोरिदम्।।४३।।**

आदिगुरूंचे सर्वांत वरच्या उजव्या हातात धारण केलेले सुदर्शन चक्र हे आयुध उत्तमाधिकारी मुमुक्षूंसाठी आहे. अज्ञानाचा अंध:कार नष्ट करून, अविद्या, काम आणि कर्म ह्यांच्यापासून उगवलेल्या संसारवृक्षाचे तसेच कर्मबंधाचे छेदन करून मायेची आवरणे मावळवून, स्वात्मज्योतीचा प्रकाश करीत साधकाला सायुज्य मुक्ती देणारे हे तेजस्वी बारा पात्यांचे चक्र सद्‌गुरूंचे सर्वश्रेष्ठ आयुध आहे. ह्या वर्णनात सद्‌गुरूंची संकल्पशक्तीच अभिप्रेत आहे. आपल्या केवळ संकल्पानेच सद्‌गुरूपी परमेश्वर अधिकारी शिष्यांत चिच्छक्तीचे प्रक्षेपण करतो. यालाच शक्तिपात असेही म्हणतात. या देवात्मशक्तीलाच कुंडलिनी असंही नाव आहे. ह्या साधनांत जागलेली चितिशक्ती साधकाच्या सर्व कर्मबंधांचा नाश करीत प्रतिप्रसव क्रमाने मूलाधारापासून आज्ञा चक्रापर्यंतच्या सर्व चक्रांचा भेद करून, सहस्रार चक्रांतील परमशिवाशी एकरूप होते. हाच आत्मसाक्षात्कार, हाच मोक्ष आणि हीच परमसिद्धी होय.

आदिनाथपासून परंपरेने चालत आलेला हा शक्तिपात संप्रदाय विसाव्या शतकात बंगालमध्ये प. प. १००८ गंगाधरतीर्थ स्वामी महाराज यांचे एकमेव शिष्य श्री नाराणतीर्थ देव यांनी प्रचलित केला. त्यांचे प्रशिष्य प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज यांनी भगवती जगदंबेच्या आज्ञेने हा महाराष्ट्रात आणला. त्यांचे शिष्य प. पू. योगीराज गुळवणीमहाराज हे या कुंडलिनी शक्तिपातयोगाचे विसाव्या शतकातील एक महान प्रवर्तक होत. त्यांनीच प. पू.

ब्रह्मश्री दत्तमहाराजांना आपले उत्तराधिकारी नेमून या शक्तिपात योगाची परंपरा चालविण्याची आज्ञा दिली. त्यानुसार त्यांनी आरंभिलेले दीक्षाकार्य आपल्या शेवटच्या आजारापर्यंत अविरत आणि मुक्तपणे चालू ठेवले. ह्या २५ वर्षांच्या काळात त्यांनी हजारो दीक्षा दिल्या पण स्वत:कडे चुकूनही त्याचे कर्तृत्व घेतले नाही की दीक्षांची गणतीही ठेवली नाही. कसलाही गाजावाजा न करता हे कार्य शांतपणे चालू ठेवले.

बहुतेक सर्व दीक्षा पत्राने किंवा तोंडी त्यांना आपापल्या घरी किंवा शक्य असेल तर आश्रमात माडीवर बसायला सांगून झाल्या आहेत. अर्थात् या सर्व दीक्षा संकल्पदीक्षाच होत्या. तंत्रग्रंथातून हीच सर्वांत सूक्ष्म व श्रेष्ठ दीक्षा मानली गेली आहे. बऱ्याच दीक्षा परगावी व परदेशीही झाल्या आहेत. "ठरलेल्या वेळी शुचिर्भूत होऊन बसा म्हणजे गुरुमहाराज कृपा करतील," असेच ते सर्वांना सांगत. बहुतेक सर्व दीक्षेच्छूंना त्यांनी दीक्षा दिली. क्वचित कधी, 'पुढे पाहू' असे म्हटले तर काहींना दीक्षेच्या पूर्वतयारीसाठी काही जपादी सांगितले. त्यांचे दीक्षाकार्य कसे चालत होते, त्याचे लेखकाने पहिलेले एक उदाहरण प्रातिनिधिक आहे. एकदा एक दक्षिण युरोपीय साधक आश्रमात आला व श्रीदत्तमहाराजांची चौकशी करू लागला. त्याने महाराजांना पत्राद्वारे दीक्षेसाठी प्रार्थना केली होती व पत्रोत्तरी महाराजांनी त्याला दीक्षेचा दिनांक व वेळही दिली होती. दुर्दैवाने तो प्रवासात असल्याने ते पत्र त्याच्या मागे फिरत त्याला मिळेपर्यंत तो दिनांक टळला होता. आपल्या मोडक्या

तोडक्या इंग्रजीत त्याने ही हकीकत दुभाष्याद्वारे सांगितली. आपल्याला आता दीक्षा मिळणार की नाही याबद्दल तो साशंक व अधीर झाला होता. महाराजांनी त्याचे बोलणे ऐकून घेतले व एकच वाक्य बोलले. "उद्या वरच्या खोलीत बसायला सांगा." हे त्या परदेशी पाहुण्याला सांगताच त्याला खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी महाराजांनी सांगितलेल्या वेळी तो आश्रमांत माडीवर श्रीगुरुमहाराजांच्या छायाचित्रासमोर येऊन बसला. त्याची तास-दीड तास बैठक झाली. त्याला आम्ही त्याचे अनुभव विचारले. तेव्हा त्याने हाताने संकेत करून त्याला भ्रूमध्यापासून सहस्रारचक्रापर्यंत प्राणाची स्पंदने जाणवली व मन त्यात रमून गेले असे सांगितले. तो भारतात आध्यात्मिक लाभाच्या अपेक्षेनेच आला होता आणि सर्वत्र योग्य सद्गुरूंच्या शोधात फिरत होता. त्याला श्रीदत्तमहाराजांची माहिती मिळताच त्याची त्यांच्यावर मनापासून श्रद्धा बसली व 'आपण यांचीच दीक्षा घ्यायची' असा त्याने निश्चय केला. त्या दिवशी आश्रमात प्रसाद घेऊन तो पूर्ण समाधानाने आपल्या देशी परत गेला.

एकदा दीक्षा दिल्यानंतर श्रीदत्तमहाराज पुन्हा त्याविषयी कधी स्वत:हून बोलत नसत. साधकाने काही शंका विचारल्यास समाधान करण्यापुरते बोलत. अगदी थोडक्यात, एखाद्या वाक्याने क्वचित एखाद्या शब्दानेही साधकाचे समाधान होत असे. साधनेत येणारे अनुभव सांगितलेले त्यांना आवडत नसत. ज्याचे अनुभव त्याच्यासाठीच असतात. इतरांना त्यांचा काही उपयोग नसतो.

असे त्यांचे मत होते. क्वचित त्यांच्या संकोची स्वभावामुळे, किंवा इतर काही कारण असू शकेल त्यांनी स्पर्शदीक्षा, समोर बैठक आणि सामूहिक बैठक यांना टाळलेले दिसते. एकदा एका साधकाने आपण श्रीगुरुमहाराजांप्रमाणे स्पर्शदीक्षा का देत नाही असे विचारलेही होते. त्यावर श्रीदत्तमहाराजांनी, "श्रीगुरुमहाराज बालब्रह्मचारी होते, आम्ही गृहस्थ आहोत." असे सांगितल्याचे ऐकण्यात आहे. बहुतेक सर्व दीक्षा पत्राने किंवा तोंडी त्यांना आपापल्या घरी किंवा शक्य असेल तर आश्रमात माडीवर बसायला सांगून झाल्या आहेत. अर्थात ह्या सर्व दीक्षा संकल्पदीक्षाच होत्या. तंत्रग्रंथातून हीच सर्वांत सूक्ष्म व श्रेष्ठ दीक्षा मानली गेली आहे. बऱ्याच दीक्षा परगावी व परदेशीही झाल्या आहेत.

त्यांची दीक्षा झालेल्या साधकांना जसे अनुभव येत तसेच त्यांची दीक्षा न झालेल्याही अनेक साधकांना त्यांच्या सान्निध्यात आध्यात्मिक प्रगतीची अनुभूती येत असे. अशा त्यांच्या सहज शक्तिप्रक्षेपणाचा लाभ आमच्यासह अनेकांनी घेतलेला आम्हाला विदित आहे. गु. भ. नीलाताई जोशी यांनी त्यांचा असा अनुभव व्यक्त केला आहे. प. पू. आचार्य किशोरजी व्यास (प. प. श्रीगोविंदगिरी स्वामी) यांनी आपला असा अनुभव ते रेणुकानिवासमध्ये श्रीदत्तमहाराजांच्या भेटीला आले असताना सांगितलेला आठवतो. बीडला त्यांच्या दर्शनाला आलेल्या श्री.

पाटांगणकर यांनी पायावर डोके ठेवताच त्यांना क्रिया सुरू झाल्या.

हे जसे वैयक्तिक संपर्कात येणाऱ्या अनेक लोकांचे अनुभव आहेत तसेच श्रीदत्तमहाराजांच्या भागवत सप्ताहांत व इतरही प्रवचनांतून सर्व श्रोतृवृंदांना आल्हादिनी शक्तीच्या अमृतवृष्टीचा प्रत्यय येत असे. सारांश एकांती लोकांती, जनी-वनी श्रीदत्तमहाराजांचे हे शक्तिवितरणाचे कार्य अव्याहत चालू असे. जसा सूर्याचा स्वभावच प्रकाशाने आसमंत उजळण्याचा आहे तसाच श्रीदत्तमहाराजांचा स्वभावच आध्यात्मिक शक्तिपाताने त्यांच्या संपर्कात येणाऱ्या सर्व लहानमोठ्या स्त्री-पुरुषांची मने उजळण्याचा होता. 'शक्तिपाताचा महामेरू' हे श्रीगुरुमहाराजांचे बिरूद त्यांनाही जणू उत्तराधिकाराने प्राप्त झाले होते.

श्रीदत्तमहाराजांच्या गुरुत्वाचे हे काही पैलू मतीच्या मर्यादेत सामावले तसे इथे ग्रंथित केले आहेत. ही अल्पस्वल्प वाक्सेवा श्रीगुरुचरणी समर्पित असो.

* * *

# पू. दत्तमहाराजांचे अलौकिक स्वरूप

- पंडितप्रवर ब्रह्मश्री
भालचंद्रशास्त्री उप्पनबेटगिरी, धारवाड

आपले दत्तमहाराज ५ वर्षे (१९३३-१९३७) इथे होते. पाठशाळेत आमचे वडील पं. ब्रह्मश्री नागेशशास्त्री जोशी उप्पनबेटगिरी यांच्याजवळ वेदान्त आणि न्याय यांचे अध्ययन करीत असत. राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था केळकर वकिलांकडे होती. पहिल्यांदा एकटेच अध्ययनाला होते. त्यांच्यामागोमाग श्रीपादशास्त्री जेरे वाडीकर, विष्णुशास्त्री खरे, नाशिक, गाडगीळ, काशीनाथशास्त्री कोढणीकर आणि फडके होते. 'लोकसत्ता'चे ह. रा. महाजनीही काही दिवस होते.

दत्तमहाराज न्यायशास्त्रातील काही कोट्यामानांवर आम्हा सहाध्यायांना आमच्या वडिलांच्या समोरच आम्हाला सांगत असत. आम्ही त्यांना सहाध्यायी न मानता गुरूंसारखाच त्यांचा आदर करीत असू. त्यांच्या सर्वसाधारण बोलण्यातही कधीही कुणाची निंदा, द्वेष, उपहास इत्यादी दोष आढळत नसत. त्या

वयातही त्यांच्या ठिकाणी भगवद्गीतेत वर्णिलेली (१७ वा अध्याय) सात्त्विक संपत्ती परिपूर्णतेने विराजत होती. दत्तमहाराजांनी वेदाभ्यास, व्रततोरूप तपस्या, शुचिता इत्यादींनी पावित्र्य संपादन केले होते.

पुण्यात शांकर मठात. आमचे वडील गेल्यानंतर, एक वर्ष मी अध्ययनासाठी होतो. तिथे दत्तमहाराजांकडे न्यायशास्त्राचे अध्ययन झाले. आयुर्वेद महाविद्यालयाच्या अनंतराव आठवले यांना न्यायशास्त्राचे अध्यापन करीत असत. त्याच वेळी एका जैन पीठाचे अधिकारी महाराजांकडे न्यायशास्त्राचे अध्ययन करीत असत. त्यांना आम्ही सहज गमतीने विचारले की, ''आपण जैन आचार्यांना न्याय सांगता ते कसे?'' तर ते म्हणाले, ''मी त्यांना वैदिक विषय शिकवत नाही. न्यायशास्त्र हे सर्वांसाठीच आहे.''

टेंबे स्वामीमहाराजांच्या द्विसाहस्रीच्या स्वोपज्ञ टीकेत एका ठिकाणी ब्रह्माला शून्यस्वरूप म्हटले आहे, ते कसे, असे आम्ही त्यांना विचारता ते म्हणाले, ''स्वामी महाराजांचे कसे चुकेल? बरोबरच. त्या ठिकाणी गुणशून्य म्हणजे निर्गुण असा अर्थ घ्यावा,'' असा त्याचा समर्पक अन्वय केला. त्यांची समन्वयशक्ती विलक्षण अशी होती.

कांचीचे शंकराचार्य यांचे कांची मठातून पत्र आले होते. विजयवाड्याला आपण श्रीदत्तमहाराजांना घेऊन यावे. मी दत्तमहाराजांसह विजयवाड्याला गेलो. तिथे दीडशे घनपाठी वैदिक आणि शंभर शास्त्री यांची सभा आयोजित केली होती.

त्या सर्वांच्या उपस्थितीत कांचीच्या परमाचार्यांच्या अध्यक्षतेखाली काही विद्वच्चर्चा झाली. एक एक विद्वान विषय मांडीत. मीही काही विषय सांगितला. विषय सांगताना बहुतेक विद्वानांच्या वक्तव्याच्या वेळी परमाचार्य मधूनमधून काही प्रश्न विचारीत. नंतर दत्तमहाराजांचे निरूपण झाले. साधारण तासभर झालेल्या त्या निरूपणात परमाचार्य काहीही प्रश्न न करता ऐकत होते. त्यांनी काहीही प्रश्न उपस्थित केला नाही. याचे सर्वांनाच आश्चर्च वाटले.

सायंकाळच्या सभेत शेकडो विद्वानांच्या उपस्थितीत परमाचार्यांनी ''पुण्याचे दत्तात्रेयशास्त्री यांनी व्यासपीठावर यावे'' असे सभेत आवाहन केले. तेव्हा दत्तमहाराज तिथे जाताच परमाचार्यांनी आपल्या गळ्यातला बिल्वपत्रांचा हार काढून स्वत:च्या हाताने त्यांच्या गळ्यात घातला. सर्वजण आश्चर्यचकित झाले. कारण परमाचार्य कुणालाही आपल्या हाताने अक्षतासुद्धा देत नसत, काष्ठपात्रांतून इतराकरवी देत असत. त्या दिवशी रात्रीसुद्धा परमाचार्यांनी तास-दीडतास दत्तमहाराजांबरोबर संस्कृतमध्ये शास्त्रचर्चा केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हाला जाण्याची घाई असल्याने श्रीपरमाचार्यांचा निरोप घेण्यासाठी गेलो तर तिथे त्यांच्या दर्शनासाठी हजारो लोकांची गर्दी होती. त्या वेळी व्यवस्थापकांनी आम्हाला परमाचार्यांचे दर्शन होणे अशक्य असल्याचे सांगितले. आम्ही त्यांना फक्त परमाचार्यांना आम्ही निघाल्याचे सांगायची विनंती केली. त्यांनी आमचा निरोप देताच परमाचार्यांनी पडदा

बाजूला करून आम्हाला पाचारण केले. म्हणाले,ते रोजचेच आहेत आपला योग दुर्लभ आहे. पुन्हा बराच वेळ संस्कृतमध्ये दत्तमहाराजांशी बोलणे झाले.

आमच्या पाठशाळेत एकदा ब्रह्मविद्यासभेचे आयोजन केले. त्यानंतर मी एकदा बंगलोरला गेलो असता तिथे परमाचार्यांच्या दर्शनाचा योग आला. त्या वेळी ब्रह्मविद्यासभेला आलेल्या विद्वानांची कांचीच्या परमाचार्यांनी चौकशी केली. त्यातील पांडुरंगशास्त्री ओडलमने, अंकोला, दत्तमहाराज आणि वाडीचे जेरेशास्त्री अशा तीन-चार विद्वानांना परमाचार्यांनी सुवर्णकटक दिले. त्यानंतर एकदा मी पुण्याला दत्तमहाराजांकडे गेलो असता त्यांच्या मंडळींनी मला ते सुवर्णकटक दाखवून ते कांचीच्या आचार्यांकडून आल्याचे सांगितले. त्या वेळी दत्तमहाराज त्यांना म्हणाले, “अहो, त्यांना काय सांगता आहात? ते त्यांनीच पाठविलेले आहे.” अशी त्यांची निरहंकारी वृत्ती अनुपम होती. आमच्यावर त्यांचा अकृत्रिम स्नेह होता.

आमच्या पाठशाळेची पंचाहत्तरी झाली. त्या वेळी श्रीपादशास्त्री जेरे, दत्तमहाराज इत्यादी विद्वान आले होते. सर्व वक्त्यांना पाच-पाच मिनिटांचा वेळ दिला होता. सर्व वक्त्यांनी बोलताना थोडाफार अधिक वेळ घेतला. दत्तमहाराजांनी मात्र बरोबर साडेचार मिनिटांत आपले म्हणणे प्रभावीपणे मांडले. संस्कृत व प्राकृत भाषेत ते अस्खलित, सुसंबद्ध, अव्याहत बोलत. पण वेळेची मर्यादा कसोशीने पाळत. विषयाचा समयोचित

विस्तार किंवा संकोच करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्यांच्या बोलण्यात गांभीर्य असे. विषयाची मांडणी मुद्देसूद आणि प्रभावी असे.

सन १९४५ मध्ये बंगलोर येथे नारायणमहाराजांनी मोठा रुद्रस्वाहाकार केला होता. १३०० वैदिक ब्राह्मण बोलावले होते. दत्तमहाराजही उपस्थित होते. नारायणमहाराज अत्यवस्थच होते. पाच वाजता त्यांचे निर्याण झाले. त्या वेळी त्यांचा पार्थिव देह बेटात न्यावा असा विचार पुढे आला. रेल्वेकडे विचारणा केली तेव्हा नियमात बसत नाही असे कळाले. ते पार्सल म्हणून पाठवले जाईल. इतर वाहनांनी न्यायला २-३ दिवस तरी लागले असते. त्या वेळी दत्तमहाराजांनीच सर्व मंडळींना श्रीमहाराजांचे और्ध्वदेहिक बंगलोरलाच करणे कसे शास्त्राच्या आणि व्यवहाराच्याही दृष्टीने उचित आहे हे पटवून दिले. त्याप्रमाणे ते सर्व कार्य श्रीमहाराजांच्या ऐश्वर्याला साजेसे संपन्न झाले.

श्रावणमासीय दक्षिणासभा, बडोदा येथील न्यायरत्न ही परीक्षा त्यांनी दिली. आमच्यावर त्यांचा अत्यंत बंधुवत स्नेह होता. आमच्या पितांजींचेही त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम होते. ते दत्तमहाराजांविषयी असे म्हणत की, "कवीश्वर हे ज्येष्ठाप्रमाणे सर्व गुणांनी अनुरूप असे विद्यार्थी आहेत." साहजिकच कुठल्याही विद्वत्सभेला विद्यार्थी पाठवताना त्यांची निवड होतच असे. पाठशाळेवर त्यांचे अतीव प्रेम होते. बऱ्याच भागवतसप्ताहांची हजार-हजार रुपयांची दक्षिणा ते पाठशाळेला देत. आश्रमातर्फेही

त्यांनी वर्षाला रु. १०,०००/- ची देणगी सुरू केली. ती आजतागायत चालू आहे. वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या परीक्षा त्यांनी दिल्या. त्यातील न्यायचूडामणी ही सर्वोच्च परीक्षा उत्तीर्ण झालेले ते पहिलेच नैयायिक होते. त्यांच्या परीक्षेसाठी योग्य परीक्षकच नव्हते. वाडीकर नानलशास्त्री आणी दुसरे एक परीक्षक होते. त्यांना दत्तमहाराजांची परीक्षा घेण्यासाठी विशेष अभ्यास करावा लागला.

आम्ही स्वत: न्यायशास्त्राच्या पहिल्या परीक्षेला पुण्याला गेलो. त्या वेळी आमच्या वडिलांनी दत्तमहाराजांना पत्र दिले होते. त्यात 'मोठ्या भावाने धाकट्या भावाचा सांभाळ केला पाहिजे' अशा अर्थाचे एक वाक्य होते. त्यानंतर आमची भोजनाची व्यवस्था तिथे नव्हती. तेव्हा दत्तमहाराज एकटेच रहात होते. तरीही त्यांनी स्वत: स्वयंपाक करून आमच्या भोजनाची सोय केली.

सांप्रत शकटपूर शंकराचार्यांचे गुरुमहाराजांनी तांबरम येथे मोठी सभा आयोजित केली. बंगलोरचे नवीन वेंकटेशशास्त्री नावाचे एक मोठे विद्वान त्या सभेला आले होते. हे वेंकटेशशास्त्री सहाही शास्त्रांत निष्णात होते. आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेने मोठमोठ्या विद्वानांना अडविण्याबद्दल त्यांची प्रसिद्धी होती. वक्त्याच्या निरूपणातली बारीकशी चूकही ते पकडत. एकदा एका वेदान्ताच्या मोठ्या विद्वानांनी 'भाष्यात अमुक विषय असा मांडला आहे' असे सांगितले. लगेच वेंकटेशशास्त्रींनी भाष्यात तसे नसल्याचे सांगितले. शेवटी शहानिशा करण्यासाठी पुस्तक आणविले तेव्हा

वेंकटेशशास्त्रींचेच बरोबर ठरले. विद्वत्सभेत त्यांच्यासमोर बोलायला लोक घाबरतच. मात्र, दत्तमहाराजांनी त्या सभेत विषय मांडायला आरंभ केला तेव्हा व्यंकटेशशास्त्रींनी महाराजांचे बोलणे मान डोलावीत ऐकून घेतले, शेवटी दत्तमहाराजांची प्रशस्ती केली. सर्वांना निरुत्तर करणारे स्वत:च निरुत्तर झाले. दत्तमहाराजांनी अनेक विद्वत्सभांत भाग घेतला. सर्वच विद्वान त्यांचे निरूपण आक्षेप न घेता शांतपणे ऐकत असत. असा त्यांचा त्या त्या विषयातील अधिकार होता.

आमच्याकडे पाठशाळेच्या शताब्दिनिमित्त एक सभा झाली. 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' या सूत्रावर चर्चा चालली होती. शांकरभाष्यात 'अथ' शब्दाचा अर्थ अनंतर असा केला आहे. साधनचतुष्ट्यसंपन्नतेच्या नंतर असा साधारण अर्थ केला जातो. न्यायशास्त्राच्या पद्धतीने अनंतर शब्दाचा ध्वंस (नाश) असा अर्थ केला जातो. त्यानुसार साधनचतुष्ट्याचा ध्वंस झाल्यावर असा शब्दाचा अर्थ निघतो. आम्ही ही शंका मांडली तेव्हा त्या विद्वत्सभेत ह्याचा समन्वय कुणाला करता येईना व साधनचतुष्ट्याचा नाश हा अर्थ मान्य करणेही शक्य नव्हते. तेव्हा दत्तमहाराजांनी त्यांचा समन्वय करीत साधनचतुष्ट्यप्राप्तीच्या क्षणाचा ध्वंस असा अर्थ करून, साधनचतुष्ट्यप्राप्तीचा क्षण गेल्या गेल्या ब्रह्मजिज्ञासेचा अधिकार येतो असे स्पष्ट केले आणि सर्वांचे समाधान केले. उदाहरणार्थ भोजनानंतरम् म्हणजे भोजनाचा नाश झाल्यावर असे नसून भोजन पूर्ण झाल्यावर असा आहे.

अशा मोठ्या थोर महाराजांची जन्मशताब्दी होत आहे असे ऐकून अत्यंत संतोष आहे. वयोमानाप्रमाणे त्या उत्सवात भाग घेण्याची इच्छा उत्कट असूनसुद्धा शक्य होत नाही.

सर्व भक्त मंडळींना महाराजांच्या ज्योतीर्मय आशीर्वादाने सर्वांचे कल्याण होवो अशी प्रार्थना करीतो.

**- भालचंद्रशास्त्री उप्पिनबेटगिरी**

श्रीमज्जगद्गुरू शंकराचार्य संस्कृत पाठशाळा,

धारवाड.

* * *

# सद्गुरू स्वरूप

**पं. राजेश्वरशास्त्री उप्पिनबेटगेरी**
प्रधानाध्यापक,
श्रीमज्जगद्गरू शंकराचार्य संस्कृत पाठशाळा, धारवाड.

जगद्गुरु श्री शंकरभगवत्पादाचार्यांनी आपल्या प्रश्नोत्तर मालिका ग्रंथात कोणाला गुरू म्हणायचे. त्याचे लक्षण (स्वरूप) काय आहे? या प्रश्नाचे उत्तर देत असताना

**''अधिगततत्व: शिष्यहितायोद्यत: सततम्''**

असे सांगितले आहे. तत्त्व जाणणारा व शिष्यांच्या हितासाठी उत्सुक असणारा असा अर्थ केला आहे. तत्त्व म्हणजे ब्रह्मतत्त्व. चतुर्विध पुरुषार्थामध्ये मुख्य मोक्ष म्हणजे आत्मैक्यज्ञान. आत्मा एकच असून जीव उपाधिभेदेन भिन्न भिन्न दिसत असतो. अविद्या निवृत्ती झाल्यानंतर स्वयंप्रकाश आत्मज्ञान होते. नंतर त्या जीवाचे जन्ममरणबंधन नाश पावते. जलात सूर्यबिंब दिसत असते. जल गेल्यानंतर बिंब दिसत नाही. तसाच जीव औपधिक देह धारण करतो. उपाधी गेल्यानंतर स्वयंप्रकाश होतो. यासाठी शेकडो जन्मांची पुण्याई पाहिजे. हे तत्त्व समजणाराच गुरू असतो.

**शब्दब्रह्मणि निष्णातो न निष्णायात् परे यदि ।**

**श्रमस्तस्य श्रमफलो ह्यधेनुरिव रक्षत: ।।**

**(भागवत)**

सर्व शास्त्रांचा अभ्यास करून जो परब्रह्मवस्तू जाणत नाही त्याचे श्रम दूध न देणाऱ्या गाईच्या रक्षणासारखे व्यर्थच होतील. म्हणूनच-

**अधीत्य चतुरो वेदान् शास्त्राणि विविधानि च ।**

**यो वै ब्रह्म न जानाति दर्वीपाकरसं यथा ।।**

**(उत्तरगीता)**

वेदशास्त्रांचा अभ्यास करून जो ब्रह्मतत्त्व जाणत नाही त्याची अवस्था स्वादिष्ट पाकात बुडविलेल्या पण रस न जाणणाऱ्या पळीसारखी होते.

शिष्यहिताबद्दल गुरूंची दृष्टी कशी असते याचा विचार करीत असतां त्रिलोकवीर अर्जुनाचे स्मरण होते. युद्धास तयार झालेला अर्जुन शोक व मोहाने ग्रस्त होऊन धर्मत्याग करायला तयार होऊन

**''यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे**

**शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।।''**

अशी प्रार्थना करतो. त्या वेळी श्रीकृष्णांनी गीतेद्वारे धर्मस्वरूप, कर्तव्य, ज्ञान, कर्म, भक्तींचे स्वरूप सांगून त्याचा मोह नष्ट केला व त्याला युद्धास प्रवृत्त केले. गुरूशिष्यसंबंध काय असतो हे गुरुचरित्रातील दीपकदृष्टांतात प्रसिद्धच आहे.

अध्यापक व गुरू यांच्यात फरक आहे. अध्यापक विद्या

प्रदान करतो. गुरू मोक्षदान देतो. गुरूची वृत्ती अंतर्मुख असते. अध्यापक बर्हिमुख असतो. संसारात दोन व्यक्ती सुखी असतात. एक भोळाभाळा मनुष्य, दुसरा गुणातीत महात्मा ! यदू व अवधूत संवादामध्ये कुमारीच्या दृष्टांताने परमार्थात एकट्याने रहाण्याचे महत्त्व स्पष्ट केले आहे. एक कुमारिका वधू परीक्षेसाठी आलेल्या वरपक्षीयांना जेवण घालण्यासाठी तयारी करीत असते. धान्य कांडताना हातातल्या बांगड्यांचा आवाज ऐकून तो बंद करण्यासाठी एकेक कंकण काढत काढत शेवटी एकच बांगडी उरली. या वरून कलह टाळायचा असेल तर एकट्याने राहावे. हे मी शिकलो. असे अवधूत सांगतात. अनेक गुरूंकडून अनेक विद्या शिकल्या पाहिजेत. अवधूत चोवीस गुरूंपासून चोवीस परमार्थोपयोगी विद्या व गुण शिकले होते.

**"न ह्येकस्माद्गुरोर्ज्ञानं सुस्थिरं स्यात् सुपुष्कलम् ।**
**पृथिवी वायुराकाशमापोग्निश्चन्द्रमा रविः।**
**कपोतोऽजगरः सिन्धुः पतङ्गो मधुकृद्गजः।।**
**मधुहा हरिणो मीनः पिंगला कुररोऽर्भकः।।**
**कुमारी शरकृत् सर्प ऊर्णनाभिः सुपेशकृत् ।।"**

अवधूताने चोवीस गुरूंपासून चोवीस कोणते कोणते गुण शिकले हे स्थूलरूपाने पाहू.

१. **पृथिवी** - कष्टकालात धैर्याने अचल राहणे (वृक्ष व पर्वतापासून परोपकार).

२. **वायू** - प्राणवायूपासून संयम, बाह्यवायूपासून निःसंगत्व

३. **आकाश** - निर्लिप्तता.

४. **जल** - शुद्धता.

५. **अग्नि** - तादात्म्य (जसे लोहवस्तू अग्नीत टाकले तर अग्निस्वरूप होतो).

६. **चंद्र** - त्याच्या कलाप्रमाणे जन्म-मरणांची अनित्यता.

७. **सूर्य** - अनासक्ती (पृथ्वीपासून पाणी घेऊन यथाकाल त्याचा त्याग करणे).

८. **कपोत** - स्नेहबंधनाचा त्याग.

९. **अजगर** - प्रयत्न न करता मिळालेल्या आहारानेच तृप्त होणे.

१०. **समुद्र** - उत्कर्ष (भरती) व क्षय (ओहोटी) या दोन्हींत सम राहणे.

११. **पतङ्ग** - मोहनाश (ज्योतीच्या आकर्षणाने तिच्यावर झेपावून आपला नाश न करणे .) (येथे विपरीत दृष्टांत आहे.).

१२. **भृंग** - सारग्रहण.

१३. **गज** - स्त्रीमोहनाश (हत्तीणीच्या पाठी असलेल्या हत्तीला दुसरा बलिष्ठ हत्ती मारतो).

१४. **मधहा** - कृपणाचे धन दुसऱ्यांनाच जाते.

१५. **हरिण** - विषयत्याग (संगीताने हरिण मोहित होतो. तसे न होणे).

१६. **मीन** - जिव्हालौल्य घातक आहे.

१७. **पिंगला** (वेश्या) - दुराशा सोडणे.

१८. **कुररपक्षी** - परिग्रहत्याग.

१९. **बालक** - निश्चिन्तता आणि निर्विकारता.

२०. **कुमारी** - एकांतवास.

२१. **बाणकृत** - एकाग्रवृत्ती.

२२. **सर्प** - घर न करणे.

२३. **ऊर्णनाभि** - मायावैचित्र्य.

२४. **भृंगकीट** - निरंतर ध्यानाने ध्येयस्वरूप पावणे.

या ठिकाणी काही गुण साक्षात् घेतलेले आहेत. हे सगळे गुण तत्त्वज्ञानासाठी अत्यंत उपकारक असून यातून परमसुख प्राप्ती होते यात संशय नाही.

ललितासहस्रनामात् 'गुरुमण्डलरूपिणी' असे एक नाव आहे. याचे भाष्य लिहताना श्रीसर्वतंत्र स्वतंत्र भास्कररायमखींद्र यांनी असे निरूपण केले आहे.

'गुरवः' परमशिवादिस्वस्वगुरूपर्यन्ताः तेषां मण्डलं परम्परा सैव रूपं निरूपणं अस्याः अविच्छिन्न गुरुपारंपर्यक्रमागतमिदं रहस्यं न तु पुस्तके लिख्यत इति भावः। अत एवोक्तं योगिनी हृदये"

कर्णात् कर्णोपदेशेन संप्राप्तमवनीतले ॥ इति।

येथे आदिगुरू परमेश्वर असून आमच्या गुरुपर्यंत ती परम्परा आलेली आहे. परंपरागत रहस्यविद्या योग्य शिष्यालाच दिली पाहिजे. प्रकट केली तर निर्बल होऊन जाते. म्हणजे गुप्त विद्या रहस्यातच ठेवणारा गुरू होय. तसेच 'गुरुप्रिया' या नावातसुद्धा 'गुरुः प्रियः यस्याः' असे सांगून असा गुरू श्रीभगवतीला अत्यंत प्रीतिपात्र असतो. 'दक्षिणामूर्तिरूपिणी' या नावात 'शिवस्य

दक्षिणाभिमुखीमूर्ति ब्रह्मनारायणादेरध्यापकत्वेन प्रसिद्धा' असे सांगून सदाशिव आदिगुरू आहे असे स्पष्ट केले आहे.

आतापर्यन्त सांगितलेली सद्गुरूंची लक्षणे श्री पूज्य सद्गरू दत्तमहाराजांच्यात होती असे दाखविल्याने सिद्धसाधन होईल. आम्हाला पाठ सांगताना त्यांचे अप्रतिम पांडित्य, विषयनिरूपणशक्ती पाहून आश्चर्य वाटत असे. इतरांना जो विषय मांडायला दोन तास पुरत नसत तो महाराज मात्र दहा मिनिटांत गंभीर शैलीने सांगत होते. ब्रह्मसूत्र शांकर भाष्यावर भामती टीका प्रसिद्ध आहे. त्यातील प्रौढिमा आणि गांभीर्य महाराजांच्या विषय निरूपणात दिसत होते. एकदा धारवाडातील आमच्या पाठशाळेत श्री विद्वान गुरुमूर्तीशास्त्री एक तासभर एका अधिकरणावर बोलले. शेवटी महाराजांनी तीनच वाक्यांत त्याचे तात्पर्य सांगितले.

पुण्यात एकदा चातुर्मास्य याग सुरू झाला होता. त्याचे एक पुस्तक मला आणून द्यायला सांगितले. दिल्यानंतर दहा मिनिटांत पुस्तक परत देऊन दुसऱ्या दिवशी त्याविषयी उपन्यास केला. त्यांची अद्भुत ग्रहणशक्ती पाहून मी दिग्भ्रांत झालो. त्यात त्यांनी, पशू, परोडाश यांचा समन्वय व्यवस्थित लावला होता.

एका भक्ताला दत्तात्रेयांचा मंत्रविधी हवा होता. श्रीपूज्य महाराजांनी मला लिहून द्यायला सांगितले. लिहून दिल्यानंतर मी सहज विचारले, उपदेशाशिवाय मंत्रजप करता येत नाही, असे पाठविले तर ते कसे करू शकतील? त्या वेळी महाराज म्हणाले. "मंत्र लिहिलेले कागद देवापुढे ठेवून नमस्कार करून तो देवाकडून

आला आहे असे समजून जप करायला हरकत नाही.'' पुष्कळ वर्षानंतर तंत्रशास्त्र पाहत असताना महाराजांनी सांगितलेला विषय सांपडला. त्या वेळी त्यांचे ज्ञान व विचार किती खोल व प्रामाणिक होते हे लक्षात आले.

महाराजांचा स्वभाव फारच संकोची होता. कोणालाही एकदम काम सांगत नसत. आश्रमात भागवत सप्ताह प्रारंभ झाल्यावेळी आपले कपडे वरती टाकायला त्यांना जमत नसे. त्या वेळी श्रीगजाननाश्रम स्वामींनी हे मला सांगितले. मी तीन-चार दिवस आग्रहाने त्यांच्याकडून घेऊन सोवळ्यात वस्त्र टाकत होतो. महाराजांना फारच संकोच वाटून दुसरी व्यवस्था केली. मी ज्या वेळी वस्त्र टाकायला गेलो त्या वेळी म्हणाले, ''दुसरी पर्यायी व्यवस्था झाली आहे. आता वस्त्र टाकण्याची आवश्यकता नाही.''

सत्पुरुषांचा स्वभाव असाच असतो. भस्माने झाकलेल्या विस्तवासारखे ते ब्रह्मज्ञानी असतात. अशा सत्पुरुषांचा सहवास मिळायला पूर्वजन्माची पुण्याई पाहिजे. आमच्या सौभाग्याने आम्हाला दोन वर्ष श्रीपूज्य महाराजांचा पवित्र सहवास मिळाला हे माझे मोठे भाग्य आहे. त्यांचे गुणकीर्तन किती केले तरी कमीच आहे. त्यांच्या तेजोमय दिव्य पादुकांना अनंत साष्टांग नमस्कार करून हे दोन शब्द संपवितो.

* * *

# भागवतस्वरूप ब्रह्मश्री दत्तमहाराज

**स्वामी गोविंददेव गिरिजी**
**(आचार्य किशोर व्यास)**

अनर्घ्यरत्नप्रसवा महाराष्ट्र भूमीने मागील शतकात जी अनमोल रत्ने भारतीय समाजास प्रदान केली, त्यामध्ये श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे स्थान उच्च आहे. 'अध्यात्मविद्या विद्यानाम्' या भगवद्गीतेतील उक्तीनुसार सर्वश्रेष्ठ अशा अध्यात्मविद्येच्याच साधनेसाठी तप:पूत धर्मजीवन व्यतीत करणारे, 'संचरिष्णू वेदान्त' हीच ज्यांची ख्याती असे विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील धर्मप्राण, श्रेष्ठ तपस्वी आणि ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज कवीश्वर एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. राजकीय व सामाजिक कार्यात प्रसिद्ध असलेल्या व्यक्तींची नावे वारंवार प्रसिद्धीच्या झोतात येत असतात. परिणामी सर्वसामान्यांना ती ठाऊकही होतात. परंतु काही विभूती दैनंदिन सामाजिक उलाढालींपासून दूर राहूनही आपल्या तपोरूप कर्तव्यात सतत मग्न असतात. त्यांच्या ज्ञानाचा, चारित्र्याचा व आध्यात्मिक साधनेचा समीपस्थ समाजावर स्थायी परिणाम होतो. त्या परिघातील लोकांची जीवनशैली आध्यात्मिकदृष्ट्या उंचावतेच परंतु पुढील अनेक पिढ्यांना हा प्रेरणाप्रकाश प्रभावित करीत रहातो. ब्रह्मश्री पू. श्रीदत्तमहाराजांचे

जीवन समाज मंदिरातील अशा शांत पवित्र व प्रेरक नंदादीपसारखे होते.

श्रीदत्तमहाराज म्हणजे थोर साक्षात्कारी संतांच्या परंपरेतील एक तेजस्वी रत्न आहे. त्या पवित्र परंपरेने लाभलेला व त्यांच्या ठायी मुरलेला ज्ञानसाधना व ईश्वरोपासनेचा कौटुंबिक वारसा, संस्कृतातील न्यायादी शास्त्रांचे सखोल अध्ययन-अध्यापन व त्यातून परिणत झालेली प्रगाढ विद्वत्ता, सर्व भूतमात्रांत ईश्वर पाहणारे हे निखळ साधुपुरुष होते. महाकवीची प्रतिभा, ऋतंभरा प्रज्ञा, अलौकिक धारणाशक्ती आणि परमेश्वरी मेधाशक्ती जन्मत:च बरोबर घेऊन आलेले होते. सनातन परंपरेतील विशुद्ध ज्ञान प्रचलित समाजासमोर परिणामकारकरीत्या मांडणारे प्रज्ञावंत भाष्यकार होते. वेदान्ताचा संदेश प्रसारित करण्यासाठी त्यांनी आपले समस्त जीवन कारणी लावले. जे स्वत: सांगत त्याप्रमाणेच आचरण करण्याच्या मानसिकतेमुळे त्यांना थोर आचार्य संबोधले जाई.

पारंपरिक संस्कार, संस्कृतचे सखोल ज्ञान आणि योगीराज पू. गुळवणी महाराज यांच्या योगपीठाचे उत्तराधिकारी म्हणून लाभलेले अधिष्ठान या त्रिसूत्रींमुळे श्रीमहाराजांचे जीवन व कार्य सुशोभित, संवर्धित आहे आणि हे सर्व पैलू आपापल्यापरीने महत्त्वाचे आहेत. म्हणूनच त्यांचे विस्ताराने विवेचन आवश्यक शक्य व उपयुक्त असे ठरणार आहे.

परंतु या तीनही अधिष्ठान तीर्थांच्या काठाकाठाने त्यांच्या

जीवनात श्रीमद् भागवत कथा प्रवचनाची सुंदर सरिता सातत्याने वाहात राहिली. या पावन, पुण्यशील भक्तिप्रवाहाने त्यांचे जीवन अत्यंत प्रभावित व आध्यात्मिदृष्ट्या सुप्रकाशित झाले. त्यांच्या अंतर्यामी विसावलेली भक्ती इतकी कोमल होती की भागवत कथा प्रवचनात प्रल्हाद आणि ध्रुव यांचे नाव ओठावर येताच सद्गदित अंत:करणाने डोळ्यांतून अश्रुधारांचे सिंचन होत भावभक्तीच्या गहिवरामुळे पुढे बोलणे अशक्य होई. भागवत कथेतील अशा अनेक प्रसंगांच्या वेळी श्रीमहाराजांची भावुकता सहजपणे व्यक्त होत असे. मुळात श्रीमद् भागवत हा थोडीही संवेदनशीलता असलेल्या कुणालाही मानसिक समाधान, बौद्धिक तृप्तता आणि आध्यात्मिक आनंद देऊन भारून टाकणारा ग्रंथ आहे. या दिव्य भागवतामृताला पू. श्रीमहाराजांसारखे सुवर्णपात्र लाभले आणि त्यांच्या संपर्क व सहवासात येणारा प्रत्येक भाग्यवान श्रवण व मानसिक धन्यतेच्या वर्षावात न्हाऊन निघाला.

नरसोबाच्या वाडीप्रमाणेच अमरपुरातदेखील भागवत सप्ताह व्हावा अशी श्री दीक्षित स्वामींची इच्छा होती. श्रीदत्तमहाराज पाठशाळेत संस्कृत शिकायला नुकतेच म्हणजे वयाच्या सोळाव्या वर्षी जाऊ लागले होते. चातुर्मास संपण्यापूर्वी भाद्रपद पौर्णिमेला भागवत सप्ताह अमरापुरात श्रीदत्तमहाराजांनी करावा अशी सद्गुरू श्री दीक्षित स्वामींनी आज्ञा केली. तेव्हापासून अखंडपणे व आजीव श्रीमहाराजांनी भागवत कथा सेवा केली. सुमारे एक हजार भागवत सप्ताह संपन्न करण्याचे फार मोठे ईश्वरी कार्य श्रीदत्तमहाराजांच्या

हातून घडले, परिणामी त्यांचे जीवनच भागवतमय झाले. त्यांचे अंतरंग भागवताशी तद्रूप झाले. भागवताशी त्यांचा तादात्म्य संबंध साकारला. श्री दीक्षित स्वामींनी आपल्या या लाडक्या शिष्याचे केवळ शब्दांनीच कौतुक केले नाही तर एक नौका पताका व फुलांनी सजवून, त्या नौकेत श्रीमद् भागवत ठेवले. तुळस व फुले अर्पण करून भागवताची पूजा केली. भागवताजवळ १६ वर्षीय श्रीदत्तमहाराजांना श्री दीक्षित स्वामींनी बसवून प्रसाद म्हणून उंची शाल श्रीदत्तमहाराजांच्या अंगावर पांघरून चंदन-कुंकू यांचा टिळा त्यांच्या कपाळी लावला व श्री दीक्षित स्वामीत्यांच्या समीप बसले. ती नाव सर्वांना घेऊन कुरुंदवाडपर्यंत गेली व तेथून अमरेश्वरला परत आली. केवढे अलौकिक आणि विलोभनीय असे ते दृश्य होते !

भागवताच्या कथा निरूपणामुळे एरवी सामान्यत: अबोल व गंभीर असणारा हा महान तर्कपंडित, अतीव तन्मयतेने व रसाळ, ओजस्वी वाणीद्वारे भागवतातील भक्तिकथा सांगत असताना इतका रंगून जाई, की तो भगवत प्रेम प्रवाह नेत्रांवाटे ओसंडून वाहू लागे आणि 'वाग्-गद्गदा द्रवते यस्य चित्तं रुदत्यभीक्ष्णम्...' हे भागवतातील भगवंताचे शब्द साकारल्याचा अनुभव येई.

'जाणे भक्तीचा जिव्हाळा, तोचि दैवाचा पुतळा' या संत तुकारामांच्या उक्तीनुसार ते तर दैवाचा पुतळा होतेच, पण अशा संतमुखातून भागवत श्रवण करणारे श्रोतेदेखील सुदैवीच म्हटले पाहिजेत. त्यांच्यासमोर येणाऱ्या भक्ताला त्यांची कृपा प्राप्त होते

अन् नंतरच त्यांचे मुखावाटे शब्द स्रवतात. आपल्या एकाही शब्दाने कुणालाही दु:ख, वेदना होऊ नयेत याविषयी ते सतत सजग होते. ज्या वेळी प्रेमाने ते बोलू लागतात तेव्हा आपण प्रत्यक्ष श्रीगुरुमाऊलीच्या मधुर वात्सल्याचा अनुभव घेत आहोत असे प्रत्येक भक्ताला प्रत्ययास यायचे. जन्मदाते माता-पितादेखील इतक्या मधुर शब्दांत उपदेश करणार नाही असे प्रत्येकास जाणवायचे. त्यांच्या शब्दांतून विरोध करणे, वाद उत्पन्न करणे, स्वत:चा डौल मिरविणे, अन्यांचा उपहास करणे, वेदना देणे, आवेश, कपट असे काहीही नसे. उलट शब्दांमधून अहेतूक दयासिंधू श्रीगुरुमाऊलीचे वात्सल्य, दया आणि करुणा काठोकाठ भरलेली अनुभवास येई. भागवतात सांगितल्याप्रमाणे, गोपाळकृष्णांच्या वेणूचा नाद ईश्वरानुग्रहरूप असल्याने अवीट व अत्यंत सुखावह जसा वाटतो तसे श्रीदत्तमहाराजांच्या उपदेशामृतांचे शब्द या नादब्रह्मासमान असत. त्यामुळे भक्तांना व श्रोत्यांना त्यांचे शब्दचैतन्य व आनंदाचा अनुभव येत असे. त्यांचे शब्द म्हणजे सळसळणाऱ्या चैतन्यमयतेचा जाज्वल्य आविष्कारच होय.

श्रीमहाराजांच्या भागवत-तादात्म्याचा परिचय होण्यासाठी विचक्षणांना त्यांची भागवत कथा श्रवण करणे अनिवार्य नव्हते. त्यांचा संपूर्ण आचार व उद्गार हेच भागवताचे स्पंदन होते.

**सन्तोऽनपेक्षा मच्चिता: प्रशान्ता: समदर्शिन: ।**
**निर्ममा निरहङ्‌कारा निर्द्वंद्वा निष्परिग्रहा:।**

**अकिञ्चनस्य दान्तस्य शान्तस्य समचेतसः।**
**मया सन्तुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशाः॥**

भागवतात सांगितलेली ही सर्व संतलक्षणे त्यांच्यात खरोखरी मुरलेली होती. त्यांचे अत्यंत सहज, साधे, निगर्वी, निरागस, शांत, सहिष्णू, धर्मपरायण व भगवद्भक्तीने युक्त जीवन अंतरंग व बहिरंग दोन्ही अंगांनी भागवतीय विचारांशी इतके एकरूप होत की त्यांना बघून मला चैतन्य महाप्रभूंच्या

**तृणादपि सुनीचेन तरोरपि सहिष्णुना।**
**अमानिना मानदेव कीर्तनीयः सदा हरिः॥**

या श्लोकाचे चालते बोलते उदाहरणच ते वाटत.

महाभारतामध्ये 'आर्जवं ब्रह्म उच्यते' असा उल्लेख आढळतो. येथे आर्जव म्हणजे ऋजुता होय. ऋजुतेलाच ब्रह्म असे संबोधतात. त्यामुळे हेच ब्रह्म ज्या वेळी जगाच्या कल्याण, उद्धार व हितासाठी नरदेह धारण करून या भूतलावर अवतार घेते तेव्हा त्या रूपाने जणू काही ऋजुताच स्थूल स्वरूपात धारण करते असे शास्त्रात सांगितले आहे. श्रीदत्तमहाराजांच्या संदर्भात ही गोष्ट पूर्णांशाने पाहायला मिळते. श्रीदत्तमहाराज हे ऋजुतेची मूर्ती असल्याचे सतत जाणवते.

श्रीमहाराजांच्या आत्यंतिक साधेपणामुळे स्थूल दृष्टीच्या पामरांच्या नजरेत त्यांची महानता न भरली तरी जाणकारांना त्यांची थोरवी ज्ञात होती म्हणूनच महाभागवत पू. श्री डोंगरेजी महाराजांसारखे सत्पुरुष बार्शी येथे स्वतः भागवत कथा सांगत

असताना श्री महाराज मंडपात येत आहेत हे बघून व्यासपीठावरून उठले व साष्टांग नमस्कार करून आग्रहपूर्वक स्वत:च्या व्यासपीठावर श्रीमहाराजांना बसवून त्यांना कथा सांगावयास लावली व स्वत: श्रवणास बसले ते उगाच नव्हे ! सत्पुरुषास अन्य सत्पुरुषाची खरी योग्यता लक्षात येते याचा हा प्रत्यय होता व बार्शीच्या भगवंताने पू. महाराजश्रींच्या योग्यतेची दिलेली ती खरीखुरी पावती होती.

त्यांची निरहंकारिता व नम्रता इतकी सहज होती की त्यांच्या थोरवीची जाणीवही त्यांना कधी झालीच नाही. वासुदेव निवासात पू. पं. आत्मारामशास्त्री जेरे जेव्हा भागवत सांगण्यासाठी येत तेव्हा श्रीमहाराज त्यांच्या व्यक्तिगत सेवेत तत्परतेने वावरत. माझ्या श्रद्धेखातर आमच्या वडिलांच्या वर्षश्राद्ध प्रसंगी भागवत सप्ताहासाठी ते हार्नियाच्या शस्त्रक्रियेनंतर सर्वजण नको म्हणत असतानाही विसाव्या दिवशी आले व रोज ६ ते ७ तास कथा निरूपण केले. सर्वांत कहर म्हणजे एकदा मी त्यांच्या घरी दर्शनास असे सांगून खरोखरी बार्शीस सपत्नीक व पू. ताई महाराजांसह संपूर्ण कथा श्रवण करून वक्त्याचा गौरव वाढविला खराच पण आणखी कळस म्हणजे बार्शीहून निघताना एक मागणी केली म्हणाले मला तुमच्या सुदामा प्रसंगाची कॅसेट द्याल का? हा प्रसंग पाहून मला पुन्हा पुन्हा ऐकावासा वाटतो इतक्या थोर विभूतींच्या या शब्दांनी मी गहिवरलो, किती लिहावे....

**वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम्।**

# पूजनीय दत्तमहाराज एक चालते बोलते शिक्षक

-प्रा. डॉ. रा. ल. जोशी
भागवताचार्य, सोलापूर

पूजनीय दत्तमहाराजांच्याकडे नियमित अध्ययन करण्याचा योग तीन वर्षे व मधूनमधून अध्ययन करण्याचा योग सहा वर्षे आला. या कालावधीत आलेले अनुभव शब्दांकित करणे तेही ५० ते ६० वर्षांनंतर करणे तसे कठीणच आहे. तथापि आज या निमित्ताने उत्पन्न होणाऱ्या स्मृतिमंजूषेच्या साहाय्याने ते तसे करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे महापुरुषाच्या स्मृती जागविण्याने उत्पन्न होणाऱ्या चित्तशुद्धीचा लाभ हे मोठेच फल आहे.

पू. दत्तमहाराजांच्या अध्यापनाची पद्धती कदाचित् वरवर पाहता कळून येणारही नाही. शब्द-शब्दार्थाबरोबरच, विद्यार्थ्याला ग्रंथ समजून घेण्यासाठी आवश्यक असलेली सूक्ष्म विचारशक्ती, समन्वय करण्यासाठी आवश्यक असलेली अनाग्रहवृत्ती, महाराजांच्या अध्यापनातून निर्माण होत असे. 'गुरोस्तु मौनं व्याख्यानं' या सदुक्तीप्रमाणे विद्यार्थ्याच्या

अंत:करणात ज्ञानाग्नीचा स्फुलिंग पेटविण्याचे व त्याद्वारा संशयाचे काहूर नाहीसे करण्याचे कार्य त्यांच्या अध्यापनाने होत असे. खरे तर त्यांच्याकडून शिक्षण घेण्यासाठी विशिष्ट योग्यता आवश्यक असे. ती असली तरच त्यांच्या शिकवण्यातील मर्म कळे. मी शिकत असताना माझी तशी योग्यता नव्हती. ती त्यांच्या कूर्मदृष्टीने त्यांनीच निर्माण केली हे निश्चित. हे आता भूतकाळाकडे नजर टाकली असता कळून येते.

पू. दत्तमहाराजांच्या अध्यापनातील बारकावे त्या वयात समजण्यासारखे नव्हते. आता चिंतन करताना त्याची जाणीव होते. ब्रह्मसूत्र शांकर भाष्यातील सांख्यमताचे खंडन शिकवताना महाराजांची त्यांच्या अंत:करणात भिनलेली सर्व - समन्वयाची वृत्ती जागृत होई आणि न कळत 'शत्रोरपि गुणा गाह्या:' या सुभाषिताने प्रेरित होऊन, ती महाराजांच्या तोंडून प्रकट व्हायची. जणू काही सांख्य-खंडनाने व्यथित होऊन महाराज म्हणायचे, "सांख्यशास्त्राचेसुद्धा आपल्यावर मोठे उपकार आहेत! त्यांनी केलेला आत्मानात्म विवेक हा अतिशय उपकारक आहे, अद्वैत वेदान्तालासुद्धा! पुरुषाचे म्हणजे आत्म्याचे, अत्यंत विशुद्ध स्वरूप प्रतिपादन केलं आहे सांख्यानी!" पू. महाराजांनी आत्मसात केलेली ही वृत्ती आपणही अशीच जीवनात जोपासली तर चित्त दूषित न होता, अधिकच आनंद अनुभवता येईल. असा संपूर्ण आयुष्यात उपयोगी पडणारा उपदेश नकळत त्यांच्या शिकवण्यांतून होत असे.

षड्दर्शन टीकाकार श्री वाचस्पतिमिश्र ज्याप्रमाणे परस्पर विरुद्ध सिद्धान्त प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथावर टीका लिहिताना अत्यंत प्रामाणिकपणे स्वतःचे मत मुळीच प्रकट होऊ न देता त्या त्या दर्शनाचे हृद्‌गत प्रभावीपणे मांडतात त्याप्रमाणेच पू. दत्तमहाराजसुद्धा त्या त्या दर्शनाशी एकरूप होऊनच शिकवीत असत. असे असूनही अद्वैत-वेदान्त सिद्धान्ताशी ते पूर्णपणे एकरूप झाल्याचे कळून येई. याचे कारण म्हणजे अद्वैत-वेदान्त प्रतिष्ठापक आद्य शंकराचार्य व याच सिद्धान्ताचे कट्टर अनुयायी असलेले प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती हे उभयता महाराजांचे उपास्य दैवतच होते.

'संचरिष्णुर्वेदान्तः' (चालता बोलता वेदान्त) असे वर्णन पू. दत्तमहाराजांचे केले जाई. तेसुद्धा ते महाराज होण्यापूर्वीपासून! कवीश्वरगुरुजी एवढेच छात्रवृन्दामध्ये त्यांचे संबोधन असे. चालता बोलता वेदान्त हे त्यांचे वर्णन आम्हाला अक्षरशः अनुभवण्यास मिळाले. वासुदेवनिवासमधून शनिवार पेठेतील त्यांच्या निवासस्थानापर्यंत त्यांच्याबरोबर चालत जाण्याचा व चालताना त्यांचे बोलणे ऐकण्याचा योग हा देवदुर्लभ असे. चालताना त्यांची दृष्टी पायावर असे. अर्जुनाच्या स्थितप्रज्ञविषयक प्रश्नातील 'व्रजेत किम्?' (स्थितप्रज्ञ कसा चालतो?) या अंशाचे उत्तरच जणू काही दत्तमहाराजांच्या चालण्यावरून मिळत असे.

'एकेन विज्ञानेन सर्वं विज्ञातं भवति' (एकाचे ज्ञान झाल्याने सर्वांचे ज्ञान होते.) या छान्दोग्योपनिषदातील सिद्धान्तानुसार पू.

दत्तमहाराजांच्या एका शंकेच्या निरसनाने अनेक शंकांचे निरसन होत असे. कोणत्याही प्रश्नाकडे कसे पहावे; त्याची दुसरी बाजू काय असू शकते हे त्यांच्या सहज बोलण्यातून कळत असे. एकदा स्वत:ला अत्यंत विरक्त आणि त्यामुळेच अतिशय निस्पृह समजणारे एक गृहस्थ 'निस्पृहस्य तृणं जगत्' (म्हणजे निस्पृह व्यक्तीला सर्व जग कस्पटाप्रमाणे वाटते) असे म्हणतात, असे पू. दत्तमहाराजांच्या कानावर आले. निस्पृह व्यक्तीविषयी त्यांना आदरच असे. परंतु त्याचा अतिरेक करून जगाला तुच्छ समजणे त्यांना योग्य वाटत नसे. तो अतिरेक योग्य नाही हे त्यांच्याच शब्दांत प्रत्युत्पन्न बुद्धीने दाखवून देत असता ते म्हणाले 'निस्पृहो जगतस्तृणम्' तर निस्पृह व्यक्तीने आपल्या निस्पृहतेचे भांडवल करून लोकांचा अनादर करणे योग्य नाही एवढेच सुचवायचे असे. अशा प्रकारे साध्या साध्या विषयातून विद्यार्थ्यांना त्यांच्याकडून मार्गदर्शन मिळत असे.

अत्यंत मूलभूत विचार करण्याची शक्ती त्यांच्याकडून कशी प्राप्त होत असे याचे एक अतिशय परिणामकारक उदाहरण आहे. 'ध्रुवासारख्या प्रखर तपश्चर्या केलल्या व्यक्तीलासुद्धा आपल्या सावत्र भावाचा एका यक्षाने वध केला असता उत्पन्न झालेला प्रचंड क्रोध आवरता आला नाही तर सामान्य व्यक्तीला क्रोध जिंकताच येणार नाही. त्याने तसा प्रयत्नच करणे योग्य नाही. त्यात त्याला यश मिळणारच नाही. तेव्हा त्याला तसा उपदेशच करू नये', असे म्हटले तर काय अयोग्य आहे? असे पू. महाराजांना

विचारल्यावर महाराज शांतपणे म्हणाले, "हा काय विचार झाला?" या एका विधानाने जीवनातल्या असंख्य शंकांचे उत्तर मिळाले. तर्कदृष्ट्या कितीही बरोबर असले तरी ते कल्याणकारक असेल तरच स्वीकारावे; अन्यथा त्याचा त्यागच करावा." अशा प्रकारे त्यांच्याकडून जीवन शिक्षणच मिळत असे.

* * *



श्री मयूरेश्वर गणेश मंदिर भूमिपूजन समारंभ



प. पू. दत्तमहाराजांची पाद्यपूजा



प. पू. दत्तमहाराजांना औक्षण करताना




प. पू. दत्तमहाराज प्रवचन करताना



प. पू. दत्तमहाराज प्रवचन करताना
शेजारी ह.भ.प. नागनाथबुवा चऱ्होलीकर आणि ह.भ.प. दंडगेशास्त्री




अखिल भारतीय कीर्तन कुल उद्घाटन समारंभ



प. पू. दत्तमहाराज नारायणस्वामींच्या मठात
श्रीस्वारीसमोर प्रवचन करताना - वाडी



धारवाड पाठशाळा

# प. पू. दत्तमहाराज - स्मरण

पं.दुर्गारामशास्त्री उपाध्ये
गोवा

महनीय व्यक्तींचा सहवास दर्शन ही जशी पुण्यकारक व क्लेशक्षयकारक असतात तसेच त्यांचे स्मरणही अतिशय पुण्यकारक व क्लेशनाशक असते.

पू. दत्तमहाराजांच्या दर्शनाचा व सहवासाचा लाभ पुण्यातील बालसंस्कृत महाविद्यालयात ते शिकवत असताना ज्या विद्यार्थ्यांना लाभला ते खरोखरच भाग्यवान होते. त्यांतही ज्यांनी वेदान्त व न्याय विषय घेऊन त्यांच्याकडून विशेष विद्या मिळविली त्यांचे ते पूर्वसुकृताचेच फळ असे मानावे लागेल. पं. रघुनाथ शास्त्री जोशी, यशवंतराव मराठे, आमचे बंधू पं. अनंतशास्त्री, डॉ. रा. ल. जोशी प्रा. श्री. शं. फडके इत्यादी विद्यार्थ्यांना असे भाग्य लाभले.

माझा ऐच्छिक विषय 'मीमांसा' असल्यामुळे केवळ आवश्यक 'वेदान्तसार'इ. ग्रंथ त्यांच्याकडे शिकण्याची संधी मला मिळाली.

आमचे वडील कै. बाळकृष्ण उपाध्ये दत्तमहाराजांचे सहाध्यायी होते. ब्र. जेरेस्वामींकडे त्यांनी 'सिद्धान्त कौमुदी'चे बरोबरच अध्ययन केले होते.

आमचे आजोबा ब्र. गोविंदशास्त्री उपाध्ये यांना दत्तमहाराज फार मान देत असत. प. प. टेंबेस्वामींचे ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर भेट म्हणून त्यांना देण्यासाठी माझ्याकडे त्यांनी दिले. आजोबांनी लिहिलेल्या प. प. टेंबेस्वामींच्या युवाशिक्षेवरील टीकेचे प्रकाशनही पू. दत्तमहाराजानींच १९४१ मध्ये, श्रीवासुदेवानंदसरस्वतीपीठ अमरापूर या संस्थेतर्फे केले. भगवद्गीतेमध्ये वर्णन केलेली स्थितप्रज्ञलक्षणे त्यांच्या ठिकाणी पाहावयास मिळत. असे सर्व गुण असणारा माणूस हा योगभ्रष्टच असतो. तो महान योग्यांच्या कुळांमध्येच जन्म घेतो. हे सर्व वर्णन पू. दत्तमहाराजांमध्ये दिसून येत असे. त्यांची भव्य प्रसन्न मूर्ती, चेहऱ्यावर प्रकाशणारे ज्ञानाचे दिव्यतेज, असाधारण नम्रता इ. विभूतिमत्व पाहिल्यावर अपरिचित व्यक्तीही त्यांच्यासमोर नम्र होत असे. संस्कृत महाविद्यालयामध्ये आम्हाला त्यांच्याशिवाय तीन गुरुजी शिकवत असत. एक. पं. मा. चि. दीक्षित, दोन - पं. वा. बा. भागवत व तिसरे पं. शि. ह. धूपवर तिघेही महापंडित. पण हे तिघेही पू. दत्तमहाराजांसमोर नम्र होत असत. ते 'गुरुणां गुरुः' होते. हे तिघेही आपल्याला आलेल्या शंका पू. दत्तमहाराजांना विचारीत व तेही त्यांच्या शंकांचे उत्तम निरसन करीत.

पुण्यात एकदा एक मध्वाचार्य आले होते. ते कसबा पेठेत एका शिष्याकडे उतरले होते. त्यांच्याबरोबर अनेक दाक्षिणात्य पंडित होते. त्या वेळी पुण्याच्या पंडितांचे नेतृत्व दत्तमहाराजांकडे होते.

दत्तमहाराजांचे पांडित्य व विवेचन कौशल्य पाहून ते पंडित व मध्वाचार्य आश्चर्यचकित झाले.

पुण्यामधेच सन १९५९ मध्ये एक मोठा सोमयाग झाला. हा सोमयाग सपशुक होता. ते समजल्यावर काही आर्य समाजवाल्यांनी तो याग अशास्त्रीय आहे असे सांगण्यास सुरुवात केली व वादाचे आव्हान दिले. या प्रसंगीही दत्तमहाराजांनी तो याग शास्त्रीय आहे हे सिद्ध करण्यात प्रमुख भूमिका बजावली.

संस्कृत महाविद्यालयात गुरुकुल पद्धतीची वर्गव्यवस्था होती. म्हणजेच गुरूचे स्थान निश्चित असे. गुरूकडे शिष्य जात असे. आताच्या पद्धतीत गुरू शिष्याकडे जातात. आसन व्यवस्थाही जुनीच असे. गुरूंना बसण्यासाठी तक्क्या व गादी असे. विद्यार्थ्यांना सतरंजी. गुरूंना विद्यार्थ्यांनी साष्टांग नमस्कार घातल्यावर पाठाला प्रारंभ होत असे. एखाद्या प्राचीन ऋषीमुनींच्या आश्रमासारखीच ती व्यवस्था होती. गुरुजी ज्ञानमूर्तीच. दत्तमहाराजांचा वर्ग विद्यापीठ इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर होता. त्या मजल्यावर तो एकच वर्ग होता. धीरगंभीर स्वरांत, संस्कृत माध्यमातून ब्रह्मसूत्र, शांकरभाष्य, भामती अद्वैतसिद्धी अशा ग्रंथातील जटिल कूटे सहज सोडवली जात. शारदाच जणू तिथे साक्षात अवतीर्ण होत होती. पू. दत्तमहाराज ज्या वेळी विवरणांत अगदी तल्लीन होत असत त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावरील दिव्य तेज आणखीच विलसत असते. अशा वेळी उजव्या हाताचा पंजा हळूच आपल्या सरल नासिकाग्रावरून महाराज फिरवत असत. दोन तासांमधील मधल्या काळात किंवा रिकाम्या

वेळांत महाराज केव्हाच रिकामे बसलेले दिसत नसत. प. प. टेंबेस्वामींच्या ग्रंथाची आलेली प्रूफे तपासणे किंवा नवीन लेख लिहिणे इ. कामांमध्ये ते नेहमीच व्यग्र असत 'क्षणार्धमपि व्यर्थ न नेयम्' हे त्यांचे तत्त्व असे.

त्या वेळी ते पुण्यात नारायण पेठेत राहत असत. तेथून ते टिळक विद्यापीठवाड्यात (सदाशिव पेठेत) चालत येत असत. त्यांच्या पायात चपला केव्हाच नसत. स्वच्छ करवतकाठी धोतर व तसलेच उपरणे हाच त्यांचा वेष असे. भव्य कपाळावर गंध असे त्यांचे चालणेही मनोहर असे. त्यांच्या चालण्यावरूनही त्यांच्या योगभ्रष्टतेची साक्ष पटत असे. भागवतामध्ये योगभ्रष्ट जडभरताचे वर्णन करताना 'इषुमा त्रावलोकन' असे त्याला विशेषण दिले आहे. 'इषु' म्हणजे बाण. एका बाणाइतकेच अंतर तो पाहात होता. इकडे तिकडे त्याची दृष्टी जातच नसे. योग्यांची सर्वच इंद्रिये नियमित असतात. त्यांतही दृष्टी मुख्य. सामान्य माणूस चालत असताना इकडे तिकडे पाहत चाललेला असतो. ही दृष्टीच माणसाला विविध विषयांकडे ओढून नेत असते. पू. दत्तमहाराज पुण्यामधील गर्दीचे रस्ते ओलांडतानासुद्धा भ्रूमध्यामध्ये दृष्टी ठेवूनच चालत. सामान्य माणूस इकडे तिकडे विशेषत: निरनिराळ्या दुकानांतून पसरविलेल्या विविध वस्तू पाहात चालत असतो. पण पू. दत्तमहाराजांचे चालणे तसे नव्हते. तेव्हाही त्यांची एकाग्रता असे. पू. दत्तमहाराजांशिवाय अशा प्रकारे चालत असणारी कोणतीही दुसरी व्यक्ती मी पाहिलेली नाही; म्हणूनच मी त्यांना योगभ्रष्ट मानतो.

पू. वक्रतुंडमहाराज, धुंडिराजमहाराज अशा महान योग्यांच्या

कुळात यांचा जन्म झाला आणि गीतेत सांगितल्याप्रमाणे या जन्मामध्येही त्यांनी संसिद्धीचाच प्रयत्न केला. लहानपनणीच त्यांना जेरेस्वामी, दीक्षितस्वामी यांसारखे महान गुरू लाभले व मोठेपणी योगीराज गुळवणी महाराजांची संगती लाभली. त्यामुळे ते सिद्ध योगिपुरुषच झाले यात शंका नाही.

पू. दत्तमहाराजांचे चालणे जसे नियमित होते तसे बोलणेही नियमित होते. सर्वच इंद्रियांचा संयम त्यांनी साधला होता. कोणालाही ते कटुशब्द कधी बोलत नसत. विद्यार्थ्यांशी बोलताना केव्हाच ते त्वं कार वापरत नसत. सर्वत्र तुम्हीचाच प्रयोग. लहान मुलांनासुद्धा तुम्हीच प्रयोग करीत. विद्यार्थ्यांना हे जरा विचित्र वाटे. पण ते तो शब्द सहज वापरीत कारण त्यांनी सर्वत्र भगवद्भाव साधला होता. त्यांना नरसोबावाडी, औरवाड (अमरापूर) या क्षेत्रांबद्दल अतिशय प्रेम होते. वर्षातील काही ठराविक दिवसांत त्यांचा वाडीला मुक्काम असेच. पुण्यात राहण्यापेक्षा त्यांना वाडीला राहणे आवडत असे. निवृत्तीनंतर वाडीलाच राहण्याचा त्यांचा विचार होता. पण वासुदेवनिवासची जबाबदारी स्वीकारल्यामुळे ती त्यांची इच्छा शेवटपर्यंत अपूर्णच राहिली.

सनातन धर्मावर त्यांची पूर्ण श्रद्धा होती. सर्व धार्मिक आचार ते कटाक्षाने पाळीत असत. नित्य संध्या व गायत्री जप त्यांचा कधी चुकला नाही. ब्राह्मणाने नित्य गायत्री जप केलाच पाहिजे. असे ते सांगत. मी निवृत्त झाल्यानंतर सन १९९० मध्ये मुद्दाम त्यांना भेटण्यासाठी गेलो व त्यांना विचारले, ‘‘मी आता काय करू? पूर्वी मी नोकरीमुळे अनुष्ठानाला वेळ देऊ शकत नव्हतो. आता माझ्याकडे भरपूर वेळ आहे. त्यांनी लगेचच उत्तर दिले. ‘‘गायत्रीचा रोज जप

करा. ब्राह्मणाला गायत्रीसारखे व्रत नाही' असे सांगून त्यांनी मनुस्मृतीतील एक त्या अर्थाचा श्लोकपण प्रमाण म्हणून सांगितला. त्यांचे बोलणे व वागणे प्रमाणयुक्त असे. वेदविहित ते करावे व निषिद्ध ते टाळावे हे त्यांच्या जीवनाचे सूत्र होते.

नरसोबावाडी, गायत्री व भागवत ही त्यांच्या जीवनातील तीन प्रमुख अंगे होती. डॉ. रा. ल. जोशींना त्यांनी गायत्री पुरश्चरण व भागवत पाठ करण्याचाच उपदेश केला व त्यांनीही तो कृतीने आचरणात आणला. भागवतावर त्यांची नितान्त श्रद्धा होती. भागवत हे त्यांचे जीवनव्रत होते. ते नुसतेच भागवत सांगत नसत तर ते जगत. ते भागवत सांगताना प्रत्यक्ष शुकदेवच भागवत सांगतात असे वाटत असे. वाणी भगवद्गुणानुवादामध्ये, कान त्याच्या कथा ऐकण्यामध्ये, दृष्टी त्याच्या मूर्ती पाहण्यामध्ये, हात त्यांची सेवा करण्यामध्ये, पाय त्याच्या क्षेत्रांमध्ये जाण्यामध्ये मग्न असावेत. त्याचा वस्तुपाठच त्यांचे जीवन होते. भागवत सांगताना ते तन्मय होत. १९९३ मध्ये इचलकरंजी येथे त्यांचा भागवत सप्ताह ऐकण्याचा सुयोग आला. त्या वेळी त्यांच्या एकतानतेचा हा प्रत्यय आम्हाला आला. सप्ताहाच्या वेळीच त्या हॉलच्या वर टेरेसचे दुरुस्तीचे काम चालू होते. त्याचा फार मोठा आवाज होत असे. अधूनमधून वीज जाऊन अंधार पडत असे. श्रोत्यांचे लक्ष विचलित होत असे. पण महाराजांच्या कथा कथनात कोणताही खंड पडत नसे, इतके ते भागवतात तद्रूप होत असत.

१९४८ ते ६० च्या दरम्यान बाल संस्कृत महाविद्यालयाच्या

वसतिगृहात महाराष्ट्राच्या व गोव्याच्या विविध भागांतून आलेले ३०-३५ विद्यार्थी राहात असत. ६-७ वर्षे एकत्र राहिल्यामुळे या विद्यार्थ्यांमधे परस्पर प्रेम निर्माण झालेले असे. त्यांतील काही थोडे पुण्यातच स्थायिक झाले तर काही शिक्षण पूर्ण करून आपापल्या गावी गेले. त्यामुळे इच्छा असूनही या सर्वांची पुनर्भेट होणे कठीण झाले होते. या सर्वांचे गुरुजनांसह एकत्र संमेलन होऊन पुनर्मीलनाचा आनंद प्राप्त व्हावा असे सर्वांनाच वाटत असे. पण ती कल्पना साकार झाली सन १९८४ मध्ये. या संमेलनाला दत्तमहाराज यावेत अशी तर सगळ्यांचीच इच्छा होती. पण ते येणार कसे? त्यांचे अनेक कार्यक्रम पूर्वनियोजित असत. मग त्यावर उपाय काय? त्यांच्या भागवतप्रेमाचा फायदा घेण्याचे आम्ही ठरवले. जर आम्ही भागवत सप्ताह ठरवला तर ते नाही म्हणणार नाहीत याची आम्हाला खात्री होती. भागवत सप्ताह हाच कार्यक्रम त्यामुळे बऱ्याच संमेलनामध्ये निश्चित केला गेला.

## आळंदी १९८७

अन्य पूर्व नियोजित कार्यक्रमामुळे इच्छा असूनही महाराज पहिल्या दोन संमेलनाला येऊ शकले नाहीत. पहिले संमेलन गोव्यात झाले व दुसरे निपाणीला झाले. तिसरे संमेलन १९८७ मध्ये आळंदी येथे साखरे महाराजांच्या मठात झाले. ८ दिवस हे संमेलन चालले. या संमेलनात नाथभागवताचे पारायण झाले. या संमेलनाला शेवटचे ३ दिवस पू. दत्त महाराजांची उपस्थिती लाभली. दोन्ही दिवस संध्याकाळी महाराजांचे वेदस्तुतीवर प्रवचन होते. स्वतः साखरे

महाराज प्रवचनाला उपस्थित असत. तीन दिवस महाराज फक्त वेदस्तुतीच्या पहिल्या श्लोकांतील पहिल्या चरणावर (जय जय जह्यजामजित दोषगृभीत गुणाम्) बोलत होते. वेदस्तुतीचे विवेचन करण्यास मोठे मोठे पंडित घाबरतात. श्रोत्यांनाही तो भाग समजण्यास अति कठीण पण पू. दत्त महाराजांचा तो अतिशय आवडता विषय. सर्वसामान्य कथाकार हा विषय टाळतातच. कारण त्यात कथा भाग नाही. पण इथे दत्तमहाराजांसारखे वक्ते होते व पू. किसनमहाराज साखरे, डॉ. राजाभाऊ यांसारखे तत्त्वज्ञ श्रोते होते. महाराजांनी मायेला अजा का म्हणतात? ती त्रिगुण कशी आहे? हे तीन गुणच कसे दोष आहेत? तिला ठार कसे मारावे व कुणी मारावे? या सर्व गूढ विषयांचे सूक्ष्म विवेचन करून सर्व विद्वानांनाही आश्चर्यचकित केले. दुसऱ्या दिवशी रात्री पू. दत्तमहाराजांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान केले. पू. दत्तमहाराजांच्या उपस्थितीमुळे सर्व विद्यार्थ्यांना व इतरांनाही झालेला आनंद अवर्णनीय होता, विषय कठीण असला तरी आपण काहीतरी अद्भूत ऐकतो आहे अशी जाणीव सर्वांनाच झाली.

## माणगांव १९८८

यानंतरचे संमेलन १९८८ मध्ये माणगावला झाले. हे संमेलन तीन दिवसच असल्यामुळे व सर्वांनाच वाचण्यास सोपे असल्यामुळे दत्तमहात्म्याचे वाचन केले गेले. या संमेलनास तिन्ही दिवस पू. दत्त महाराज उपस्थित होते. या संमेलनाचे निमंत्रक डॉ. रा. ल. जोशी होते. आम्हा विद्यार्थ्यांची १४-१५ संमेलने झाली. पण हे संमेलन सर्वच दृष्ट्या अद्भुत ठरले. एकतर माणगावसारखे प. प. टेंबेस्वामींचे

जन्मस्थळ, पू. दत्तमहाराजांची उपस्थिती व त्यांच्या अपूर्व वक्तृत्त्वाचा लाभ असा हा त्रिवेणीसंगमच होता.

आम्ही संमेलन ठरविले त्या वेळी आमची अपेक्षा केवळ ३०-३५ व्यक्तींचीच (विद्यार्थी व गुरुजन) होती. पण पू. दत्तमहाराज माणगावला गेलेत हे समजल्यामुळे पुणे, इंदूर, नागपूर इ. ठिकाणांहून अनेक भक्त माणगावला पोचले. आम्ही तर सर्व व्यवस्था ३०-३५ लोकांची केलेली. सगळाच गोंधळ होणार असे वाटू लागले. गावही नवा. कोणीच ओळखीचे नाही. पैसेही त्याच अंदाजाने आणलेले. दुपारपर्यंत २००-२५० लोक जमले. पण आश्चर्य असे की कोणतीही अडचण आली नाही. दत्तकृपेने सर्व व्यवस्था आपोआप झाली. पैसा तर इतका न मागता जमा झाला की, शेवटी तो निरनिराळ्या संस्थाना वाटून द्यावा लागला. संस्थेनेही सर्व प्रकारचे सहकार्य दिले. या वेळी सर्वांनाच गुरुचरित्रातल्या गरीब ब्राह्मणाने केलेल्या सहस्र भोजनाचीच आठवण झाली. हे सर्व कसे पार पडले याला पू. दत्तमहाराजांचे अद्भुत सामर्थ्य हेच उत्तर द्यावे लागेल.

या संमेलनामध्ये अनेक भांडी आम्हाला देवस्थानकडून घ्यावी लागली. तिसऱ्या दिवशी पू. दत्तमहाराजांना गोव्याला जायचे होते. व आम्हालाही त्यांच्या बरोबर जाणे आवश्यक होते. सर्व सामान पद्धतशीरपणे परत करण्यास तासभर तरी लागला असता. आम्ही समितीला आमची अडचण सांगितली समितीने सर्व सामान पोहचले आहे, तुमच्यावर आमचा संपूर्ण विश्वास आहे असे सांगितले. सर्व आश्चर्यच !

या संमेलनात पू. दत्तमहाराजांना त्यांना पाहिजे त्या विषयावर बोलण्यास आम्ही सांगितले. त्यांनी विषय निवडला, भागवतातील भीष्मस्तुती. संध्याकाळी दोन अडीच तास प्रवचने होत असे. महाराजांच्या वक्तृत्वाचा तो अद्भूत अनुभव. सर्व मंदिर व परिसर तुडुंब भरलेले. सर्व भक्तजन कानांत प्राण आणून भागवत रसाचे अमृतपान करीत होते हे दृश्य अपूर्व होते. महाराजांच्या मुखांतून जणू प. प. वासुदेवानंद सरस्वतीच बोलत होते. मी महाराजांची अनेक प्रवचने ऐकली. पण त्यामध्ये सर्वश्रेष्ठ अनुभूती कोणती तर या दोन दिवसांतील दत्तमहाराजांच्या प्रवचनांची ! ज्यांनी ती प्रवचने ऐकली ते धन्य होत! जणू सर्व भागवताचा रसच आटवून त्या प्रवचनात आणला होता. सर्वच अपूर्व. भागवत ग्रंथच भक्तिरसाचा अर्क आहे. पण भीष्मस्तुती हा त्या अर्काचाही अर्क आहे. ती वाचतांनाही शरीर रोमांचित होते. मन पुलकित होते. मग साक्षात दत्तमहाराजांच्या मुखारविंदातून ते ऐकतांना श्रोत्यांची काय अवस्था झाली त्याची कल्पनाच केलेली बरी. शरपंजरी पडलेला भीष्म, त्याच्यासमोर उभा असलेला शंखचक्रगदापद्मधारी श्रीकृष्ण महाराजांना व श्रोत्यांना प्रत्यक्ष समोर दिसत होता.

ज्यांना संपूर्ण भागवत वाचणे शक्य नसेल त्यांनी केवळ भीष्मस्तुती वाचावी. सर्व भागवतच त्यात समाविष्ट आहे. महाराज त्या वेळी भीष्म झालेले होते. करुणामय वाणीने श्रीकृष्णाला जणू आत्मनिवेदनच करीत होते. महाराज हे भीष्मच होते. जीवनातील अनेक आपत्तींना भीष्माप्रमाणेच त्यांनी धैर्याने तोंड दिले होते.

(महाराजांचा मृत्यूही भीष्मासारखाच होता. त्यांना मृत्यूच्या वेळी भगवत्स्मरण होते; असे त्या वेळी तेथे उपस्थित असलेले डॉ. रा. ल. जोशी सांगतात.)

भीष्माने आपल्या स्मृतिपटलावर कोरलेली श्रीकृष्णांची अनेक चित्रे त्यांनी श्रोत्यांसमोर उभी केली.

घोड्यांच्या टापांनी उडालेल्या धुळीने माखलेला, घामाने डबडबलेला व भीष्माच्या बाणांनी ज्याचे कवच छिन्न झालेले आहे असा श्रीकृष्ण अर्जुनाच्या विनंतीवरून दोन्ही सैन्यांच्या मध्ये रथ उभा करून आपल्या कटाक्षानेच कौरव सैन्याचा नाश करणारा श्रीकृष्ण, अर्जुनाला गीतोपदेश करणारा श्रीकृष्ण, आपली प्रतिज्ञा मोडून भक्त प्रतिज्ञा खरी करण्याकरता रथचक्र घेऊन भीष्म वधाकरता प्रवृत्त झालेला श्रीकृष्ण, अशी विविध श्रीकृष्ण चित्रे त्यांनी सर्वांसमोर उभी केली व शेवटी भीष्माने मन, वाणी व दृष्टी ह्यांच्या वृत्तींनी श्रीकृष्णामध्ये आपल्याला कसे समाविष्ट केले, तो त्याच्याशी कसा एकरूप झाला हे सांगून श्रोत्यांना भक्तिरसाच्या समाध्यवस्थेचा साक्षात्कार घडवून आणला.

## गोव्याला भेट

असे हे दत्तमहाराजांच्या विद्यार्थ्यांचे संमेलन म्हणजे सर्व आश्चर्यच! दत्तमहाराज हे एक विभूती होते. याचा साक्षात्कार त्या वेळी सर्वांनाच झाला. संमेलन आटपून महाराज गोव्याला आले. गोव्याला महाराजांची ही दुसरी भेट. पहिली भेट सन १९७० सालीये वेदमूर्ती ब्र. विठ्ठलशास्त्री बोरकर यांच्या सत्तरीच्या निमित्ताने झाली

होती. त्या वेळीही भागवत सप्ताहासाठी त्यांना बोलावले होते. आठ दिवस त्यांचा मुक्काम गोव्यात होता. याच दिवसांत त्यांनी आमच्या घरी येऊन त्यांचे सहाध्यायी असलेल्या आमच्या वडिलांची भेट घेतली. अनेक दिवसानंतरच्या भेटीमुळे दोघांनाही अतिशय आनंद झाला. रात्री महाराजांनी विजयदुर्गा मंदिरास भेट देऊन देवीमहात्म्यावर प्रवचन दिले. दुसऱ्या दिवशी आलं केरी येथील दत्तमंदिराला भेट देऊन दत्तमाहात्म्याचे निरूपण केले. याच दिवसांत त्यांना प. प. टेंबेस्वामींचे शिष्य ब्र. परशुराम भेट शिकेरकरही भेटले. त्यांनी महाराजांना मोठ्या आग्रहाने आपल्या घरी नेले. ते टेंबेस्वामींचे शिष्य असल्यामुळे महाराजांना त्यांची विनंती नाकारता आली नाही. पू. दत्तमहाराजांच्या मनात प. प. टेंबेस्वामीविषयी विलक्षण श्रद्धा होती.

गोव्याच्या दुसऱ्या भेटीत मात्र ते फर्मागुडी येथे एकच दिवस राहिले. कारण दुसऱ्या दिवशी रात्री कोल्हापूरला जाऊन त्यांना रेल्वेने पुण्याला जाणे आवश्यक होते. गोव्यात कै. श्रीपाद अळवणी हे गुळवणी महाराजांचे शिष्य होते. त्यांचा मठ फर्मागुडी येथे आहे. त्यांनी पू. दत्तमहाराजांनी आपल्या मठाला भेट द्यावी म्हणून पुष्कळ प्रयत्न केले होते. पण ते साध्य झाले नव्हते. पू. दत्तमहाराज माणगावहून परस्पर कोल्हापूरला जायचे होते. डॉ. राजाभाऊ जोशी यांनी विनंती केल्यामुळे त्यांनी आपल्या कार्यक्रमात थोडा बदल करून गोव्याची ही भेट घडवून आणली.

या भेटीत त्यांनी 'श्री दत्त निवास' या श्रीपाद अळवणी यांच्या मठाचे उद्‌घाटन केले 'श्रीदत्तनिवास' हे नाव पण त्यांनीच सुचवले. 'श्रीदत्तनिवास' या शब्दांतील निवास शब्दाचे औचित्य सांगताना त्यांनी ''गतिर्भर्ता प्रभु: साक्षी निवास: शरणं सुहृत-प्रभव: प्रलय स्थानं निधानं बीज मव्ययम'' हा श्लोक म्हणून हा कोणत्या ग्रंथातील आहे असा प्रश्न श्रोत्यांना विचारला. सर्वांनाच तो विष्णुसहस्रनामातील वाटला. पण तो गीतेच्या नवव्या अध्यायातील आहे हे महाराजांनी सांगितले. 'वासुदेव निवास', 'वामन निवास' इ. 'निवास' शब्दयुक्त नावे ठेवताना त्यांतील गर्भितार्थ, त्या शब्दाच्या गतिर्भता इ. सर्व छटा त्यांना सूचित करायच्या होत्या असे यावरून दिसून आले.

याच वेळी आमचे वडील बंधू कै. अनंतशास्त्री यांचीही त्यांच्याशी भेट झाली. अनंतशास्त्री हे दोन्ही पायांनी अपंग होते. महाराजांचे त्यांच्यावर अतिशय प्रेम होते. दत्तमहाराजांकडे त्यांनी १० वर्षे वेदान्ताचे अध्ययन करून वेदान्त पारंगत व जैन दर्शन पारंगत या पदव्या मिळवल्या होत्या. वाईच्या धर्मकोशाच्या ५-६ खंडाचे त्यांनी संपादन केले होते. गोव्यातील कवळे येथील पाठशाळेतही बरीच वर्षे त्यांनी अध्यापनाचे काम केले. उद्‌घाटनाचा कार्यक्रम झाल्यावर महाराज कोल्हापूरमार्गे पुण्याला रवाना झाले. केवळ शिष्यप्रेमामुळेच त्यांनी हा असा लांबचा प्रवास केला.

## इचलकरंजी १९९३

या नंतरचे संमेलन इचलकरंजी येथे सन १९९३ मध्ये झाले. या संमेलनात भागवत पारायण हाच मुख्य कार्यक्रम होता. सकाळी

सर्व विद्यार्थी भागवत पारायण करीत असत व सायंकाळी पू. दत्तमहाराज निरूपण करीत असत. महाराजांचे निरूपण संथ व एका लयीत असे. संक्षेपत: भागवतातील सर्व भाग ते सांगत असत. आजकाल भागवत कथाकार भागवत थोडेसे व इतर रंजनाचा भागच जास्त आणतात. हिंदी कथाकारांचा तर नाच गाण्यातच जास्त वेळ जातो. वेदस्तुती पंचम स्कंधातील खगोल, भूगोल यांना तर ते हातही लावत नाहीत. महाराज यातील कोणताच भाग टाळत नसत. शिवाय तो सांगत असतानाच आजच्या खगोल, भूगोल ज्ञानाशी त्याची सांगडही घालत असत. भागवतात खगोल वर्णनात (स्कंध ५ अ २२) चन्द्रलोक सूर्यकिरणांच्याही पलीकडे १ लाख योजने दूर आहे असे वर्णन आहे. प्रत्यक्षात चंद्र सूर्याच्या कितीतरी अलीकडे आहे.

मग भागवतातील वर्णन चुकीचे आहे का? या शंकेवर पू. दत्तमहाराजांनी उत्तम उत्तर दिले. ते म्हणाले, ''भागवतात सांगितलेला चन्द्रमा हा आम्हाला दिसणारा चन्द्रमा नसून वेगळाच चन्द्रमा आहे.'' असा हा इचलकरंजीत भागवताचा सोहळा ८ दिवस चालला. जालन्याहून पू. ताईमहाराज पण आल्या होत्या. इचलकरंजीचे लोक पण सप्ताहात सहभागी झाले होते. इचलकरंजीचे कै. गोपाळ जोशी हे या संमेलनाचे निमंत्रक होते. त्यांनी महाराजांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार केला.

## पुणे १९९३

यानंतरचे संमेलन पुण्यामध्ये सन १९९३ मध्ये झाले. हे पं.

लक्ष्मीकांत जांभोरकर यांनी निमंत्रित केले होते. उदकशांत, दत्तयाग, गणेशयाग इ. कार्यक्रम संपन्न झाले. पू. दत्तमहाराजांना निमंत्रण देण्यासाठी मी आणि एक विद्यार्थी त्यांच्या घरी गेलो व त्यांना संमेलनाचे निमंत्रण दिले. पू. दत्तमहाराजांनी आमंत्रण स्वीकारले व आपली संमेलनाला वर्गणी म्हणून रु. २५ आमच्याकडे दिले. मी त्यांना म्हणालो, ''हे विद्यार्थ्यांचे संमेलन आहे. आपल्याकडून पैसे कसे घेऊ?'' महाराजांनी लगेच प्रतिप्रश्न केला... ''म्हणजे मी विद्यार्थी नाही का?'' या त्यांच्या प्रश्नाने आम्ही स्तिमित झालो व त्यांनी दिलेले पैसे स्वीकारणे आम्हाला भाग पडले.

## विद्यार्थी

पू. दत्तमहाराज जन्मभर विद्यार्थीच होते. खरे म्हटले तर पूर्व सुकृताने त्यांना सर्व विद्या जन्मतःच प्राप्त होत्या. प. प. टेंबेस्वामींचा त्यांना आशीर्वाद लाभला होता. त्यांना अध्ययनाची गरजच नव्हती. पण योगी लोक लोकव्यवहार सांभाळून लोकांना मार्गदर्शन करत असतात. संमेलनाला वर्गणी देऊन त्यांना विद्यार्थ्यांनी सर्व जन्मभर विद्यार्थी रहावे हाच उपदेश करावयाचा नसेल ना?

आपल्या प्रवचनांतून कधी कधी ते नर्म विनोदही करीत असत. पण गंभीर विषय गंभीरपणेच मांडत असत. विनोदाचे त्यांना वावडे नव्हते. रघुवंश तर त्यांना तोंडपाठच होता. रघुवंशातील एखादा प्रसंग सांगून विनोद करणे त्यांना फार आवडे . वासुदेवनिवासामध्येही ते रिकाम्या वेळात रघुवंशासारखे ग्रंथ लोकांना शिकवत असत.

अध्यापन व अध्ययन ही दोन्ही व्रते त्यांनी केव्हाच सोडली नाही.

माणगावच्या संमेलनात भाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना देण्यासाठी म्हणून मी काही सप्तशती गुरुचरित्राची पुस्तके त्यांच्याकडे भेट देण्यासाठी दिली. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना दिल्यावर मीही ते पुस्तक त्यांच्या हस्ते मिळावे म्हणून त्यांच्याकडे गेलो. मला त्यांनी पुस्तक दिले व रघुवंशातील एक ओळ म्हटली, 'यत्र दाता गृहीता च स्वयं कुशिकनन्दन' तुम्हीच जर पुस्तके दिली आहेतं तर तुम्हीच ते कसे घेता? जो देणारा तोच ग्राहक कसा होऊ शकतो? असा प्रश्न त्यांनी विनोदाने मला केला. अर्थात हा प्रश्न विचारण्यात विनोदाशिवाय दुसरा कोणताही इतर अर्थ नव्हता. 'हे कर, हे करू नको' असे त्यांनी केव्हाही सांगितले नाही. प्रवासामध्येही ते सहसा आपले धोतर इ. कपडे दुसऱ्याला धुऊ देत नसत.

## सोलापूर १९९०

सन १९९० मध्ये ते राजाभाऊंच्या सत्तरीच्या निमित्ताने सोलापूरला आले होते. दोन दिवस त्यांचा सोलापूरला मुक्काम होता. दुसऱ्या दिवशी मी त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेलो. भेट झाल्यानंतर त्यांच्याबरोबर असलेले एक सहकारी मला म्हणाले, "महाराजांना औषध घेण्यासाठी द्राक्षांचा रस पाहिजे! तुम्ही आणाल का?" मला अतिशय आनंद झाला. महाराज कोणाकडेच काही मागत नसत. मला हे माझे मोठे भाग्यच वाटले. मी लगेच द्राक्षे आणण्यासाठी निघालो. पहिल्या दिवशी बऱ्याच ठिकाणी द्राक्षांचे गाडे फिरताना पाहिले होते पण त्या दिवशी अर्धा तास फिरलो तरी

द्राक्षाचा गाडा सापडेना. मला वाटले महाराज माझी परीक्षा तर घेत नाहीत ना? शेवटी अर्ध्या-पाऊण तासानंतर एक गाडा दिसला. मला परमानंद झाला. मी द्राक्षे घेतली व आणून त्यांच्या सहकाऱ्यांकडे दिली. महाराजांना द्राक्षे दिल्यामुळे मला धन्य धन्य वाटले!

असे किती प्रसंग व आठवणी सांगाव्यात, लोकांच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या नसल्या तरी माझ्या दृष्टीने त्या फार महत्त्वाच्या आहेत. मी त्या माझ्या हृदयस्फुटांमध्ये जपून ठेवल्या आहेत. या प्रसंगाचे स्मरणही मला अतिशय आनंद देणारे आहे.

### नरसोबावाडीतील भेटी

नरसोबावाडी व अमरापूर ही दोन्ही त्यांची श्रद्धाक्षेत्रे होती. दत्तमंदिराची सुधारणा, अमरापूरचा घाट इ. सर्व कार्ये वासुदेवनिवास, वामननिवास प्रमाणेच त्यांच्या कार्याची स्मृती करून देतात. नरसोबावाडीचे ब्राह्मण त्यांना दत्तावतारच मानतात. काही ब्राह्मणांच्या घरातून जेथे ते १-२ दिवसही राहिले, त्यांची स्मृती जपून ठेवली आहे. काहींना त्या भागाचे देवघरच केले आहे. नरसोबावाडीत मी त्यांना दोन वेळा भेटलो. एकदा त्यांच्या घरीच भेटलो. भेटीनंतर ते माझ्याबरोबरच दत्तमंदिरामध्ये जाण्यास निघाले. निघताना मला त्यांनी माझ्या चपलांची आठवण केली. तुमच्या चपला असतील ना? असे त्यांचे वाक्य मला आजही आठवते. वाडी हे दत्तभक्तांचे वृंदावन आहे. तिथली धूळही पवित्र आहे. ती अंगाला लागली पाहिजे. तेथे चपला घालू नयेत असे तर या एका

वाक्यात सुचवायचे नव्हते ना?

ही भेट १९८४ मध्ये झाली. दुसरी भेट १९८६ मध्ये झाली. या वेळी ते नारायण स्वामींच्या मंदिरासमोर प्रवचन करत होते. त्या वेळी कोणत्या तरी आजारामुळे त्यांचा घसा बसलेला होता. श्रोते जास्त नव्हते. २५-३० असावे. पण त्यांच्यापर्यंतच त्यांचा आवाज जात नव्हता; खरे म्हटले तर त्यांना विश्रांतीचीच आवश्यकता होती. तरीही ते प्रवचन करत होते. कारण त्यांना नित्यनियम चुकवायचा नव्हता. औरवाडचा, त्यांनी अगदी बालपणी सुरू केलेला भागवत सप्ताहही ते केव्हाही चुकवत नसत. त्यांना वार्धक्यामुळे तो करणे अशक्य झाले, त्या वेळी त्यांनी तो डॉ. राजाभाऊंना करण्यास सांगितले. आज तो बंद झालेला असला तरी दत्तमहाराजांची स्मृती म्हणून तेथील मंडळींनी तो चालू ठेवावा असे मला वाटते.

पू. दत्तमहाराजांच्या गुरुत्वाचे वर्णन काय करावे? ब्र. वरदानंदांसारखे सर्व भारतामध्ये विश्रुत असलेले व ज्यांनी भीष्माप्रमाणेच कृष्णप्रतिमा समोर ठेवून देहविसर्जन केला त्यांचे दैवत होते दत्तमहाराज. उगारसारख्या ठिकाणी राहून अत्युग्र साधना व कठोर तपश्चर्या करून शेवटी गंगेमध्ये देहविसर्जन करणाऱ्या श्रेष्ठ तपस्वी नारायणनंदांचे प्रेरणास्थान होते दत्तमहाराजच!

पुण्यामध्ये राहणारे, प्रज्ञाचक्षू असूनही तपस्वी जीवन जगणारे व अनेक संस्कृतप्रेमींची प्रेरणा व आश्रयस्थान असलेल्या कै. यशवंत मराठे यांचे आराध्य दैवत होते, दत्तमहाराज! गाणगापूरमध्ये एकभुक्त

राहून अखंड ५० वर्षे संगमावरील पादुकांचे अर्चन करणाऱ्या कै. वामनराव शिकेरकरांचे पूजास्थान होते दत्तमहाराज !

आजही डॉ. रा. ल. जोशी, डॉ. विघ्नहरी देव यांसारख्या अनेक विद्वानांच्या हृदयांमध्ये नित्य पूजले जाणारे दैवत आहे दत्तमहाराजच. अशा या दिव्यविभूतीला माझे अनंत प्रणाम.

* * *

# जयन्ति सुकृतिनो योगसिद्धाः कवीश्वराः

-डॉ. श्रीधर शंकर फडके
एम्. ए. पी.एच्.डी. (संस्कृत)
पो. फातोर्डा, ४०३६०२

१९५४ हे वर्ष असावे ते. नुकताच १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन लपत छपत साजरा केला होता. स्वातंत्र्याची चळवळ गोमंतकात हळूहळू उग्र रूप धारण करत होती. गोवामुक्ती चळवळ जोरात चालू झाली होती. राजकीय अस्थिरता असली तरी व्यवहार चालू होते. रेल्वे धावत होती. भारत सरकार व पोर्तुगीज सरकार यांचे राजकीय संबंध होते.

१९५४ च्या जून महिन्यात टिळक विद्यापीठाची एक जाहिरात केसरीत आली. टि. म. वि. च्या वसतिगृहात संस्कृत शिकणारे विद्यार्थी घ्यायचे आहेत. मला ती जाहिरात वाचून अत्यंत आनंद झाला. माझ्या काकांना ती जाहिरात दाखवली व त्यांना म्हटले की 'मला पुण्याला जायचे आहे? काका म्हणाले 'जाऊ या.' त्यांच्या होकारानिशी मी पुण्याला जायची तयारी केली. बोटात

एक सोन्याचे जोडवे होते ते २० रु. ना विकले व पैसे जमवले व १२ जुलै १९५४ हा पुण्याला गेलो.

भागवत गुरुजींना भेटलो व वसतिगृहात प्रवेश मिळवला. त्या काळात गोव्यातील व कोकणातील विद्यार्थी एस. एस. सी. नंतर टिळक म. विद्यापीठात येत असत. पुण्यासारख्या ठिकाणी राहण्याची सोय होत होती. संस्कृत शिकता शिकताच कॉलेज शिक्षण घेण्याची मुभा होती. माझ्या बरोबरच कोकणातून कणकवलीचे गणेश श्री. करंबेळकर आले होते. बेरीचे अ. बा. व दु. बा. उपाध्ये असे बंधुद्वय होते. वा. रा. शिकेरकरही माझ्यापूर्वीच आले होते.

बहुतेक मुले वेदान्त व साहित्याकडे जात असत. मी व गणेश करंबेळकरांनी वेदान्त घेतला. करंबेळकरांना कॉलेज करावयाचे होते व मला इंग्लिश शिकायचं होत. वेदान्त शिकवणारे गुरुजी म्हणजे कवीश्वर गुरुजी - मूर्तिमंत वेदान्त. त्या काळी वेदान्त परिभाषा नावाच्या ग्रंथाने अध्ययनाचा आरंभ करायचा. त्यामध्ये वेदान्तशास्त्राची परिभाषा सांगितली होती. वेदान्तशास्त्राचे अधिकारी कोण? 'अधिकारी व विधिवत अधीत वेदवेदांगत्वेन', असं म्हणून गुरुजी थांबले मग विवेचन चालू - वेद म्हणजे काय? वेदांग म्हणजे काय? विधिवत् म्हणजे काय अशा तऱ्हेने त्यांचे विवेचन चाले. मधेमधे जामेता निवारणारर्थ (कंटाळा घालवण्यासाठी) गप्पा चालत. कुठे धर्मचैतन्यमध्ये पं. राजेश्वरशास्त्री द्रविड आले आहेत. मग राजेश्वरशास्त्र्यांची माहिती.

मूळचे महाराष्ट्रीय कुटुंब पण काशीमध्ये वास्तव्य. सांगवेद विद्यालयाचे प्राध्यापक. 'त्यांची प्रवचन चुकवू नका', असे ते सांगायचे.

गुरुजींच्या मुखावाटे इंग्रजी शब्दांचे मूळ ते शब्द गमावत. उदा. टॉकिज शब्दाचा उच्चार ते टाकी असा करत. अशातऱ्हेने गुरुजींचे पाठ म्हणजे 'आनंदतरंग' असायचे. गुरुजींचा प्राकृत अध्ययनावर विशेष भर असे. ते म्हणायचे. शंकराचार्य केव्हा झाले, त्यांनी कोणते ग्रंथ लिहिले याची माहिती पुस्तक वाचून मिळेल पण अद्वैत सिद्धीतली एकादी पंक्ती समजली नाहीतर गुरूंकडेच जावे लागेल. ते म्हणाले - शास्त्रीय ग्रंथामध्ये व्युत्पत्ती साध्य झाली की शास्त्रं तुमच्याशी बोलू लागतात. असं म्हणून ते एक श्लोक सांगत, 'व्युत्पत्तिः पक्षिणी प्रोक्ता कोश व्याकरणे उभे/ पक्षद्वयं समालम्ब्य शास्त्रव्योम्नि प्रवेशयत् !' कोश व व्याकरण या पंखांनी व्युत्पत्ती पक्षिणी शास्त्राकाशात मुक्त संचार करू शकते असे ते म्हणत. १९५४ ते १९६३ असा दहा वर्षांचा अध्ययन योग मला लाभला. वेदान्त परिभाषेपासून सुरुवात करून पार अद्वैतसिद्धी, चित्सुखी अशा वेदान्तातील अत्युच्च ग्रंथांचे अध्ययन त्यांच्याकडे करण्याची संधी मला मिळाली व माझ्या जीवनाच सोनं झालं अस मी मानतो.

गुरुजी सकाळी व संध्याकाळी विद्यापीठात येत असत. विद्यापीठातले पुष्कळसे विद्यार्थी वसतिगृहात राहून सकाळच्या वेळी कॉलेजात जात असत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार

सकाळी वा संध्याकाळी पाठ चालत असत. मी कॉलेजात जात नव्हतो म्हणून मला सकाळी वेदान्ताचा पाठ मानवत होता. गुरुजी शनिवारात कन्याशाळेसमोरील वाड्यात राहत असत. तिथून ते चालत विद्यापीठात यायचे. ते पायात चपला घालत नव्हते. उन्हाळ्याच्या दिवसात चालणे, पंचाग्रिसाधनच ते. पण ते कधीच तक्रार करीत नसत. उन्हात चालत असल्यामुळे तहान लागायची. मी मग दीक्षित गुरुजींच्या घरून तांब्या भरून आणायचा व वर्गात ठेवायचा नियम केला.

गुरुजी आल्याबरोबर पाठाला सुरुवात करीत असत. सुरवातीला 'नारायणं पद्मभुवं वसिष्ठं व्यासं शुकम्' इ. श्लोक म्हणून गुरुपरंपरेतील मंगलाचरण व्हायचे व मग तासभर तरी घड्याळाकडे न बघता पाठ व्हायचा. गुरुजी आदिशंकराचार्यांच्या पंथातले. बादरायण सूत्रांवरील शांकरभाष्य शिकवताना विशेषत: पूर्वपक्ष उत्तर पक्ष शिकवताना ते म्हणायचे, 'शंकराचार्य अद्वैती असूनसुद्धा पूर्वपक्ष काय मांडतात ते बघा.' संपूर्ण शांकरभाष्यात एकदाच, फक्त एकदाच, 'निरंकुशत्वात् ते तुंडस्य' असे म्हणून प्रतिपक्षाविषयी जरा कमीपणाचे उद्गार आचार्यांच्या मुखातून निघाले आहेत.

गुरुजींचे पाठांतरसुद्धा दांडगे होते. शांकरभाष्यावर वाचस्पतिमिश्रांची भामती म्हणून टीका आहे. त्या टीकेची ते कथा सांगायचे. भामती ही वाचस्पतिमिश्रांची धर्मपत्नी. वाचस्पती मिश्र लिहीत असत तेव्हा हातात दिवा घेऊन त्यांना लिखाणासाठी

उजेड दाखवत असे. भामती दिवा दाखवते या गोष्टीचे भान वाचस्पतींना नव्हते. इतके एकरूप होऊन त्यांचे लेखन चालत असे. एके दिवशी संध्याकाळी लेखन करायला दिसेना म्हणून सहज त्यानी मान वर करून बघितले तर त्यांना भामती दिव्याची वात सारताना दिसली व त्यांना समजले की भामतीच आपणाला लिहायला उजेड दाखवते. म्हणून भामतीची या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी म्हणून त्यांनी ग्रंथाचे नाव 'भामती' असे ठेवले.

अशा कथांची पाठातून ते पखरण करीत असत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची ओळख होत असे. आमच्या वर्गात गणेश करंबेळकर, कु. जोशी, दत्ता वाडेकर असे विद्यार्थी असत. गुरुजी सोयीनुसार वेळा ठरवत असत म्हणून विद्यार्थी समाधानी असत. वेदान्ताप्रमाणेच गुरुजी न्यायशास्त्राचेही अध्यापन करीत. पं. रघुनाथशास्त्री जोशी त्या काळात न्यायशास्त्राचे अध्ययन करीत असत. गुरुजींकडे न्यायशास्त्राचे अध्ययन करून त्यांची न्यायपारंगत पदवी मिळवली व ते ठाण्याच्या तत्त्वज्ञान विद्यापीठात न्यायशास्त्राचे आचार्य झाले.

देवी नवरात्रात गुरुजी मला दुपारी जेवायला बोलावत असत. नवरात्राचे नऊ दिवस निरनिराळी पक्वान्ने असत. विशेषतः 'शकु हंडे, हुग्गी' अशासारखे कर्नाटकी पदार्थ असत. ब्राह्मणाने पोटभर जेवावे असा गुरुजींचा कटाक्ष असे. मी मुद्दामच जरा लौकर जात असे. एकदा असा गेलो असता गुरुजी लेखन करीत बसले होते.

बहुधा सुटीचा दिवस असावा. इतक्यात अशोकला काहीतरी लिहिण्याची इच्छा झाली. तो सरळ आला व गुरुजींच्या पुढे असलेली शाईची दौत घेऊन त्याच्या अभ्यासाच्या जागी बसला. गुरुजी शाईची दौत कुठे गेली असे पाहू लागताच त्यांना अशोकच्या समोर दौत दिसली. एक-दोन वेळां त्यांनी सांगून पाहिलं पण अशोक काही दौत आणीना. बालहट्टच तो. शेवटी गुरुजीच लेखन साहित्य घेऊन त्याच्याजवळ जाऊन बसले. धन्य तो अशोक, ज्याला गुरुजींसारखे वेदान्ती पिता मिळाले. आणखी एखादा बाप असता तर त्याने तिथे कुरुक्षेत्र निर्माण केले असते!

याशिवाय गुरुजींकडे जाण्याचे दोन प्रसंग असत. ते म्हणजे दसरा आणि संक्रात. दसऱ्याला सोनं देण्यासाठी गुरुजींच्या घरी ज़ायचे व तिळगूळ घेण्यासाठी त्यांच्याकडे जायचे. बहुतेक सर्वच विद्यार्थी जात असत. या वेळी गुरुजी विशेष करून विद्यार्थ्यांच्या घरच्या मंडळींची चौकशी करत असत. मला ते नेहमी विचारीत मातोश्री कशा आहेत?

१९५४ ते १९६३ अशी नऊ वर्षे मी गुरुचरणापाशी अध्ययन केले. द्वैती अद्वैती ग्रंथ वाचले. एकदा माझे मित्र, रवीन्द्र कुलकर्णी याचे वडील श्री. द. कुलकर्णी मला म्हणाले, ''फडके, एकदा कवीश्वर गुरुजींना भेटायचं आहे. मला त्यांची वेळ ठरवून दे.'' मी त्यांची वेळ ठरवली व मीही त्यांच्याबरोबर गेलो. श्री. कुलकर्णी विक्रीकर आयुक्त होते. त्यांना संस्कृतची व विशेषत: वेदान्ताची आवड होती. जवळजवळ तासभर त्यांची चर्चा चालली होती.

चर्चेच्या शेवटी श्री. कुलकर्णींनी गुरुजींना साष्टांग नमस्कार केला व म्हणाले, ''भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशय:!'' या वचनाचा मला अनुभव मिळाला.

सन १९६३ मध्ये मी वेदान्तपारंगत परीक्षा उत्तीर्ण झालो व वसतिगृह सोडून विद्यापीठ आवारातच एक खोली भाड्याने घेऊन राहू लागलो. माझ्याबरोबर प्रा. बाळ विष्णू आपटे व अशोक वि. आपटे हे बंधू रहात होते. पुढे सन १९६४ मध्ये पुणे विद्यापीठातून वेदान्त व पाली भाषा घेऊन एम. ए. झालो व गोव्यात परतलो.

पुणे सोडले तरी संस्कृत भाषा परीक्षांच्या निमित्ताने टि. म. वि. चा संबंध राहिला. काहीकाळ मी टि. म. वि. च्या कार्यकारिणीवर होतो. अशा रीतीने पुणे या विद्यानगरीशी सतत संबंध राहिला. हे सर्व सांगण्याचा उद्देश हा की मी प्रत्येक वेळी वासुदेवाश्रमात जाऊन गुरुजींना भेटत असे व त्यांच्या चरणाशी नतमस्तक होत असे. मध्यंतरी एकदा अरण्येश्वराच्या पिछाडीला पं. जांभोरकरांकडे टि. म. वि. च्या छात्र मंडळाचे संमेलन झाले त्या वेळी गुरुजींचे मार्गदर्शनपर भाषण ऐकण्याची संधी मिळाली होती. अशीच संमेलनाची पर्वणी पं. वा. वा. अभ्यंकरांच्या नवनगरात भरली होती. कार्यक्रम आटोपून येताना समजले की गुरुजी अत्यवस्थ आहेत. तेव्हा जे दर्शन झाले ते अखेरचेच !

मी जेव्हा जेव्हा गुरुजींचा विचार करतो तेव्हा तेव्हा मला असं जाणवते की त्यांच्या आशीर्वादाने विद्यार्थ्यांचे संपूर्ण जीवनच

व्यापून जाते. हल्लीच्या काळात गरुजींसारखे आचार्य मिळणे दुर्लभ. कुठल्यातरी पूर्व पुण्याईने अशा सद्गुरूंचा लाभ झाला. गुरुजी म्हणजे साक्षात् दत्तमहाराजच ते!

* * *

# आमचे श्रद्धास्थान - पं. दत्तात्रेयशास्त्रीकवीश्वरगुरुजी

**प्रा. अवधूत हर्डीकर**
B. S. (A) Retd.
निवृत्त केंद्रनिर्देशक - आकाशवाणी

आमच्या पारंपरिक धर्मशास्त्रातल्या ग्रंथातून प्रत्येक गोष्ट कशी हवी हे सांगताना, त्याचे वर्णन त्याबाबतच्या विशेषणातून स्पष्ट होते. उदाहरणार्थ ब्राह्मण कसा हवा, हे सांगताना त्यासंबंधीचे विशेष सांगून झाल्यावर त्याची खास करून उपयोगिताही सांगितलेली दिसते. गौतम धर्म सूत्रामध्ये (२.२.१२) आपल्या घरात एखादे मंगलकार्य होत असताना ब्राह्मण व्यक्तीला पुढे करावे; असे सांगितले पण तो ब्राह्मण कसा? ब्राह्मण आई-वडिलांचा मुलगा? का नाटकीय गुणधर्मांना कवटाळणारा ढोंगी? विद्वत्तेचा आव आणणारा अधर्माचरणी? का आचार-विचारभ्रष्ट असला तरी चालेल असा? कसा? कसा हवा?

महर्षी गौतम सांगतात. ‘‘**विद्याभिजन वाग्रूप वय:शीलसंपन्नं न्यायवृत्तं तपस्विनम्!**’’ ‘तो विद्यासंपन्न हवा उत्तम आंतरिक वृत्ती-प्रवृत्तींनी युक्त हवा. मृदु=कोणाला न

दुखावणारी, वाणी हवी. सुस्वरूप-प्रौढ-उत्तमस्वभावानेयुक्त असलेला, न्यायसुसंगत वर्तन असलेला आणि ज्याने अधिक गुणवान होण्यासाठी काही कष्ट घेतलेले आहेत असा ब्राह्मण हवा.' किंबहुना ब्राह्मण या शब्दाच्या उच्चाराबरोबर अशीच व्यक्ती डोळ्यांसमोर त्या काळात उभी राहत असे.

मी पुण्यात पन्नास वर्षांपूर्वी टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये आलो तेव्हा असे आचारविचारसंपन्न, या गौतम ऋषींच्या व्याख्येला उदाहरण म्हणून असणाऱ्या, अनेक योग्य व्यक्ती आम्हाला गुरुजी म्हणून लाभलेल्या आहेत. पं. वामन बाळकृष्ण भागवतगुरुजी, पं. मार्तंडशास्त्री दीक्षित गुरुजी, मीमांसक पं. डोंगरे गुरुजी, न्याय-वेदान्ताचे पं. श्री कवीश्वरगुरुजी; आज पन्नास वर्षांनंतरही आमच्या स्मरणामध्ये सर्व ठसठशीतपणे खडे आहेत.

अनेकानेक व्यक्ती विस्मृतीत गेल्या. परंतु या चारही व्यक्ती कायमच्या लक्षात राहिल्या. बाहेर आक्रमकपणे शब्दव्यवहार करणारे अनेक लोक या व्यक्तिमत्त्वांपुढे मृदू वाणीचे=विनम्र होऊन, जात असत, हे आम्ही प्रत्यक्षपणे अनुभवलेले आहे. विद्या-साधनारूपी तपश्चर्येचे न्यारे तेज त्यांच्या चेहऱ्यावर असायचे. आमचे खरोखरच भाग्य उत्तम होते म्हणून असे गुरुजी आम्हाला लाभले.

एका संस्कृत सुभाषितात वर्णन केल्याप्रमाणे पं. कवीश्वरगुरुजी

होते. 'चेहरेपट्टा प्रसन्नतेचे माहेरघर; अंतःकरण दया-पूर्ण, वाणी अत्यंत मृदु-जणू अमृताला पाझरवणारी, कोणतीही कृती परोपकाराचीच' हे सांगून कवी म्हणतो, 'असे लोक कोणाला वंदनीय ठरणार नाहीत.'

त्यांचे शिकवणे स्वगत-भाषणासारखे होते. अध्यात्मविद्येच्या सिद्धान्ताप्रमाणे कोणत्याही कृतीसाठी त्या प्रकारची इच्छा - जरुरीपुरता अहंकार आणि कृतीची माहिती त्याच्या पौर्वापर्याचे ज्ञान! या गोष्टी आवश्यक. उदा. चहा करणे या कृतीला चहापिण्याची इच्छा हवी. तसेच, चहा करण्याची कृती माहीत हवी आणि चहा करण्याला पुरेसाच अहंकारही हवा. या तिन्ही गोष्टी कृतीसाठी आवश्यक असतात ! चहा करण्यासाठी लागणारा 'अहंकार'-वृक्षावर चढण्यासाठी लागणाऱ्या अहंकाराएवढा नको, लाकडे मोडण्याला लागतो तेवढा नकोच असतो. भांडण करण्याला लागतो किंवा मारामारी ही कृती करण्यासाठी लागतो तो अति अहंकारच असतो. तोही नकोच!

अध्यापन ही साधी व दुसऱ्यावर परिणाम घडवून आणणारी, त्याला ज्ञानसंपन्न बनविणारी एक क्रिया! या क्रियेसाठी आवश्यक अहंकार म्हणजे, एका भांड्यातली वस्तू दुसऱ्या रिकाम्या भांड्यामध्ये ठेवण्याकरिता आवश्यक तेवढाच तो हवा. ग्रंथरूपी भांड्यामधले आदी शंकराचार्यांचे विचार, विद्यार्थीरूपी दुसऱ्या एका भांड्यात अलगद सोडायचे यासाठी लागणारा अहंकार' कुस्तीसाठी लागणाऱ्या अहंकाराएवढा नकोच नको ! झाडावर

फूल उमलणं ही क्रिया जशी सहज-सुलभ होते तसे त्यांचे अध्यापन चालायचे, त्यामुळं त्यांच्या वर्गामध्ये गुरुजींच्या अहंकाराची शिष्याच्या अहंकाराशी टक्कर होत नसे हा त्यांचा विशेष; मी अध्यापक झालो तेव्हा लक्षात आले. त्यामुळे पं. कवीश्वर गुरुजींना कधीही शंका विचारली तर राग येत नसे. रस्त्यात उभ्या उभ्याही ते तो विषय तसाच निरंहकारी भावात सांगायचे. आम्हाला लाभलेले टिळक महाराष्ट्र विद्यापीठातले जवळ जवळ सर्वच गुरुजी असे होते. क्वचित पं. डोंगरेगुरुजी भिन्न वाटले तरी त्यांना ते सर्व शोभून दिसायचे!

वेदान्त परिभाषा आम्हाला पं. कवीश्वरांमुळेच सहज सुलभ झाली. अध्यात्म, माया, अनुसंधान, बंध, मोक्ष, पंचकोश कल्पना, समापत्ती... सारखे अनेक पारिभाषिक शब्द एकदम सुलभ झाले. **कोणत्याही शास्त्राची एक परिभाषा असते. त्या परिभाषेतच त्या शास्त्राचे ग्रंथ असतात. ती परिभाषा पक्की समजण्याखेरीज शास्त्रग्रंथ वाचनाच्या खटाटोपात पडू नये.** त्यात एकदा पडलात तर या परिभाषा वापरून त्याचा व्यावहारिक अर्थ व्यंगार्थासारखा वापरून कथेकरी बुवासारखे अज्ञ जनांमध्ये विनोदाच्या अंगाने वेदान्त सांगणारा पंडित असे नाव होऊ शकते. त्याला वेदान्त कळलेला असतो असे नव्हे.

त्यांचा कमालीचा साधेपणा, शुचित्व आणि आचार विचारसंपन्नता या गोष्टी गिरवण्यासारख्या होत्या. धोतर व अंगावरची शाल आणि उपरणे या वेषात ते शहरात फिरत.

गावोगावी जात. ईश्वरविषयक भावांनी संयुक्त झाल्यावर लगेच ते वाडीला जात. आठवडाभर राहून मग येत. पण या भक्तिभावांशी त्यांनी तडजोड केली नाही. नोकरीरूपी नियमांच्या शृंखलांत एखादा माणूस केव्हाच बद्ध झाला असता; पण पं. कवीश्वर बंधात असूनही मुक्त होते. ते कधीही मत्त संमत्त झाले नाहीत का मनाची शांतता त्यांनी ढळू दिली नाही. व्यवहारात राहूनही ते विरक्तीचा आनंद घेत असावेत. किंबहूना त्यांची आध्यात्मिक प्रगती ही या विरक्तीचा परिणाम होता. व्यवहारातले त्यांचे असणे हे आध्यात्मिक अभ्यास पक्का होण्यासाठीच होत असे आम्हाला वाटे. व्यवहारी जीवनाचा वावर खरा विरक्त वैराग्यशील माणूस आध्यात्मिक अभ्यास पक्का होण्यासाठीच करतो. त्यामुळेच स्तुती-निंदा, जय-पराजय, पंडित-अपंडित या द्वैतांच्या पलीकडे ते गेले होते. प्रश्न विचारण्याच्या शैलीवरून त्यांनी मला एकदा माझे पूर्ण नाव विचारले. माझ्या वडिलांचे पं. 'रघुनाथ' हे नाव ऐकल्याबरोबर त्यांनी विचारले, ''आचार्य रघुनाथशास्त्री हर्डीकरांचे आपण सुपुत्र काय?'' मी होय म्हटल्यावर त्यांची व आपली मैत्री होती असे ते म्हणाले. विद्यार्थ्यांनाही 'अहो-जाहो' म्हणणारे आमचे पं. कवीश्वर गुरुजी होते.

एक अत्यंत वैराग्यशील ईश्वरानुसंधानात गढलेले, सतत त्याचा अनुध्यास घेतलेले पं. कवीश्वर हे केवळ पुस्तकी पंडित नव्हते आणि म्हणूनच पुस्तकातली माहिती किंवा पुस्तकातले ज्ञान त्यांच्यावर बोज्यासारखे राहिले नाही. अशा व्यक्तीच्या

सान्निध्यात आमची दोन-तीन वर्षे अध्ययनाची गेली. अशा व्यक्ती व ज्ञान यांत फरक नसतो. व्यक्ती म्हणजेच ते ज्ञान व ज्ञान म्हणजेच ती व्यक्ती असे हे परमआदरणीय व्यक्तिमत्त्व!

योगवसिष्ठ या ग्रंथामध्ये वर्णन केल्याप्रमाणे पं कवीश्वरांचे जीवन होते.

**"प्राप्यं सम्प्राप्यते येन, भूयो येन न शोच्यते ।**
**पराया: निर्वते: स्थानं यत् तद् जीवनमुच्यते ।।"**

-योगवसिष्ठ १-१४-१०

"जे जीवन जगत असताना आयुष्यात व्यक्तीला जे मिळवावयाचे आहे ते मिळवले जाते.

"जे जगणे पश्चात्तापाला किंवा दु:खाला कारण होत नाही आणि त्याचवेळी

"ज्या जगण्यामध्ये, पराकोटीचे निरपेक्ष समाधान मिळण्याचे हेच साधन आहे असे वाटते. त्याला जीवन म्हणतात.

संपूर्ण जीवनाचे या मार्गावर सोने करणाऱ्या आमच्या पं. कवीश्वर गुरुजीच्या स्मृतींना सादर वंदन!

* * *

# स्व. ती. दत्तमहाराज कवीश्वर जन्मशताब्दीनिमित्त अभिवादन!

**डॉ. श्रीकांत मधुकर केळकर**
अहमदनगर

**स्व. ती. दत्तमहाराज कवीश्वर :-** गुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी व मोक्षमार्गाचे एकमात्र मार्गदर्शक म्हणून जवळजवळ २५ वर्षे निरलसपणे, निस्पृहवृत्तीने, लोककल्याणार्थ, प्रबोधनाचे, जागरणाच्या सन्मार्गावर लोकांना प्रवृत्त करण्यासाठी ज्ञान, कर्म, उपासना यांचे समन्वयाने पालन करून लोकसंग्रहासाठीच आपले जीवन समर्पित करणारे आदरणीय महापुरुष साक्षात योगी म्हणून प्रसिद्ध होते. "शुचीनां धीमता गेहे, ज्ञानपूतोऽभिजायते," असेच त्यांच्या बाबतीत म्हणावे लागेल. न्याय मीमांसा - वेदान्त, व्याकरण, साहित्य, अध्यात्म,पुराणसाहित्य, योगमार्ग व शक्तिपात विधींचे मर्मज्ञ अधिकारी म्हणून त्यांनी भिन्न भिन्न क्षेत्रांत असाधारण कार्य केले. असामान्य बुद्धिवैभव, व्यवहारकौशल्य, नीतिमत्ता, ज्ञानी, तपस्वी-कर्मयोगी, सत्प्रवृत्ती, ज्येष्ठ-श्रेष्ठांबद्दल असाधारण आदरभाव बरोबरीच्या सर्वांबद्दल कशाचीही अपेक्षा न ठेवता

सरळ मनाने स्नेहवर्षाव करणे, स्वतःच्या मोठेपणाची थोडीसुद्धा जाणीव होऊ न देता जपून झाकून ठेवीत. सतत स्नेहाचरण करणे आणि लहानांच्या बाबत तत्पर सहानुभूती. सौहार्द सौजन्य आणि निरपेक्षवृत्तीने वागणे असा असाधारण जीवनप्रवास ती. कवीश्वर गुरुजींनी आयुष्यभर पूर्ण केला. सर्वांत वावरून निस्पृह, निरपेक्ष (पण नीरस नव्हे) स्वतःशीच चिंतनमग्न, अध्ययनशील व किंचित् अबोलपणाकडे झुकणारे त्यांचे गंभीर आदरणीयत्व सहज आयोजन, आचरण आदर्श स्वरूपाचे होते. शिक्षक म्हणून, प्रवचनकार, भागवत सप्ताहाचे, शास्त्रविचारांचे मर्मज्ञ, विद्वान, लेखन-भाषण, विवरण, समीक्षा, परीक्षण, साक्षेपी प्रकाशन आणि निरलस प्रशासक म्हणून त्यांनी सामाजिक क्षेत्रातील सांस्कृतिक, धार्मिक वैचारिक क्षेत्रात अखंड ७०/७५ वर्षे कार्य केले. साधेपणा, कमीत कमी गरजा, पराकोटींचे स्वावलंबन, अनादर न दाखविता स्वतःचे कार्य उत्कृष्टपणे करणे व इतर सर्वांना स्वतःच्या योग्यतेची जाणीवही होऊ न देता समंजसपण, समन्वयपूर्वक दृष्टीने रागविणे, वेळेची शब्दाची व विशिष्ट प्रसंगाची जाणीव ठेवून नेमकेपणाने, नेटकेपणे सार्वजनिक काम पूर्ण करणे, निरहंकारी अमानित्व व अदंभत्व, वृत्तीने हा खराखुरा चमत्कार मानावा लागेल. माझ्यासारख्यांचे भाग्य आहे की, त्यांच्यासारख्या परमादरणीय महापुरुषांच्या मार्गदर्शनाचा जवळजवळ ४ वर्षांपर्यंत विद्वत्तेचा, अध्यापनात त्यांनी दिलेल्या सौजन्य, सौहार्द, सहानुभूतीपूर्वक वागणुकीचा लाभ मिळाला. वेदान्तातील

एकापेक्षा एक मोठे ग्रंथ त्यांच्या मुखातून ऐकण्यास मिळणे; माझी योग्यता काय, क्षमता किती, अभ्यास कितपत याचा विचारही न करता 'आपण करूया, वाचूया, बघूया' अशी भूमिका घेऊन वागविणे, तेव्हा आणि आजही अत्यंत दुर्मिळ, दुर्लभ म्हणून आदर्श स्वरूपाची मानसिकता, उदारपणा, सहिष्णुता, समंजसता-समन्वयपरकता, साध्या साध्या गोष्टींतही दुसऱ्याला समजून घेऊन त्याला सौजन्य देण्याची वृत्ती, खरोखरीच अकल्पित वाटावी अशी आहे. त्यांची असामान्य योग्यता, असाधारण कामगिरी, दिगंत कीर्ती मिळवलेले सन्मान व पुरस्कार, सर्व क्षेत्रांत त्यांच्याबद्दलचा आदरभाव, त्यांचे असंख्य क्षेत्रातील व्याप्ती. घटना प्रसंगातील बहुविध कार्य व त्या सर्वांचे नेमकेपणाने केलेले कामाचे नियोजन, कोणालाही न दुखाविता व खुपू न देता, स्वतःचे मोठेपणा सूचित न करता, हे परम योग्याचेच कार्य आहे.

ती. पं. दत्तात्रेयशास्त्री धुंडिराजशास्त्री कवीश्वरमहाराज हे मूळचे नगर जिल्ह्यातील मांडगावचे, सप्तर्षी कुळातील. त्यांचे आदरणीय व कतृत्वशाली पूर्वज नरसिंह सरस्वतींच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या नरसोबावाडी येथे स्थिर झाले. पूर्वीच्या विद्वानांनी काव्यकौशल्याचा उत्कृष्ट व यशस्वी परिचय करून दिला म्हणून कवीश्वर ही मानाची उपाधी त्यांना मिळाली व तेच नाव म्हणून व्यवहारात प्रतिष्ठित झाले. सातारा, नरसिंहवाडी येथील या कुळातील महापुरुषांचे वास्तव्य, कृष्णातीरीच्या पावित्र्याचे व उदात्ततेचे प्रमाण मानावे लागेल. आजोबा वक्रतुंड महाराज

दत्तसंप्रदायात आदरणीय व स्व. टेंबे स्वामी महाराजांनाही आदरणीय म्हणून विख्यात. त्यांचे वडील धुंडिराज महाराज परमार्थाचे प्रवचन, पारायण, आदी क्षेत्रांतील सेवा ह्यात अत्यंत आदरणीय होते. प्रपंच आणि परमार्थाची उत्तम सांगड घातली होती. अध्यात्म क्षेत्रातील अधिकारी व्यक्ती. भागवतपुराण व इतर साहित्याचा उत्तम व्यासंग होता. त्यांचा शिष्य परिवार मराठवाडा व विदर्भात विपुल प्रमाणात होता. देऊळगाव राजा येथे त्यांचे बराच काळ वास्तव्य असे. त्यांच्या शिष्यांनी त्यांना एक घर बांधून दिले होते. तेथे नित्य नैमित्तिक उपक्रम चालत होते आणि आजही आहेत. दत्तमहाराजांच्या आजी, धर्मनिष्ठ व काटेकोरपणे आचरण करणाऱ्या होत्या. संस्कारसंपन्न पवित्र आचरण आणि सर्वांची समुचित सेवा हा त्यांचा जीवनक्रम होता. त्यांचा प्रभाव कवीश्वर गुरुजींवर असाधारण होता. प.प.दीक्षित स्वामी हे फार मोठे अधिकारी विद्वान, ह्या परिवाराशी संबंध व स्नेहवर्षाव करणारे होते. एकंदरीत पुनीत व संस्कारसंपन्न घराणे व प्रतिष्ठित, समाजात आदरणीय मानले जात होते. वडिलांचा विवाह सन १९०४ मध्ये शिरहट्टी येथे श्री हरमणकर ह्यांची गंगूबाई ज्या पुढे सौ. सरस्वतीबाई म्हणून प्रसिद्ध झाल्या. देवीची उपासना करीत. वडील धुंडिराज महाराज अथर्वशीर्ष व गुरुचरित्राची सतत पारायणे करीत. त्यांना इष्टदेवतेचे अनेक वेळा दर्शन व मार्गदर्शन मिळे. गोंदवलेकर महाराज व रंगनाथ महाराज यांच्या दर्शनाचा लाभ मिळाला होता. तसाच आदरणीय टेंबेस्वामींचाही. त्या

काळात धुंडिराज महाराजांनी विधिवत् होमहवनही केले होते. जपानुष्ठानही केले होते. परिणामस्वरूप माघ वद्य षष्ठी शके १८२१ बुधवार २ मार्च १९१० रोजी सूर्योदयाच्या वेळी, धुंडिराजमहाराज व सौ. सरस्वतीबाई यांना पुत्रलाभ झाला. त्या बाळाचे नाव 'दत्तात्रेय' असे ठेवले.' दत्तमहाराजांच्या घराण्यात, पूर्वजांनी खडतर गणेशव्रतात पुरश्चरण केल्यामुळे स्वयंभू गणेशमूर्तीचा लाभ होऊन ईश्वराचा अनुग्रह लाभलेले व पुराणवाङ्मयात पारंगत असलेले विद्वान ह्या कुळात जन्म घेतील असा आशीर्वाद मिळाला व त्या कुळात पणजोबा भालचंद्रशास्त्री, पितामह वक्रतुंडमहाराज, धुंडिराजमहाराज व स्वत: दत्तमहाराज अशा विद्वानांची परंपराच अवतरली. एखादा महापुरुष आला तर घराण्याचा उद्धार होतो. येथे तर अखंड व गौरवशाली परंपरा निर्माण झाली व निरलस सहज भावपूर्ण असे लोककल्याण साधले गेले! अशा पुनीत कुळात आणि नरसोबावाडी ह्या तीर्थक्षेत्रात त्यांचा जन्म, बालपण व संस्कारपुनीत शिक्षण घडून आले. थोड्याच दिवसांत टेंबेस्वामी महाराज वाडीला आले. धुंडिराजमहाराजांकडून बाळाला मांडीवर घेताच, 'बुवा आपले काम पूर्ण करण्याकरिता पुन: आलात काय? आपण पांढऱ्या, आम्ही भगव्या वस्त्रात एवढाच फरक आहे !' म्हणून आजोबांचे (वक्रतुंड महाराजांचे), नाव बाळाला ठेवावे असे सांगितले. पहिल्या वाढदिवसाच्या निमित्ताने खाणे-पिणे-खेळणी व वस्तू ह्याची सजावट करून वरती एक गीतेचे छोटे पुस्तक ठेवले होते. बाळाने रांगत येऊन सर्व बाजूला करून फक्त

गीता हातात घेतली. भावी काळच्या विद्वत्ता आणि व्यासंगाचे प्रसाद चिह्नच मानावें लागेल. त्यामुळे सर्वांना आश्चर्य व आनंद वाटला. लहानपणापासून देवासमोर उभे राहून अनेकानेक स्तोत्रे व आरत्या दत्तमहाराज म्हणत. कृष्णेत स्नान व देवावर पाणी घालणे त्यांना आवडत असे. आठव्या वर्षी उपनयन व पाठोपाठ उपासना आणि वेदाध्यनाचा अधिकार मिळाला. संध्या व गायत्री उपासना चालत असे. गुरुचरित्राचे वाचनही सुरू झाले. वाडीच्या नैमित्तिक उत्सवामध्ये दत्तमहाराज भाग घेत असत. याच वेळी शंकराचार्य, जेरेस्वामी महाराजांच्या पाठशाळेत काव्य व्याकरणाचे अध्ययन सुरू झाले. एकपाठी असल्यामुळे मनावर चांगले संस्कार होत असे. व्यक्तित्व घडण्यास त्यातून चांगली मदत झाली. पुढे सांगलीच्या पाठशाळेत वे. शा. सं. वेंकटेशशास्त्री अभ्यंकर यांच्याकडे व्याकरणशालेचा अभ्यास पूर्ण झाला. चातुर्मास संपण्यापूर्वी भाद्रपद पौर्णिमेला धुंडिराजमहाराज वाडीमध्ये दीक्षित स्वामींच्या प्रेरणेने भागवत सप्ताह करीत असत. परंतु स्वामींचा मुक्काम अमरपूर औरवाडला होता. दत्तमहाराजांनी भागवत सप्ताह वयाच्या १६ व्या वर्षी केला. 'दत्ता, पूर्ण ज्ञानी होशील. आता भागवत सप्ताह सुरू केल्यामुळे तुझ्या हातून मोठा धर्मप्रसार होईल. तुझ्यावर ईश्वराची मोठी कृपा आहे.' असे म्हणून दीक्षित स्वामींनी स्वहस्ते उंची शाल पांघरून चांदीचे संध्यापात्र, आशीर्वाद म्हणून दिले आणि भागवत सप्ताहाची मालिकाच दत्तमहाराजांची चालली. एक हजारावर

भागवत सप्ताह जवळजवळ साठ वर्षांपर्यंत दत्तमहाराजांचे चालले. सर्व नित्य नैमित्तिक व व्यावसायिक कामे सांभाळून ईश्वरी कार्य घडले. पण त्यावेळी दत्तमहाराजांनी अत्यंत संकोचून जाऊन, 'हे केवळ गुरुमहाराजांमुळे ! ते प्रसन्न झाल्यामुळे घडले. आपले काही नाही,' असे म्हटले. पुढील जीवनात गुळवणीमहाराजांशी घनिष्ठ संबंध आला आणि तेव्हापासून अखेरपर्यंत गुळवणी महाराज त्यांना 'श्रीदत्तमहाराज'असे म्हणून इतरांनाही तसाच उल्लेख करण्यास सांगत. १९२५ ते १९६५ पर्यंत अमरापूरला नियमाने भागवत सप्ताह करीत. परंतु १९६५ मध्ये पुण्यास वासुदेवाश्रम सुरू झाल्यामुळे गुळवणीमहाराजांच्या आज्ञेने अमरापूरऐवजी वासुदेवाश्रमात भागवत सप्ताह सुरू झाले.

सांगलीच्या पाठशाळेत असताना दत्तमहाराज वेळोवेळी वाडीला अधूनमधून येत असत. एकदा अधिक महिन्यात वाडीला आले. बऱ्याच दिवसांत दीक्षित स्वामींचे दर्शन घडले नाही म्हणून अमरापूरला जाऊन येतो म्हणून आजीला सांगून निघाले. पण येताना कृष्णेच्या वाढलेल्या पुरामध्ये भोवऱ्यात अडकले पण दत्तप्रभूंचे स्मरण करताच प्रत्यक्ष दत्तप्रभूंचे दर्शन घडले व जीवही वाचला. हा रोमहर्षक अनुभव ईश्वरी प्रसादच मानावा लागेल.

वडिलांचा- धुंडिराजमहाराजांचा, प्रवचने पारायणामुळे सर्वत्र संचार असे. प्रवचनासाठी /पारायणासाठी गावोगावी जात असत. अशाच निमित्ताने बार्शीला आले असताना भगवंतराव पाठक ह्या अनुग्रहीत भक्ताची मातृविहीत कन्या सुंदरा

सौ. सरस्वतीबाईंच्या मनात भराली व ती. दत्तमहाराजांसाठी करण्याचे नक्की ठरले. सर्वांच्या संमतीने विवाह झाला. तेव्हा दत्तमहाराज वीस वर्षांचे होते व नववधू बारा वर्षांच्या होत्या. सौ. लक्ष्मीबाई नावाने सासरी आल्या. दत्तमहाराज त्यावेळेस सांगलीच्या पाठशाळेत अध्ययन करीत होते. त्यांचा स्वभाव काहीसा अबोल, वाचनात मग्न. साधी राहाणी, स्वावलंबन, गंभीर वृत्ती त्यामुळे पत्नी लक्ष्मीबाईंना त्रास होई. पण समजून घेऊन जवळ जवळ ७० वर्षे त्यांनी प्रपंच चालविला. त्यांचे बालपण सिद्धप्रज्ञा घेऊन आलेल्या योग्याप्रमाणे व्यतीत झाले. शुद्ध सात्विक बुद्धी घेऊन आल्यामुळे बालवयातच आत्मज्ञान व सर्वशास्त्रांचे ज्ञान प्रकट होत असे. विद्यार्थीदशेत ते उत्तम योग्यतेचे साधक व ज्ञानी आहेत. असे जाणवत असे. विवाहानंतरही त्यांचे शिक्षण धारवाडच्या शंकराचार्य पाठशालेत चालले होते. तपस्या, ज्ञान व शुचित्व ह्या गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व उजळून निघाले होते.

धारवाडच्या पाठशाळेत त्यांचे अध्ययन उत्तम प्रकारे चालले. अलौकिक बुद्धी, सर्व विषयांचे सहज आणि परिणामकारक ग्रहण, मनन/चिंतनाने परिपक्वता आणि एकत्रितपणे साकल्याने व जवजवळ परिपूर्ण असे विवेचन करण्याचे कौशल्य दत्तमहाराजांनी त्या काळात सर्वांसाठी सर्वांसमोर सहजपणे प्रकट केले. त्यांचे गुरू पंडितप्रवर नागेशशास्त्री उप्पनबेटगिरी खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम सांगत असत. ते दत्तमहाराज उत्कृष्टपणे करीत असत, असे उल्लेख सापडतात. अध्ययनातील

हे प्रावीण्य, असाधारणच म्हणावे लागेल. जवळ जवळ सहा वर्षे त्यांनी धारवाडच्या पाठशाळेत अध्ययन केले आणि मग पुण्यास आले. विवाह होऊन सहा सात वर्षे झाली तरी त्यांचे उच्च अध्ययन चालले होते आणि खऱ्या अर्थाने व्युत्पन्न विद्वान म्हणून त्यांनी आपली योग्यता सिद्ध केली. पुण्यात त्यांना संकेश्वर (शंकराचार्य) मठात अध्यापन करण्याची विनंती करण्यात आली आणि त्यांनी पुण्यात बिऱ्हाड करून, सेवावृत्ती अत्यंत निष्ठेने स्वीकारली. सरदार नातूंनी त्यांच्याबद्दलच्या आदर भावनेमुळे, राहावयास जागा दिली व सौ. लक्ष्मीबाई समवेत घरी अभ्यासासाठी विद्यार्थी असत. येणारे जाणारे असत; असा गृहस्थाश्रम सुरू झाला. अत्यंत काळजीपूर्वक घरी व बाहेर ते उत्तम अध्यापन करीत असत. त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली. सर्वशास्त्रे आणि अध्यात्म विद्या त्यांना अवगत होती. उपनिषदापासून पुराणापर्यंत व्यासंग होता. ठिकठिकाणच्या विद्वत्परिषदेमध्ये त्यांना मानाने बोलविले जाई. कामकोटीश्वर, शंकराचार्य मठ, शृंगेरी, मद्रास, बंगलोर, हैदराबाद, वाराणसी इत्यादी ठिकाणच्या परिषदांमध्ये त्यांची कामगिरी झाल्याचे चर्चेमध्ये अत्यंत यशस्वी व प्रभावपूर्ण ठरली. त्यांना अखिल भारतीय स्तरावर मान्यता मिळाली. परंतु इतके असूनही त्यांना वैयक्तिक कामना, इच्छा, महत्त्वाकांक्षा किंवा अहंकार यांचा स्पर्शही झाला नाही.

पुण्यात अध्यापन करताना सरदार नातूंकडील जागा तशी लहान नव्हती तरी ते त्यांच्याकडून भाडेही घेण्यास तयार

नसल्यामुळे दत्तमहाराजांनी आपले निवासस्थान तेथून हलवून सदाशिव पेठेत आगाशे वाड्यात हालविले. येथे आल्यावर पहिल्यांदाच गुळवणीमहाराजांना दत्तमहाराज भेटले आणि आयुष्यभराचा तो घनिष्ठ असा सहवासयोग घडून आला. पहिला मुलगा दुर्दैवाने चौथ्या वर्षी देवाघरी गेला व नंतर कन्या सुमनचा जन्म झाला. कुलदेवतेला नवस केल्यानंतर १९४० मध्ये त्यांना पुत्र झाला. त्याचे अशोक असे नामकरण केले.

१९५२ मध्ये टिळक-महाराष्ट्र विद्यापीठात रु. १६०/- मासिक वेतनावर संस्कृत विभागात शास्त्रीय अध्ययनाच्या विशेष अभ्यासक्रमासाठी न्याय आणि मिमांसा ह्या विषयांचे अध्यापन करण्याची सेवावृत्ती मिळाली. अध्यापनाखेरीज इतर लेखन कामे, महाराजांवर वेळोवेळी सोपविली जात असत. त्यासाठी वेगळे मानधन असावे अशी अपेक्षा त्यांनी केली नाही आणि विद्यापीठाने तसा विचारही केला नसावा. विविध कामे उरकून व जबाबदाऱ्या सांभाळत असताना, आदरणीय गुळवणीमहाराजांच्या इच्छेनुसार टेंबेस्वामी महाराजांचे समग्र साहित्य प्रकाशित करण्याची जबाबदारी अत्यंत विश्वासाने दत्तमहाराजांकडे सोपविली गेली. आणि सतत तीन वर्षांपर्यंत प्राणपणाने ५००० पृष्ठांची बारा खंडांची ही समग्र योजना दत्तमहाराजांनी पूर्ण केली. संकलन, संपादन करणे, टीपा लिहिणे, प्रेसकॉपी तयार करून तपासून छापखान्यात देणे, प्रूफे तपासणे, हेलपाटे मारून झालेले काम गुळवणीमहाराजांना दाखवून त्यांची संमती घेणे इत्यादी सर्व कामे दत्तमहाराजांनी

नियोजनपूर्वक व अनुशासन संभाळून उत्तम प्रकारे पार पाडली. मुळातच टेंबेस्वामी महाराजांचे सर्वच साहित्य, स्तोत्रे, गीते, प्रबंध आदी मौलिक मार्मिक प्रमाणनिष्ठ विद्वत्ता आणि व्यासंगाचा परिचय करून देणारे होते. त्याचे प्रकाशन म्हणजे वैचारिक बौद्धिक व धार्मिक क्षेत्रातील उत्तुंग कामगिरी मानावी लागते. ते काम गुरुनिष्ठेने, श्रद्धेने भक्तियुक्त अंत:करणाने दत्तमहाराजांनी पूर्ण केले.

नित्याचे सर्व जीवनतंत्र, माहिती, अध्यापन, प्रपंचातील कामे व इतर आनुषंगिक येणाऱ्या जबाबदाऱ्या, नैमित्तिक उत्सव-पारायणे, भागवत सप्ताह, दौरे आणि माता-पित्यांच्या गाठी भेटीसाठी प्रवास हे अतिशय उत्तम प्रकारे दत्तमहाराजांनी आजीवन सांभाळले. ज्ञान आणि विद्या यातील धर्मपरंपरा, विद्वत्सभा, शास्त्राचार्य इत्यादी ठिकाणी व अखिल भारतीय स्तरावरील कार्यक्रमात त्याचा सहभाग असेच. सन्मानाने त्यांना निमंत्रित केले जात असे. त्यातही त्यांचा व्यासंग, चिंतन, मनन, विचारधन नेमक्या शब्दांत, नेमक्या वेळेच्या बंधनात संयोजकांना कधीही काहीही करावे न लागता, विचार सिद्धांताचे पूर्ण परिशीलन करून निर्णयरूपाने त्याचे प्रस्तुतीकरण आणि एवढे सर्व होताना अभिमानाचा स्पर्शही होऊ न देता, सर्व कार्यच पाहिले की मन आदराने भारावते. वेळेच्या बाबतीत तर जितकी मिनिटे किंवा जेवढा वेळ सांगितला असेल तेवढ्याच नेमक्या मर्यादेत १५ मिनिटे, ४५ मिनिटे, १-२ तास किंवा कितीही असो. एकाही मिनिटांचाही फरक न होता विषयाचे पूर्ण विवेचन करून त्यांचे

भाषण संपत असे. हे योग्याचेच कर्तृत्व मानावे लागेल.

अनेक परिवारांमध्ये त्यांना गौरविण्यात आले. त्यांच्याकडे आदराने पाहिले जात असे. कांची कामकोटीच्या शंकराचार्यांनी आपल्या मठातर्फे आयोजित केलेल्या शास्त्रार्थ ज्ञानवैभवाने आणि प्रतिपादन कौशल्याने स्तिमित, प्रसन्न होऊन जगद्गुरूंनी त्यांना सन्मानपत्रे, सुवर्णकंकण, श्रीफळ, हार, वस्त्रे व आयुष्यभर वार्षिक पाचशे रुपयांचे वर्षासन जाहीरपणे दिले. एवढा मोठा सम्मान होऊन पुण्यात परतल्यावर दत्तमहाराजांनी एकही अक्षर उच्चारले नाही किंवा कल्पना दिली नाही. इतर विद्वानांकडून समजल्यावर सत्कार सोहळ्याचा वृत्तांत ऐकून अत्यंत आनंदित झालेल्या गुरुमहाराजांनी दत्तमहाराजांना सपत्नीक भोजनाचे आमंत्रण देऊन त्यांचा सत्कार करून हार, श्रीफल, धोतरजोडी, उपरणे दक्षिणा व सुवर्ण दिले. सौ. लक्ष्मीबाईंचीही खणा नारळाने ओटी भरून, शालू देवविला. गुरुमहाराजांची दत्तमहाराजांबद्दलची आत्मीयता आजीवन होती. त्यांची योग्यता जाणूनच होते.

नंतर भारत सरकारने दत्तमहाराजांच्या विद्वत्तेचे महत्त्व ओळखून त्यांना विद्यावाचस्पती ही पदवी देऊन राष्ट्रीय पंडित म्हणून त्यांचा राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते सम्मान योजिण्यात आला.

**एक महत्त्वाचा उल्लेख -** आदरणीय कवीश्वर गुरुजींच्या मोठेपणाचा निदर्शक म्हणून कधीही विसरता येणार नाही तो म्हणजे १९५२ पासून जवळजवळ १७ वर्षे गुरुजींनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या बालमुकुंद संस्कृत महाविद्यालयात शास्त्रग्रंथाचे

अध्यापन केले. अनेक कामेही केली. लेखनाची बरीच जबाबदारी असे. आकस्मिकपणे आणि फारशी अपेक्षा नसताना त्यांचे विद्यापीठातील काम थांबले की थांबविले हे सांगता येणार नाही. तरीही निंबार्काचार्यांच्या ब्रह्मसूत्र भाष्याची त्यांच्यावर जबाबदारी सोपवली होती. कामगिरी दत्तमहाराजांनी उत्तम प्रकारे पूर्ण केली आणि आपल्या सेवावृत्तीच्या व विद्यापीठात काम करण्याचे भाग्य मिळाले या गौरवपूर्ण व कृतज्ञतापूर्ण दृष्टिकोनातून हे भाष्य त्यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठास निस्वार्थीपणे, निरपेक्षपणे काहीही न घेता निष्ठेने अर्पण केले. टि. म. वि. च्या प्रकाशनामध्ये हे गौरवास्पद ठरले.

दुसरा त्यांच्या 'समत्वबुद्धि समवधान' अंत:करण योग्यासारखे होते ह्याचा परिचय देणारा अनुभव तितकाच बोलका होता.

१९८६ मध्ये वामन निवासाचे बांधकाम पूर्ण करण्याच्या कामी दत्तमहाराजांनी मोठे योगदान केले. वाडीजवळील अमरेश्वराच्या दत्तमंदिराचाही जीर्णोद्धार सर्वांच्या सहकार्याने पूर्ण केला. त्यांचे नित्यनैमित्तिक उत्सव पारायणे आणि प्रवचनाच्या निमित्ताने सर्वत्र संचार असे. वासुदेव निवासाचे प्रमुख असताना ही त्यांनी आपले मोठेपण मिरवले नाही. सर्वांना बरोबर घेऊन स्वत:ची जबाबदारी नियोजनपूर्वक व अनुशासन पालन पूर्ण केली. सर्वांचा मान राखला. दीक्षापात विधी व पत्रव्यवहार १९९६ पर्यंत स्वत:च सांभाळत होते. ऋजुता, सर्वांबद्दल आत्मीयता, प्रत्येकाला समजून

धरून त्याला योग्य रीतीने वागविणे, सर्वांच्या प्रश्नांना समस्यांना वैयक्तिक, पारिवारिक आणि सामूहिक असे समजून घेऊन नि:संदिग्ध स्वरूपात उत्तरे दिली. मार्गदर्शन केले. त्यांच्याकडून साधना करवून घेतली. आयुष्यभर त्यांनी ज्ञानाचा प्रसाद वाटण्याचे काम निरलसपणे, नि:स्वार्थीपणे केले. एक हजारावर भागवत सप्ताह आणि १५०० वर प्रवचने केली.

आपल्या दीक्षित शिष्यांच्या हृदयांत ते शक्तिसंचार करून थोड्या काळात त्यांची जीवनगती अध्यात्माकडे वळवू शकत असत. त्यांच्या मोठेपणाची व साक्षात्काराची प्रचीती भिन्न भिन्न क्षेत्रांतील साधकांच्या अनुभवावरून कळून येते. अनेक साधक घडवून धर्मजागृती जागरणाचे प्रबोधनाचे काम त्यांनी केले. १९८९ मधे डॉ. अशोक महाराजांवर कामाची जबाबदारी उत्तराधिकारी म्हणून जाणीवपूर्वक व स्पष्टपणे सोपविली. १९९१ मधे घराण्याची मंत्रदीक्षा. १९९५ पासून वासुदेवनिवास पीठाच्या दीक्षा व १९९६ च्या आजारपणानंतर पत्रव्यवहारही डॉ. अशोक महाराजांकडे सोपविला. जवळजवळ ७० वर्षांच्या वैवाहिक जीवनात प्रपंच व परमार्थ ह्या दोन्ही स्तरांवर सौ. लक्ष्मीबाई आईसाहेबांनी उत्तम साथ दिली. त्यांचे १० नोव्हें. १९९९ रोजी निधन झाल्यानंतर दत्तमहाराजही अधिकच अलिप्त झाले. अन्नग्रहण कमी झाले बोलणे कमी झाले आणि १ मार्च २००० रोजी दत्तमहाराजांची जीवितयात्रा समाप्त झाली. वयाच्या ८९ व्या वर्षी सफल कृतार्थ आणि लोककल्याणार्थ समर्पित केलेल्या जीवनस्तराची सांगता

झाली. आज शताब्दी वर्ष संपून १०१ व्या वर्धापनदिनाच्या सुमारास दत्तमहाराजांचे कार्य आणि जीवन सध्याच्या संघर्ष गतिमय जगात मार्गदर्शक व प्रेरक वाटते.

खरे पाहता दत्तमहाराजांचे १९६५ पासूनचे कार्य समाजहिताचे, आध्यात्मिक क्षेत्रातील उन्नतीचे, धर्म विचार प्रसाराचे आणि सर्वांना बोध करण्याचे होते. त्यांच्या सारखे अधिकारी महापुरुष दीपस्तंभासारखे असतात, आहेत आणि असतील.

आदरणीय दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर ह्या आदर्श आचार्यांचे माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या जीवनात अत्यंत आदराचे स्थान आहे. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना अनेक छोटी मोठी कामे करताना, अनेक परीक्षांच्या अभ्यास करताना, धावपळ करीत असताना टिळक विद्यपीठात शास्त्रप्रवेश, शास्त्रप्रथमा शास्त्रकोविद (वेदांतकोविद) आणि शास्त्र विशारद, वेदान्तशास्त्र ह्या परीक्षांसाठी अभ्यास व प्रयत्न करीत होतो. महाविद्यालयात संस्कृतचे शिक्षण प्रत्यक्ष व्यवहारात आणि भावी जीवनात पुरेसे होणार नाही यासाठी जुन्या परंपरेतील शिक्षणाचा लाभ घेता यावा त्याप्रमाणे १९५९ पासून १९६३ पर्यंत विद्यापीठात जात होतो. वेदान्त हा निवडलेला विषय आणि इतर विषय सामान्य स्वरूपाचे अभ्यासक्रमात शिकवताना असत. संस्कृत माध्यमातून परीक्षा होई आणि अभ्यासक्रमात संस्कृतबरोबर मराठीचाही प्रयोग होत असे. आदरणीय स्व. भागवतगुरुजी, पं. शि धुपवर न्यायविद्वान मार्तंडशास्त्री दीक्षित (कवीश्वरांचेच शिष्य व स्नेही)

पं. वीरेश्वरशास्त्री डोंगरे, पं. डॉ. विनायक शास्त्री परांजपे आणि इतर गुरुजनांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. परंतु ह्या सर्व विद्वानांच्या मालिकेत आमचे जेष्ठ डॉ. त्रिविक्रम धर्माधिकारी, स्व. डॉ. वासुदेव क्षीरसागर, पं. करंबळेकर व यांच्याकडूनही ऐकण्याचे भाग्य लाभले. या सर्वांच्या बरोबरच आदरणीय कवीश्वर गुरुजींच्या उत्कृष्ट, प्रमाणनिष्ठ यथार्थ, अशा विचारांचा अध्यापनाच्या निमित्ताने लाभ मिळाला. अनेक छोटे मोठे ग्रंथ त्यांतील वेचे त्यांनी आपल्या असामान्य कौशल्याने सांगितले. अगदी मनुस्मृती २ व ७ अध्याय सुरुवातीच्या परीक्षांसाठी त्यांनी सहजपणे सांगितला. वेदान्तसार सारखा आदर्श वेदतंत्र, विवेचनपर ग्रंथ उत्कृष्टपणे शिकविला. सिद्धान्त लेखसंग्रह हा दीक्षितांच्या ब्रह्मसूत्रांचा आधारे रचलेला वेदान्त विचार प्रकट करणारा ग्रंथ गुरुजींनी उत्तम प्रकारे शिकविला. ब्रह्मसूत्रांवरील चारी आचार्यांची चतु:सूत्री भाष्ये तितक्याच शास्त्रनिष्ठेने आणि प्रमाणपुर:सर विवेचनावरून सांगितले. प्रत्येक शब्दाचा अन्वयार्थ, प्रकरण अध्याय किंवा मूळ ह्याचे विवरणही उत्तम प्रकारे केले. बह्मसूत्र शांकर भाष्य संपूर्णपणे परीक्षेसाठी निर्णयसागर प्रतीच्या तीन व्याख्यांच्या स्पष्टीकरणासह स्पष्ट केले. काहीही विचारले की त्याचे, 'असे आहे बघा', म्हणत विवेचन सुरू करत आणि सामान्यातील सामान्य विद्यार्थ्यालाही तळहातावरच्या आवळ्यासारखा (करतलास्थित आमलकवत) स्पष्ट होते असे. पूर्ण समजत असे. त्यांची कामांची धावपळ असे, पूर्ण विश्वासात

घेऊन, 'एक दोन दिवस जाऊन येतो. मग आपण बघू या, करू या', असे सौजन्य, सौहार्द सरलतापूर्ण बोलण्यातून सांगत. केवढा मनाचा मोठेपणा. पुष्कळवेळा मी एकटाच असे, तेव्हा ग्रंथालयातून पुस्तक आणावयाचे, गुरुजी म्हणावयाचे 'हं वाचा ! कोठपर्यंत आले होतो?' पहिले वाक्य वाचले की, शास्त्रीजींचे शास्त्रपूत स्वच्छ व स्पष्ट विवेचनाचा ओघ सुरू होत असे. वेळ संपत आली की, 'आता थांबू या. नंतर अमुक दिवशी बघू या', असे म्हणत असत. आज जवळ जवळ ५० वर्षे होत आली, गुरुजी नाहीत. विद्यापीठ वाडा मूळ स्वरूपात नाही. तरीही गुरुजींचे हे शिकविणे डोळ्यांसमोर उभे राहते. मनात आहे हृदयात ठसलेले आहे. त्यांना कधीही काही देण्याचे धाडस ही कधी घडले नाही. नगरला भेटल्यावर एकदा दिल्यावर त्यांनी स्पर्श करून सर्वांना वाटून टाकले. मी घेणार नाही असे अहंकाराचे बोलणे नाही स्वीकार व परिग्रहही नाही, तत्त्व पाळणे हे प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे त्यांच्याबद्दलचा आदर अधिकच वाढतो. आज आठवतो आहे.

टिळक विद्यापीठात शिकत असताना ती. कवीश्वरगुरुजींनी जी वागणूक म्हणून दिली ती खरोखरच दुर्लभ, सुदुर्लभ आहे. मी सामान्य. प्रयत्न करीत होते त्यांचे निरीक्षण करीत होते. अबोलपणी पण स्नेहशून्य नाही. बोलावयाचे ते थोडेच, अर्थवाही व अन्वर्थक स्वरूपाचे! परीक्षेच्या प्रश्नपत्रिका काढून उत्तरपत्रिका तपासतानासुद्धा त्यांची कामावरची निष्ठा नेमकेपणा व अनुशासनप्रियता आज शिक्षकी व्यवसायात किंवा तथाकथित

विद्याक्षेत्रात दिसते का? आढळते का? किंवा समाजजीवनात असे पथप्रदर्शन कधी होईल का? कदाचित उत्तर नसेल.

ती. कवीश्वर गुरुजींचे येणे, आपल्या खोलीत बसून काम करणे एकाग्रतेने वाचन करणे, प्रूफे तपासणे, लेखन करणे इ. सर्व नियमितपणे चालत असे. एकदा माझा अनुभव असा आहे मी त्यांच्यासमोर उभा राहिलो. त्यांची वाचनमग्नता एवढी, मला हाक मारण्याचे साहस झाले नाही. दोन मिनिटांनी मी बाहेर वर्गाजवळच्या गॅलरीपाशी उभा राहिलो. त्यांनी सहजपणे पाहिले व लगेच मी गेलो. तेव्हा सहजपणे हसून म्हणाले, 'तुम्ही येऊन गेलात ना? हाक का नाही मारली? मी सहजच वाचत होतो' व पुढच्याच क्षणी त्यांचे शिकवणे सुरू झाले. चार वर्षांच्या काळात वेळोवेळी त्यांच्याबद्दल ऐकावयास मिळाले. त्यांच्याकडून ऐकू शकलो. इतरांबद्दल स्नेह, सौजन्य, वास्तव्य व सहज भावाने बोलणे, अमानित्व, स्नेहपूर्ण सदाचरण, चांगल्या गोष्टींचे कौतुक करणे चांगल्या कामात स्वतः मदत करणे, पत्रे लिहिणे, प्रस्तावना लिहिणे, अभिप्राय लिहिणे आणि छोट्या मोठ्या समारंभात नेमके बोलणे इत्यादी त्यांचे विशेष आमच्यासारख्याचे निधान आहे. त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला, तेव्हा आमच्या नगरच्या 'गुंजारवात' मी लेख लिहिला होता आणि असे त्यांच्या वाचनात व स्मरणात होतं. हसून म्हणाले, 'चांगला आहे. पण इतके असे लिहावयाचे नसते' त्यांच्या स्वभावाला सुद्धा समुचित प्रशंसा किंवा गौरव रुचायचा नाही. किंबहुना गुरूंना श्रेय देऊन स्वतःचे

मोठेपण झाकून ठेवण्याचा वेगळेपणा होता. तो आजही जाणवतो. रस्त्याने जातानासुद्धा योग्याप्रमाणे दोन पावलापुढेच पाहत असत. एकदा रस्त्यात समोर ते दिसले. आनंदाश्रमासमोर, अप्पा बळवंत चौकाकडून येताना, त्यांना नमस्कार करणे मनात होते पण हाक मारणे अवघड वाटले, तेवढ्यात गुरुजींनी पाहिले व हसून विचारले, 'काय केळकर केव्हा आलात?' हे सौजन्य दुर्लभ आहे. मी हलकेच म्हणण्याचे धाडस केले. 'गुरुजी नगरला या ना.' त्यावर 'हो येईन की तुम्ही आहात डॉ. द. ग. जोशी आहेत. आमचे स्नेही आहेत जरूर येईन.' असे कधी ऐकावयास मिळेल? एकदा नगरच्या सनातनधर्मसभेत श्रीगुळवणीमहाराजांबरोबर येणार असल्याचे कळले म्हणून मी तेथे जाऊन त्यांना नमस्कार केला, ते म्हणाले, 'हं महाराजांबरोबर आलो होतो. कसे काय चालले तुमचे?' अजून ते शब्द आठवतात.

एकदा टिळक विद्यापीठात सायंकाळी सातच्या सुमारास गुरुजी, प्राचार्य भागवत गुरुजींच्या खोलीत वाचत होते. दिवा छोटा मंद वाटणारा, एक पाय खुर्चीवर, खुर्चीच्या हातावर हात तो मस्तकावर रेललेला मोठा ग्रंथराज हातात, एकाग्रतेने वाचत होते. त्यावेळी उत्सुकता दाटून आली. गुरुजी काय वाचत असतील? हलकेच पाहिले तर व्याकरण महाभाष्याचा खंड त्यांच्या हातात होता. वाचत होते. आमची चाहूल लागताच म्हणाले, "हं काय म्हणता? भागवतांची वाट पाहता थांबलो होतो." सहज वाट पाहताना, एकाग्रतेने ग्रंथराजाचे वाचन ही आश्चर्यचकित करणारी गोष्ट आहे.

गेली जवळ जवळ ४५ वर्षे माझे नगरला राहणे आहे. १९८५ ते २००१ डिसेंबर पर्यंत सारडा महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून आणि आता छोटी मोठी काम करीत नगरमध्ये आहे. नगरच्या रेखी मठाचे मुख्य रेखी. त्यांचा परिवार, वैद्य, अनेक भक्त आणि साधक ह्यांच्याशी भेट होताच गुरुजींचा विषय निघतो. एकदा अशोक महाराजांचे त्यांच्या भक्तमंडळात आगमन व भाषण झाले होते तेव्हाही परिचितांकडे आठवण काढली होती.

माझा वेळोवेळी गुरुजींशी पत्रव्यवहार चालत होता, त्याची बहुतेक वेळा उत्तरे हस्ताक्षरात व प्राय: लगेच येत. अर्धा मजकूर संस्कृतात बाकी मराठीत असे. पत्र येई. एकदा त्यांना धार्मिक समारंभासाठी हरिद्वारला डोक्याला लागले असे कळले. तेव्हा न राहवून चौकशी करण्यासाठी पत्र लिहिले तर, 'थोडे लागले होते त्रास झाला आता प्रकृती ठीक आहे. काळजी करू नये.' असे वाचले. जगाची काळजी करणारे गुरुजी त्यांची काळजी आपण कोण करणार? त्यांची ऋजुता प्रशंसनीय आहे.

तसेच एकदा आश्रमात मोठा सोहळा पार पडला. त्यानंतर त्यांना लिहिले होते, तेव्हा उत्तरात लिहिले, 'कार्यक्रम उत्तम पार पडला. गुरुकृपेने व सर्वांच्या सहयोगाने दगदग झाली पण ठीक आहे. थोडी विश्रांती घेतो. काळजी नसावी.'

परिचित कोणी गेले, विषय निघाला की, आठवण करीत. हे आज मुद्दाम लिहिण्याचा उद्देश त्यांचे मोठेपण वेगळेपण आणि असामान्य योग्यतेचा सर्वांना निदान माझ्या अनुभवातून अंदाज

यावा. मोठेपणा जाणवावा.

आदरणीय कवीश्वरगुरुजी सतत चिंतनशील मननशील संयमी नि वेळी आत्ममग्न, पण सतत व्यासंगात कार्यात वावरूनही निःस्पृह निरपेक्ष व निरलस वृत्तीने असत. सर्वांमध्ये असत. स्वतः वेगळे राहत. अलिप्त नव्हे पण गुंतत नसत. स्वतःची वृत्ती, स्वतःचा मोठेपणा झाकून वावरणे, कमीत कमी गरजा ठेवणे स्वावलंबनाने राहणे, कोणालाही त्रास होऊ नये म्हणून सावधपणे वागणे हे समाजपुरुषाचे सदाचरण चिरस्मरणीय आहे. माता-पिता, बंधु-भगिनी, गुरुजन आणि सर्व आदरणीय संत- सज्जन-महात्मे ह्या सर्वांबाबत आदराने वागणे, सर्वांना सांभाळून वागविणे, मनापासून लोकांच्या कल्याणाची, प्रगतीची व हिताची काळजी घेणे व हे मोठेपण फारच जाणवणारे, उत्तम विचारवंत, वक्ता, शोधकर्ता, आचार्य, प्रशासक व लेखन-वाचन-प्रवचन पारायण ग्रंथलेखन इ. माध्यमांत जवळजवळ ६०-७० वर्षे प्रपंच व परमार्थ ह्यांचा समन्वय साधणाऱ्या महापुरुषास त्यांच्या शताब्दीनंतरच्या पहिल्या वर्धापनदिनाच्या अनुरोधाने अभिवादन. शुभेच्छा. त्यांच्या स्मृतीस शतशः प्रणाम. त्यांचे आशीर्वाद मागे राहोत हीच प्रार्थना.

* * *

# दिव्य संदेश

**पं. वसंत अ. गाडगीळ**

श्रृंगेरी शारदापीठाचे जगद्गुरू शंकराचार्य श्री अभिनव विद्यातीर्थ महास्वामी, श्रृंगेरी आणि पुणे या दोन्हींच्या इतिहासात प्रथमच शारदा संस्कृत पाक्षिकाच्या नवव्या वाढदिवसासाठी १९६७ मध्ये पुण्यात यायचे ठरले. त्यावेळचे पुण्याचे महापौर नानासाहेब गोरे यांनी उत्स्फूर्त संस्कृत स्वागतभाषणाने त्यांचे शनिवारवाड्याच्या महाद्वारी स्वागतम् केले. परंतु शनिवारवाड्यावर पोहचताच, शंकराचार्यांनी पहिलाच प्रश्न विचारला, 'कवीश्वरशास्त्रिण: कुत्र सन्ति?' (कवीश्वरशास्त्री कुठे आहेत? आधी शंकर विद्यापीठात (१९४४ ते ४८) आणि नंतर निवृत्त होईतो टिळक विद्यापीठाच्या श्री बालमुकुंद महाविद्यालयात न्यायवेदान्त मीमांसा या शास्त्राचे प्राध्यापक असणारे प्रा. पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर म्हणजेच पुण्याची खरीखुरी विद्वत्ता. महाराष्ट्राच्या शास्त्री परंपरेचे भूषण असा त्यांचा भारतात सर्वत्र निर्विवाद लौकिक होता. यामुळेच श्रृंगेरी असो वा द्वारका, पुरी असो वा कांची, कोणत्याही पीठाचे जगद्गुरू अथवा बेंगाल कोल

सप्लाय कंपनीचे मध्वराज शिंगेरे यांच्याकडे येणारे वैष्णव माध्वपीठांचे प्रमुख स्वामी पुण्यात आले म्हणजे विद्वान शास्त्रीमंडळीत अग्रपूजेचा बहुमान असायचा, पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वरांचाच !

सुंदर शास्त्रघटीत संस्कृतात त्या आचार्यांची मानपत्रे लिहावीत तर ती पं. कवीश्वरांनीच. धर्मशास्त्र असो वा न्यायवेदान्त असो, भागवतपुराण असो वा पू. वासुदेवानंद सरस्वतीमहाराजांचे प्रचंड दत्तभक्तिप्रधान साहित्यिक खंड असोत, कोणत्याही विषयाबद्दल शंकासमाधान, जिज्ञासापूर्तीसाठी श्री कवीश्वरा: शरणम्। असा त्यांचा पांडित्याचा लौकिक होता.

पंजाबचे तत्कालिन राज्यपाल आणि अ. भा. संस्कृत साहित्य संमेलनाचे अध्यक्ष काकासाहेब (न. वि.) गाडगीळ यांनी माझ्याकडे महाराष्ट्रातून निर्विवाद पाण्डित्य असणाऱ्या प्रकांड पंडिताचे नांव 'विद्यावाचस्पति' या राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसादांच्या हस्ते कलकत्ता येथे दिल्या जाणाऱ्या बहुमानासाठी मागविले. केवळ विद्वत्ताच नव्हे, तर त्या जोडीला कमालीची अंतर्मुखता, विनयशीलता आणि वैराग्य या साऱ्यांचा सुरेख संगम असणारे दक्षिण भारतातील एकमेव विद्यानिधान म्हणून पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांचे नाव सुचविताच हा बहुमान त्यांच्या पायाशी चालत आला. पं. कवीश्वरशास्त्री काही अडचणींमुळे कलकत्त्याला जाऊ शकले नाहीत, तर स्वत: श्री. गाडगीळ हे राष्ट्रपतींचे प्रतिनिधी म्हणून चंदीगडच्या राजभवनातून मुद्दाम पुण्याला आले आणि हा

बहुमान त्यांना समर्पण करून गेले. त्यानंतर गेल्या ४० वर्षांत महाराष्ट्रात अन्य कोणालाही हा बहुमान आजपर्यंत मिळाला नाही.

अखिल भारतात सर्वत्र पुण्याचे प्राचीन परंपरेचे पांडित्य म्हणजे राजेश्वरशास्त्री असे समीकरणच रूढ असल्याने वाराणसीचे पंडितराज द्रविडांपासून दक्षिण भारतातील पं रामचंद्रशास्त्री (बंगरुळू), पं. भालचंद्रशास्त्री उप्पिनबेट्टिगिरी (धारवाड), पं. वीरेश्वरशास्त्री डोंगरे (हैदराबाद), मद्रासचे पं. त्या. सु. श्रीनिवासशास्त्री (हे दोघे डेक्कन कॉलेजच्या कोष विभागात ज्येष्ठ शास्त्री होते.) या सर्वांना पं. कवीश्वरांसमोर नतमस्तक होण्यास धन्यता वाटायची. आज त्यांच्या निधनानंतर त्यांच्या उंचीचाच नव्हे, त्यांच्या जवळपास उभा राहू शकेल असा विद्वान कोण आहे, या यक्षप्रश्नाचे उत्तर नकारार्थीच द्यावे लागेल.

श्रीदत्तमहाराज कन्यागतासाठी नृसिंहवाडी येथे असताना इकडे पुण्यात त्यांची दहा वर्षांची कन्या शोभा फ्ल्यूच्या साथीत गेली. त्यांचे सर्व कुटुंबीयच त्यावेळी फ्ल्यूने आजारी होते. पू. गुळवणीमहाराजांनी मला बोलावून घेतले आणि त्यांचे शिष्य भालेराव यांच्या बरोबर वाडिया सांसर्गिक रुग्णालयातून शोभाचे पार्थीव ताब्यात घेऊन ओंकारेश्वरी अग्निसंस्कार पार पाडा, असा आदेश दिला. तो प्रसंग निभावला. दुसऱ्या दिवशी पू. दत्तमहाराज सकाळीच वाडीहून परतले आणि दुपारी टिळक विद्यापीठात आमचा वेदान्ताचा पाठ नेहमीप्रमाणे सुरू झाला. चेहऱ्यावर नेहमीचा तो शान्तिब्रह्मभाव. स. प. महाविद्यालयातील त्यांचा

धाकटा बंधू संघप्रचारक गजानन गँगरीनने मृत्युमुखी पडला, तेव्हा हाच अंत:करण गदगदून हेलावणारा प्रसंग आम्ही अनुभवला होता. त्यांची कन्या चि. शोभा गेली अन् दुसऱ्याच दिवशी कांची कामकोटी पीठाधीश्वरांनी वैदुष्याचा बहुमान म्हणून पू. दत्तमहाराजांना सोन्याचे कडे (स्वर्णकंकण) पाठविले. त्याचा स्वीकार करताना पू. दत्तमहाराज म्हणाले, 'विपदा आणि संपदा या दोन्ही एकाचवेळी पाठवून परमात्मा आपली कसोटी पाहात आहे !' सारख्याच निर्मम वृत्तीने या दोन्हींचा स्वीकार करण्याच्या तटस्थ वृत्तीमुळेच दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर नुसते सामान्य शास्त्री व पंडित नव्हे, तर ज्ञानियांचे राजे अन् वैराग्याच्या विरक्तीच्या स्वानंद साम्राज्याचे सम्राट झाले.

इतर शास्त्री पंडित प्राध्यापकांना निवृत्तीनंतर काय, असा प्रश्न पडतो. पं. कवीश्वरांना त्यांच्या निवृत्तीनंतरच्या व्यासंगाला, अनुष्ठानांना, तपश्चरणाला वेळच पुरत नसे. श्री वासुदेव निवासात दररोज सायंकाळी जात. तोवर तेथे आणि आश्रमात जाणे बंद झाल्यावर, रेणुकानिवास, या निवासस्थानी आर्त, जिज्ञासूंची सतत रीघ असायची. आज भारतातून येणारा तो असंख्य भक्तांचा, शिष्यांचा, अनुग्रहीतांचा, उपासकांचा, आर्तांचा वर्ग गुरुमाऊली अंतर्धान पावल्यामुळे पोरका झाला आहे. परंतु त्यांनी प्रज्वलित केलेला ज्ञानज्योतीचा नंदादीप सर्वांच्या हृदयमंदिरात अखंड तेवतच राहणार आहे.

**जया अंगी मोठेपण तया यातना कठीण ॥**

**चणे खावे लोखंडाचे । तेव्हा ब्रह्मपदी नाचे ॥**

ही दोन्ही संतवचने पुराणिक, प्रवचनकार, कीर्तनकार यांच्या तोंडून महाराष्ट्राने थोर अवतारी पुरुषश्रेष्ठांच्या जीवनचारित्र्याच्या, अवतारकार्याच्या निरूपणातून अनेकवेळा ऐकली असतील. परंतु १ मार्च १९९९ या दिवशी परमेश्वरचरणी विलीन झालेले थोर ब्रह्मश्री, न्यायवेदान्तांसारख्या प्राचीन शास्त्रांचे प्रकाण्ड पंडित, विद्यावाचस्पती दत्तात्रेयशास्त्री तथा दत्तमहाराज कवीश्वर यांच्यासारख्या भागवतोत्तमाला असह्य अशा यमयांतनातून जावे लागले असेल, याची त्यांना निष्काम परब्रह्म, चालता बोलता वेदान्त, मूर्तिमंत स्थितप्रज्ञ मानून त्यांच्यासमोर नतमस्तक झालेल्या आजच्या असंख्य उपासक भक्तांपैकी कुणाला फारशी कल्पना असेल असे मला वाटत नाही. याचे कारण वाचकवर्गासमोर आलेल्या त्यांच्या कोणत्याही चरित्रग्रंथात, आठवणींच्या संग्रहात, आत्मनिवेदनपर पत्रात याचा अगदी पुसटसुद्धा उल्लेख कुठेही आढळला नाही. विसाव्या चालू ख्रिस्ती शतकाच्या आस्तमनाच्या वेळी महाराष्ट्राच्या धार्मिक विश्वातील विद्वत क्षेत्रातील एका सर्वश्रेष्ठ थोर महात्म्याचे (या शतकातील ऐतिहासिक महत्त्वाचे ठरणारे), ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे ब्रह्मपद कशी खडतर वाटचाल करीत त्यांच्याजवळ आले याची साक्ष म्हणून हा उल्लेख मला आज करावा लागत आहे.

ज्यांच्या सहकुटुंब सपरिवार निर्दय हत्येच्या भीषण आठवणीने

आजही आपले चित्त थरारते, त्या व्याकरणमहापंडित प्रा. काशिनाथशास्त्री अभ्यंकर यांना, ५५१ शनिवार पेठ, पुणे -२, या आपल्या निवासस्थानातून न्यायवेदान्त महापंडित प्रा. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर यांनी १९ जून १९६५ रोजी लिहिलेले चार पुष्ठांचे प्रदीर्घ पत्र कुणाचेही अंत:करण पिळवटून टाकेल आणि सात्त्विक संतापाच्या त्वेषाने कुणीही पेटून उठावे अशा दाहक, विदारक सत्याने भरलेले हे आत्मनिवेदन आहे. याच महाविद्यालयात स्थापनेपासून (डिसेंबर १९४८) न्याय,मीमांसा आणि  वेदान्त शिकविणारे पं. द. धुं कवीश्वर यांना, त्यांच्या मासिक पाचशे रुपये वेतनापैकी निम्मे, म्हणजे पंधरा दिवसांचे वेतन अडीचशे रुपये दंड ठोकून कठोर शिक्षा करण्यात आली होती. यांचा अपराध कोणता? तर हे (पं कवीश्वर) आजारी असल्याचे सांगून पंधरा दिवस गैरहजर राहिले ! पं. द. धुं. कवीश्वर गुरुजी या पत्रात संस्कृत मंडलाध्यक्षांसमोर आपली बाजू मांडताना प्रारंभीच लिहितात.

‘फाल्गुन पौर्णिमेपासून चैत्र पौर्णिमेपर्यंत सुटी एक महिना आहे. असे श्री अधिपतींनी सांगितल्यामुळे मी एकटा वृद्ध माता-पितरांच्या भेटीस जालना मुक्कामी गेलो. सुटी सुरू झाल्यावरही येथेच राहून विद्यार्थ्यांचे आवश्यक विभागांचे पाठ संपवून गेलो. जालन्यास चैत्र शुक्ल पक्षात मी आजारी पडलो. लगेच तेथील प्रसिद्ध प्रामाणिक डॉ. श्री. नाईक यांचे औषध सुरू केले. चार-पाच दिवसांनी ताप कमी झाला तरी औषध चालूच होते. त्या

वेळी पौर्णिमेपर्यंत आपण पुण्यास जाऊ शकू. अशा भावनेने मी त्या सुमारास पौर्णिमेच्या आधी एक पत्र श्री. अधिपतींना पाठविले. की बहुतेक पौर्णिमेस तिथे येईन, पू. पिताजीही आजारी असल्याने त्यांना वाडीचा दूरचा प्रवास झेपणार नाही म्हणून चैत्र वद्य सप्तमीपर्यंत मला वाडीस (नृसिंहवाडी) पू. पिताजींच्या अनुष्ठानासाठी जावे लागेल. नंतर इंजेक्शन चालू होती. शक्तीही पूर्ण आली नव्हती. म्हणून डॉक्टरांच्या व वडील मंडळींच्या सांगण्याप्रमाणे मी पौर्णिमेनंतरही दोन-तीन दिवस जालन्यास राहून संकष्टीस सकाळी निघून सायंकाळी येथे आलो. येताना औषध बरोबर घेऊन आलो. नंतर मंगळवार-बुधवार दोन दिवस विश्रांती घेऊन बुधवारी रात्री मी वाडीस गेलो. तेथील उत्सवात सेवा आटोपून वैशाख शुद्ध प्रतिपदेस येथे रात्री परत आलो. पुढे एक-दोन दिवसांत श्री. अधिपतींनी सुटीतील वेतन वगळून काही उरलेले द्रव्य हातावर ठेविले. ते मुकाट्याने घेऊन मी घरी आलो.'

याच पत्रात ते पुढे म्हणतात... 'त्या सभेस येण्यास मला अधिकार नाही, असा लोकशाहीचा कायदा असेल तर वाटेल त्याच्यावर वाटेल तसे आक्षेप सभेपुढे यावेत आणि याचा निर्णय मात्र विचारवंतांनी आक्षेप घेणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणे तत्काळ द्यावा, ही लोकशाहीची पद्धत मात्र न्याय्य आहे काय? ईशेच्छा!'

आज हा विद्यादेवीचा अपमान आपल्यासमोर घडून आला, याचा विषाद वाटतो. असे विद्यादेवीमुपास्महे असे बिरुद मिरविणाऱ्या विद्यापीठाला सांगून पत्राच्या शेवटी : संमार्जन

कर्मकर्त्यांपेक्षा (झाडूवाल्यापेक्षा) सुद्धा हीन वागणूक दिल्याबद्दल हरीची इच्छा असे. असे लिहिताना ते म्हणतात... 'या वेळी पाकिस्तानात नसतानाही मी निर्वासित होत आहे... ज्या द्रव्यामुळे सर्वांची बुद्धीच घात करून नियामकताच विजयी झाली आहे, ते माझे वेतन द्रव्य कायमचेच स्थगित व्हावे, फक्त गेल्या १५-१६ वर्षांमाणेच यापुढेही विद्यादेवीचे निर्वेतन आजीव सेवकत्व मला लाभावे हीच अंतिम इच्छा.'

त्या काळच्या प्रशासनाने या विद्यापीठाच्या सत्त्वशील अशा आपल्या गुरुजींना अशी अन्याय्य वागणूक देऊन त्यांना छळले, असे समजताच आपल्या गुरुजींच्या सात्त्विक वृत्तीला शोभेल असाच प्रतिशोध (सूड) विधायक मार्गाने आपण घ्यावा, असे आम्ही त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांनी ठरविले आणि पाच-दहा, पंधरा असे करत पाचशे रुपये, संस्कृतप्रेमी कवीश्वरभक्तांकडून उभे केले. कमवा आणि शिका योजनेखाली ज्या 'सकाळ'चा वार्ताहार, छायाचित्रकार म्हणून १९५२ पासून मी काम करीत होतो, त्या सकाळचे संपादक डॉ. नानासाहेब परुळेकर या विद्याप्रेमीच्या हस्ते ही गुरुदक्षिणा समारंभपूर्वक टि. म. वि. चे कुलगुरू म. म. प्रा. द. वा. पोतदार यांच्या समक्ष पू. गुरुचरणी समर्पण केली. प्रज्ञाचक्षू पं. यशवंतराव मराठे यांच्या घरी हा समारंभ झाला.

यापुढे विद्वानांची अशीच परवड झालेली दिसली तर याच विधायक मार्गाचा अवलंब करा असे सांगून डॉ. परुळेकरांनी

छात्रांच्या या गुरुभक्तीचे कौतुक केले आणि आमच्या कवीश्वर गुरुजींनी गुरुदक्षिणा म्हणून दिलेल्या पाचशे रुपयांपैकी त्यांना विद्यापीठाने ठोकलेल्या दंडा इतकीच, म्हणजे अडीचशे रुपये, ही रक्कम स्वीकारली. बाकीचे अडीचशे रुपये त्यांनी आम्हाला परत केले. त्याच सभेत डॉ. परुळेकर यांनी अडीचशे रुपये मूलधन मानून सकाळ-पुरस्कृत विद्वत् पोषण निधी हे नवीन काम उभे केले. या निधीच्या संचालक मंडळात स्वत: डॉ. ना. भि. परुळेकर आणि श्री. म. (बाबूराव) पारखे, पं. ना. श्री. (नानासाहेब) सोनटक्के, उद्यान कार्यालयाचे श्री. शंकरराव थत्ते, पं. वसंत अ. गाडगीळ (चिटणीस) अशी पाच मंडळी होती. रुपया-दोन रुपये प्रत्येकाकडून दरमहा गोळा करून त्या निधीतून याचना न करणाऱ्या परंतु विपद्ग्रस्त संस्कृत विद्वानांना दरमहा आवश्यक तेवढे अन्नधान्य शिधा (रेशन) घरपोच देऊन त्यांचा गौरव करण्याची ही योजना डॉ. परुळेकरांच्या हयातीपर्यंत चालू होती. (माझ्याशिवाय सर्व संचालक मंडळ आज काळाच्या पडद्याआड गेलेले आहे.) मॉडर्न हायस्कूलचे अंध झालेले पं. नारायणशास्त्री दीक्षित यांच्यासारख्या अनेक विपद्ग्रस्तांना ही सेवा पोचविता आली.

घालून, तोडून, तापवून आणि ठोकून सुवर्णाची परीक्षा व्हावी तसे पू. कवीश्वर गुरुजींचे अवतारकार्य काळाच्या आणि कालानुरूप कलीच्या कसोटीवर तावूनसुलाखून निघण्याचा हा काही एकमेव प्रसंग नव्हे. एके दिवशी पुण्याच्या एका दैनिकातील पहिल्याच

पानावर एका वार्तेच्या शीर्षकाने लक्ष वेधून चक्रावून सोडले. पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वरांना अटक. पुढील वार्तेत म्हटले होते. घरफोडीच्या गुन्ह्याबद्दल पं. दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वरांना अटक करण्यात आली आहे. सध्या पू. दत्तमहाराजांचा निवास होता ते रेणुकानिवास हे घर अर्धवट बांधकाम झाले असताना, एका भक्ताने गयावया करून तात्पुरता आसरा म्हणून तिथे राहायची संमती मागितली. हरिश्चंद्राचे अवतार असणाऱ्या दत्तमहाराजांनी उदारपणे त्याला तिथे आसरा दिला आणि तो ते बळकावूनच बसला. म्हणाला, 'माझा ताबा, घर माझे!' यांच्या चिरंजीवांनी या बळकावणाऱ्याचे कुलूप तोडून फेकून देताच दत्तमहाराजांवर घरफोडीचा फौजदारी गुन्हा त्याने दाखल केला. श्री. ब. ना. भिडे वकिलांसारख्यांनी त्यांचा खटला लढवून दीड-दोन वर्षांनी न्यायालयाकडून महाराजांना न्याय मिळवून दिला. घर बळकावणाऱ्या भक्ताला पू. दत्तमहाराजांनी लिहिलेले पत्रदेखील माझ्या संग्रही उपलब्ध असून ते प्रकाशात आले तर या महात्म्याची माहात्मता अधिक प्रकाशमान होईल.

पिढीजात संस्कृतविद्या आणि दत्तोपासना यांची ओतप्रोत पुण्याई लाभलेल्या कवीश्वर घराण्यात दत्तमहाराजांचा जन्म २/३/१९१० मध्ये झाला आणि तेही कृष्णा-पंचगंगा यांच्या पवित्र संगमावर. तपस्यास्थळी असणाऱ्या नृसिंह सरस्वतींच्या परममंगल छत्रछायेत, नृसिंहवाडीत सूक्ष्म देहसिद्धी असणारे योगियांचे सम्राट श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज यांचा बालपणीच

त्यांना आशीर्वाद लाभला. नृसिंहवाडी, सांगली, धारवाड, श्रृंगेरी, पुणे यांच्यासारख्या ठिकाणी न्यायवेदान्तासारख्या गहन शास्त्रांचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला. पंडितश्रेष्ठ नागेशशास्त्री उप्पिनबेट्टिगेरी (धारवाड) तसेच वाराणसीचे शास्त्रसागर पंडितराज राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्याकडून न्यायशास्त्राचे तर श्रृंगेरी शंकराचार्य जगद्गुरू पीठाचे आस्थान पंडित मीमांसाविद्वान पं. सुब्बाशास्त्री यांच्याकडून मीमांसेचे पाठ लाभलेले पं. दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर हे केवळ पुण्याचे, महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारताच्या संस्कृत विद्यापरंपरेला मुकुटायमान असे सर्वश्रेष्ठ भूषण होते. पुण्यासारख्या ठिकाणी त्यांच्या विद्वत्तेची कदर नव्हे तर परवड झाली. ज्यांच्याकडे त्यांनी अनिवार्य कुटुंबनिर्वाहासाठी सेवावृत्ती केली, त्यांनी त्यांच्या अथांग वैदुष्याची कदर करण्याऐवजी बोद्धरो मत्सग्रस्ताः। न्यायाने दुःस्वास करून घोर विटंबनाच केली, आम्हाला न विचारता परस्पर राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद त्यांना कलकत्त्याला बोलवून विद्यावाचस्पती पदवी देतात म्हणजे काय? असेही त्यांच्याबद्दल बोलले गेले. परंतु दत्तमहाराजांचे वेगळेपण त्यांच्या नितांत वेदान्ती वृत्तीत असल्याचे वेळोवेळी जाणवून देणारे प्रसंग आम्ही अंतरंगातील निकटवर्तींना अनेकदा पहावयास मिळाले. अस्मानी वा सुलतानी अशा कोणत्याही विपत्तीच्या वेळी हे शान्तिब्रह्म विचलित झाले नाहीत, म्हणून तर प्रा. द. धुं. कवीश्वर या सामान्य संज्ञेकडून ते पं. दत्तात्रेयशास्त्री या पदावरून ब्रह्मश्री दत्तमहाराज या सर्ववंद्य

सम्राटपदावर केव्हा जाऊन पोहोचले याचा कुणालाच पत्ता लागला नाही, असे म्हणण्यापेक्षा त्यांचे खरे स्वरूप वेळीच ओळखण्याबाबत अतिपरिचयाद् अवज्ञा झाली हे उशिरा का होईना कबूल करण्याचा प्रांजळपणा काही नव्यविद्याविभूषितांनी दाखवायला हवा.

अलीकडेच राष्ट्रीय पंडित म्हणून राष्ट्रपती पुरस्काराचा बहुमान लाभलेले व पं. दत्तमहाराजांचे सहकारी प्राध्यापक म्हणून सान्निध्य लाभलेले थोर वैयाकरणी महापंडित प्राचार्य वामनशास्त्री भागवत गुरुजी संस्कृत विद्याक्षेत्रातील प्राचीन आणि अर्वाचीन विद्याविभूषित विद्वानांतील (शास्त्री आणि एम. ए., पीएचडी) संघर्षाची समस्या किती घातक आणि घोर आहे. यावर प्रकाश टाकताना मला म्हणाले, 'अहो, हे नव्यविद्याविभूषित पीएच. डी.,डी लिटवाले आमच्यासारख्यांना (धोतर-उपरणे-टोपीवाल्यांना) भटजी समजून या वर्गाला कमी लेखतात, पाण्यात पाहतात, त्यांचे मानधन हजारांत तर आमचे शेकड्यातही नसते. पंडित भागवत गुरुजींच्या म्हणण्यात तथ्य नाही, असे कोण म्हणेल?

आजच्या संगणकीय युगात, प्राच्य विद्यांच्या प्राचीन पाठशाळा परंपरेने विद्या रसनाग्रनर्तकी असणाऱ्या पं. दत्तमहाराजांसारख्या शाऽस्त्री-पंडितांचा व्यासंगी वर्ग झपाट्याने काळाच्या पडद्याआड चालला आहे. नुसती विद्वत्ताच नव्हे तर विवेक आणि

वैराग्याबरोबर ईश्वरी धर्मानुष्ठान प्रसादाची जोड लाभली तर त्यालाच स्वर्णकस्तुरिका संयोग म्हणतात. हा हृद्य संगम ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या चरित्रात झाला आणि म्हणूनच डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. वराहगिरी वेंकटगिरी, डॉ. शंकरदयाळ शर्मा यासारखी राष्ट्रपतींची त्रयी या दत्तमहाराजांच्या सन्मानांत स्वत:चा बहुमान मानू लागली. अशी धन्यता लाभलेले. पू. दत्तमहाराज म्हणजे ज्ञान-विवेक वैराग्याची त्रिविध ज्योत एकत्रय प्रकाशच असणाऱ्या जगावेगळ्यो थोर नंदादीपाला आमचे अनंत प्रणाम.

नम: शांताय तेजसे ।

* * *

# साक्षात्कारी संत-ब्रह्मीभूत पं. दत्तमहाराज कवीश्वर

-पं. ल. पं. जांभोरकर
पुणे

परमपूजनीय ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर, आम्हा सर्व विद्यार्थ्यांचे पू. कवीश्वर गुरुजी. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात आम्हाला न्याय, वेदान्त शिकवीत होते. प्रत्यक्ष अभ्यासापेक्षा जीवनविषयक तत्त्वज्ञान ऐकण्यातच आम्ही स्वत:ला कृतकृत्य समजत होतो. गोपिकांना रासक्रीडेच्या वेळी व इतरही वेळी जसे कृष्णाचे माझ्यावरच प्रेम आहे असे वाटत असे तसेच मीही असे म्हणतो, 'गुरुजींचे माझ्यावरच खूप प्रेम होते.' शिकत असताना त्यांच्या मातामहींना (वय ८०) सांगलीवरून आणण्यासाठी गुरुजींनी मलाच पाठविले होते. तसेच सौ. सुमनताईच्या लग्नात मीच सर्वाधिकारी होतो.

तसेच आपल्यामुळे इतरांना यत्किंचितही त्रास होऊ नये म्हणून वेळप्रसंगी आपला कर्मठपणा ते बाजूला ठेवीत असत.

कन्याशाळेच्या समोरच्या वर्तकांच्या वाड्यात गुरुजी प्रथम रहात असत. कोणत्या तरी निमित्ताने आईसाहेब व इतर सर्वजण बाहेरगावी गेले होते. ही कुणकुण माझ्या व मित्र दिवाकरच्या कानी आली. आम्ही दोघे घरी गेलो. ते नको नको म्हणत असताना आम्ही स्वयंपाकाच्या तयारीला लागलो, तेव्हा गुरुजी म्हणाले, 'सोवळे नेसण्याची आवश्यकता नाही. धूतवस्त्र असले तरी चालेल. बहिरंगापेक्षा अंत:करणाची शुद्धता श्रेष्ठ असते. बहिरंगाचे अवडंबर विनाकारणच माजवू नये.'

जाता जाता 'सहज बोलणे हाचि उपदेश,' हा संतांचा स्वभाव तेथे प्रकट झाला. अतिशय शांत स्वभाव, माऊलीची कनवाळू दृष्टी, राग कधी माहीतच नाही, ते विद्यार्थ्यांना कधीही 'अरे, कारे' म्हणत नसत. घरी मंडळींनादेखील ते 'अहो काहो' असेच म्हणायचे. दत्तमहाराज प्रत्यक्ष दत्ताचेच अवतार होते, याचा पदोपदी अनुभव आला. एकदा विद्यापीठातील सर्वचजण गुपचुप गणपतीच्या देवळात यज्ञासाठी गेले होते. मीच या ना त्या कारणाने विद्यापीठात एकटाच होतो, म्हणजे मलाही जाण्यास उशीर झाला होता. इतक्यात विद्यापीठात पोस्टमन आला व त्याने तार आणली. ती कर्मधर्म योगाने माझीच होती. माझी आई अत्यवस्थ होती व ताबडतोब निघून येणे, असा तारेत मजकूर होता. जवळ तर एक पैसाही नव्हता मी धावतच गुपचुप गणपतीच्या देवळात गेलो. पाहतो तो काय, तुडुंब गर्दी! देवळात शिरकाव होईना. काय करावे? कसे करावे? डोळ्यांवाटे अश्रुपूर वाहत होता. थिजून

जागचे जागी उभा राहिलो. पाहतो तो काय प्रत्यक्ष गुरुजी माझ्यासमोर उभे! त्यांनी माझ्या हातात शंभर रुपयाची नोट ठेवली. एका विद्यार्थ्यास मला गाडीत बसवून देण्यास सांगितले व 'ताबडतोब नीघ' म्हणाल, 'वाटेल बरे आईला.' मी गुरुजींच्या चरणावर मस्तक ठेवले व निघालो. गावी गेलो. गुरुजींनी 'वाटेल बरे आईला' असे म्हटले होते, पुढे आईला खरोखरच बरे वाटले! वास्तविक ती अत्यवस्थ झाली होती. पण गुरुजींनी आशीर्वाद दिला होता ना. आई बरी झाली. मी विचार केला. तार आलेली कोणालाही माहीतही नव्हती. फक्त मला व पोस्टमनला. मग गुरुजींना कळाले कसे? गुरुजी म्हणजे साक्षात दत्तावतार साक्षात्कारी संतच होते.

''**परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य नित्यं निजहृदि विकसन्त सन्ति सन्तः कियन्तः ।**'' अहं सामान्यः । मी अत्यंत सामान्य माणूस पण माझ्या ठिकाणी केवढा मोठेपणा त्यांनी निर्माण केला! माझ्या हातून संस्था स्थापण्याचे कार्य घडविले. ती संस्था त्यांच्या कृपेने वाढली; शिशुवर्गापासून ते दहावीपर्यंत सुमारे दोन हजार विद्यार्थी इतर विषयांबरोबर संस्कृतचाही अभ्यास करीत आहेत. माझ्या गावाजवळील हिंगोली येथील धर्मालंकार ओमप्रकाश देवडाजींनी त्यांच्या नावाचा प्रस्ताव पाठविला. संस्कृत पाठशाळेला 'ब्रह्मश्री पं. दत्तमहाराज धुंडिराजमहाराज कवीश्वर संस्कृत पाठशाळा' हे नाव पाठशाळेला देण्याचा. त्यांच्या प्रत्यक्ष भेटीत गुरुजींनी मान्यता दिली. त्याकरिता श्री देवडाजी

पाठशाळेच्या नावाने दोन लाख बँकेत ठेव ठेवणार आहेत व दरवर्षी पाठशाळेच्या खर्चासाठी तीस हजार रुपये पाठविणार आहेत.

**' सज्जनानां जीवनं परापेकाराय एव ।'**

**गंगा पापं शशी तापं । दैन्यं कल्पतरू स्तथा ।**
**पापं तापंच दैन्यं च घ्नन्ति सन्तो महातपा:**

सज्जनानां जीवनं परोपकारार्थमेव । लोकांच्या उद्धाराकरिताच अशा सज्जनांचा जन्म होत असतो. माझ्या जीवनाचे तर त्यांनी सोनेच केले. विद्यापीठात शिकत असताना धर्मवीर विश्वासराव डावरे सतत विद्यापीठात येऊन मला लग्नाची गळ घालू लागले, पण मी त्यांना दाद देईनासा झालो. तेव्हा ते पू. कवीश्वर गुरुजींच्याकडे गेले व माझी नात लक्ष्मीकांताला द्यायचा मी निश्चय केला आहे तेव्हा आपण हे घडवून आणावे, तेव्हा गुरुजींनी मला घरी बोलाविले. माझ्याकडून होकार वदवून घेतला, आई-वडिलांना तार करून बोलाविले व माझे शुभमंगल घडवून आणले! असे एक ना अनेक प्रसंग सांगता येतील.

उपदेशाबद्दल मी अनेक वेळा त्यांना बोलून दाखविले पण त्यांनी प्रत्यक्ष गुरुमंत्र दिला नाही. 'सहज बोलणे हाचि उपदेश' हेच ब्रीदवाक्य खरे ठरले. असे होते माझे व साऱ्या जगाचे गुरुजी. ते शरीराने जरी आमच्यातून निघून गेलेले असले तरी त्यांचा वरदहस्त साऱ्या जगावर राहणारच आहे, माझ्यावरही त्यांची कृपा सतत रहावी हीच त्यांना श्रद्धांजली.

* * *

# चैतन्यदीप प्रज्वालिला

**प्रा. अजित कुलकर्णी**

M.A. Philosophy पुणे

माझे आजोळघर हे सज्जनगड परळी, जि. सातारा. या एका अनुबंधाने आमचे घरात समर्थ सांप्रदायिक विचारधारा येऊन पोहचली. स्वगृह हे दत्तसंप्रदायिक, श्री गुरुचरित्रातील एक घटना श्री गुरुमहाराज हे सात रूपे धारण करून सात शिष्यांकडे गेले. त्यातील एक घर आमचे! मातुलगृह समर्थ सांप्रदायी तर आमचे वरवंड येथील घरात ज्ञानदेव व तुकाराम यांच्या पालख्या पायी वारीचे वेळी उतरत असल्याने वारकरी संप्रदायाचाही संस्कार! असा हा साधनेचा त्रिवेणी संगम जीवनात झाला आहे.

सन १९५७-५८ मध्ये वयाच्या आठव्या वर्षी प. पू. सद्गुरु श्रीधरस्वामींनी अनुग्रह दिला. त्यानंतर लहानपणापासूनच आध्यात्मिक चिंतनाची आवड. एप्रिल १९७३ मध्ये पू. श्रीधरस्वामींनी देह ठेवल्यावर स्वप्न दृष्टांतात हे वृत्त मला समजले. मी त्या वेळी श्रीवरदपूर या क्षेत्री गेलो होतो. मन अत्यंत खिन्न झाले होते. तसा मी लहान! खूप रडलो ! त्या रात्री तेथे लोकांनी गुफेतून देह बाहेर आणून ठेवला होता. समोर, पण दूरवर बसलो होतो.

तेव्हा मी नामस्मरण करीत होतो. यापुढे काय होणार? हा प्रश्न मला भेडसावत होता. १९६७ मध्ये माझी स्वामींची शेवटची भेट झाली. त्या वेळी काही चर्चा झाली. ती येथे देणे उचित होणार नाही, म्हणून लिहीत नाही. पण आता काय करावे? मनातून स्वामींना आर्तपणे आळवले. 'स्वामी, मी तुमचे बाळ! बाळाला आता माऊली नको कां? मी कोणाकडे पाहू?'

तेवढ्यात एक घटना दिसली. पू. श्रीधरस्वामींच्या देहातून छातीपासून बॅटरीतून प्रकाश बाहेर पडता तस्सा एक प्रकाशाचा झोत बाहेर पडला तो कुठपर्यंत गेला हे मी पाहू लागलो तर दूर एक औंदुबराचे झाड होते, त्याखाली एक व्यक्ती खाली मान घालून उभी होती, ती मी पाहिली. पांढरे स्वच्छ धोतर व अंगावर करवत काठी उपरणे. कपाळावर चंद्रकोरीचे गंध! ओळखीची वाटत होती पण परिचय होईना ? मग मी हे सर्व पाहत ध्यानावस्थेत गेलो तेव्हा स्वामींनी सांगितले, "यापुढे तू मला या कवीश्वर शास्त्रींच्या रूपात पाहा. मी तुला त्यांच्याकडे सोडत आहे." मग पुण्यातील अत्यंत विनम्र व्यक्तीचे स्वरूप आठवले. एका बाजूला दुःख व दुसऱ्या बाजूला आनंद दोन्हीही अनुभवीत होतो. पू. स्वामींना समाधी दिल्यावर दोन दिवसांनी पुण्यात आलो.

दिंडीमुळे पू. दादासाहेब ऊर्फ ग. बा. नातूंचा व कवीश्वरशास्त्रींचा परिचय माहीत होता म्हणून त्यांना घेऊन लगेच महाराजांकडे गेलो. घडलेली सर्व घटना सांगितली तेव्हा ते एवढंच

म्हणाले, ''श्रीधरस्वामी मोठे अधिकारी. तथापि, त्यांनीही आम्हाला सुचविले आहे. मी आत्ता इतकेच सांगतो की, आमचा अजित व तुम्ही मी दोन समजत नाही. आपण येत जा. परंतु हे कोणासही सांगू नये. हा श्रद्धेचा विषय आहे. पाहू पुढे! दोघांनाही त्रास नको.'' म्हणून पू. दत्तमहाराजांनी देह ठेवल्यावर श्रद्धांजली संदर्भातील सभेत ही गोष्ट मी जाहीरपणे प्रथम सांगितली.

त्यानंतर पू. दत्तमहाराजांनी 'दीक्षानुग्रह' दिला. चैतन्यदीप प्रज्वलित केला. ही केवळ गुरुकृपा आहे अशी माझी धारणा आहे.

त्यानंतर वेळोवेळी माझे त्यांच्याकडे जाणे येणे झाले. श्रीगुरुचरित्र अखंड पारायण या संस्थेचे ते अध्यक्ष व मी कार्यवाह या नात्याने अनेक वर्षे काम पाहिले. माझ्या एम. ए. च्या परीक्षेच्या वेळी तर्कसंग्रह अन्नभट्टाचा अभ्यास त्यांच्या मार्गदर्शनाने झाला. त्यानंतर दरवर्षी श्रीवासुदेव निवास येथे मी श्रीमद् भागवत सप्ताहास, सकाळी कॉलेजची सेवा व दुपारी अर्थाला येऊ लागलो.

पुढे सन १९८६, १९८७ मध्ये त्यांनी मला सांगितले की, ''आनंदाश्रम येथे आपण भागवताची पुराण सेवा करीत जावे. लोकांमध्ये या भक्तिज्ञानाचा प्रसार करावा.'' मी त्यांना सांगितले, ''महाराज माझा शास्त्री- पंडितांसारखा संस्कृतचा अभ्यास नाही. कशी माझ्याकडून सेवा होणार?'' तेव्हा ते म्हणाले, ''हे पाहा आपण कुठे बोलावयाचे असते? भगवंत बोलवून घेतो. मनोभावे त्याला समोर ठेवून बोलावे. बघा काय होतं.'' झालं! मी विचार

एकच केला, पू. दत्तमहाराजांची ही आज्ञा समजून आपण चिंतन करू या. तेव्हा लक्षात आले ते हे की, १२ वर्षे ऐकून पूर्ण झाल्यावर पू. दत्तमहाराजांनी हे सुचविले आहे म्हणजे हा ईश्वरी संकेत असावा. एवढा विचार करून गेली २२ वर्षे ही सेवा सद्गुरूंनी व भगवंतानी करून घेतली. काही वेळा ते दशम स्कंधाला ऐकण्यास सौ. आईसाहेब व ते स्वत: आले होते. हे माझे फार मोठे भाग्य होते. तसेच श्री दत्तजयंती महोत्सवात वाडीप्रमाणे रोज गुरुचरित्रावरही प्रवचने सायंकाळी करावीत हे ही त्यांनी सांगितले. तीही सेवा आनंदाश्रमात सुरू आहे. असा हा एक ऋणानुबंध निर्माण झाला. अजून खूप काही आहे. विस्तार भयास्तव एवढेच लिहितो.

* * *

# शांतिब्रह्म
# ब्रह्मश्री प. पू. श्रीदत्तमहाराज

-सुश्री सुशीला मोडक
संपादक, श्रीवासुदेव निवास,
पुणे ४११ ००४.

भारतीय व्यक्तींच्या सांस्कृतिक जीवनाचा प्रत्येक दिवसाचा प्रारंभच पुण्यश्लोक ऋषी, संत, जीवन्मुक्त, भगवद्भक्त यांच्या परम मंगल संस्मरणाने होतो-

**'प्रल्हाद नारद पराशर पुण्डरीक ।**
**व्यासाम्बरीशशुकशौनकभीषमदाल्भ्यान् ।**
**पुण्यानिमान् परमभागवतां स्मरामि ॥'**

अशा महाभागवतांचे लक्षण श्रीमद्भागवत ग्रंथाने समर्पकपणे दिले आहे.

**सर्वभूतेषु यः पश्येद भगवद्भावमात्मनः।**
**भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥**

(श्री. भा ११.२.४५)

नऊ योगीश्वरांमधील दुसरे योगीश्वर श्रीहरी म्हणाले, ''हे राजा, आत्मस्वरूप भगवान सर्व प्राणिमात्रांमध्ये आत्मरूपाने राहिले आहेत असे जो पाहतो, त्याचबरोबर सर्व चराचर आत्मस्वरूप

भगवंतांमध्येच आहेत, असे पाहतो, अर्थात् वास्तवात संपूर्ण जगत् भगवत्स्वरूपही आहे असा ज्याचा अनुभव आहे, अशी ज्यांची सिद्ध दृष्टी आहे तो भगवंताचा परमप्रेमी उत्तम भागवत समजावा."

'जनी जनार्दन' आणि 'सर्वाभूती भगवद्भाव' लाभलेल्या ज्ञानी भक्तांचे जीवन म्हणजे भक्तियोगात्मक अद्वैतदृष्टीचे जीवनभाष्य आहे. श्रीमत् शंकराचार्य, ज्ञानेश्वर यांच्या जीवनकार्यात त्याच तत्त्वदृष्टीचा प्रभावी आविष्कार आहे.

श्री. प. प. श्रीमद्वासुदेवानंद सरस्वती स्वामीजी महाराज प. पू. ब्रह्मश्री श्री दत्तमहाराज, योगीराज श्री गुळवणी महाराज यांचे जीवन, कार्य आणि तत्त्वदृष्टी ही अशा श्रेष्ठ ज्ञानिभक्तांचे सजीव साकार दर्शन आहे. त्यांचे संस्मरण, अनुसरण हीच त्यांची अंतरंग भक्ती आहे.

श्रीमद्भगवद्गीतेतील ज्ञानी, भक्त लक्षणाप्रमाणेच (अ.१२), श्रीमद्भागवत, ग्रंथात ज्ञानी भक्त, संतलक्षणे आली आहेत.

**सन्तोऽनपेक्षा मच्चित्ताः प्रशान्ताः समदर्शिनः ।**
**निर्ममा निरहंकारा निर्द्वन्द्वा निष्परिग्रहाः ॥**

(श्री. भा. ११.२६२७)

'संतांना कशाचीही अपेक्षा नसते. त्यांचे चित्त माझ्या ठायी जडलेले असते. ते अत्यंत शांत असतात आणि समदर्शी असतात. म्हणजेच सदा, सर्वदा, सर्वत्र सर्वांतर्यामी स्थित असलेल्या भगवंताचे दर्शन करतात. त्यांच्या ठिकाणी अहंकाराचा लेशही नसतो. त्याचप्रमाणे मी, माझेपणा नसल्यामुळे ममत्व संभवतच नाही.

सुख-दु:खादी द्वंद्वे त्यांना बाधत नाहीत. त्याचप्रमाणे बौद्धिक, मानसिक, शारीरिक आणि कोणत्याही प्रकारचा कसलाही संग्रह ते करीत नाहीत.'

संतश्रेष्ठ एकनाथांचे या लक्षणावरील भाष्य हृदयस्पर्शी आहे. प. पू. भागवताचार्य श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने गीतेमध्ये सांगितलेली ज्ञानिभक्तलक्षणे (३.१२), ज्ञानलक्षणे (३.१३) श्रीमद्भागवतोक्त संतलक्षणे यांचे मनोज्ञ दर्शन घडते. 'अमानित्वं अदंभित्वं' या लक्षणाप्रमाणेच त्यांचा लौकिक, प्रपंचव्यवहारही श्रीसंत एकनाथांप्रमाणेच -

**'देही असोनि नाही अहंकृती । गेही असोनि नाही गृहासक्ती ।'**

असा होता.

## ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज यांचे मर्यादापुरुषोत्तमत्व

परम पूजनीय श्रीधुंडिराज महाराज यांचे निरातिशय वात्सल्य. प. पू. श्रीदत्तमहाराजांवर होते. अनेक वर्षांपूर्वी प. पू. श्रीधुंडिराज पुण्याला आले होते. मी आश्रमात सद्गुरू योगीराज श्रीगुळवणीमहाराजांच्या दर्शनास गेले होते. तेव्हा तेथे प. पू. श्रीधुंडिराजमहाराजांचेही दर्शन झाले. मी त्यांना म्हणाले, महाराज आपण आमच्या घरी यावे. श्रीमहाराजांनी लगेच होकार दिला. प. पू. सद्गुरू श्रीगुळवणी महाराजांनाही बोलावले. परंतु श्रीगुरुमहाराजांना त्यादिवशी वेळ नव्हता. तेव्हा मी प. पू. श्रीधुंडिराजमहाराज यांना म्हणाले की, मी आपल्याला न्यायला उद्या

केव्हा येऊ? ' त्या वेळी श्रीमहाराज म्हणाले, कशाला न्यायला येताय? आम्हाला श्रीदत्तमहाराज आपल्या घरी घेऊन येतील.'

दुसरे दिवशी प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज प. पू. पितृचरण श्रीधुंडिराज यांना घेऊन आमच्या घरी आले. बैठक घातलेली होती. बैठकीवर प. पू. श्रीधुंडिराज महाराज बसले. प. पू. श्रीदत्तमहाराजांनाही मी म्हटले, 'आपणही बैठकीवर बसावे.' परंतु श्रीदत्तमहाराज त्या बैठकीवर न बसता खाली सतरंजीवर बसले. त्या वेळी पिताश्री श्रीधुंडिराज महाराज म्हणाले, "ते मोठी आमची मर्यादा पाळणारे आहेत, ते नाही बसणार आमच्या शेजारी."

आजही तो प्रसंग हृदयपटलावर कोरला गेला आहे. वाल्मिकी रामायणातील, **'पिता ही दैवतं तात देवतानामपि स्मृतम्! '** (पिता हे देवादिकांचेही दैवत आहे.) त्याच आदरयुक्त बुद्धीने पित्याच्या मर्यादेचे परिपालन श्रीदत्तमहाराजांनी केले. ज्या ज्या तेजस्वी आणि मंगल गुणांची कल्पना मानवी मनाला करता येईल, त्या सर्वांचा आविष्कार श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी झाला होता. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वडिलांशी कसे मर्यादेने वागावे याचा आदर्श वस्तुपाठच दिला असेच म्हणावे लागेल. त्या वेळी मला तरी प. पू. श्रीदत्तमहाराज मर्यादापुरुषोत्तम प्रभु रामचंद्राप्रमाणे भासले.

## प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज यांचा आदर्श गृहस्थाश्रम

**नाना वेश नाना आश्रम । सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम ।**
**जेथे पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ।।**

(दा. १४.७.१)

सर्व आश्रमांना गृहस्थाश्रमाचा आधार असतो. थोर पुरुष गृहस्थाश्रमात निर्माण होतात आणि त्याच्याच आश्रयाने जगतात. नाना प्रकारचे वेष व नाना प्रकारचे आश्रम आहेत. पण गृहस्थाश्रम या सर्वांचा आधार आहे. त्रैलोक्यातील सर्व लोकांना अखेर गृहास्थाकडेच विश्रांती लाभते. देव, ऋषी, मुनी, योगी, अनेक तापसी व विरक्त पुरुष, पितर आणि इतर हविष्य अन्नाचे भागीदार, तसेच अतिथी व अभ्यागत हे सगळेजण गृहस्थाकडूनच तृप्त होतात. ज्या गृहस्थाश्रमामध्ये स्वधर्माचे आचरण आणि यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह ही षट्कर्मे चालतात. धर्मशास्त्राप्रमाणे सर्व क्रियांचे आचरण घडते; जेथे सर्व लोकांशी बोलणे चालणे होते. जे काही करायचे असेल ते सर्व प्रकारे नियमित आणि शास्त्रोक्त पद्धतीने जेथे केले जाते, तो गृहस्थाश्रम उत्तम होय. त्यातल्या त्यातदेखील जेथे अलौकिक असा हा भक्तिमार्ग आढळतो तो गृहस्थाश्रम तर धन्य धन्य आहे! असा आदर्श गृहस्थाश्रम प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांचा होता. श्रीसमर्थ रामदासांनी उत्तम पुरुषांची लक्षणे सांगितली आहेत. १) आत्मज्ञान २) प्रखर वैराग्य ३) गोड भाषण आणि ४)पुष्कळांना सुखी करणे. या चार गोष्टी श्रीदत्तमहाराजांच्या आचरणात प्रत्यक्ष साकार झालेल्या दिसतात.

एकदा सहज प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या घरी 'रेणुकानिवास' येथे त्यांच्या दर्शनासाठी गेले होते. तेव्हा त्यांच्या स्नुषा (प. पू. अशोकमहाराजांच्या पत्नी) सौ. सविता वहिनी यांनी सांगितलेली हकीगत आहे. सविता वहिनी सांगत होत्या, "अहो, दादा (प. पू.

श्रीदत्तमहाराज) सांगतात, आपली जी कुलदेवता रेणुका माता आहे ना, ती आपला प्रपंच चालवतीय. त्यामुळे आपल्याला काही कमी पडत नाही. तिची उपासना, पूजा अर्चा सर्व व्यवस्थित केले पाहिजे. म्हणजे तिची पूर्ण कृपा आपल्या घराण्यावर नित्य, सतत, अखंड राहील."

खरोखर श्रीदत्तमहाराजांच्या घरी रोज कोणीना कोणी तरी भोजनप्रसादास असे. दुपारी बारा वाजता जे कोणी येतील त्यांना प. पू. श्रीदत्तमहाराज 'प्रसाद घेऊन जा' असे म्हणत असत आणि आपल्याबरोबर भोजनास बसवत असत. खरोखर 'रेणुका निवास' हे घर रेणुका देवीचेच आहे असेच श्रीदत्तमहाराज सांगत असत. **'तुका म्हणे घालू तयावरी भार । वाहू हा संसार देवापायी।'** अशी जीवनाची तत्त्वदृष्टी श्रीदत्तमहाराजांची होती. एवढेच नव्हे तर प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन म्हणजे श्रेष्ठ ज्ञानिभक्तांचे सजीव, साकार दर्शन आहे.

## विद्यावाचस्पती ब्रह्मश्रींचे 'अकिंचनत्व'

श्री दत्तमहाराजांकडे घराण्याची अशी एक परंपरा होती की अधिक महिन्यातील कुळधर्म बाहेर जाऊन करायचा. एके वर्षी हा अधिक महिन्यातील कुळधर्म आपल्या 'वासुदेव निवास' या आश्रमामध्ये श्रीदत्तमहाराजांनी केला होता. त्याला 'मारग मैणे' व 'जानाई देवी' चा कुळधर्म असे म्हणतात. तीन दिवस त्यावेळी श्रीदत्तमहाराजांचे देव आश्रमात होते. त्या वेळी 'मारग मैणे' व 'जानाई देवी' यांच्या प्रत्येकी चौदा, चौदा सवाष्णी व दोन कुमारिका

भोजनास असतात व ब्राह्मण कितीही आले तरी सर्वांना भोजन द्यावयाचे असते. पुरणा- वरणाचा स्वयंपाक करावयाचा असतो.

त्या कुळधर्मामध्ये प. पू. श्रीदत्तमहाराजांनी घरात असे सांगितले होते की, ' आपल्या घरातील सर्व नव्या नऊवारी साड्या (लुगडी), शाली, धोतरजोड्या, उपरणी यांनी भरलेल्या ट्रंका घेऊन आश्रमात चला'. आणि दुसऱ्या दिवशी आम्हा सर्वांना भोजन प्रसाद देऊन सर्वच्या सर्व लोकांना कुणाला धोतर जोडी-उपरणे, कुणाला शाल, कुणाला लुगडे असे प्रत्येकाला दिले. सर्व बॅगा रिकाम्या केल्या. श्रीदत्तमहाराज हे दातृत्वामध्ये अग्रणी असलेले श्रीदत्तप्रभू आहेत.

दुसरा प्रसंग जो आठवतो तो देऊळगाव राजाचा. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या 'रौद्रीशांती' च्या वेळी देऊळगावराजा येथे 'विष्णुयाग' केला होता. हा यज्ञ पाच दिवस चालला होता. त्या वेळी यज्ञाचे यजमानपद म्हणून श्रीमहाराजांचे सुपुत्र प. पू. श्री अशोक महाराज व त्यांच्या पत्नी व श्रीमहाराजांच्या स्नुषा सौ. सविता यांनी भूषविले होते. त्याच वेळी प. पू. श्रीदत्तमहाराजांकडून दररोज अनेक जणांना गुरुमंत्रही दिले जात होते. त्याही वेळी अनेक भक्तांनी अत्यंत भक्तीयुक्त अंत:करणाने श्रीमहाराजांच्या चरणी आहेर अर्पण केले. त्या मिळालेल्या आहेरामुळे अक्षरश: सर्व खोली भरून गेली. तेव्हा प. पू. श्रीमहाराजांनी आपल्या सुनांना असे सांगितले की, ' जे जे कोणी दर्शनाला येतील त्यांना प्रत्येकाला ह्यातील देऊन टाका.' त्यांच्या मोठ्या सुनबाई सौ. सविता यांनी सांगितले की, 'आम्ही ते मिळालेले सर्व तेथे प्रत्येकाला दिले व अक्षरश: सर्व खोली पूर्ण

रिकामी केली.' प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अगाध नि अलौकिक दातृत्व लोकोत्तर कर्णाच्या दातृत्त्वाची आठवण करून देते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी प. पू. श्रीसद्‌गुरुयोगीराज श्री गुळवणीमहाराजांना लिहिलेल्या पत्रातही स्वत:ला 'अकिंचन' म्हटले आहे. पण श्रीगुरुमहाराजांनी त्यांचे 'अकिंचनत्व' ओळखले होते. त्यामुळे त्यांचा कधीच गैरसमज झाला नाही.

आज जेव्हा श्रीदत्तमहाराजांचे 'अकिंचनत्व' या शब्दाचा विचार मनात येतो तेव्हा असे लक्षात आलेले आहे की 'अकिंचनत्व' एवढे मोठे आहे की मी त्यांच्या चरणी नतमस्तक आहे.

'अकिंचन या शब्दाचा अर्थ एकनाथी भागवतात पुढीलप्रमाणे दिला आहे. तो सर्वांना समजावा व श्रीमहाराजांची थोरवी, आणि महानता सर्वांनी जाणून घ्यावी.

**चिन्मात्री जडले मन । विश्व जाहले चैतन्यघन ।**
**बुडाले परिग्रहाचे भान । अकिंचनपण या नाव ।।**

(११.९०८)

**मी वाचूनि ज्याचे गाठी । नाही फुटकी कांचवटी ।**
**मजवाचोनि सगळे सृष्टी । आणिकांते न देखती ।।**

(१४.१९२)

**ऐसे करिता माझे भजन । जातिकुळ देहाभिमान ।**
**सहजे जाय निरसोन । अकिंचन या नाव ।।**

(१४.१९३)

श्री नाथ महाराजांनी 'अकिंचनत्व' गुणाचे वर्णनही अलौकिक पुरुषाचे वर्णन केले आहे. ते पुढीलप्रमाणे -

**अकिंचनस्य दान्तस्य शान्तस्य समचेतसः ।**
**मया सन्तुष्टमनसः सर्वाः सुखमया दिशाः ।।**

(१४.१३)

अर्थ - सर्व संग सोडून देऊन जो मोकळा झाला आहे. मन व इंद्रिये ताब्यात ठेऊन जो तृप्त आहे. जो सर्वत्र भागवत्स्वरूप पाहणारा आहे. माझ्या स्वरूपातच ज्याचे मन रमलेले आहे, त्याला हे सर्व विश्व सुखमयच आहे.

ओव्या -

**ऐक अकिंचनाचा गोठी । नाही मठ मठिका पर्णकुटी ।**
**पांचापालवी मोकळ्या गांठी ।**
**त्यांसी ये भेटी निजसुख माझे ।।** (१४.१०३)
**तो जेउती वास पाहे । ते दिग्मंडळ सुखाचे होये ।**
**तो जेथ कां उभा राहे । तेथ गुसावले आहे महासूख ।।**
(१४.१०९)

**त्याचे पाऊल जेथे पडे । तेथे निजसुखाची खाणी उघडे।**
**तो प्रसंगे पाहे जयाकडे । तेथे स्वानंदे वाढे परमानंद ।।**
(१४.११०)
**तो ज्यासी भेटे अदृष्टे । त्यास सुखाची पहाट फुटे।**
**त्याचा पावो लागलिया अवचटे । सुखाचे गोमटे निजसुख लाभो ।।** (१४.११३)

खरोखर प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपले जीवन सर्वस्व जनताजनार्दनाला समर्पित केले होते. **'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टविती परउपकारे ।'** या संतवचनाप्रमाणे स्वत: एषणात्रयरहित असूनसुद्धा लोककल्याण साधण्यासाठी आपले सर्व जीवन त्यांनी वेचले. 'अनंत सद्गुणांनी त्यांचा आश्रय घेतलेला होता. 'गुणा: पूजास्थानम्' अशा महाराजांना कोटी कोटी दंडवत'.

## आधी राखावा आचार

प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांचे डोळ्याचे ऑपरेशन झाले होते. नेत्रविशारद प. पू. डॉ. श्री. ल. शं. भावे यांनी हे ऑपरेशन केले होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा अधिकार डॉ. भावे हे पूर्णपणे जाणून असल्यामुळे ऑपरेशननंतर आठ दिवस आपल्याच घरी श्रीमहाराजांना ठेवून घेतले होते. तेथेच डॉक्टरांनी त्यांची उत्तम व्यवस्था ठेवली होती. संध्या-वंदनादी करत असत. श्री. भावे डॉक्टर त्यांची सकाळ व सायं संध्येची स्वत: सोवळ्यात तयारी करून देत असत. व श्रीदत्तमहाराजांना हाताला धरून हळूहळू हॉलमध्ये आणून बसवत असत. श्रीमहाराजांनी त्याही काळात नित्य कर्म केलेच केले. त्या वेळी डॉ. भावे यांच्याकडे सज्जनगडावरून प. पू. श्री. भास्करबुवा रामदासी आले होते आणि ते तेव्हा श्रीसमर्थ रामदासांच्या 'आत्माराम' या ग्रंथावर रात्री ८ वाजता प्रवचन करीत असत. श्रीमहाराजांची खोली त्यांच्या शेजारीच असल्यामुळे श्रीमहाराज कॉटवर उठून बसून आत्माराम ऐकत असत.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी कोणत्याही परिस्थितीत आपले आचरण सोडले नाही. श्रीसमर्थ -

**'आधी राखावा आचार । मग पहावा विचार ।**
**आचार विचारे पैलपार । पाविजेते ।।'**

दास.(१७.१०.२५)

सूक्ष्म ज्ञानदृष्टी येण्यासाठी जो अभ्यास करायचा; त्यासाठी आचार व विचार दोन्ही पवित्र असावे लागतात. आचार व विचार शुद्ध ठेवून सत्संगामध्ये सच्छास्त्रश्रवण केले तर सूक्ष्मामध्ये शिरण्याची युक्ती साधते.

**'अंतर क्षाळिले गुरुप्रतिती । बाह्य क्षाळिले शास्त्रयुक्ति ।**
**ऐसे शुचित्व निजनिश्चिती । अद्वैत स्थिति नांदे तेथे ।।'**

देही असून विदेही, प्रपंचात राहून उत्कृष्ट शांतीचा अनुभव, निष्काम कर्तव्याचरण असे श्रीदत्तमहाराजांचे अनुपम दर्शन घडतेच घडते.

## सौ. लक्ष्मीबाई - सौ. आईसाहेब

## अहो भाग्यम् । साक्षात् विष्णु - लक्ष्मी

महाभाग्याने श्रीदत्तमहाराजांसारखे पती मिळाल्याने सौ. आईसाहेबांचे जीवन खरोखर धन्य! धन्य! झाले. सौ. आईसाहेबांची महान् पुण्याई! म्हणून त्यांना घरातच प. पू. धुंडिराजमहाराज त्यांचे श्वशूर हे सद्गुरू लाभले. आणि ब्रह्मश्री प. पू. श्रीदत्तमहाराजांसारखे 'शांतिब्रह्म' असलेले पती लाभले. प्रपंचच परमार्थ होण्यासाठी श्रीदत्तमहाराजांना सौ. आईसाहेबांचे विलक्षण साह्य असे.

**“पतीपत्नीची चित्तवृत्ती । अनुकूल वर्ते धर्मप्रवृत्ती ॥”**

असे लक्ष्मीनारायणस्वरुपी हे दाम्पत्य एक चित्ताने व उदार प्रेमाने प्रपंच परमार्थ एक करून आनंदाने नांदत असलेले पाहून आमच्यासारख्या सर्वांना अमर्याद सुख-समाधान लाभत असे. सौ. आईसाहेब सहधर्मचारिणी. सौ. लक्ष्मीदेवी, यांना श्रीदत्तमहाराजांची चरणसेवा लाभल्याने त्या स्वत: खरोखरच धन्य होत. अशा सम-समान गुण असलेल्या वधू-वरांना एकत्र आणून ब्रह्मदेवाने आमच्यासारख्या सर्वसामान्यांचे खरोखर कल्याणच केले. एवढेच नाही तर आदर्श गृहस्थाश्रमाचा वस्तुपाठ त्यांनी जगाला शिकविला.

सौ. आईसाहेबांनी घरची आघाडी अत्यंत समर्थपणे सांभाळली. त्यामुळे श्रीदत्तमहाराज सांसारिक जबाबदारीबद्दल पूर्णत: निश्चिंत होते. सौ. आईसाहेब, आहे त्यामध्ये, अत्यंत टापटिपीने व समाधानाने संसार करत असत. सौ. आईसाहेब तशा रसिक, हौशी होत्या. सौ. आईसाहेबांची राहणी अत्यंत साधी. सौ. आईसाहेब सदा प्रसन्न, सदा सर्वांशी सारखेपणाने वागणाऱ्या, अत्यंत बुद्धिमान व बहुश्रुतता असल्यामुळे सर्व विषयांत अधिकारवाणीने बोलत असत. सौ. आईसाहेबांची साधनाही फार मोठी होती.

सौ. आईसाहेब म्हणजेच सौ. लक्ष्मीबाईसारख्या चतुरस्र बुद्धिमान व अत्यंत कुशल अशा गृहिणीची जोड मिळाल्यामुळे विरक्त श्रीदत्तमहाराजांचा संसाररथ जगाचे कल्याण करत पुढे जात होता व आजही त्यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

सौ. आईसाहेबांचे कार्तिक स्नान कधीही चुकले नाही.

सौ. आईसाहेब म्हणत चांदणी बघून कार्तिक स्नान करायचे असते. पहाटे चारला सौ. आईसाहेब चातुर्मास नियमही करीत असत. एका चातुर्मासामध्ये सौ. आईसाहेबांनी प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरणांचे तीर्थ रोज घेण्याचा नियम केला. श्रीमहाराजांना धर्मकार्यासाठी वरचेवर गावाला जावे लागत असे. त्या वेळी सौ. आईसाहेब जाण्यापूर्वी चरणतीर्थ बाटलीत भरून ठेवत असत. कारण रोजचा नियम चुकता कामा नये, हीच त्यांची आत्यंतिक मनस्वी धारणा। सर्वश्रेष्ठ महापुरुषाची सहधर्मिणी होण्याचे भाग्य लाभलेल्या सौ. आईसाहेबांनी हा चातुर्मासातील नियम अत्यंत कटाक्षाने पूर्ण केला. या व्रताचे उद्यापन असे असते की माहेरहून आहेर करायचा असतो. परंतु सौ. आईसाहेबांनी स्वतःच काव्य करून प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरणी अर्पण केले. ते काव्य खाली देत आहे.

**चरणतीर्थ घेतले - उपकृत जाहले ।**
**धुंडिराजसुत लाभले - सर्वस्व त्यांना अर्पिले ॥ धृ.॥**
**थोर कुल कवीश्वरांचे - घराणे असे महंतांचे ।**
**पूर्व सुकृत असे साचे - म्हणूनी लाभले पाय त्यांचे ॥१॥**
**वाणीमध्ये द्यावे बळ - नाम घेता जाई वेळ ॥२॥**
**संतकुळी जन्मला तुम्ही थोर ।**
**पुत्ररूपी पाठिशी तीन शिलेदार ।**
**कन्या तिन्हीही सांभाळिती संसार ।**
**बघूनी त्यांचे सुयश - आनंद झाला फार ॥३॥**
**तुमचेची घेणे - तुम्हासी देणे ।**

**तुमच्यापाशी - काय उणे ।**

**परि अल्प पाकळी स्वीकारणे ।।४।।**

**सौ. लक्ष्मीबाई दत्तात्रेय कवीश्वर**

प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांचे पिताश्री प. पू. श्री. धुंडिराजमहाराज हे सौ. आईसाहेबांचे गुरू व मामंजी. सौ. आईसाहेबांचे लहानपणीच लग्न झाल्यामुळे श्रीदत्तमहाराजांच्या सौ. मातोश्रींचे व प. पू. श्री पिताजींचे अपार वात्सल्य सौ. आईसाहेबांना लाभले. त्या दोघांनी त्यांचे सर्व कोडकौतुक केले. सौ. आईसाहेबांची मुळातच असलेली सेवावृत्ती त्या घराण्यामध्ये पूर्णपणे बहरून गेली.

प. पू. श्रीधुंडिराजमहाराज त्यांना मोक्षगुरू मिळाले. त्यानंतर तर आपल्या श्रीगुरूंची म्हणजेच श्रीधुंडिराज महाराजांची त्यांनी **'तनु मन जीवे । चरणासी लागावे । आणि अगर्वता करावे । दास्य सकळ ।।'** अशी सेवा केली व सेवावृत्तीचा आदर्शच त्यांनी सर्वांना शिकविला.

आपल्या श्रीगुरूंना दृष्ट होऊ नये म्हणून सौ. आईसाहेबांनी "श्रीगुरूची दृष्ट असे काव्य केले आहे. तेही या ठिकाणी देत आहे -"

**- श्रीगुरुची दृष्ट -**

**दृष्ट झाली माझ्या आता श्रीगुरुवरा ।।धृ.।।**

**ज्ञान निखारे फुलवून ।**

काम क्रोध मिरची लवण ।
दुर्बुद्धी मेथी मोहरी जाण ।
उतरी गुरुवरा माझ्या श्रीगुरुवरा ।।१।।
मन कोंबडा मारून
वासना लिंबू उतरुन ।
स्थूल देह हा जाळून ।
लावू अंगारा, माझ्या श्रीगुरुवरा ।।२।।
नरनारी दर्शना येती ।
दृष्ट लावूनिया जाती ।
आता दृष्ट उतरुनि काढू ।
श्रीगुरुवरा, माझ्या श्रीगुरुवरा ।।३।।
धुंडिराज गुरु मी केले ।
देहमन शुद्ध झाले ।
देहभान विसरून गेले ।
श्रीगुरुवरा माझ्या श्रीगुरुवरा ।।४।।
दीन लक्ष्मी पदी लीन ।
मागतसे भक्तीदान ।
चरणापासी रहावे म्हणूनी ।
मागे आसरा, माझ्या श्रीगुरुवरा ।।५।।

**सौ. लक्ष्मीबाई दत्तात्रेय कवीश्वर**

वरील दोन्ही काव्यावरून सौ. आईसाहेबांची पतिनिष्ठा, जीवाभावाने केलेली गुरुसेवा तर दिसून येतेच येते आणि त्यांच्या

प्रत्येक कृतीला एक आध्यात्मिक उंची लाभलेली होती. त्या खरोखरच थोर 'विदुषी' होत्या.

सौ. आईसाहेब, धन्य तुमचा महिमा! तुम्हा उभयतांचे जीवन हे आदर्श पती-पत्नींचे जीवन आहे. ते सर्वांना सर्वकाळ निःसंशय मार्गदर्शक होईल.

## स्थितप्रज्ञमूर्ती - ब्रह्मश्री प. पू. श्रीदत्तमहाराज

**दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।**
**वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥** गीता २.५६

दुःखप्राप्तीत ज्याचे मन उद्वेगरहित असते आणि सुखप्राप्तीत ज्याची स्पृहा (इच्छा) दूर झालेली आहे. प्रीति, भय व क्रोध ही ज्याची नष्ट झाली आहेत असा मुनी 'स्थिरबुद्धि म्हटला जातो.'

कोणत्याही परिस्थितीत मनाचा समतोल यांचा ढळत नसे. एवढेच नाही तर,

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।**
**"निर्ममो निरहंकारः समदुःख सुखः क्षमी ॥"**

भ. गी. १२.१३

सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणी द्वेषभावरहित (याचप्रमाणे) स्वार्थरहित, सर्वांचा प्रेमी आणि अकारण दयाळू, ममत्वरहित व अहंकाररहित सुखदुःखांच्या प्राप्तीत सम व क्षमाशील असतो. अपराध करणाऱ्यालाही अभय देणारा असतो.

वरील बाराव्या अध्यायातील हा श्लोक संपूर्णपणे

ज्यांच्याबाबतीत सत्य आहे अशी ज्ञानमूर्ती म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराज! त्यांच्या जीवनातील सर्वच प्रसंग अंत:करणाला गहिवरून टाकणारे आहेत. कामकोटी पीठाच्या श्रीचंद्रशेखरेंद्र सरस्वतींनी सुवर्णकंकण देऊन त्यांचा सर्वोच्च मान सन्मान केला होता. श्रीदत्तमहाराजांनी हा बहुमान झाल्याची वार्ता स्वत:हून कोणासही - प. पू. योगीराज श्रीगुळवणी महाराजांनाही दिली नाही. तशी ते देणार नाहीत, हे ध्यानी घेऊन धारवाडचे प. पू. श्री भालचंद्रशास्त्री उप्पिनबेटिगिरी यांनी श्रीमहाराजांना पत्र लिहून ही हकीगत कळविली. त्या वेळी प. पू. श्रीदत्तमहाराज नृसिंहवाडीस काही अनुष्ठान करण्यास गेले होते. तेव्हा त्या काळात श्रीमहाराजांची एक कन्या कालवश झाली. श्रीमहाराज अनुष्ठान आटोपून परत आले. प. पू. श्रीदत्तमहाराज परत आल्यावर त्यांच्या दर्शनासाठी, शिवाय त्यांची कन्या दिवंगत झाली म्हणून त्यांच्याकडे बरेच लोक येत-जात होते. योगायोगाने त्याच सुमारास त्यांचे सुवर्णकंकण कामकोटीहून आले होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांनी ते सुवर्णकंकण घरातून आणून बाहेर आलेल्या मंडळींना पाहण्यासाठी हातात दिले आणि म्हणाले की, "श्री भगवंताच्या इच्छेने सुवर्णकंकण मिळाले, आणि त्याच भगवंताच्याच इच्छेने मुलगीही देवाघरी गेली." 'सुखदु:खे समे कृत्वा' चा हा प्रत्यक्ष पाठच ते तेथील उपस्थितांनी देत होते. ही एक घटना जरी भक्तांच्या मनात दृढावली तरी त्यांची आध्यात्मिक वाटचाल वेग घेईल.

ब्रह्मश्री प. पू. श्रीदत्तमहाराज सर्व शास्त्रांत तर परिपूर्ण ज्ञाते आहेतच.

परंतु महापुराण श्रीभागवत ग्रंथाची त्यांना प्रचंड ओढ होती. श्रीवासुदेव निवासात श्री सद्गुरुराज योगीराज श्रीगुळवणी महाराजांनी जेव्हा भागवत सप्ताह सुरू केला तेव्हा एका वर्षी प. पू. श्रीदत्तमहाराज व एका वर्षी प. पू. पंडित आत्मारामशास्त्री जेरे असा काही वर्ष सप्ताह होत असे. श्री आत्मारामशास्त्री श्रीदत्तमहाराजांपेक्षा वयाने मोठे होते. तरीही श्रीदत्तमहाराजांचा भागवत सप्ताह असताना मध्यंतरासाठी जेव्हा श्रीदत्तमहाराज थांबत असत तेव्हा तेवढ्या वेळात माडीवर जाऊन श्रीदत्तमहाराजांच्या विश्रांतीसाठी अंथरूण घालण्याचे काम श्रीआत्मारामशास्त्री करीत. त्या वेळी ते म्हणत, "महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व देशात श्रीमद्भागवत उत्कृष्ट सांगणाऱ्यांत श्रीदत्तमहाराज सर्वश्रेष्ठ आहेत. इतर शास्त्रांप्रमाणे श्री भागवत शास्त्रही श्रीदत्तमहाराजांना तोंडपाठ आहे."

## साक्षात दत्तावतार - ब्रह्मश्री प. पू. दत्तमहाराज

अनेक वर्षांपूर्वीची ही घटना ती सहज जशी लिहून ठेवली तशीच इथे दिली आहे. परम पूजनीय श्रीसद्गुरू योगीराज श्रीगुळवणी महाराज प. पू. श्रीदत्तमहाराजांना बरोबर घेऊन एकदा आमच्या घरी आले होते. श्रीसद्गुरू महाराज येणार होते हे माहीत होते, परंतु श्रीदत्तमहाराज येणार हे माहीत नव्हते. त्यादिवशी मी का कोणास ठाऊक एक फुलाचा, एक तुळशीचा हार आणला होता. प. पू. श्रीदत्तमहाराज आले म्हणून इतका परमानंद झाला. परंतु श्रीदत्तमहाराजांना घालण्यास दुसरा फुलांचा हार नाही म्हणून वाईट

वाटले. पूजा केल्यावर जेव्हा हार घालण्याची वेळ आली तेव्हा श्रीगुरुदेव श्रीगुळवणीमहाराजांना फुलांचा हार घालून एवढेच म्हटले की, ''श्रीगुरुमहाराज, श्रीदत्तमहाराजांना मी आता तुळशीचा हार घालते.'' तेव्हा सद्गुरू महाराज योगीराज म्हणाले, ''अगं, दत्ताला तुळशीचाच हार पाहिजे. तू जरूर घाल.'' आजही हे सद्गुरूंचे वाक्य अंत:करणात भरून व्यापून राहिलेले आहे.

जणू काही त्या वेळी श्री योगीराज श्रीगुळवणी महाराजांनी असे सूचित केले की, 'अगं, श्रीदत्तमहाराज म्हणजे, आत्मज्ञानी असूनही प्रेमळ भक्त, प्रेमळ शिष्य आहेत. अत्यंत कनवाळू असूनही स्वमनाचे स्वामी आहेत. योगसामर्थ्यसंपन्न परंतु लोकांमध्ये वागताना क्षमाशील, शास्त्रज्ञ विद्वान असूनही विनम्रभावाने वागण्याचे चातुर्य असणारे असे सद्गुरुस्वरूप श्रीदत्तमहाराज दत्तावतार आहेत बरं का!' आणखीही एक गोष्ट श्रीगुरुदेव सहजगत्या बोलून गेले, अग, श्रीदत्तमहाराज आमच्यापेक्षाही मोठे आहेत हं!' आणि हे बोलत असताना श्रीगुरुमहाराजांचा आनंदमय प्रेमभाव नुसता ओसंडून वाहात होत. मला तर असे वाटते, श्रीनिवृत्तीनाथ म्हणजे श्रीसद्गुरुराज योगीराज व श्रीनिवृत्तीनाथांच्या म्हणजेच श्रीगुरुदेव महाराजांच्या कृपाप्रसादाने श्रीभागवत सांगणारे श्रीज्ञानदेवम्हणजे श्रीदत्तमहाराज!

अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान असलेले आदिनाथ श्रीशिवशंकर श्रीसद्गुरुराज श्रीयोगीराज श्रीगुळवणीमहाराज धन्य होत व श्रीसद्गुरू वचनावर पूर्ण विश्वास ठेवून अनन्यभावाने शरण जाणारे सच्छिष्य

ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज, धन्य होत! विनम्रभावाने आपल्या दोघांच्या चरणी शतश: लोटांगण!

अनेक वर्षांपूर्वी नृसिंहवाडीला घडलेला प्रसंग आहे. श्री प. प. श्री नरसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराजांची पुण्यतिथी होती. तो दिवस अश्विन वद्य सप्तमीचा होता. शके १८४९ म्हणजेच इ. स. १९२७ मध्ये श्री. प. प. श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराज निजधामाला गेले. प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांचे ते मोक्षसद्‌गुरू.

त्या दिवशी आम्ही नृसिंहवाडीला गेलो होतो. सौ. आईसाहेब आम्हा सर्वांना म्हणाल्या, ''आज आपल्याला औरवाडला भोजनप्रसादाला जायचे आहे चला सर्वजणी.'' त्या वेळी औरवाडला होडीतून जावे लागत असे. आम्ही सर्वजण प्रसादाला गेलो होतो. मी सौ. आईसाहेबांच्या शेजारी भोजनाला बसले होते. प. पू. श्रीदत्तमहाराज पंक्तीतून भराभरा वाढत होते. मी सौ. आईसाहेबांना म्हटले, ''अहो आई, महाराज वाढत आहेत. मी जाऊ का वाढायला, पाणी तरी वाढते. सौ. आईसाहेब म्हणाल्या, ''येथे फार सोवळे असते. आपण फक्त भोजन करायचे व जायचे. बैस शांतपणे.''

खरोखर त्या दिवशी श्रीदत्तमहाराजांनी केलेल्या श्रीसद्‌गुरू सेवेचे अपूर्व दर्शन घडले. श्रीज्ञानेश्वरांच्या शब्दात सांगायचे झाले तर,

**ते ज्ञान पै गा बरवे । जरी मनी आथि आणावे ।**
**तरी संतां या भजावे । सर्वस्वेंशी ।।** (४.१६५)
**जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंटा ।**
**तो स्वाधीन करी सुभटा बोळगोनी ।।** (४.१६६)

**तरी तनुमनजीवे । चरणासी लागावे ।**

**आणि अगर्वता करावे । दास्य सकळ ॥** (४.१६७)

एकदा श्रीदत्तमहाराजांनी भागवत सांगत असताना असं सांगितले होते की श्रीसद्गुरूंची सेवा करावी परंतु, 'मी सेवा करतो किंवा मलाच सेवा करायला मिळते आहे,' असा भावसुद्धा मनात असता कामा नये. म्हणजेच जरी सेवा करीत असलो, सेवारूपी कर्म करीत असलो तरी ते आपण करीत नाही अशी ठाम समजूत ठेवणे, त्याच्या फलाची आशा न ठेवणे, कर्म करीत असताही आपले नैष्कर्म्य तसेच आहे. अशा समजुतीने राहणे ही त्याची युक्ती आहे. ज्ञान जर प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर संतचरणाची अनन्य सेवा हाच उपाय आहे असेच जणू काय श्रीदत्तमहाराज आपल्या कृतीतून दाखवत होते. जो कर्माचे कर्तृत्त्व आपल्याकडे घेत नाही अशा पुरुषालाच ते ज्ञान प्राप्त होते व त्यामुळे त्या पुरुषाला निरंतर शांतीचा लाभ मिळतो. असे 'शांतिब्रह्म' असलेल्या श्रीदत्तमहाराजांनी त्यादिवशी श्रीगुरुसंवेचा आदर्श आम्हा सर्वांना शिकविला, प्रत्यक्ष दाखविला.

## चैतन्यस्वरूप सद्गुरू

**चैतन्यं शाश्वतं शान्तं, व्योमातीतं निरंजनम् ।**

**नादबिंदुकलातीतं, तस्मै श्रीगुरुवे नमः ॥**

गुरुगीता - ७०

अर्थ -जो चैतन्यस्वरूप, शाश्वत, शांत, आकाशादिपेक्षा सूक्ष्म,

निरंजन, नादातीत, बिंदुच्याही अतीत, कलातीत आहे अशा श्रीगुरूला नमस्कार असो. श्रीगुरूचे अविनाशी स्वरूप हा श्लोक वर्णन करतो. श्रीगुरू हे एक फार मोठे तत्त्व आहे.

वरील श्लोकात सांगितल्याप्रमाणे प. पू. ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांचे अविनाशी स्वरूप आहे. श्रीदत्तमहाराज देह, मनबुद्धीच्या पातळीवरही चैतन्यमय झालेले होते. ते 'स्व' मध्ये म्हणजे आत्मस्वरूपामध्ये स्थित, आनंद, कलेचे पूर्णत्व म्हणजे चिद्रूपता व बिंदूचे पूर्णत्व म्हणजे सत्‌ब्रह्म. नाद, बिंदू व कला या शक्तींचा शुद्ध बोध व यथार्थ अनुभव त्यांना होताच होता. श्रीगुरुभक्तीच्या उजेडातील ही योगाची वाट आजही श्रीदत्तमहाराज दाखवीत आहेत.

## खरी परिपक्वता, पूर्ण समाधानाने सहज जीवन जगणे

कोणत्याही परिस्थितीत पूर्ण समाधानाने सहज जीवन जगणारे श्रीदत्तमहाराज आपण सर्वांनी पाहिले आहेत. सूर्याप्रमाणे आत्मप्रकाश पसरवीत, चंद्राप्रमाणे सर्व जीवांना शीतलता देत, मेघाप्रमाणे सर्वांवर प्रेमाची वृष्टी करीत, स्वानंदाची संपत्ती सर्वत्र लुटत, असा समाधियुक्त अवघाची संसार सुखाचा करून आनंदाने तिन्ही लोक प. पू. श्रीदत्तमहाराजांनी भरून टाकलेले आहेत. जीवन्मुक्त होऊन विदेहीमुक्ती पण ह्याच देहात त्यांनी साधलेली आहे.

अत्यंत निर्लिप्त, 'कमलपत्रमिवाम्भसा', 'शाब्दे परे च निष्णातं।' श्रोत्रियं 'ब्रह्मनिष्ठं' या श्रुतिप्रणीत सद्गुरुलक्षणांचे दर्शन त्यांच्या ठायीं

घडते. 'सरस्वती वरदपुत्र' अशी त्यांची शब्दगंगोत्री आहे. ज्ञानी भक्त संतांच्या अष्टलक्षणात निरपेक्षता, भगवद्‌च्चिंतन, समदर्शन, निराभिमान, निर्ममता, अपरिग्रह, निर्द्वंद्वता, प्रशांत चित्त यांचा समावेश आहे. त्यांचे यथार्थ प्रत्यंतर श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव, जीवन, कार्य यांमधून येत राहते. या अष्टलक्षणांचे वर्णन करताना श्रीसंत एकनाथ महाराज म्हणातात -

**चैतन्य सरोवरींचे कमळ । विकासले अष्टदल ।**

**ते हे संतलक्षण । स्वानंदशील साधूसी ।।**

(ए. भा. २६.३५०)

ज्या भारतीय साक्षात्कारात भक्तियोग, अद्वैत आंणि शक्तिपातसाधना यांचे समन्वयी भाष्य प्रगट झाले आहे, त्याचप्रमाणे श्रीदत्तमहाराजांच्या जीवनकार्यात या भूमिकांचा त्रिवेणी प्रयागसंगम प्रगट झाला आहे.

या जगात 'गुरुत्व' हे अलौकिक आहे. एक श्रीसद्‌गुरूंचे स्थानच तेवढे अविनाशी आहे. असे अविनाशी असलेल्या श्री ब्रह्मश्री दत्तमहाराज यांचे वर्णन कसे करणार? दृश्य विश्वामधील कोणतीही उपमा श्रीगुरू ला देता येत नाही. म्हणून खरोखर श्रीदत्तमहाराजांचे वर्णन करता येत नाही. ब्रह्मश्री प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरणी अनन्य भावाने शरण जाऊन एवढे म्हणते,

**म्हणौनि सद्‌गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना ।**

**अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ।।**

(दास. १.४.३१)

# उपायवनवसंतु ।
# जो आज्ञेचा अहेवतंतू

**नीला जोशी**

अमृतानुभवाच्या दुसऱ्या अध्यायात ही पहिलीच ओवी आहे. यात खोलार्थाने प्रवेश करण्यापूर्वी आपल्या डोळ्यांपुढे एक कंच हिरवीगार अशी झाडांनी भरलेली बाग येते. वेगवेगळी झाडे आहेत, फळे-फुले आहेत, अगदी मन वेधून घेणारी फुले विविधरंगांनी नटलेली, असा हा बगीचा आपले मन वेधून घेतो. पण ही फळे-फुले बहरून येण्याकरता वसंताचे आगमन व्हावे लागते. त्याशिवाय अनेक झाडे असली तरी ती बहरत नाहीत. वसंताचे आगमन सांगावे लागत नाही. हे जसे सृष्टीतील दृश्य आपण पाहतो व सुखावतो. तसेच मानवी जीवनाचे आहे. अनेक उपाय साधनाने भरलेले हे जग असले तरी त्या नुसत्या निरनिराळ्या साधनांना सुफलित करणारा तिसरा कोणी तरी लागतो. वसंताप्रमाणे आपली जीवनबाग फुलविणारा सुद्गुरू आवश्यक असतो. याला ज्ञानेश्वरांनी अहेवतंतू असे म्हटले आहे. मंगळसूत्र.

विवाहामध्ये पती पत्नीला एकत्र करणारा दुवा म्हणजे मंगळसूत्र. तसे एखाद्या मानवी जीवाला शिव स्वरूपाची ओळख करून देणारे बंधनसूत्र म्हणजे सद्गुरू होय.

श्री ज्ञानेश्वरांनी आपल्या सद्गुरूंकरता हे एक खास प्रकरण लिहिले आहे. अमृतानुभव ही ज्ञानदेवांची एक वेगळीच खासीयत आहे. त्यांचा तो स्वत:चा अनुभव आहे. आत्मानुभव या काही आमच्यासारख्या सामान्य जीवाने बोलायच्या गोष्टी नाहीत. पण तरीही सद्गुरूंचे जे मोठेपण आहे ते आपल्या लक्षात येते. त्यांचे व्यापकपण, त्यांच्या सात्विक, प्रेमळ व समभावाने वागण्यावरून लक्षात येते. अधिक न लांबविता मुद्द्याकडे येऊ या. या वर्षी प. पू. दत्तमहाराजांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या व्यक्ती विशेषत्वाचा विचार करण्याचा प्रयत्न. आपण आपल्या हिताकरताच करणे अगत्याचे आहे. आपल्यापुढे प. पू. गुरुमहाराज, प. पू. दत्तमहाराज व प. पू. काकामहाराज ही तीन उत्तुंग व्यक्तिमत्त्वे आहेत. असे असताना आपण जर चिंतन केले नाही तर आपले जीवन कोरडेच राहिले असे होईल. म्हणून प. पू. गुरुमहाराज, प. पू. दत्तमहाराज यांचे गुरुशिष्यपण कसे मिळून गेलेले होते ते अंतरंग स्थितीने जाणण्याची क्षमता आपल्याजवळ नाही; पण येणाऱ्या बाह्य अनुभवावरून जाणवते. प. पू. गुरुमहाराज लौकिक देहात असतानाच प. पू. दत्तमहाराजांचे मोठेपण जाणवत होते. गुरुनिष्ठाही कळत होती. पण गुरुमहाराज लौकिक देह सोडून गेल्यावर अस्वस्थ झालेली मने, कळवळून

गेलेली मने हा वियोग कसा काय सहन करणार असे वाटत होते. पण प. पू. गुरुमहाराजांनी आपल्या आध्यात्मिक किल्ल्या ज्यांच्या हाती दिल्या त्यांचे व्यक्तिमत्त्व व्यापक असल्यामुळे आश्रम पुन्हा सावरू लागला. त्याचे कारण प. पू. दत्तमहाराजांचे गुरुमहाराजांशी झालेले एकरूपत्व हे सर्वांनाच आधारभूत झाले. एकतर प. पू. गुरुमहाराजांनी प. पू. दत्तमहाराजांच्या रूपाने दिलेला आधार हा तितकाच आध्यात्मिक इहपरलौकिकदृष्ट्या तोलामोलाचा असणार ही खात्री व निष्ठा दोन्ही मनांमध्ये होत्या. पण प्रत्यक्षात अशा तऱ्हेची सोयरिक ही किती सार्थ आहे, होती हे अनुभवाने कळू लागल्यावर मनाला दिलासा वाटू लागला. त्यांची समदृष्टी जाणवू लागली, तसतसे आम्हाला खूपच आपलेपणा वाटू लागला.

पहिली गोष्ट त्यांचे बोलणे, प. पू. गुरुमहाराजांप्रमाणे आतून हृदयातून येत आहे असा प्रत्यय येऊ लागला. प. पू. गुरुमहाराजांचे बोलणे त्यांच्या अंत:करणातून येत असल्यामुळे मनावर परिणामकारी होई. त्यात कृत्रिमता नव्हती.

श्री ज्ञानेश्वरांची ओवी अशी -

**''अर्थ बोलाची वाट पाहे ।**
**तेथे अभिप्रावो अभिप्रायाते विये।**
**भावाचा फुलोरा होये! मतीवरी''॥**

वाणीने उच्चारलेला शब्द त्यातील भाव ऐकणाऱ्यांच्या मनापर्यंत गेला पाहिजे.'' अशी ही वाणी प. पू. गुरुमहाराजांप्रमाणे प. पू. दत्तमहाराजांची होती.

एक प्रसंग सांगते, अशीच आश्रमात गेले, 'या' असे म्हणणाऱ्या गुरुमहाराजांची आठवण येऊन या शब्दांत काय जिव्हाळा होता असे वाटून थोडे गहिवरून आले. प. पू. दत्तमहाराज बसलेले होते. त्यांच्या लक्षात आले, ते लगेच हळूवारपणे म्हणाले, "आपली गुरुमहाराजांवर भक्ती होती म्हणून वियोग जाणवणे अगदी स्वाभाविक आहे. पण गुरुमहाराजांसारखी माणसे सतत चैतन्य रूपाने असतातच. ते आश्रमातच आहेत. तुम्हाला इतका त्रास होतो आहे तर आम्हाला किती होत असेल?"

आणखी एक गोष्ट बघू या. प. पू. दत्तमहाराजांची सहनशक्ती व सहिष्णुता किती आहे त्याच्या कल्पनेनेच आपण थक्क होऊन जातो. माजी विश्वस्त भाऊसाहेब वाकडे यांनी मला मुद्दाम बोलावून सांगीतले की, प. पू. दत्तमहाराजांचे एक सविस्तर चरित्र तुम्ही लिहा. वास्तविक प. पू. दत्तमहाराजांच्या चरित्राचा आवाका खूप मोठा आहे, माझा तो अधिकार नाही. पण तरी श्री. भाऊसाहेबांनी सांगितल्यामुळे मला खूप आनंद झाला व एक सेवा म्हणून मी ते लिहिले म्हणण्यापेक्षा प. पू. गुरुमहाराजांनी ते लिहून घेतले व त्याचे प्रकाशन आश्रमातच आहे, तेव्हा या चरित्राबद्दलचा हा प्रश्न नाही.

ज्या वेळी वामननिवास प. पू. दत्तमहाराजांच्या सत्यसंकल्पानेच उभा राहिला, त्यातच प. पू. गुरुमहाराजांची जन्मशताब्दी प. पू. दत्तमहाराजांनी साजरी केली, त्या वेळी सर्व

जोशी कुटुंबीयांना व श्री. गोडसे काका आदी इतर साधक मंडळीनाही वाटले की प. पू. दत्तमहाराजांची आपल्याला काहीच तशी माहिती नाही तर या निमित्ताने त्यांचे छोटे का होईना चरित्र लिहावे. प. पू. गुरुमहाराजांना ही गोष्ट आनंदाचीच वाटेल. आधीच प. पू. दत्तमहाराज या गोष्टीला संमती देत नव्हते, कारण त्यांना लोकैषणा अजिबात नव्हती, पण कशीबशी संमती दिली. आश्रमाला कोणताही त्रास द्यायचा नाही म्हणून आम्ही ते स्वत: छापले व त्याचे प्रकाशनही उत्सवात झाले. सर्व पुस्तके छापून झाली नव्हती. पण थोडी झाली तेवढी आश्रमात ठेवावी म्हणून आश्रमात गेलो होते. तेथे ऑफिसात एक गृहस्थ बसले होते. बाहेर प. पू. दत्तमहाराज आणखी कोणी एकदोघं होती. ऑफिसमध्ये बसलेले गृहस्थ आश्रमापैकी किंवा विश्वस्तांपैकी ओळखीचे कोणीच नव्हते हे मुद्दाम नमूद करते. हे पाहुणे उत्सवासाठी मराठवाड्यातून कुठून तरी आल्याचे म्हणाले. आम्ही पुस्तके इथे ठेवतो असे फक्त म्हटले. त्यांचा आवाज उगीचच थोडा चढला. ही पुस्तके वासुदेव प्रकाशनची आहेत का तर ती इथे ठेवा, बाकीची पुस्तके इथे विकत नाहीत. आम्ही काही सांगू लागले, तर ते ऐकूनच घेईनात बोलतच सुटले. ऐकायलाच तयार नाहीत. ''अहो हे प. पू. दत्तमहाराजांचे चरित्र आहे.'' तर म्हणाले, ''न्याय सगळ्यांना सारखाच. मी काही ठेवू देणार नाही.'' ''अहो नुसती ठेवते छे! आम्हाला शब्द बोलून देईनात, मी तर रडकुंडीला आले. इतक्यात आवाज ऐकून प. पू. दत्तमहाराजच उठून आले.

बापरे त्यामुळे आमच्या मनाची स्थिती फारच वाईट झाली. प. पू. दत्तमहाराज शांतपणे म्हणाले, 'त्यांचे ब्लडप्रेशर वाढते, तसे वाढले की ते तसेच बोलतात. त्यांना पाणी आणून द्या.' पाणी पिऊन झाल्यावर ते म्हणाले, 'घरी जा काही औषध घ्या आम्ही बघतो काय करायचं ते.' आम्हाला म्हणाले, 'त्यांचे काही मनावर घेऊ नका' आणि जराही त्या माणसाला कटू न बोलता प्रत्यक्ष आपल्याच पुस्तकाबद्दल हे बोलत आहेत याचा राग त्यांना आला नाही. हसून म्हणाले, ''हे असे चालायचेच. तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. तुमच्या सर्वांच्या भावना मी जाणतो.'' असे म्हणून शांतपणे पुस्तके टेबलावर ठेवून घेतली. काही घडलचं नाही अशी निर्विकार अवस्था पाहून आमचे मन भरून आले.

सद्गुरूंचे मोठेपण प्रत्यक्ष अनुभवले! किती विशाल विश्वात्मक मन आहे असे वाटले. प. पू. महाराजांची आठवण झाली. तोच प. पू. दत्तमहाराज म्हणाले, ''गुरुमहाराजांनी असे कितीक प्रसंग सोसले आहेत.'' यावरून या दोघांच्या आंतरस्थिती सारख्या आहेत, त्यामुळे दोघांची एकरूपता लक्षात आली. प. पू. दत्तमहाराज गुरुमहाराजांचे पदी एकरूपता पावल्याची जाणीव झाली. ''आंतरस्थितीच्या खुणा अंतरनिष्ठ जाणती, ''असे श्री समर्थांनी दासबोधात म्हटले आहे. आपण अंतरनिष्ठ नाही. तसा प्रत्यक्ष अनुभव नाही. पण या प. पू. दत्तमहाराजांच्या सौम्य वागण्यामुळे कोणतीही कटुता न येऊ देता प्रश्न मिटविला हे पाहून मनाचे व्यापकपण कळते. सद्गुरुपद कळले. त्यामुळे आम्ही प.

पू. दत्तमहाराजांकडे गुरुमहाराज म्हणूनच पाहात होतो. त्याला अशा या प्रत्यक्ष केलेल्या कृतीने पुष्टी मिळाली व हे दोघे बिंब-प्रतिबिंब रूप आहेत याची मनाला खात्री पटली. त्यामुळे गुरुमहाराज आहेतच ही भावना अधिकाधिक दृढ झाली.

प. पू. गुरुमहाराज असतानाच खूप गर्दी वाढू लागल्यामुळे गर्दीचे विभाजन होण्यासाठी गुरुपौर्णिमेचा उत्सव वेगवेगळ्या ठिकाणी सुरू केला. दादर, बडोदा वगैरे ठिकाणी तेथील साधक एकत्र येऊन उत्सव प्रेमाने करीत. त्याप्रमाणे गिरगावात आमच्याकडे एकादशी ते पौर्णिमा असा उत्सव करीत होतो. उत्सव झाला की गुरुदक्षिणा पोचवण्यासाठी पुण्यात येऊन सर्व हकीकत निवेदन करीत असू. प. पू. गुरुमहाराजांना उत्सवाची हकीकत ऐकून आनंद होत असे. "छान करता! असे एकोप्याने करावे म्हणजे नीट होते. इथे गर्दी फार झाली की कोणालाच काही समाधान होत नाही. काही मिळत नाही." (सहवास, बोलणे वगैरे) प. पू. गुरुमहाराज निजधामी गेल्यावर उत्सव चालू ठेवला; पण प. पू. दत्तमहाराजांना विचारले की उत्सव आषाढी एकादशीपासून असतो. आपण एकादशीला येऊन द्वादशी सोडून पुण्याला परतलात तर जमेल का? प. पू. दत्तमहाराज ताबडतोब म्हणाले, "आपल्याला ही प्रेरणा गुरुमहाराजांनीच दिली आहे. येऊ आम्ही." खूप आनंद झाला. इथेसुद्धा प. पू. गुरुमहाराजांशी एकरूप झालेले दत्तमहाराजांचे मनच दिसले. श्री. जोशी दशमीचे दिवशीच गाडी घेऊन जात असत. एकादशीला आपले आन्हिक

आटपून सकाळी ७ च्या सुमारास प. पू. दत्तमहाराज निघत व अकराच्या सुमारास मुंबईस पोचत. आल्यावर ओवाळून घेतल्यावर लगेचच त्यांच्याकडून वाक्य बाहेर पडायचे, ''गुरुमहाराजांचा संकल्प आहे तो सत्यसंकल्प आहे. तुमच्याकडून करून घेत आहेत.'' या वाक्यामुळेही त्यांचा गुरुमहाराजांवरील प्रेमभाव कळून येत असे. रोज सायंकाळी पाच वाजता त्यांचे प्रवचन होई. दर्शनाला व प्रवचन ऐकायला बरीच मंडळी येत असत.

दुपारचा फराळ झाल्यावर ते थोडे विश्रांती घेत असत. पण एका वर्षी ते लवकर उठले, यांना म्हणाले, ''जरा पंचांग बघूया.'' यांनी दिले. म्हणाले, ''आम्हाला वाटतच होते की उद्या गुरुमहाराजांचे जन्मनक्षत्र आहे. जन्मनक्षत्राच्या दिवशी गुरुमहाराज उदकशांत करीत असत. गुरुजी आज येतील ना, त्यांना विचारा, व तुम्ही पण या उत्सवात एक जन्मनक्षत्र उदकशांत करत जा.'' गुरुजी तीन दिवस आमच्याकडेच राहत असत; त्यामुळे ते होतेच. करंबेळकर गुरुजी म्हणाले, 'सांगतो मी ब्राह्मणांना.' तेव्हापासून त्रयोदशीला उदकशांत झाल्यावर जेवण करून प. पू. दत्तमहाराज निघत असत. किती बारीक लक्ष! प. पू. गुरुमहाराजांविषयी आपलेपणा! हे सर्व पाहून त्यांचे अद्वैत कळून येई. हा कार्यक्रम जवळजवळ वीस वर्षे चालू होता. खरोखर प. पू. दत्तमहाराजांच्या येण्यामुळे गुरुपौर्णिमेला एक वेगळी प्रतिष्ठा आली. त्रयोदशी किंवा द्वादशी जसे नक्षत्र येईल तसे ते सर्व व्यवस्थित करून पुण्याला

परत जात. सर्वांना तीन दिवस प्रवचनाचा लाभ होई. कोण करणा इतके प्रेमाने? प. पू. गुरुमहाराजांवरील निष्ठाच हे सारे करील होती. त्यामुळे खरोखर गुरुमहाराजांची उणीव दत्तमहाराजांनी भास दिली नाही. म्हणून ते गुरुमहाराजच आहेत हा भाव पक्का हो गेला. कारण गुणसादृश्य! सद्गुरू हे वत्सल असतात. त्यांच्याक करुणा असते. चित्ताचे समत्व असते. श्री ज्ञानेश्वरीत एक ओवी आहे -

**अर्जुना समत्वचित्ताचे । हेचि सार जाण योगाचे ।**
**तेथे मन आणि बुद्धिचे ऐक्य आथी ।।**

सर्वांजवळ समभावाने वागणे किती तरी कठीण आहे सद्गुरु समदृष्टी असतात. म्हणून सर्वांचे हित-कल्याण. साधू शकतात कारण समोर व्यक्ती आली की; हिला काय दिले पाहिजे म्हण ही मार्गस्थ होईल हे त्यांच्या लक्षात येते. त्यामुळे व्यक्ती तितक्य प्रकृती असल्या, तरी सर्वांवर सारखी कृपा असते. उपयोज वेगवेगळे दिसेल, पण भिन्नभाव त्यामधे नसतो हे जे सद्गुरूं कार्य आहे ते सतत समभावाने चालू असते. हे लक्षात आले त्यांची वत्सलता प्रत्येकाच्या अनुभवाला येणारच!

देऊळगाव राजाला प. पू. दत्तमहाराजांची रौद्री शांती होती सर्वांनाच बोलावणे होते, पण मलाही आवर्जून म्हणाले होते की "नीलाताई तुम्ही देऊळगावराजाला कधी आला नाहीत तर य वेळी या." अर्थातच त्यांनी स्वत: बोलविल्यामुळे आनंद त झालाच. सद्गुरूंची वत्सलता होती. ज्या दिवशी तुलादान हो

तो मुख्य दिवस होता. मुंबईहून निघालो पण त्यादिवशी जालना स्टेशनला गाडी उशिरा पाहेचली. देऊळगाव राजाला जाण्यास उशीर लागला. वाटले आपण काही वेळेवर पोचणार नाही. प. पू. दत्तमहाराजांचे दर्शन आधी होणार नाही. थोडे मन अस्वस्थ झाले. आम्ही वेळेवर न पोचल्यामुळे प. पू. दत्तमहाराजांचा पाय बाहेर निघत नव्हता. अजून कशा आल्या नाहीत, अशी वाट पहात होते. हे पाहून आईसाहेब, सविता वहिनी यांनासुद्धा खूप नवल वाटले! भक्तांची काळजी किती करतात? आता निघालेच पाहिजे म्हणून निघाले इतकेच. पुढे वाटेतच त्यांची गाडी आम्हाला दिसली. प. पू. दत्तमहाराजांनी गाडी थांबवली. "आपली वाट पाहत होतो. या लवकर आम्ही पुढे होतो, म्हणाले. त्याप्रमाणे इतकी अफाट गर्दी होती की पुढे सरकणेही कठीण तर 'तुला' दिसणार कशी? पण या ठिकाणीही महाराजांची आत्मीयता दिसून आली. सारखे तेथून सांगत होते, "नीलाताईंना एवढ्या गर्दीतून येता येणार नाही त्यांना पुढे घेऊन या." शेवटी माझी व्यवस्था होऊन मला 'तुला' पाहता आली. यामध्ये सांगण्याचा हेतू इतकाच असेच प. पू. गुरुमहाराजांचे होते. सर्व लक्ष असायचे. ते प्रसंग लिहिले तर तर व्याप्ती वाढेल. गुणांचेही साम्य दोघांमध्ये पूर्ण होते. यात कोणाला खुश नाखुश करणे हा हेतू नसतो तर सर्वांबद्दल सारखी आपुलकी हा त्यांचा समभाव. चैतन्यच सगळीकडे भरून आहे, हा जो अनुभव त्यांनी घेतलेला असतो त्यामुळे ते सर्वत्र तेच पाहतात दुजे कोणी नाही, हा अनुभव घेतलेले ते, खरे पाहता

भगवंतच असतात. तेच खरे सद्गुरू होत.

मार्ग जरी आपल्यापुढे वेगवेगळे दिसत असले, तरी सद्गुरू मिळाल्याशिवाय या उपायांना फळ येत नाही. म्हणून 'गुरु दाविलीया वाटा' असे जे म्हणतात, ते याकरता व म्हणून सद्गुरुशिवाय आपल्याला परमेश्वराकडे कोणी पोचविणार नाहीत.

अशा प्रकारचे प. पू. दत्तमहाराजांनी सद्गुरुपद भूषविले व म्हणूनच ते गुरुमहाराजांशी पूर्णपणे एकरूप झाले होते. हे लक्षात येते. म्हणूनच आश्रमाचा म्हणजे जनतेचा भार आपलेपणाने सांभाळला. असे हे गुरुपद आहे. मी जरी हा अनुभव लिहिला म्हणून व्यक्तिगत स्वरूपाचा दिसला तरी तो सार्वत्रिक आहे. हे निस्वार्थी व आपले कल्याण करणारे प्रेम प्रत्येकाला मिळालेले आहे. पण, 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगल,' असे जे म्हटले आहे तसे सद्गुरू असतात. म्हणून ईश्वराकडे कसे जा, हे सद्गुरुंशिवाय समजत नाही. सद्गुरूं आत्यंतिक दयाळू असतात. हे बारीक-सारीक गोष्टींतून आपण समजून घ्यावयाचे आहे. ही कृपादृष्टी झाल्याशिवाय जीवनबाग फुलत नाही. जे गुरुमहाराजांकडे अनुभव तेच प. पू. दत्तमहाराजांकडे होते.

वाणीनेसुद्धा त्यांनी आपपरभाव दाखविला नाही. "ही पहा महाराजांची मंडळी आली," असे द्वैतात्मक ते कधी बोलले नाहीत.

प. पू. दत्तमहाराजांचे बोलणे अगदी सरळ, कंगोरेरहित, दुसऱ्याच्या मनापर्यंत पोचणारे असे असायचे. असेच एकदा

आश्रमात बसलो होतो, फारशी कोणी मंडळी नव्हती. चार-पाचजणच होती. कांही विषय निघून प. पू. दत्तमहाराज उत्तर देताना साधेपणाने बोलून गेले, ''आम्हाला तरी समत्व कुठे जमत होते, पण गुरुमहाराजांनी कृपा केली व आम्हाला समत्व बुद्धी दिली.'' साधे निर्मळ मन होते म्हणून बोलले. यात त्यांना सद्गुरुकृपा काय करते हेच सांगावयाचे होते. किती निर्मळ स्वभाव, साधा स्वभाव? सद्गरू असे असतात! चित्ताचे समत्व याचाच अर्थ प्रत्येकात चैतन्य आहे हे सद्गुरू ओळखतात. एका चैतन्याशिवाय या जगात काही नाही, हा स्वत: अनुभव घेतल्यावर ते खरे पाहता भगवद्रूप होतात. भगवंतच असतात. 'गुरु:साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवेनम:', असे म्हणतात ते सत्य आहे पण सद्गुरूंच्या साध्या राहण्यामुळे त्यांचे सत्य स्वरूप आपल्याला कळत नाही. लक्षात येत नाही. ते ओळखण्याकरिता मनाची शक्ती कमी पडते. आपल्या बुद्धीने ती जाणण्याचा प्रयत्न अपुराच पडणार!!

अध्यात्म मार्गात सद्गुरुपदाचे महत्त्व मोल, फार आहे. 'सत्' ला जाणून 'सत्'च होणार. तो सद्गुरू व तोच भगवंत इथपर्यंतचा विचार मी माझ्या अल्पमतीप्रमाणेच करीत आहे. हे अधिकाधिक मनाला पटवून घेण्यासाठी त्यांच्या सहवासात सहजपणे आलेली वाक्ये किंवा विचार त्यांचे सद्गुरुपद जाणवून देतात. त्यातील एक हकीकत पाहूया. एकदा आमच्याकडे आले असताना, एका साधकाने मोकळेपणे त्यांना विचारले, ''प. पू. गुरुमहाराजांनी

आपले पद आपणास दिले आहे, मग आपण आता त्या गादीवर का बसत नाहीत?'' प. पू. दत्तमहाराजांनी मनापासून मोकळ्या अंत:करणाने दिलेले उत्तर ऐकले व मन भारावून गेले. चकित झाले! ते म्हणाले, ''अहो, प. पू. महाराज देहात असतानासुद्धा त्यांच्यापुढे आम्ही कधीच बसलो नाही व आता ते नाहीत असे आम्हाला वाटतच नाही ते आहेतच.'' मग सांगा त्यांच्या गादीवर आम्ही कसे बरे बसणार?'' या उत्तरावरून त्यांची गुरुमहाराजांचे या अव्यक्तातील, देहातीत अवस्थेतील, चैतन्य अक्षय स्वरूपाची अनुभूती जाणवली. हा अनुभव म्हणजे आत्मस्वरूपाचा साक्षात्कार आहे. सत्स्वरूप किंवा असणेपण हे कायम असते. त्याला जा-ये नसते. हा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय वरील उद्‍गार निघणार नाहीत. म्हणूनच प. पू. दत्तमहाराज सद्‍गुरू होते व म्हणून साधना करत असताना ज्यांना असे सद्‍गुरू लाभतात ते निजमार्गाकडे निश्चितपणे वाटचाल करू लागतात व आपल्या शक्तीप्रमाणे सद्‍गुरुकृपेमुळे आपल्या घरी म्हणजेच स्वस्वरूपी पोचतात. अशा सद्‍गुरूंना जगातील चैतन्य फक्त दिसत असते.

एकदा मी माझ्याबरोबर येणारे एक साधक व श्री. गोडसे काका असे होतो, मी प. पू. दत्तमहाराजांना सहजपणे म्हणाले, ''आपण प. पू. गुरुमहाराजांप्रमाणेच भगवद्रूप आहात असे मनापासून वाटते व नमस्कार होतो. लगेच प. पू. दत्तमहाराज म्हणाले, ''नीलाताई आम्हीही तुमच्या तिघांत चैतन्यच पाहत असतो, अन्य नाही.'' आता ही त्यांची सततची आत्मस्थिती

होती. हे आपल्या लक्षात येत नाही. सतत त्या वृत्तीतच ते होते! हे सोपे आहे का? आपण भगवंतालाच आकाशात पाहत होतो. पण तीव्र जाणीव होण्यास मनाला वेळ लागतो. प. पू. गुरुमहाराजांबरोबर प. पू. दत्तमहाराज कसे एकरूप झाले होते हे यावरून लक्षात येईल. जेव्हा अशी एकरूपता प्राप्त होते तेव्हा काय होते.

**राखो जाता शिष्याते । गुरुपण ही धाडीले थिते ।**
**तरी गुरुगौरव जयाचे । सांडी चित्ता ॥१२॥**

याचा अर्थ श्री. दांडेकर म्हणा, जोगमहाराज हे असं सांगतात की सद्गुरू थोरवी अशी आहे, सत्‌शिष्याला कृतार्थ केल्यावर सत्‌शिष्यच गुरुपदाला येतो याप्रमाणे प. पू. दत्तमहाराज सद्गुरू पदावर आरूढ झाले. प. पू. गुरुमहाराजांनी जेव्हा त्यांना सारे आपलेपण दिले तेव्हा त्यांची श्रेष्ठता ओळखून 'आपणासारिखे' केले. त्याकरिता सत्‌शिष्य असावे लागते. आत्मनिष्ठ असावे लागते. अशी सर्व थोर मंडळी संतमंडळी म्हणत असतात. सत् काय हे जाणण्याची योग्यता यावी लागते. म्हणून प. पू. गुरुमहाराजांनी स्वतःच्या निश्चयात्मक बुद्धीने, कोणच्याही दडपणाखाली न येता जनतेचे हित, कल्याण कशात आहे हे ओळखून आपल्या ऐश्वर्य योगाच्या किल्ल्या त्यांचे हाती दिल्या. प. पू. गुरुमहाराजांनी विश्वाचा विचार केला, कारण ते विश्वात्मक झाले होते. बहुजनांचे केल्याने प्रथम साधावयाचे होते. असे जे साधतील त्यांना, ''आपणासारिखे' केले. आपण पस्तीस वर्षे हे

सारे पाहत आहोत. आश्रमाचे सारे उपक्रम जसेच्या तसे होत आहेत. कोणताही बदल नाही आश्रमवासी सारे त्यांच्या आज्ञेखाली संभाळत आहेत. आत्मीयतेने करीत आहेत.

ही स्थिती प्राप्त झाल्यावर सत्‌शिवाय वेगळेपणा राहात नाही गुरुरूप होतो हे आपण प्रत्यक्ष पाहिले. मी पाहिलेले लिहीत आहे. माझा तो अधिकार नाही. मला आत्मानुभव मुळीसुद्धा नाही! पण डोळ्यांनी पाहिलं, मनानी अनुभवलं, ते फक्त शब्दात मांडीत आहे. तेसुद्धा प. पू. दत्त महाराजांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने लिहीत आहे. एक अल्प-स्वल्प सेवा म्हणूनच त्याचा गुरुमहाराजांनी स्वीकार करावयाचा आहे. सेवा मानून घ्यावी हीच प्रार्थना आहे. प. पू. दत्तमहाराजांबद्दल आणखी थोडे अनुभवलेले लिहिले पाहिजे.

वीस एक वर्षे प्रत्यक्ष आषाढी एकादशीला आल्यानंतर पुढे त्यांना येण्याचे जमेना. व्याप वाढला होता व प्रकृतीही तेव्हढी ठीक रहात नव्हती. म्हणून मी मग दर महिन्याला जाऊ लागले. रोज सायंकाळी महाराज आश्रमात येत असत. परंतु सकाळी त्यांना विचारून ते म्हणतील तेव्हा जात असे. थोडा वेळ बसत असे व ते सहजपणे जे कानावर पडेल ते ऐकत असे. साध्या बोलण्यातून ज्ञानच मिळायचे. पुढे काही वेळेस असे होऊ लागले की त्यांचे डोळे अर्धोन्मिलीत असत व ते शांत बसलेले असत. कोणी आले की डोळे उघडून त्यांच्याशी बोलत असत. त्यांच्या प्रश्नाला उत्तरे देत दिलेला प्रसाद परत देत, पुन्हा त्याच अवस्थेत जात. हे पाहून

मला वाटे हे आपल्या ध्यानावस्थेत आहेत पण कोणी आले की त्यांना बोलावं लागतं. म्हणजे त्यांच्या एकाग्र अवस्थेला त्रास होत असेल. एकदा धीर करून मी विचारलं, "अशी भक्तमंडळी येतात व आपल्याला प्रश्न विचारतात अडीअडचणी आमच्या असतात. आपण त्याचे निराकरण करता, व्यवस्थित प्रेमाने प्रत्येकाला सांगता, पण यामुळे आपल्या एकाग्रतेचा भंग होतो याचा आपल्याला त्रास होत असेल नाही का?" प. पू. दत्तमहाराज म्हणाले की, "नाही होत. मी ज्या अवस्थेत असतो त्याच अवस्थेतून मी बोलतो." म्हणजे त्याच असणेपणाच्या अवस्थेत बोलायचे, द्यायचे, करायचे व त्याच ठिकाणी पुन्हा स्वस्थ व्हावयाचे. त्यामुळे त्रासाचा प्रश्नच येत नाही. बोलविता धनी वेगळाची. "मी बाहेर बसू का? 'नको' म्हणाले, "बसा इथेच नाम घेत." या अवस्थेला बाह्य कुंभक म्हणतात. असे म्हणाले, पुन्हा शांतपणे बसले. आता ही स्थिती आंतरस्थिती आहे. या स्थितीचा अनुभव नसला, तरी ते वेगळ्या आनंदात आहेत. ती आता सतत तशीच राहणारी अवस्था आहे. एवढेच लक्षात आले म्हणजे प्रत्येकाच्या अंतरी सत् तत्त्व आहे त्याच्याशी एकरूपता आहे. त्यावरून सद्गुरूंच्या अवस्थेची पुसट का होईना कल्पना आली. हे मला बघायला मिळालेफ असे दोन तीन वेळा. शांत, स्थिर अवस्थेत ईश्वरी कृपेने सत्संगात राहण्याची एक वेगळी संधी मिळाली. त्या वेळी हा प्रसंग मी दोन तीन त्यांच्या अधिकारी साधक बंधूना मुद्दाम सांगितला, हेतू इतकाच की तो अनुभव

त्यांना अधिक कळेल व ते प. पू. दत्तमहाराजांशी अधिक बोलू शकतील.

आणखी महत्त्वाचे म्हणजे, मी त्यांना विचारित होते की, "काही तत्त्वज्ञान सांगणारे पण मराठीत असणारे ग्रंथ वाचू का." ते म्हणायचे, "काही जरुरी नाही. श्रीज्ञानेश्वरी वाचता, दासबोध, एकनाथी भागवत वाचले आहेत. एवढे खूप आहे." तरी पण मला वाटे कितीतरी जण यांच्याजवळ संस्कृत अध्ययन करतात आपणास संस्कृत येत नाही, त्यामुळे आपण प. पू. दत्तमहाराजांबरोबर वाचू शकत नाही. म्हणून दोन तीन वेळा विचारले तेव्हा म्हणाले, "विचार सागर ग्रंथ आहे तो मराठी आहे तुमचा तुम्ही घरी वाचून बघा. चांगदेव पासष्टी वाचा जमलं तर. 'तत्त्वमसि' या महावाक्याचा बोध श्री ज्ञानेश्वरांनी चांगदेवांना केला आहे." मी 'विचार सागर' वाचला थोडा व काही महाराजांना विचारलंही पण प. पू. दत्तमहाराज म्हणाले, "श्री ज्ञानेश्वरीतून जे तुम्हाला समजणार, प. पू. गुरुमहाराजांनी जी शक्ती दिली आहे त्यावरून वृत्तीचे दृढीकरण होणार आहे. उगीच फार जंजाळात पडण्याचे कारण नाही." एकदाच चांगदेव पासष्टीतील थोडा विचार झाला होता. श्री ज्ञानेश्वरांनी श्री चांगदेवांची मनाची स्थिती वरची होती हे लक्षात घेऊन, तो त्यांचा अधिकार जाणून, त्याचा आदर करून तत्त्वज्ञानाच्या ज्ञानमीमांसेच्या प्राथमिक विवेचनात गुंतून न ठेवता ते ज्ञान गृहीत धरून विश्वनिर्मिती ज्ञानाची त्रिपुटी व त्याच्या पलीकडची आत्मानुभूती अशा प्रकारे अशा

उच्च पातळीवर नेले. चांगदेवांना ज्ञानदेवांनी फार आपुलकीने वागवले आहे हे लक्षात घ्यावे. सख्या चांग्या असे शब्द वापरून त्याला आपलासा केला आहे.

मला जेवढे लक्षात आहे व आले तेवढे लिहिले. यात सर्वच लक्षात आहे असे नाही, तेव्हा काही चुका असल्यास त्या माझ्या आहेत हे समजून घ्यावे.

त्यांच्या सांगण्याचा सारांश असा की, सद्‌गुरूंवर पूर्ण विश्वास ठेवून साधन करत रहावे व आपल्या वृत्तीत बदल करावा. आपली माया आपल्या घरापुरती न ठेवता ती व्यापक करावी. सर्वांवर प्रेम करण्यास शिकावे. प. पू. गुरुमहाराजांची शिकवण लक्षात ठेवावी. शास्त्राचा कीस काढण्यात उगीच फार वेळ घालवू नये. आपल्या काळाची मर्यादा लक्षात घेऊन अभ्यास वाढवित जावे. प. पू. गुरुमहाराजांनीसुद्धा साधनेवर भर द्यावा. ते चुकवू नये हेच प्रामुख्याने सांगितले होते. शेवटी अनुभवाकडे वळणे हे महत्त्वाचे असते. शब्दाच्या रानांत फार गुंतून पडू नये, कारण शब्द संपतात तेव्हाच ज्ञान होते. म्हणून अनुभव महत्त्वाचा. त्याकरता योग्य तेवढेच वाचावे, अशी दोघांचीही समान मते होती.

लौकिक जीवनातील दोन गोष्टी -

### ती. सौ. आईसाहेबांचे अहेवपणे जाणे

आईसाहेबांची अतिशय इच्छा होती आपण प. पू. दत्तमहाराजांच्या आधी जावे असे वारंवार त्या म्हणत असत. त्यावर प. पू. दत्तमहाराज त्यांना म्हणत असत, ''तुम्ही श्री

महाराजांकडे मागा ते तुमची इच्छा पूर्ण करतील." त्याप्रमाणे घडले. प. पू. गुरुमहाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी सायंकाळी ती. सौ. आईसाहेबांनी जगाचा निरोप घेतला व सर्व सौभाग्यानिशी सद्‌गुरुचरणी विलीन झाल्या. गुरुमहाराजांनी येथेही आपले कृपाळूपण दाखविले. प. पू. दत्तमहाराजांनी त्यानंतरचे आपले कर्तव्य पूर्ण केले. बाहेर बसले होते व आपल्या तोंडाने स्वमुखाने म्हणाले, "आमचा संचार पूर्ण केलात आमचे काही म्हणणे नाही तुमच्याही इच्छा काही राहिल्या नाहीत असे आम्हाला वाटते." यात्रेबरोबर थोडी पावले चालून आईसाहेबांना प्रेमाने निरोप दिला. कशात न गुंतता, आपलेपण न सोडता हा निरोप झाला हेच संतपद व सद्‌गुरूंचे स्थान आहे. या वयातसुद्धा ते शांतपणे, खरं पाहता अंगणात उन्हाचीही सुरुवात झाली होती, पण शांतपणे निश्चल बसून होते. आपल्या जन्मभराच्या सहचारिणीबद्दलचा पूर्ण आदर त्यांनी व्यक्त केला. मनात काय असणार. भगवदकार वृत्ती झाली होतीच. गृहस्थाश्रमाच्या मर्यादा संभाळून प. पू. दत्तमहाराज कृतार्थ झाले होते. त्यांचे ते वागणे पाहून सद्‌गुरुपदाची थोरवी एका वेगळ्या दृष्टिकोनातून अनुभवली. हात दोघांसाठी आपोआप जोडले गेले व डोळ्यांतून सहजपणे अश्रू ओघळले. या ठिकाणी अमृतानुभवातील पहिल्या अध्यायातील ओवी आठवते

**दाऊनी दोन पण । एक रसाचे आरोगण ।**
**करीत आहे मेहूण अनादि जे ।। २० ।।**

पुरुष व प्रकृती हे जोडपे अनादी काळापासून एक सच्चिदानंद

रूप आत्मरसाचा उपभोग घेत आहे. आपण व्यवहारासदेखील पती-पत्नीला एकरूपच मानीत असतो. अशा प्रकारे प. पू. दत्तमहाराजांचा गृहस्थाश्रम परमार्थ रूपच होता. प. पू. दत्तमहाराज सौ. आईसाहेबांचे मागे दीड-एक महिनाच राहिले, पण आपल्या लौकिकाजीवनसुद्धा देवरूप करून एक सामान्यांना मार्ग दाखविला.

## पिता पुत्रांची एकरूपता

प. पू. दत्तमहाराजांच्या वैकुंठरूप झाल्यावरही त्यांच्याच गुरुकृपेने चांगली पण दुःखद घटना घडली. ती म्हणजे त्यांचे ज्येष्ठ सुपुत्र अशोक महाराज यांचा आजार व दुःखद निधन. सद्गुरूंची कृपा अखंड असते. मी स्वतःच पाहत होते. श्री. अशोकरावांची चित्रकृती बदलत होती. ती भगवदाकार होत होती. ते माझ्याशी जे संवाद करीत होते, त्यांवर अनासक्तपणा जाणवत होता. 'गुरुमहाराजांच्या आठवणी सांगा', म्हणत होते. इतर काहीच बोलणे नव्हते. नामस्मरण करीत होते. आमोदला (मुलगा) म्हणत होते, "तुमच्या आई तुमच्या घरी जास्त राहतील. आम्ही रेणुका निवासमध्ये राहू." वरती खोलीत जावे तेव्हा एकांतात बसलेले असायचे. अभ्यास चिंतन चालू होते. प. पू. दत्तमहाराजांची गुरुकृपा त्यांना घडवत होती, हे पूर्णपणे लक्षात येत होते. आजाराच्या यातना होत्या पण त्या ते सहन करीत होते. आश्रमात त्यांच्या स्वास्थ्याकरता अनुष्ठान प. पू. काकांनी सुरू ठेवलेच होते. प. पू. दत्तमहाराजांच्या पुण्यस्मरणाच्या आदल्या दिवशी मी

पुण्यातच होते. त्यांना हॉस्पिटलमधे भेटले होते. 'आवडीने भावे' हा अभंग मुलीकडून नेहमी म्हणून घेत असत. त्यांच्यातील हा वृत्तीचा बदल जाणवत असे. त्या वेळी श्री ज्ञानेश्वरीतील ही ओवी आठवत असे. सद्गुरूंचे वर्णन यात आहे.' **विषय व्याळे मिठी, दिधलिया नुठी ताठी, ते गुरुकृपादृष्टी, निर्विष्ट होय.** अशा तऱ्हेने पिता व गुरू असलेले प. पू. दत्तमहाराज लौकिक देह ठेवल्यावरही गुरुकृपेची दृष्टी आपल्या सुपुत्रावर ठेवून आहेत. याचा हा प्रत्यक्ष अनुभव पहात होते. सद्गुरू सदैव पाठीशी असतात. ते देहाने गेले तरीही ही त्यांचे गुरुत्व सर्वांचा संभाळ करते. अशोकमहाराज ते गूढ अशा गुंजनांतर ते गुंतले आहेत असे पुष्कळ वेळा लक्षात येत असे. अशोक महाराजांनी जायच्या आधी सुमारे पहाटे तीन वाजता आपली माळ आपल्याजवळ असलेल्या साधकाला दिली. शाल आणखी कुणास तरी दिली. म्हणाले, ''घे तुला आठवण.'' तिचे काम झाले. शेवटपर्यंत सावध होते व बरोबर आपल्या पिताजींच्या वेळेला, **तोच वार तीच तिथी व तीच वेळ,** गाठून आत्मस्वरूपी मिळून गेले. हा एक फार मोठा गुरुकृपेचा भाग आहे. प. पू. दत्तमहाराजांनी आपल्यात मिळवून घेतले व आपल्या पुत्राचे जीवन कृतार्थ केले. आपल्या वडिलांच्या पुण्यस्मरणाच्या दिवशी प. पू. अशोकरावांनी त्यांचेशी एकरूप होऊन वंदन केले असे दिसत होते. हा सद्गुरुकृपेचा चमत्कार वाटतो. त्या वेळी मी तिथे रेणुका निवासामध्ये सबंध दिवस राहिले. प. पू. काकामहाराज सकाळी

आले ते शेवटपर्यंत बसलेलेच होते. खूप वाईट वाटले परिवाराला. सवितावहिनीं करता! पितापुत्रांना हात जोडले व म्हटले, "ही सद्‌गुरुकृपेशी एक आगळी वेगळी भेट झाली." सुखदु:खमिश्रित मन होते या गोष्टींमुळे सद्‌गुरूंचे जीवनातील महत्त्व काय अधिक स्पष्ट झाले.

## वासुदेवनिवासा वरील अलोट भक्ती भविष्यकाळाकरिता केलेली आध्यात्मिक योग्यसुयोजन,

या गोष्टी माझ्या डोळ्यांसमोर प. पू. दत्तमहाराजांचे सद्‌गुरू म्हणून पाहिलेले जीवन जसे मला माझ्या बुद्धीने समजले तसे सेवाभावाने सांगण्याचा प्रयत्न केला. सद्‌गुरुपदाची धुरा, गुरुमहाराजांनी त्यांच्यावर सोपविली त्याप्रमाणे सेवाभावाने वागून, पंचवीस वर्षे चालवून, गुरुमहाराजांच्या प्रमाणे त्यांनी सर्व आयोजन उत्तम केले. आश्रमाच्या स्थापनेचा संकल्प त्यांचाच होता, त्यासाठी तळमळ त्यांचीच होती. गुरुमहाराजांना आता आश्रम हवाच अशी तळमळ त्यांना लागलीच होती. 'सत्यसंकल्पाचा दाता भगवान', याप्रमाणे तो झालासुद्धा. प. पू. दत्तमहाराजांना आश्रमात आल्याशिवाय चैन पडत नसे. रोज ते आश्रमात येत असत. भागवतसप्ताह नियमाने करीत. त्यात ते रंगून जात. सारा जीव आश्रमात होता. कुणीही त्यांच्या दर्शनाला गेले की, ते विचारीत देवाला नमस्कार करून आला का? सर्व उत्सवाची आखणी करीत असत. अनेक यज्ञयाग झाले, संतमहंत, विज्ञानपंडित, असे अनेक महापुरुष वासुदेव

निवासात येऊन गेले. सिद्धयोगाच्या शक्तिपात विद्येच्या पाणपोईत अनेक तृषार्त शांत झाले. हे सर्व, गुरुमहाराजांप्रमाणेच सद्गुरुपदावर अधिष्ठित झाल्यावर सत्कर्म सद्विचार यांचे प्रवाह सतत वहात राहिले. वासुदेव निवास चैतन्यमय होऊन राहिला. देवी तुळजाभवानी संतुष्ट झाली. भविष्यकाळाकरता ही गंगा सतत वहात राहिलीच पाहिजे. हेच तर सद्गुरूंचे खरे मोलाचे काम असते याचाही विचार प. पू. दत्तमहाराजांनी फार काळजीपूर्वक केला, असे सर्वांनाच जाणवत आहे. विज्ञान, तंत्रयुगाचा काळ, काळाची गती अतिशय वेगवान, चंगळवादाकडे आकृष्ट होणारी काळाची पाऊले माणसाला असलेले अनेक ताणतणाव, वेळेचा अभाव, नोकरी, व्यापार, व्यवसाय यांची बदललेली यंत्रणा, जागतिकीकरण, इंग्रजी भाषेत अधिकाधिक ग्रंथित असलेले ज्ञान, या सर्व जगातील घडणाऱ्या घटनांचा कानोसा त्यांच्या तीव्र ईश्वरनिष्ठ बद्धीने घेतला होता. या सर्व गोष्टींचा विचार करणारा, तप:पूत जीवन जगणारा, पूर्ण निर्लोभी व उत्तमचरित्र, गुरुनिष्ठा, समाजाविषयी मनाला तळमळ असणारे, या सर्वांपेक्षाही आत्मबोध आणि प्रसन्नता लाभलेले असे व्यक्तिमत्त्व त्यांनी पारखून ठेवलेले होते व योग्य वेळ आल्यावर किंवा त्यांना परमेश्वरी संकेत मिळाल्यावर आपला हा अधिकार प. पू. काका महाराजांच्या हाती सोपवून आपल्या नंतरची सर्व जबाबदारी प. पू. काका महाराजांच्या हवाली करून ते निवांतपणे अलिप्तपणे स्वस्थ झाले. याबाबतीत प. पू. गुरुमहाराजांच्या प्रमाणे प. पू.

दत्तमहाराज निश्चयात्मक बुद्धीचे होते. पूर्ण विचार होता. तसे एकदा नव्हे, तर दोनदा मोकळेपणाने लिहून ठेवून ते निर्भयता पावले. सारे उघड स्वच्छपणे केले. हेच त्यांचे झळकणारे सद्गुरुपद. पुढील काळाचा यथायोग्य विचार त्यांनी केला व ते विश्वात्मक झाले होते. या ठिकाणी सद्गुरुपदाचा अखेरचा टप्पा पूर्ण केला आज आपण हे सर्व डोळ्याने अनुभवीत आहोत. प. पू. काकामहाराजांचा निर्लोभीपणा, लोकांना हे साधन जास्ती जास्त लोकांपर्यंत कसे जाईल याचा ध्यास त्यांना लागलेला आहे. प्रत्यक्ष प. पू. दत्तमहाराज त्यांच्या तप:पूत अनासक्त उत्तम चारित्र्याबद्दल आमच्या सारख्यांजवळ बोलले आहेत. मला वाटते त्यांनी एक दोघांच्या पत्रातूनही या त्यांच्या आध्यात्मिक गुणाबद्दल लिहिलेले आहे. अशा तऱ्हेने निस्पृहपणे प. पू. दत्तमहाराजांनी आपले सद्‌गुरुपद भूषविले. हे सर्व लिहिल्याशिवाय प. पू. दत्तमहाराजांच्यावरील लेखन पुरेच होणार नाही.

प. पू. गुरुमहाराज, प. पू. दत्तमहाराज व प. पू. काकामहाराज तिन्ही महापुरुष सद्गुरुपदी अढळ आहेत व तिन्ही एकरूपाने नांदत आहेत. अशा आत्मस्वरूपी एकरूप झालेल्या गुरुमूर्ती दत्तात्रेयांना पुन्हा-पुन्हा सर्वांचे वतीने शरण जाऊन वंदन करते. शरण जाते व म्हणते ही आत्मसुखाची गंगा वासुदेव निवासातून सतत वाहू दे.

शेवटी अशा या सद्गुरुरूपाला मनोभावे वंदन करते, ह्या बरोबरच श्रीवासुदेव निवास, त्यात निवास करणारे सारेजण निष्ठावान भक्त या सर्वांनाही मनापासून वंदन करते. त्याच बरोबर

प. पू. दत्तमहाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव दोन वर्षे निष्ठेने चालविणाऱ्या सतत कार्यरत समितीच्या सेवाभावी मंडळींचे अभिनंदन करते. प. पू. सद्‌गुरू ह्या सर्वांचे कल्याण करतीलच. चुकलेमाकले असल्यास सांभाळून घ्यावे हीच सद्‌गुरुचरणी प्रार्थना. सर्वांनाच ही प्रार्थना आहे की आपल्या सर्वांच्या शुभेच्छा माझ्या या वयात मला फार मोलाच्या आहेत. आपण सर्वांनी तथास्तू म्हणा.

* * *

# शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्द वाटू धन जनलोका ।।

**प्राचार्य वसंत कृष्ण नूलकर**

सुमारे १९५०-५१ मध्ये आम्हाला समजले की श्री. बापूजी अणे यांना बिहारमध्ये गंभीर आजार झाला आहे. तो आजार पाठीच्या मणक्याचा असून त्या व्यथेने बापूजी अतिशय दुःखामध्ये आहेत. आता पुढे काय करावे याबद्दल जवळच्या नातेवाईकांमध्ये विचार झाला, माझे वडील डॉक्टर कृष्ण आत्माराम नूलकर हे तत्कालीन एम. डी. एफ. सी. पी. एस. आणि कुशल शस्त्रवैद्य होते. ते रिटायर होऊन आम्ही पुण्यातच रहात होतो. वाडा मोठा, सोय होईल यादृष्टीने श्री. बापूजींना पुणे येथे आणले आणि वाड्यातच दिवाणखान्यात एका खास तयार केलेल्या लाकडी उंच खाटेवर त्यांना ठेवण्यात आले. त्यांना उठून बसणेच काय पण कुशीवर वळणे अशक्य होते आणि सर्व देहधर्म खाटेवरच पडून करावे लागत. तशाच स्थितीत त्यांना डोके खांद्यापासून पायाच्या दोन्ही पोटऱ्यांपर्यंत प्लॅस्टर घातले गेले. त्यांना त्या तशा स्थितीत दर दोन तीन तासांनी उचलून पून्हा ठेवावे लागे. अन्यथा

असह्य कळा लागत. कळा सोसेनाशा झाल्या की बापूजी ''मायबाई मायबाई गं'' असे मोठ्या करुण स्वराने ओरडत की लगेच बापूजींचा विश्वासू माणूस पापय्या लगेच माझ्या वडिलांना बोलावून आणत असे. ते दोघे त्यांना हलवून ठेवत. हे इतके वर्णन एवढ्याच करता केले की अशा स्थितीत फक्त ससून हॉस्पिटलमधले ऑपरेशनचे चार दिवस सोडले तर कधीही संध्या वंदन सोडले नाही. सकाळ-सायंकाळ दोन वेळा संध्या निजून करत असत. प्रात:काळी निजूनच तीन नमस्कार नेमाने करत. 'मातापूरनिवासिनी भगवती देवी कुलस्वामिनी' असे मोठ्याने म्हणून माहूर देवीला पहिला, दुसरा टिळकांना आणि तिसरा महात्मा गांधींना!

भारतातील कॉंग्रेसचे बहुतेक सर्व नामवंत पुढारी आम्हाला कळवून घरी येत. पुण्यातील, मुंबईतील सर्वच नामवंत राजकीय, शिक्षण, धार्मिक क्षेत्रातले सर्व नामवंत बहुधा दोन आठवड्यांनी असतच! बाबासाहेब जयकर, द. वा. पोतदार, रँग्लर महाजनी आणि रँग्लर परांजपे हे अगदी नियमित! काकासाहेब गाडगीळ हेही दर आठवड्याला येत. या सर्वांच्या बरोबर बापूजींच्या गप्पा, संभाषण, वादावादी असे सर्व प्रकार चालत, पण या सर्व मंडळींच्यामध्ये एकमेकांबद्दल फार आदर आणि सन्मान आहे हे जाणवत असे.

बापूजी टिळक विद्यापीठाचे कुलपती होते. त्यामुळे विद्यापीठातील बरीच मंडळी विद्वान आणि विविध विषयांचे तज्ज्ञ

हे येत असत. साधारणपणे दुपारी ४॥ वाजल्यापासून मंडळींची ये-जा सुरू होई ती सायंकाळी ७॥ पर्यंत सतत ओघ असे. बापूजी जस जसे बरे होऊ लागले तशी येणारी मंडळी सतत वाढत गेली.

यामध्येच एक महान विद्वान म्हणजे ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर गुरुजी हे होते. अर्थात या काळात म्हणजेच १९५०-५२ मध्ये आचार्य कवीश्वर गुरुजी हे फक्त कवीश्वर गुरुजी याच नावाने प्रसिद्ध होते. प्रथम साधारणपणे आठवड्यातून एकदा येत असत. अत्यंत साधा आणि स्वच्छ पोषाख, किंचितसे अधोमुख, मनामध्ये कांहीतरी गंभीर विचार चालू आहे असे लगेच कळावे. निर्मळ मंद हास्य असे मुखावर! पण त्याच चेहेऱ्यावर एक विद्वान विचारी माणसाचा अलिप्तपणा असे.

एक दिवस दुपारी बाराच्या सुमारास गुरुजी उठून बाहेर जाऊ लागले तोच बापूजींनी मला हाक मारली अन् सांगितले, "हे पहा, उद्यापासून गुरुजी आपल्याकडे ११ वाजता येतील. मला शांकरभाष्य सांगणार आहेत. तरी येथे त्यांची सर्व व्यवस्था पहात जा." हाताची एक लाकडी साधी खुर्ची, समोर स्टूल, स्टुलावर लाकडी पाट, एक मोठा तांब्या, तांब्याचे भांडे, थंड पाणी अशी व्यवस्था असे. गुरुजींच्या हातात एक साधी पिशवी त्यात दोन पुस्तके!

पहिल्याच दिवशी मी ११ ला दहा मिनिटे कमी असताना सर्व व्यवस्था केली आणि निघून जाऊ लागलो तोच बापूजी म्हणाले,

''हे पहा, तुझे कॉलेज ११ ला संपते ना?'' मी होकार दिला. ''तर पुस्तक घेऊन इथे बसत जा. काही लागले सवरले तर मदत होईल.'' बापूजी म्हणाले. पण मी थोडे कुरकुरीच्या स्वरात म्हटले, ''मला काही कळत नाही. नुसते ऐकून काय उपयोग?'' त्यावर बापूजींनी शांतपणे जे सांगितले ते मी कधीही विसरणार नाही. ते म्हणाले, ''हे पहा पुस्तकावरून वाचन होईल. गुरुजी बोलतील ते श्रद्धापूर्वक ऐकावे. हळूहळू कळत जाईल.'' आजही बापूजींचे हे शब्द मला आठवून डोळे पाण्याने भरतात! आप्तवचन म्हणजे काय ते मला आज वयाच्या ऐंशीव्या वर्षी समजते. दशोपनिषदं सुरू झाली. त्यावरचे शांकरभाष्य गुरुजी स्वच्छ खड्या आवाजात वाचत. महिना गेला, दोन महिने गेले आणि सहाव्या महिन्याच्या सुमारास प्रकाश पडू लागला!

ब्रह्मश्री कवीश्वर गुरुजी हातामध्ये पुस्तक घेऊन पुस्तकाचे प्रथम पृष्ठ उघडून बसत तोपर्यंत बापूजी जे आडवे झोपलेले असत ते आपल्या छातीवर पुस्तक उघडे ठेवून वाचीत असत. गुरुजी मध्यम-उंच-मंद आवाजात स्वच्छ शब्दोच्चारात वाचन सुरू करत; त्यावरचे भाष्य वाचले की त्यावर संस्कृतामध्येच टीका टिप्पणी करायची! मधूनमधून बापूजी आणि दत्तमहाराज यांचे संभाषण होत असे. क्वचित प्रसंगी एखादी व्यक्ती भेटायला येई. बहुधा अशी व्यक्ती प्रसिद्धच असे. सकाळी ८-८। वाजता दर मंगळवारी तत्कालीन गव्हर्नर सर गिरिजाशंकर बाजपेई येत. ११ पर्यंत बापूजी मोकळे होत आणि लगेच दत्तमहाराज यावयाचे आणि

टिप्पणी चालू करायचे, शांत आणि गंभीरपणे हे वाचन चाले. बापूजी मधूनमधून शंका उपस्थित करून दोघेही संभाषण करीत. उत्तरोत्तर मला जसे समजू लागले तसे दोघांबद्दल ''आश्चर्यवत् पश्यति कश्चिदेनं'' अशी अवस्था झाली. ''वृद्धाः शिष्याः युवा गुरुः'' (मी हे जेव्हा माझ्या मित्राला जोशीला आत्ताचा प्रकांड पंडित डॉ. जोशी ला सांगितले तेव्हा तो म्हणाला, हे बघ तुझे वर्णन ''दगडः शिष्यः प्रकाण्ड पण्डितो गुरुः असे पाहिजे.'')

केनोपनिषदातील ''**यन्मनसा न मनुते येनाहुर्मनो मत् ॥**'' आणि ते चार श्लोकांवर चर्चा झाली ती मला अजून आठवते आणि ''तत् च संस्मृत्य संस्मृत्य'' असे होऊन जाते. सहाव्या श्लोकावर (यन्मनसा न मनुते वगैरे) ब्रह्मश्रींचे भाष्य अतिशय अप्रतिम होते.

**''अन्तस्थेन हि चैतन्य**

**ज्योतिषावभासितस्य मनसो मननसामर्थ्यम् ॥''**

या आचार्यांच्या भाष्यावर गुरुजींचे उत्तम भाष्य झाले. अनेक संबंधित विषयावरची गुरुजींची टीका पथदर्शक असे.

दुपारचे बारा वाजत असत; उन्ह तळपू लागे! मग विराम होई. ग्रंथ बंद होत असत. हात जोडले जात. हजार पौंडाचा बोजा माझ्या रिकाम्या डोक्यावरचा उतरून मी हात जोडून उभा राही अन्

**शंकरं शंकराचार्य केशवं बादरायणम् ।**

**सूत्रभाष्यकृतौ वन्दै भगवन्तौ पुनः पुनः।।**

**श्रुतिस्मृतीपुराणानां आलयं करुणालयम् ।**

**नमामि भगवत्पादं शंकरं लोकशंकरम् ।।**

ही प्रार्थना होऊन अध्याय संपत असे. एक हलके स्मित करून ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर बाहेर पडत. दशोपनिषद झाल्यावर बापूजींनी उत्तम दिवस पाहून एक शाल, श्रीफळ आणि सहस्त्ररौप्य दक्षिणा दिली. ब्रह्मश्रींनी आनंदाने स्वीकार केला. फळे घेतली आणि असा हा एक अनुपम्य सोहळा संपला. मला त्यात भाग घेता आला तेव्हा 'यदा किंचित् बुधजनसकाशादवगतः । तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः।।' ह्या भत्रृहरीच्या सुंदर उक्तीचा साक्षात अनुभव घेतला.

ब्रह्मश्रींच्या शिकविण्याची पद्धत अशी होती; प्रथम एक दोन ओळी पूर्ण वाचत; त्यावरचे शांकरभाष्य वाचन होई आणि पुन्हा त्यावर ब्रह्मश्री स्वयंभाष्य करीत. आचार्यांच्या भाष्याची भाषा 'प्रसन्न गंभीरा' अशी म्हटली गेली आहे. ते का म्हटले हे अशा वाचनानंतरच कळते.

ब्रह्मश्री दत्तमहाराजांनी भाष्यावर (द्वैतपर) ग्रंथ लिहिला आहे. फार प्रौढ भाषा कशी असते ते ह्या ग्रंथात पाहावे. पूर्वोत्तरपक्ष समभावाने सिद्ध करून नंतर शोध घेत निर्णयावरती यायचे ही पद्धत त्यात उत्तम प्रतीत होते. आपल्या 'ज्यूरिस्पूडन्स' ह्या पंचखण्डात्मक महान ग्रंथात डॉ. रास्को पाऊंड हा जगन्मान्य कायदातज्ज्ञ लिहितो की दोन्ही बाजू ऐकून घेऊन न्यायनिवाडा

करावा. आमचे दुर्दैव असे की भारतीयांमध्ये अतिप्राचीन काळापासून ही पद्धत चालू होती आणि म्हणूनच तर आचार्य म्हणतात, ''तु शब्द: पक्षम् व्यावर्तयति।'' दुर्दैव हे की हे कोणाला लक्षात येत नाही.

ब्रह्मश्री ह्यांचे अति निर्मळ, सौम्य व्यक्तिमत्त्व होते. कधीही कोणाला उलटून बोलणार नाहीत. आपल्याबद्दल तर नाहीच नाही. अति सौम्य आणि मृदू व्यक्तिमत्त्वामुळे कित्येकदा त्यांना त्रासही सहन करावा लागे.

ब्रह्मश्री दत्तमहाराजांना त्यांच्या सौम्य आणि अबोल स्वभावामुळे टिळक विद्यापीठाच्या वाड्यातील पाठशालेत फार त्रास झाला होता. कारण दत्तमहाराजांना बरेचदा बाहेरचे विशेषत: कर्नाटक, विदर्भ, मराठवाडा येथून शास्त्रार्थाकरिता बोलावणे असे. ते रजा काढून जात असत. तर एकदा पाच-सहा वरच्या वर्गाचे विद्यार्थी मला भेटायला आले. त्यांचा लीडर हा माझा दाट स्नेही आणि जवळचा असा विद्यार्थी होता. त्यांनी सर्वांनी मला विनंती केली की, ''सर तुम्ही जरा पहाना कवीश्वर गुरुजींकडे!'' मी चकित होऊन म्हटले, ''अरे मी कोण? ते स्वत: समर्थ आहेत ना!'' तेव्हा मला तो म्हणाला, ''अहो ऑफिसात जवळपास पूर्ण महिना त्यांची रजा आकसाने मांडली गेली आहे! त्यांनी अभ्यासक्रम पूर्णपणे पुरा केलाय!'' सर, गुरुजींचा दिनक्रम कसा चालेल? घरात पाच-सहा माणसे आहेत! सर हे सर्व वाड्यातील दोन माणसे करताहेत; तुम्ही कुलपतींच्या कानावर घालाना

जरासे!'' मी पडताळून पाहिले ती तशी परिस्थिती होती. मीही गोष्ट हलकेच बापूजींच्या कानावर घातली. सायंकाळी पाच वाजता विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांना बोलावले. बापूजी संतापले होते. ते म्हणाले, ''अरे सर्व गोष्टी एकाच मापाने कसे मोजता ? गुरुजींचा दर्जा विशेष विद्वान (एमेरिटस्) असा आहे. आता पुन्हा असे करू नका. त्यांना विद्वत् गोष्टींना, यज्ञ-यागांना जायचे असते. गुरुजींची रजा ही कार्यक्रमाकरताच असते; मौज मजेकरता नसते. विद्यापीठे ही विद्वानांमुळे ओळखली जातात. बिल्डिंगमुळे नाही. एक ना एक दिवस या विद्वान पुरुषामुळेच तुम्हाला सन्मान मिळेल!'' मला अजून आठवते आहे; गुरुजी मान खाली घालून नि:शब्द बसले होते. विद्यापीठातील दोघांनीही गुरुजींची क्षमा मागितली.

वर्षामागून वर्षे गेली.! वाजपेय यज्ञ झाला. त्या वेळी बापूजी उठू शकत नव्हते. पण यज्ञफल की काय बापूजी पूर्ण बरे झाले. नागपूरला गेले. लोकसभेत प्रचण्ड बहुमताने निवडून आले. यज्ञनारायणाची कृपा झाली. प्रतिवर्षी पुण्यास येत असत. तेव्हा ब्रह्मश्री दत्तमहाराजांना नेमाने भेटून जात! वर्षामागून वर्षें गेली! बापूजी पूर्णायू होऊन निजधामास गेले.

अन एकेदिवशी कळले की ब्रह्मश्री दत्तमहाराज, योगीराज गुळवणीमहाराज यांच्या पीठावर श्रींच्या आज्ञेने आरूढ झाले! बापूजी-एक सच्चे स्वातंत्र्य सैनिक आणि निष्ठावान उपासक यांची

भविष्यवाणी खरी झाली. देवदेवेश्वर संस्थानातर्फे ब्रह्मश्रींची भेट कैक वर्षांनी झाली. शरीर खूप थकलेले पण चेहऱ्यावर दुर्दम्य उत्साह होता. चेहेऱ्यावर निष्पाप बालसुलभ हास्य!

घरी जाताना विचार आला ब्रह्मश्रींकडून शांकरभाष्यासह उपनिषदवाक्ये मी ऐकली! माझ्याच वाट्याला हे भाग्य कसे आले?

**अनंत जन्माचिया पुण्यरासी ॥**

**म्हणूनि येणे देवा तुझ्या पायापासी ॥**

* * *

# सदा संतांपासी जावे

श्री. नारायण दाते

प. पू. श्रीमहाराजांचे महानिर्वाण वयाच्या ९० व्या वर्षी १ मार्च १९९९ या दिवशी झाले. 'आचार: प्रथमो धर्म: ।' या तत्त्वाला त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व होते; मग ते नित्यकर्म असो अथवा नैमित्तिक असो ! श्री महाराजांच्या जीवनातील अनेक लहानमोठ्या प्रसंगांमध्ये आपल्याला आचारधर्माबरोबरच साधेपणा, अमानित्व, लीनता, स्थितप्रज्ञता, प्रसिद्धीपराङ्मुखता, वक्तृत्व हे गुण प्रकर्षाने अनुभवण्यास मिळतात.

**कमालीचा साधेपणा :** प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आपल्या शरीराची वाजवीपेक्षा जास्त काळजी कधीही घेतली नाही. शनिवार पेठेतील वर्तक वाड्यातील आपल्या घरापासून श्री वासुदेव निवासापर्यंत भर दुपारी ते अनवाणी येत असत. अंगावरदेखील धोतर आणि उपरणे एवढीच वस्त्रे असत. आश्रमात दुपारी विश्रांती घेतानादेखील नेहमीचे उपरणे पांघरून आपल्या बैठकीच्या लहानशा गादीवर अंग दुमडून झोपत असत. पावसाळा असो, उन्हाळा असो, अथवा हिवाळा त्यांचा पोषाख

ठरलेला धोतर आणि उपरणे!

कुठेही परगावी जायचे असो, त्यांचे सामान अत्यंत आटोपशीर असे. हातात एक लहानशी पिशवी व बोचक्यासारखी लहानशी वळकटी! त्यामध्ये एखादी दुसरी शाल, नित्य लागणारी वस्त्रे व उपकरणे एवढेच सामान असे. त्यांच्या या कमालीच्या साधेपणामुळे लोक त्यांना एक सामान्य याज्ञिकी करणारा ब्राह्मण असे समजत असत.

**अमानित्व :** अंदाजे १९७८ चा हा प्रसंग. आश्रमात शिकवण्यासाठी दोन तीन विद्यार्थी होते. प. पू. श्रीदत्तमहाराज रोज भोजन आटोपून साधारण एकच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरातून आश्रमात विश्रांतीसाठी येत असत. श्रीमहाराज वरच्या खोलीत बसत. त्या दिवशी महाराजांचा एक साधक दुपारी दोनच्या सुमारास आश्रमात आला. त्याला श्रीमहाराजांची पत्रदीक्षा झालेली होती. तो सरळ जिना चढून वरती गेला. त्याने सरळ प. पू. श्रीदत्तमहाराजांनाच विचारले, "दत्तमहाराज कुठे आहेत?" प. पू. दत्तमहाराजांनी त्या गृहस्थाचे नाव, गाव विचारले व भोजन झालेले आहे का? नसल्यास खाली जाऊन भोजन करा असे सांगितले. ते गृहस्थ खाली आले, पण खाली कुणीच न दिसल्याने ते पुन्हा वरती आले व त्यांनी श्रीमहाराजांना विचारले, "खाली कुणी नाही." श्रीमहाराज म्हणाले, 'चला मी आलो.' असे म्हणून उपरणे सावरून खाली आले. पाट मांडून तांब्या-भांडे ठेवले व शर्ट काढून त्यांना पाटावर बसण्यास सांगितले, आपण स्वतःच

त्यांना वाढण्यास सुरुवात केली. ओट्यावरील भांड्यांचा आवाज ऐकून तळघरातून श्री. कृष्णा आर्वीकर बाहेर आले. त्याने पाहिले तर प्रत्यक्ष श्रीदत्तमहाराजच त्या गृहस्थांना वाढत आहेत. विद्यार्थी कृष्णा आर्वीकर पुढे आला व श्रीमहाराजांना सांगितले 'मी वाढतो, आपण बसा.' हे सगळे त्या भोजन करणाऱ्या गृहस्थाने पाहिले. त्याने कृष्णा आर्वीकरला विचारले, 'हे कोण आहेत?' श्रीकृष्णाने हे दत्तमहाराजच आहेत. 'असे सांगताच, ते गृहस्थ अवाक् झाले. त्या गृहस्थांनी काही म्हणण्या आधीच श्रीमहाराज आपल्या खोलीत गेलेदेखील! केवढे हे अमानित्व!

प. पू. श्रीदत्तमहाराज जेव्हा जेव्हा वाडीला जात, तेव्हा तेव्हा औरवाडला आवर्जून जात असत. त्या ठिकाणी प. प. श्रीदीक्षितस्वामींच्या शिष्या गं. भा. यमुताई राहात असत. प. पू. श्रीमहाराज त्यांना भेटून त्यांची मोठ्या आस्थेने विचारपूस करीत. त्यांनी वाढलेल्या कण्या मोठ्या प्रेमाने मनापासून खात असत.

१९८० हे साल, श्रीदत्तमहाराजांच्या अमृतमहोत्सवाचा दुसरा दिवस, महाप्रसादाकरिता श्रीवासुदेव निवासात बरीच गर्दी झाली होती. लोक पाने धरण्यासाठी गडबड करीत होती. एका पंक्तींत दोन-चार पाने शिल्लक होती. त्यातील एका पानावर श्रीदत्तमहाराज येऊन बसलेदेखील! एका सामान्य भक्ताप्रमाणे सामान्यांच्या पंक्तीत बसलेले श्रीदत्तमहाराज, आपल्या कृतीने बरेच काही सांगून गेले. सांगता समारंभामध्ये मोठे हार घालून ज्यांचा सत्कार केला, ज्यांना लाखाचा निधी दिला. ज्यांचा

गुणगौरव केला अशी महान व्यक्ती आपल्या पंक्तीत बसलेली आहे, हे कित्येकांना कळलेदेखील नाही! त्यामुळे प.पू. श्रीमहाराजांचे भोजन होण्याआधीच काही मंडळी हात धुण्यासाठी उठलीदेखील! स्वत:चे मोठेपण झाकून घेण्याची केवढी ही कुशलता, खबरदारी!

याच पद्धतीने दीक्षा देतानादेखील श्रीदत्तमहाराज वागत असत. त्यांनी कुणालाही असे कधीही असे सांगितले नाही, की मी तुम्हाला दीक्षा देतो. दीक्षा पत्राद्वारे असो किंवा प्रत्यक्ष असो, ते सांगत, "श्री महाराजांच्या (प. पू. श्रीगुळवणी महाराज) फोटोला हार घाला. फोटोपुढे नारळ ठेवा, पेढे ठेवा आणि श्रीमहाराजांना प्रार्थना करा की माझ्यावर अनुग्रहाची कृपा करा. श्रीमहाराज तुमच्यावर कृपा करतील. नंतर तो नारळ फोडून घरच्या सर्वांनी खावा." याप्रमाणे दीक्षा झाल्यानंतर साधक जेव्हा प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनास जात आणि सांगत, "महाराज, खाण्यापिण्याचे नियम (कांदा-लसूण) इतके काटेकोरपणे पाळणे, आम्हाला कठीण वाटते." तेव्हा श्रीमहाराज म्हणत, "ठीक आहे, काळजी करू नका. हळूहळू आपल्या सवयी कमी करत जा, पुढे या सर्व गोष्टी आपोआपच बंद होतील." भक्ताची आर्तता पाहून त्यांचे अंत:करण विरघळून जायचे.

प. पू. श्री. दत्तमहाराजांची बसण्याची ढब वेगळीच असे. तसे ते मुद्दामच बसत असावेत. त्यांची पावले मांडीच्या इतक्या आत त्यांनी घेतलेली असत की त्यांच्या पावलांच्या अंगठ्यांना

कुणाला स्पर्श करता येत नसे. खुर्चीवर बसले असले तरीसुद्धा ते त्यांची पावले इतकी मागे घेत असत की त्यांच्या पावलांना स्पर्श करणे अशक्य होत असे. 'अलौकिक नोहावे लोकांप्रती' अशी श्रीदत्तमहाराजांची कृती होती.

## परमेश्वर चरणी लीनता नम्रता

१९९० या वर्षी औरवाड येथे प. पू. श्री दत्तमहाराजांचा भागवत सप्ताह ठरला. औरवाड येथे स्नानाची व अन्य विधींची सोय नव्हती. तेथील गैरसोयी श्रीमहाराजांना सांगताच श्रीमहाराज म्हणाले, "देवाचे अन्य सेवेकरी जसे राहतात, तसेच आम्ही राहू" स्वत: इतके मोठे असूनदेखील सामान्य सेवेकऱ्यांच्या सारखेच स्वत:ला मानणे व वागणे हे किती कठीण आहे! ८० च्या घरात स्वत:चे वय असूनदेखील श्रीमद्‌भागवत सेवेपुढे त्यांना स्वत:ला होणाऱ्या त्रासाची बिलकुल फिकीर वाटली नाही.

श्रीदत्तमहाराजांचे श्रीमद्‌भागवतावर अलोट प्रेम होते. एके वर्षी श्रीवासुदेव निवासात श्रीमद्‌भागवतावर विवेचन करताना श्री महाराजांना ताप असूनदेखील त्यांनी विवेचन चालूच ठेवले शेवटी आरतीच्या वेळी श्रीमहाराजांना पुष्कळ थंडी भरून आली, त्यामुळे त्यांना उभेदेखील राहता येईना. परंतु आरती होईतोपर्यंत श्रीमहाराज मोठ्या नेटाने तसेच उभे राहिले.

साधू, संत व संन्यासी यांच्याबद्दलचा श्रीमहाराजांचा आदरभाव वाखाणण्याजोगा होता. करवीर पीठाधिपती प. प. विद्याशंकर भारती आश्रमात आले होते. त्यांचे व श्रीमहाराजांचे

आसन शेजारी शेजारी मांडले होते. पीठाधिपती आसनस्थ होताच, श्रीमहाराज त्यांच्यासमोर खाली जमिनीवर बसले. नेमके असेच भोजनाच्या वेळी घडले. पीठाधिपतींच्या शेजारी श्रीमहाराजांचे पान मांडले होते हे पाहताच श्रीमहाराजांनी एक शब्दही न बोलता आपले पान उचलले व विश्वस्तांच्या ओळीत जाऊन बसले. या वेळी यात कुणालाही दोषी न ठरविता, संन्याशाशी कसे वागावे, हे आपल्या कृतीतून दाखवून दिले.

## प्रसिद्धीपराङ्मुखता

सन १९८० च्या अगोदर प. पू. श्री दत्तमहाराजांचा आश्रमात कोठेच मोठा फोटो नव्हता. म्हणून विश्वस्तांनी मोठा फोटो तयार करून घेऊन, तो वरील दिवाणाच्या खोलीत ठेवला. श्री दत्तमहाराजांना ही गोष्ट आवडली नाही. श्री महाराजांनी तो फोटो श्री. कोंढरेंना तिसऱ्या मजल्यावरील आतील खोलीत ठेवण्यास बऱ्याच वेळा सांगितले. परंतु विश्वस्तांच्या सांगण्यावरून श्री. कोंढरेंनी त्याकडे दुर्लक्ष केले. श्रीदत्तमहाराज दौऱ्यावर गेले असताना, विश्वस्तांनी तो फोटो फ्रेम करून, दिवाणावरील भिंतीवर बसवून टाकला. ही गोष्ट दत्तमहाराजांना समजल्यावर त्या खोलीत कामाशिवाय जाणेच बंद करून टाकले.

## व्यवहारदक्ष

प. पू. श्री दत्तमहाराज साक्षात्कारी असूनदेखील अत्यंत व्यवहारदक्ष होते. पत्रव्यवहार करण्याकरिता श्रीमहाराजांना कार्डे,

पाकिटे लागत असत. त्याकरिता व्यवस्थापकांच्या जवळ पन्नास-शंभर रुपये देऊन, त्यांच्याकडून कार्डे, पाकिटे आणून घेत; पण आश्रमातली कार्डे, पाकिटे त्यांनी कधीही वापरली नाहीत. भक्त मंडळींना लग्न मुंजीकरता आहेर पाठवितानादेखील कमिशनसकट मनीऑर्डरचे पैसे व्यवस्थापकांच्या जवळ ते देत असत.

कांची कामकोटीचे प. प. श्रीशंकराचार्यांनी (जयेंद्र सरस्वती) काही कारणास्तव पीठाचा त्याग केला होता व तपश्चर्या करण्याकरता ते निघून गेले होते. त्यांच्याबद्दल द्वारकापीठाधीश स्वरूपानंद सरस्वती यांनी वर्तमानपत्रात जाहीरपणे अनुद्गार काढले होते. द्वारकापीठाधीशांच्या हस्ते प. पू. श्रीदत्तमहाराजांचा सत्कार होणार होता. परंतु श्रीमहाराज त्या सत्काराला गेले नाहीत, कारण द्वारकापीठाधीशांचे ते बोलणे श्रीमहाराजांना आवडले नव्हते. त्यांनी आपली नाराजी तिथे न जाण्याने व्यक्त केली. फक्त श्रीमहाराज एवढेच म्हणाले की थोरामोठ्यांनी सामान्यांचा असा बुद्धिभेद करू नये.

## महान त्याग

कोठेही जाहिरात न केल्यामुळे प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केलेल्या असीम त्यागाची कल्पना कोणालाही नाही. श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील त्यांचे वडिलोपार्जित घर प. पू. धुंडिराज महाराजांच्या देऊळगावराजाच्या ट्रस्टला जोडून टाकले. पुण्यातील श्रीवामननिवास ही वास्तू म्हणजे श्रीमहाराजांच्या अथक प्रयत्नांचे

व असीम त्यागाचे चालते बोलते उदाहरणच आहे. ही वास्तू उभारण्याकरिता गावोगावी श्रीमद्‌भागवत सप्ताह करून आलेले सर्व पैसे श्रीमहाराज विश्वस्तांच्या हवाली करत. हे त्यांचे कार्य दोन-चार वर्षे चालले होते. पण श्रीमहाराजांनी या कार्याची लोकांना जरासुद्धा कल्पना येऊ दिली नाही. श्रीमहाराजांचे प्रत्येक कार्य इतके अबोलपणे व अलिप्तपणे चालायचे की, त्यांच्या महान कार्याची कोणालाही कल्पनाच येत नसे. श्रीदत्त-अमरेश्वर जीर्णोद्धाराच्या वेळी श्रीमद् भागवत सप्ताह व श्रीगुरुपौर्णिमा यातून मिळालेली सर्वच्या सर्व रक्कम न मोजता श्रीमहाराज जीर्णोद्धार मंडळाकडे देत असत. दोन-तीन वर्षांमध्ये प. पू. श्रीमहाराजांनी जवळ जवळ तीनचार लाख रुपये सहजरीत्या श्रीदत्तअमरेश्वरकरिता दिले. अशीच गोष्ट काशीयात्रेच्या वेळी घडली. तिथे दानधर्म करण्याकरिता त्यांनी शेकडोंनी वस्त्रे, उपवस्त्रे व अन्य गोष्टी घेतल्या होत्या. परंतु स्वत: मात्र आठ वारी साधे धोतर व करवतकाठी उपरणे याशिवाय काहीही परिधान केले नाही. यासंबंधी कोठेही वाच्यता नाही.

## दुसऱ्याला मोठेपणा देणे, स्वत:ची स्तुती स्वत:च्या कानाने न ऐकणे

१९८० हे वर्ष प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या अमृत महोत्सवाचा सांगता समारंभ सुरू होता. प्रमुख व्यक्तींची भाषणे झाली. नंतर प. पू. वै. श्री. धुंडामहाराज देगलुरकर यांचे अध्यक्षीय भाषण सुरू झाले. प्रास्ताविक संपताच श्रीधुंडामहाराजांनी प. पू.

श्रीमहाराजांची स्तुती करण्यास सुरवात केली. ती स्तुती ऐकताच श्रीदत्तमहाराज पटकन उठले आणि त्यांनी श्रीधुंडामहाराजांच्या हातातील माईक आपल्या हातात घेतला व बोलण्यास सुरवात केली, ''आपण सर्व भक्तमंडळी व साधक प. पू. योगीराजांच्या अतिशय प्रेमातील आहोत. याशिवाय येथे जमलेली विद्वान मंडळी, सत्पुरुष व श्री धुंडामहाराजांची आपल्या सर्वांवर असीम कृपा व प्रेम आहे. त्यांचे असेच प्रेम आपल्यावर राहावे, अशी आपण त्यांना प्रार्थना करू या.'' असे बोलून त्यांनी सभा संपावली. लोकांना वाटले, श्रीदत्तमहाराजांना कामाची घाई असावी म्हणून त्यांनी सभा संपविली असावी. परंतु प्रत्यक्षात मात्र श्रीधुंडामहाराजांनी केलेली आपली स्तुती श्रीदत्तमहाराजांना स्वत:च्या कानाने ऐकायची नव्हती व दुसऱ्यांना ऐकवायची नव्हती.

प. पू. श्रीमहाराजांच्या स्वभावाचे एक खास वैशिष्ट्य होते. दुसऱ्याचा अगदी लहानसा गुणदेखील ते मोठा करून सांगत असत व त्याचे मनापासून कौतुक करीत. श्रीमहाराजांनी केलेले कौतुक तोंडदेखले कधीच नसायचे. एखाद्याने केलेली कविता, प्रसंग, तक्रार ते नीट वाचून बघत असत, व त्या व्यक्तीला समाधानकारक उत्तर देत असत.

आश्रमाचा एक माजी विद्यार्थी श्री. राजाराम कुलकर्णी याने पंधरा वर्षांपूर्वी प. पू. श्रीमहाराजांच्या प्रेरणेने अग्निहोत्र घेतले. आधानाच्या वेळेस श्री महाराजांचे प्रवचन झाले. या तत्त्वाचे विवेचन करताना ते म्हणाले, ''आम्ही नुसतेच शब्दपंडित

आहोत. श्रौत कर्माचे फळ कसे महान आहे हे मीमांसा शास्त्राने सांगत बसतो. पण करत मात्र काही नाही. कारण श्रौत कर्म किती कठीण असते हे ते करणाराच जाणतो. येथे श्रीमहाराजांनी वे. मू. राजाराम कुलकर्णी यांना मोठेपण दिले व स्वत:ला केवळ शब्दपंडित म्हणवले, केवढे हे विशाल मन! दुसऱ्याला मोठेपणा देण्याची श्रीमहाराजांची सहजवृत्ती होती.''

## क्षमाशीलता

१९९० हे वर्ष. प. पू. श्री महाराजांचा सहस्र चंद्रदर्शन शांती महोत्सव ठरला आणि श्री महाराजांची प्रकृती एकाएकी बिघडली, काय झाले हे श्रीमहाराजांना कळले होते. पण कोणालाही न सांगता सर्व त्रास शांतपणे ते सहन करीत होते. डॉक्टरी उपचार चालू होते, पण थोडासुद्धा फरक पडत नव्हता. महोत्सवाच्या आधी पंधरा दिवस कुडली पीठाचे शंकराचार्य श्रीवासुदेव निवासात आले होते. त्यांच्या कानावर महाराजांच्या प्रकृतीसंबंधी सर्व हकीगत घातली गेली. तेव्हा ते म्हणाले, ''श्री महाराजांवर प्रयोग झालेला आहे, हा प्रयोग उलटवावयाचा का? ते श्रीमहाराजांना विचारा.'' प. पू. श्रीमहाराज म्हणाले, ''प्रतिकार करू नका, उलटवू नका. कारण प्रयोग करणाऱ्या व्यक्तीला त्रास होईल. फ़ार फार तर प्रतिबंध करा.'' केवढी ही दयाबुद्धी!

प. पू. श्रीमहाराजांनी गोखलेनगरचे आपले स्वत:चे घर एका अडलेल्या गरजू व्यक्तीला राहावयास दिले होते. पण पुढे त्या व्यक्तीने आपला शब्द फिरवला, जागा सोडली नाही. उलट

श्रीमहाराजांना त्रास देण्यास सुरुवात केली. परंतु क्षमाशील श्रीमहाराज त्याच्यावर रागावले नाहीत. त्याला असे न वागण्याबद्दल उपदेशपर सुंदर पत्र लिहिले, त्या पत्राचा शेवट असा केला, ''परमेश्वराच्या दरबारी आपण एका गरीब ब्राह्मणाला निष्कारण का छळले, याचे उत्तर देण्याची वेळ आपणावर येऊ नये व आपणांस परमेश्वराकडून शिक्षा होऊ नये, अशी श्री परमेश्वरचरणी आम्ही हात जोडून कळकळीची प्रार्थना करतो.'' काय हा करुण भाव! केवढी ही क्षमाशीलता!!

साधारण १५ वर्षांपूर्वीचा काळ असेल. प. पू. श्रीमहाराज आश्रमात उत्सव महोत्सवाच्या वेळी नित्यप्रसादास थांबत असत. त्यावेळी प. पू. श्री टेंबेस्वामी महाराजांच्या फोटोखाली त्यांचे पान असे व त्यांच्या उजव्या हातास वयस्कर व परिचित व्यक्तींची पाने असत. त्या दिवशी सर्व मंडळी आपआपल्या पानावर बसली होती. प. पू. श्रीमहाराज आपल्या जागेवर बसले पण त्यांच्या शेजारचे पान रिकामे होते. त्या पानावरील व्यक्ती आमंत्रण न केल्यामुळे रागावून प्रसादास आली नव्हती. प. पू. श्रीदत्तमहाराजांना ते समजले परंतु कोणतीही वाच्यता न करता ते शांतपणे पानावर बसले. संकल्प होताच पानाभोवती पाणी फिरविण्याचा, आहुत्या घालण्याचा इतका सुंदर अभिनय केला, की लोकांना वाटले, श्रीमहाराज जेवायलाच बसले. सर्व मंडळींनी भोजनास सुरुवात करताच श्रीमहाराज एकदम उठले; तेव्हा लोकांना समजले की, श्रीमहाराजांनी जेवणाचा अभिनय केला

होता. प. पू. श्रीमहाराज आपले ताट घेऊन स्वयंपाकघरात आले. तिथे आपले व त्या व्यक्तीचे पान मांडले व त्या व्यक्तीला बोलावणे पाठविले, ती व्यक्ती येईतोपर्यंत प. पू. श्रीमहाराज खिडकीजवळ उभे होते. ते दिसताच "या बसा," असे म्हणून त्यांना पाट दाखविला. ती व्यक्ती बसताच त्यांच्याशेजारी श्रीमहाराज जेवायला बसले व सावकाश होऊ द्या, असे म्हणाले. याप्रमाणे अनेक भक्तमंडळींचे लहानमोठे अपराध पोटात घालून त्यांना उदार अंत:करणाने श्रीमहाराजांनी क्षमा केली.

एकदा एक व्यक्ती तावातावाने वरच्या खोलीत गेली व प. पू. श्रीमहाराजांना ओरडून म्हणाली, "तुम्हाला गादीवर कोणी बसविले आहे? तिथे मला बसायचे आहे." प. पू. श्रीदत्तमहाराज शांतपणे त्यांना म्हणाले, "तुम्ही बसा, आमची काहीही हरकत नाही; खाली देवापुढे चला, तिथे आपण प्रार्थना करू या."

असेच एकदा प. पू. श्रीदत्तमहाराज वरच्या खोलीत बसले होते; समोर बरीच भक्तमंडळी बसली होती. एक प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या रागातच श्री महाराजांच्या समोर जाऊन त्यांना रागाने बोलू लागली, "तुम्हाला काय समजतंय का?" श्री महाराज शांतपणे म्हणाले, "तुम्ही म्हणता आहात ते अगदी बरोबर आहे; आम्हाला खरंच काहीही कळत नाही. आम्ही अजाण आहोत."

वरील दोन्ही प्रसंगातील उर्मठ वक्तव्यावर जराही न रागवता, शांत व दयाळू अंत:करणाच्या श्रीमहाराजांनी त्या व्यक्तींनाच

मोठेपण दिले. केवढे हे उदार, क्षमाशील अंत:करण!

## योग्य शब्दांत समाधान करण्याची हातोटी

दहा-बारा वर्षांपूर्वी, श्रीवामन निवासमध्ये एक सद्गृहस्थ 'स्पिरिच्युअल हिलिंग' या शास्त्राने रोग्यांचे राग बरे करीत असत. लोकांना बरे, वाईट अनुभव येत असत. ते गृहस्थ खाण्या-पिण्याबाबत काळवेळ (ग्रहण) इत्यादीबद्दल कोणताच विधीनिषेध पाळत नसत. त्यांच्याबद्दल प. पू. श्रीमहाराजांकडे तक्रारी गेल्या व त्यांचे हे उपचार बंद करण्याविषयी श्री महाराजांना लोकांनी विनंती केली. तेव्हा श्रीमहाराजांनी त्या गृहस्थांना असा निरोप पाठविला, "आजपर्यंत तुम्ही पुष्कळ रोग्यांवर उपचार केले आहेत; त्यामुळे तुमच्या कार्याची माहिती बऱ्याच जणांना झाली आहे, त्या कार्याचा प्रचारही पुरेसा झालेला आहे. तेव्हा पुढील कार्य तुम्हास घरी करण्यास हरकत नाही."

तसाच प्रसंग दोन-तीन वर्षांपूर्वी पुण्यात घडला. गणपती दूध पितो अशी वार्ता सगळीकडे वाऱ्यासारखी पसरली. प. पू. श्रीमहाराज खाली हॉलमध्ये असले होते समोर बरीच भक्तमंडळी बसली होती. एक महिला श्रीमहाराजांना तावातावाने सांगू लागली, "महाराज, गावातले सर्व गणपती दूध पीत आहेत, तर आपल्या देव्हाऱ्यातील गणपती दूध पितो का, हे पहा, कोणाला तरी सोवळे नेसून देवघरात जायला सांगा." प. पू. श्रीमहाराजांनी त्या महिलेचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि तिला म्हणाले,

''तुमच्या देव्हाऱ्यात गणपती आहे ना, त्याला प्रथम तुम्ही दूध पाजा. तुमचा गणपती दूध प्याला की आम्ही आमच्या देव्हाऱ्यातील गणपतीला दूध पाजू.'' प्रश्नकर्त्या माणसाला न दुखवता, त्याचे समाधान करून त्याला परत पाठविण्याची प. पू. श्रीमहाराजांची हातोटी काही वेगळीच होती.

## वक्तृत्व

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी विषयविवेचन करण्याची शैली समोरच्या श्रोतृवृंदावर अवलंबून असे. विषयांतर न करता प्रसंग वेळ ठिकाण बघून श्रीमहाराज बोलत असत. त्यामुळे समोरचे श्रोते विषयाशी पूर्णपणे एकरूप होऊन जात असत. सिंहगडाच्या पायथ्याशी कोंढणपूर म्हणून एक गाव आहे; तेथील दत्तमंदिराचा कळस प. पू. श्रीगजानन स्वामी महाराज यांच्या हस्ते बसविण्यात आला तेव्हा प. पू. श्रीमहाराजांचे समोरच्या लोकांना उद्देशून भाषण झाले. त्या भाषणात नरवीर तानाजी मालुसरे, शिवाजी महाराज, संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज व रामदास स्वामी यांचे राष्ट्रप्रेम व धर्मप्रेम कसे होते, हे निरनिराळ्या उदाहरणांद्वारे श्रीमहाराज लोकांना सांगत होते, हे सांगताना तुकाराम महाराजांचे अभंग व रामदास स्वामींच्या दासबोधातील ओव्याच्या ओव्या श्रीमहाराज म्हणून दाखवीत होते, हे विचार अतिशय साध्या व सोप्या भाषेत श्रीमहाराजांनी लोकांना पटवून दिले.

याउलट, श्रीगुरुदेव रानडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' या संस्थेच्या हॉलमध्ये श्रीमहाराजांचे व्याख्यान

होते. व्याख्यानाला सर्व विद्वान मंडळी जमली होती. त्या वेळी न्याय, वेदान्त व तत्त्वज्ञान यांचे दाखले देत देत, श्रोत्यांना 'श्रीगुरुदेव रानडे यांचे तत्त्वज्ञान' हा विषय श्रीमहाराज समजावून देत होते. संपूर्ण भाषण म्हणजे विद्वत्तेचे व विषयाचे सखोल ज्ञान असल्याचे एक द्योतक होते.

महान पंडित असूनही कोंढणपूरच्या भाषणात श्रीमहाराजांनी आपल्या पांडित्याची जरासुद्धा लोकांना कल्पना येऊ दिली नाही, तर ट्रेनिंग कॉलेजमध्ये मात्र पंडितांच्यासमोर पांडित्यपूर्ण भाषेत विषय विवेचन केले.

## आचारनिष्ठा

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी आयुष्यभर कटाक्षाने पाळलेली आचारनिष्ठा शेवटच्या क्षणापर्यंत सोडली नाही. अखेरच्या आजारातदेखील प्रकृती अस्वास्थ्यामुळे श्रीमहाराजांना संध्या करणे अशक्य होते; तेव्हा पाणीही घेत नसत. यथाशक्ती आह्निक करीत होते. अशा प्रकारे जीवनाच्या अखेरपर्यंत ते आचार धर्माचे निग्रही होते. पुढे संध्या करणे अशक्य झाले. त्या दिवसापासून शेवटच्या क्षणापर्यंत श्रीमहाराजांनी अन्न घेतले नाही; मौन धारण केले. डोळेही उघडले नाहीत, केवढा हा आचार पालनाचा निश्चय! प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन आचार धर्माचा मूर्तिमंत आदर्श होता. सद्गुरू श्रीदत्तमहाराजांना कोटी प्रणाम!

* * *

# ‘ आनंदाचे डोही आनंद तरंग ’

श्रीमती आशा किशोर धारप
मुंबई - ४०००१६

प. पू. श्रीतुकाराम महाराजांच्या अनेक अभंगांचा साक्षात् अनुभव देणारे महापुरुष म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराज होत आणि हा अनुभव घेण्याची परमकृपा ज्यांनी केली ते महान् व्यक्तिमत्त्व म्हणजे श्रीसंतसद्गुरू प. पू. श्री. गुळवणीमहाराज होत.

‘आनंदाचे डोही’ हा अभंग श्रीतुकाराममहाराजांच्या साक्षात्कारावस्थेचा सुंदर उद्गार आहे. ह्या परमअनुभवाचा आविष्कार गूढगर्भतेने करत असताना प. पू. श्रीदत्तमहाराज आपल्या प. पू. मातोश्रींच्या (सकल सौ. संपन्नसरस्वती आई) उदरात असताना ‘गर्भाचे आवडी मातेचा डोहळा’ ह्या शब्दांची प्रकर्षाने आठवण होते. अनुभव सरिसा मुखा आला हे प. पू. श्रीदत्तमहाराजंचे जीवनसूत्र-जीवनसार होते हेही निश्चित!

विसावे शतक हे भारताच्या दृष्टीने महत्त्वाचे शतक आहे. राजकीय दृष्ट्या पारतंत्र्य-स्वातंत्र्याची प्रचंड उलथा पालथ करणारी चळवळ, आमूलाग्र सामाजिक परिवर्तनाचा इतिहास, आर्थिक बदलांचे वेगवेगळे पैलू, जागतिक स्थित्यंतराचा मागोवा घेत झालेली समर्थ शैक्षणिक वाटचाल, साहित्यिकदृष्ट्या प्राचीन

वाङ्मयाकडून नव्या दिशांनी व नव्या दृष्टिकोनांनी झालेली वाङ्याची नवी संरचना, अशा आणि ह्या सर्व स्थित्यंतराचा सूक्ष्मपणे अभ्यास, विसाव्या शतकातल्या आपल्या नव्वद वर्षांच्या वास्तव्यात प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केला होता. चतुरस्रपणे सर्व परिस्थिती जाणून घेतली होती. आपल्या आयुष्याचे प्रयोजन त्यांना, श्रीसद्‌गुरू कृपेने कळलेलेच होते. ह्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपले 'जीवन-कर्तव्य-गंतव्य' निश्चित केले होते. सोळाव्या वर्षी त्यांनी केलेला 'श्रीमद्‌भागवत सप्ताह' ही त्याची साक्ष आहे.

एखाद्या संतपुरुषाला जाणून घेताना, सर्वसामान्य माणूस, आपल्या मर्यादित दृष्टिकोनातून त्या महापुरुषाच्या महनीयतेची उकल करतो. त्या असामान्य व्यक्तित्त्वाचे मूल्यमापन करताना त्याची विद्वत्ता, त्याची उज्ज्वल परंपरा व त्याच्या जीवनकार्याची विशेषता, ह्या गोष्टींचा नक्कीच विचार होतो, पण संतसत्पुरुष कालातीत असतात हे जरी सत्य असले तरी त्यांचा कालसापेक्ष विचार व आचार जाणून घेणे ही महत्त्वाचे असते. कारण त्यांचे समग्रतेचे भानही सतत जागृत असते.

प. पू. श्री टिळक महाराजांना अध्यात्म आनंदात सुखाने रहाता आले असते. पण राजकीय उत्थानाचे कार्य हे त्यांच्या आयुष्याचे प्रयोजन त्यांनी जाणले होते. प. पू. श्रीस्वामीविवेकानंदांनाही समाधीसुखाच्या अनुभवात यथेच्छ विहार करता आला असता. परंतु हिंदू धर्माचे महत्त्व जगाला ज्ञात करून देणे हेच आपल्या जीवनाचे ईप्सित आहे, हे त्यांना श्रीसद्‌गुरुकृपेने उमजले होते व

त्या दिशेनेच त्यांचे कार्य झाले. प. पू. श्री स्वातंत्र्यवीर सावरकर, साहित्यिक निर्मितीतच फक्त गुंतून पडले असते तरी ते त्यांचे बलस्थानच होते. पण भारतीय स्वातंत्र्याच्या दिशेने कार्य करणे, हेच त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते, जे त्यांना पूर्णपणे गवसले होते.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर प. पू. श्रीदत्तमहाराजांचा विचार करताना, त्यांच्या तीन वेळा तीन राष्ट्रपतींकडून झालेल्या सत्कारांची आठवण होते. हे सत्कार निव्वळ एका ज्ञानीमहापुरुषाचे सत्कार नव्हते. हे त्रिवार सत्कार म्हणजे प. पू. श्री.शंकराचार्यमहाराज, श्रीज्ञानेश्वर-नामदेव-एकनाथ-तुकाराम महाराज, प. पू. श्रीसमर्थ रामदासस्वामी, प. पू. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराज, प. पू. श्री गुळवणीमहाराज, प. पू. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज, प. पू. श्रीरामकृष्ण परमहंस, योगी श्रीअरविंद, श्रीरमणमहर्षी, श्रीगोंदवलेकर महाराज, श्रीशेगावनिवासी श्रीगजाननमहाराज, श्रीअक्कलकोट निवासी स्वामी समर्थ, श्री गाडगेमहाराज, श्रीसाईबाबा, प. पू. श्रीविनोबा भावे, प. पू. श्रीअखंडानंद सरस्वती स्वामीमहाराज (ज्यांची जन्मशताब्दी नुकतीच साजरी झाली.) ह्या सर्व व संपूर्ण संतमांदियाळीचा सत्कार आहे. ह्या भक्तीअधिष्ठित-ज्ञान-कर्म-योग ह्या तीन मार्गांचा सत्कार आहे. हा श्री वारकरी परंपरा, श्रीदत्तपरंपरा, श्रीभागवत परंपरा ह्या तीन श्रेष्ठ परंपरांचा सत्कार आहे. म्हणूनच प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या जीवनकार्याचा, त्यांच्या मानवी-जीवन-मीमांसेचा विचार करणे म्हणजे ‘अणुरेणु या थोकडा। तुका

आकाशाएवढा' ह्या व्याप्तीचा विचार आहे. ह्या विश्वात्मक व्याप्तीची कल्पना करणे केवळ अशक्य आहे. 'संत होऊनी संतांसी पहावे' हे ज्यांचे भागधेय आहे, अशा महापुरुषांनाच ते शक्य आहे. म्हणूनच इतरांना 'उरलो उपकरापुरता' ह्या भूमिकेतून कार्य करणाऱ्या प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तित्वाचे व जीवनकार्याचे स्वल्पसे शब्दपूजन कदाचित् थोडेसे साधता येईल.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना गुरुदेव श्रीगुळवणीमहाराजांकडून दीक्षाप्राप्त शक्तिपात योगाची, अत्यंत महत्त्वाची योगपरंपरा व प. पू. श्रीदीक्षितस्वामीमहाराजांकडून (श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज) मिळालेली तेजस्वी अशी दत्त व भागवत परंपरा, ह्याचे अतुलनीय वरदान प्राप्त झाले होते. 'अमूप असे हे तेजोमय धन' त्यांनी जनसामान्यांच्या कल्याणाकरता, त्यांच्या उद्धाराकरता, आयुष्यभर प्राणपणाने वाटले, निष्ठावंत प्रेमभावाने लुटले, लुटू दिले म्हणूनच किती भक्त, किती साधक, किती जनसामान्य उद्धरले गेले, मार्गस्थ झाले, कृतार्थ झाले, ह्याचा हिशोब केवळ अशक्य आहे.

संप्रदायाची ठराविक चाकोरी प. पू. श्रीदत्तमहाराजांनी कधीच उल्लंघिली नाही. हे अर्थातच विचारपूर्वक घडले आहे. पण त्याचबरोबर परमार्थसाधन ही केवळ सांप्रदायिक आचारप्रणाली नसून तो स्वयंप्रेरित शोध आहे हे त्यांना माहीत होते. जागृत तत्त्वजिज्ञासा आणि ईश्वरोपासनेत असलेले अंत:शुद्धीचे व मूलग्राही दृष्टीचे महत्त्व (तुका म्हणे फळ आहे मूळापाशीं) त्यांनी

साधकांच्या मनावर सतत बिंबवले.

इंद्रियांचे संयमन व इंद्रियांचा जय प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या आयुष्यातल्या कितीतरी प्रसंगात दिसून येतो. भक्तांना असे अनेक प्रसंग माहीत आहेतच.

**नाही देवापाशी मोक्षाचे गाठोडे ।**
**आणूनि निराळे द्यावे हाती ॥**
**इंद्रियांचा जय साधुनिया मन ।**
**निर्विषय कारण असे तेथे ॥**

ह्या अभंगाचा अनुभव प्रत्यक्षात बघणे हे भाग्याचेच होते.

**"हे चि थोर भक्ति आवडते देवा ।**
**संकल्पावी माया संसाराची ॥"**

हा प. पू. श्रीदत्तमहाराजांचा आवडता अभंग! संसाराच्या मायेचा संकल्प करून त्यांनी कधीच श्रीसद्‌गुरुचरणांवर वाहिला होता. ('आरंभीच केले विसर्जन') आणि म्हणूनच 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' ही त्यांची सहजस्थिती होती.

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वात पराकोटीचे सौजन्य व सामर्थ्य यांचा अपूर्व संयोग होता. म्हणूनच ते सर्वांवर सदैव क्षमा व दया ह्यांची कृपा करीत राहिले. 'क्षमा ही अमूप सुखाची राशी' त्याचे वर्म त्यांनी सुखदपणे जाणले होते.

प. पू. श्रीदत्तमहाराजांकरता 'श्रीमद्‌भागवत' हे श्री भगवत्पूजनाचे अमोघ साधन व आत्मनिवेदनाचे पवित्र माध्यम होते. म्हणूनच त्यांनी श्रीमद्‌भागवत सप्ताहातून सर्वांकरता

सातत्याने प्रकट केला तो भक्तीचा अकृत्रिम व परमोच्च आत्माविष्कार! 'बुडता हे जन न देखवे डोळां' ही त्यामागची भूमिका होती.

पुढील अभंग म्हणजे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे साक्षात्-स्वरूप-वर्णन आहे.

**सर्वस्वाचा त्याग तो सदा सोवळा ।**
**न लिंपे विटाळा अग्नी जैसा ॥१॥**
**सत्यवादी करी संसार सकळ ।**
**अलिप्त कमळ जळी जैसे ॥२॥**
**घडे ज्या उपकार भूतांची ते दया।**
**आत्मस्थिती तया अंगी वसे॥३॥**
**ना बोले गुणदोष नाइके जो कानी।**
**वर्तोनि तो जनी जनार्दन॥४॥**
**तुका म्हणे वर्म जाणितल्याविण।**
**पावे करिता सीण सांडी मांडी॥५॥**

प. पू. श्रीदत्तमहाराजांकरता कितीही लिहावे, एखादा ग्रंथराज सिद्ध करावा, तरी तो अपुराच आहे. 'पुरुनी उरलासे रूप, रस, गुण, गंधी' अशी स्थिती आहे. तरीही त्यांनी 'श्रीदेवीभागवताचा' नवरात्रीत केलेला जागर ज्यांनी 'नारायणी नमोस्तुते' त वाचला, अभ्यासला, त्या सर्वांना प. पू. श्रीदत्तमहाराजांचे 'मानवी जीवनाचे भाष्यकार' हे अद्भूत, केवळ अपूर्व आणि स्तिमित करणारे रूप पाहून धन्य व्हायला होते. मनुष्य जीवनातल्या कित्येक समस्यांचा

उहापोह, विकारांच्या प्राबल्यावर विवेकाचा उपाय, विवेकाधिष्ठित जीवनाचे सुखदरूप नामस्मरण व तत्त्वचिंतनाचे अपरंपार महत्त्व, प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वेगवेगळ्या तऱ्हेने समजावून दिलेले त्यांच्या इतर प्रवचन ग्रंथातून आपल्याला आढळून येते.

सुख, शांती, समाधान,आनंद प्राप्तीच्या मार्गांचे विशदीकरण, ईश्वरोपासनेच्या मार्गाचे अमोघ, सुलभीकरण आणि 'कोणाही जिवाचा न घडो मत्सर। वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे।' हे सूत्रात्मक वर्म, प. पू. श्रीदत्तमहाराजांनी सर्वांना, अगदी सर्वांना वाणासारखे वाटले, वाटत राहिले व आजही वाटताहेत. निव्वळ आणि केवळ त्यामुळेच.....

**'तुका म्हणे सोपी केली पायवाट ।**
**उतरावया भवसागर रे॥'**

हे सर्व भक्तांचे फलित ठरले आहे.

* * *

# श्रीदत्तमहाराज कवीश्वर नामावली

डॉ. वासुदेव व्यं. देशमुख
मार्गदर्शक - डॉ. रा. ल. जोशी

१ उपमन्युगोत्रप्रकाशक श्रीदत्त कवीश्वर॥
२ कलिप्रभावितजनदयार्द्र श्रीदत्त कवीश्वर॥
३ श्रीगणेशलोकस्थित श्रीदत्त कवीश्वर॥
४ स्वीकृतमानवविग्रह श्रीदत्त कवीश्वर॥
५ सप्तर्षिकुलदीपक श्रीदत्त कवीश्वर॥
६ कवीश्वरोपाख्यान्वर्थक श्रीदत्त कवीश्वर॥
७ धुंडिराजतपफल श्रीदत्त कवीश्वर॥
८ सरस्वतिगर्भरत्न श्रीदत्त कवीश्वर॥
९ वासुदेवयति-अंकस्थित श्रीदत्त कवीश्वर॥
१० वक्रतुंडनामधारक श्रीदत्त कवीश्वर॥
११ पुराणकथनेच्छुक श्रीदत्त कवीश्वर॥
१२ गीताप्रेमी बालक श्रीदत्त कवीश्वर॥
१३ नृसिंहवाटिकावासी श्रीदत्त कवीश्वर॥
१४ मातृतपस्यासहायक श्रीदत्त कवीश्वर॥

१५ वेदशास्त्रसंपादक श्रीदत्त कवीश्वर।।

१६ नृसिंहसरस्वतिचरणाश्रित श्रीदत्त कवीश्वर।।

१७ श्रीगुरुचरणांबुजनिर्भर श्रीदत्त कवीश्वर।।

१८ गुरुदर्शनार्थलंघितमहापूर श्रीदत्त कवीश्वर।।

१९ श्रीमद्भागवतपाठपरायण श्रीदत्त कवीश्वर।।

२० श्रीमद्भागवतत्त्वोपदेशक श्रीदत्त कवीश्वर।।

२१ श्रीभागवतरहस्योद्घाटक श्रीदत्त कवीश्वर।।

२२ साक्षात् श्रीमद्भागवत श्रीदत्त कवीश्वर।।

२३ भागवतोत्तम श्रीदत्त कवीश्वर।।

२४ भागवतसुधारसचंद्र श्रीदत्त कवीश्वर।।

२५ सर्वदर्शनपारग श्रीदत्त कवीश्वर।।

२६ सुंदरलक्ष्मीवरमालित श्रीदत्त कवीश्वर।।

२७ अनेकविद्वत्सभाजिष्णु श्रीदत्त कवीश्वर।।

२८ परमाचार्यार्पित-सुवर्णकंकण श्रीदत्त कवीश्वर।।

२९ तनयावसानदुःखसहिष्णु श्रीदत्त कवीश्वर।।

३० आचार्यचतुष्टयसंमानित श्रीदत्त कवीश्वर।।

३१ पुण्यपत्तनवासी श्रीदत्त कवीश्वर।।

३२ छात्रप्रिय अध्यापक श्रीदत्त कवीश्वर।।

३३ नवनीतमृदुमानस श्रीदत्त कवीश्वर।।

३४ हित-मित-सत्यवाचक श्रीदत्त कवीश्वर॥

३५ श्रीगुरुवामनकृपाश्रित श्रीदत्त कवीश्वर॥

३६ वासुदेवयतिग्रंथप्रकाशक श्रीदत्त कवीश्वर॥

३७ श्रीगुरुदेवचरित्रलेखक श्रीदत्त कवीश्वर॥

३८ त्रिवारराष्ट्रपतिसंमानित श्रीदत्त कवीश्वर॥

३९ जितसर्वेंद्रिय श्रीदत्त कवीश्वर॥

४० दोषादर्शन श्रीदत्त कवीश्वर॥

४१ अमानी-मानद श्रीदत्त कवीश्वर॥

४२ सर्वत्र समदर्शी श्रीदत्त कवीश्वर॥

४३ अजातशत्रु श्रीदत्त कवीश्वर॥

४४ पितृपरायण श्रीदत्त कवीश्वर॥

४५ मातृभक्तिपर श्रीदत्त कवीश्वर॥

४६ कुलाचरणदक्ष श्रीदत्त कवीश्वर॥

४७ कुलपरंपरासंवर्धन श्रीदत्त कवीश्वर॥

४८ संतचरणरत श्रीदत्त कवीश्वर॥

४९ संतचित्ततोषण श्रीदत्त कवीश्वर॥

५० संतवचनकृत श्रीदत्त कवीश्वर॥

५१ श्रीधरयतिप्रिय श्रीदत्त कवीश्वर॥

५२ सज्जनगडसमारोहक श्रीदत्त कवीश्वर॥

५३ योगिराजआज्ञापित श्रीदत्त कवीश्वर॥

५४ समर्थसंनिधि ध्यानावस्थित श्रीदत्त कवीश्वर॥

५५ शांभवीदीक्षाप्राप्त श्रीदत्त कवीश्वर॥

५६ चिच्छक्तिविलासदर्शी श्रीदत्त कवीश्वर॥

५७ योगिराजप्रिय श्रीदत्त कवीश्वर॥

५८ करुणासागर श्रीदत्त कवीश्वर॥

५९ आर्तबंधु श्रीदत्त कवीश्वर॥

६० दीनोद्धारक श्रीदत्त कवीश्वर॥

६१ श्रीवासुदेवनिवाससंकल्पक श्रीदत्त कवीश्वर॥

६२ श्रीवासुदेवनिवाससंवर्धक श्रीदत्त कवीश्वर॥

६३ योगिराजप्रकटितमहिमा श्रीदत्त कवीश्वर॥

६४ श्रीगुरुवामननिर्दिष्टमोक्षमार्गदर्शक श्रीदत्त कवीश्वर॥

६५ शक्तिपाताचार्य श्रीदत्त कवीश्वर॥

६६ श्रीगुरुवामनशिबिकावाहक श्रीदत्त कवीश्वर॥

६७ श्रीगुर्वर्पितजीवित श्रीदत्त कवीश्वर॥

६८ श्रीवामननिवासनिर्माता श्रीदत्त कवीश्वर॥

६९ श्रीअमरेश्वरमंदिरजीर्णोद्धारक श्रीदत्त कवीश्वर॥

७० श्रीनृसिंहगुरुसंकल्पपूरक श्रीदत्त कवीश्वर॥

७१ तुल्यनिन्दास्तुति श्रीदत्त कवीश्वर॥

७२ शांतिसागर श्रीदत्त कवीश्वर॥

७३ अहैतुकीकृपाकर श्रीदत्त कवीश्वर॥

७४ परगुणपरमाणुपर्वतीकृत् श्रीदत्त कवीश्वर॥

७५ परदोषकंठधर श्रीदत्त कवीश्वर॥

७६ परापराधसाहन श्रीदत्त कवीश्वर॥

७७ परेच्छाप्रारब्धभोगी श्रीदत्त कवीश्वर॥

७८ अनाक्रोशप्रारब्धादृत श्रीदत्त कवीश्वर॥

७९ सहजसमाधिस्थित श्रीदत्त कवीश्वर॥

८० आत्माराम श्रीदत्त कवीश्वर॥

८१ भक्तिसुधापरिक्लिन्नहृदय श्रीदत्त कवीश्वर॥

८२ नागेशाचार्यशिक्षित श्रीदत्त कवीश्वर॥

८३ द्वैततिमिरसूर्य श्रीदत्त कवीश्वर॥

८४ अज्ञानध्वांतभास्कर श्रीदत्त कवीश्वर॥

८५ शरणागतवत्सल श्रीदत्त कवीश्वर॥

८६ रेणुकानिवाससंस्थित श्रीदत्त कवीश्वर॥

८७ कुटुंबवत्सल श्रीदत्त कवीश्वर॥

८८ सम्यक्पूरितगृहस्थाश्रम श्रीदत्त कवीश्वर॥

८९ वेदांतपारिजातसौरभानुवादक श्रीदत्त कवीश्वर॥

९० शुक्लांबरधर श्रीदत्त कवीश्वर॥

९१ प्रसन्नमुखचंद्र श्रीदत्त कवीश्वर॥

९२ मधुरहास्य श्रीदत्त कवीश्वर॥

९३ दर्शनपावन श्रीदत्त कवीश्वर॥

९४ कूर्मकृपादृष्टि श्रीदत्त कवीश्वर॥

९५ सहजवार्तोपदेश श्रीदत्त कवीश्वर॥

९६ अमोघसंकल्प श्रीदत्त कवीश्वर॥

९७ वराभयकर श्रीदत्त कवीश्वर॥

९८ भगवद्गुणगानप्रिय श्रीदत्त कवीश्वर॥

९९ यजनयाजनचोदक श्रीदत्त कवीश्वर॥

१०० भुक्तिमुक्तिप्रदाता श्रीदत्त कवीश्वर॥

१०१ निगृहीतसर्वेंद्रिय श्रीदत्त कवीश्वर॥

१०२ योगोनान्ते तनुत्यागी श्रीदत्त कवीश्वर॥

१०३ मृत्यंजय श्रीदत्त कवीश्वर॥

१०४ स्वानंदलीन श्रीदत्त कवीश्वर॥

१०५ निजधामारोहक श्रीदत्त कवीश्वर॥

१०६ नित्यसनातन श्रीदत्त कवीश्वर॥

१०७ स्मर्तृगामी श्रीदत्त कवीश्वर॥

१०८ वासुदेवकृतसारथ्य श्रीदत्त कवीश्वर॥

## प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने अर्पिलेली स्मृतिसुमने.

## प. पू. योगीराज श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज यांचा प. पू. दत्तमहाराजांच्या षष्ट्यब्दपूर्तीप्रसंगी आशीर्वाद.

(२५ मे १९६९)

'आमचा व कवीश्वर घराण्याचा संबंध फार जुना आहे. श्रीसद्गुरु टेंबेस्वामींच्या समग्र वाङ्मयाचे बारा खंडांत पांच हजार पृष्ठांचे प्रकाशन केवळ श्रीदत्तमहाराजांच्यामुळे शक्य झाले. एवढे प्रचंड कार्य करूनही त्यांनी सतत स्वत:चा उल्लेख त्या दृष्टीने कोठेही केलेला नाही. आमच्यामुळे हे घडले असेच त्यांना वाटत आहे. श्रींचा शतसांवत्सरिक उत्सव या प्रकाशनाने साजरा झाला तो श्रीदत्तमहाराजांच्यामुळे. त्यांनीच आमच्या हातून हे कार्य घडविले आहे. या निमित्ताने श्रीदत्तमहाराजांचा सहवास फार जवळून आला. आमचे मनांत त्यांचेविषयी आदर नी स्नेह निर्माण झाला. श्रीदत्तमहाराज औरवाडच्या श्री. दीक्षितस्वामींनी स्थापन केलेल्या सद्गुरुपीठसंस्थानचे एक विश्वस्त आहेत. त्यांची तेथील जबाबदारी अगत्यपूर्वक पार पाडण्याची तळमळ व श्रद्धा पाहून आमचे अंत:करण त्यांनी खेंचून घेतले व त्याचेच पर्यवसन म्हणून श्रीवासुदेवनिवासचे, तेथील धार्मिक समारंभाचे, तेथील सत्कार्यांचे संचालकत्व ओघानेच श्रीदत्तमहाराजांचेकडे आलेले आहे. येथे सर्व गोष्टी त्यांच्या इच्छेप्रमाणे घडून आलेल्या आहेत व पुढेही येत राहतील. त्यांचेकडे आलेली ही सेवा श्रीकृपेने पुढेही पार पडेल.

अशा भारतीय ख्यातीचे चतुरस्र विद्वान, कार्यकुशल कर्णधार आम्हांला लाभले ही खरोखर ईश्वरकृपाच होय. तेव्हां आपण सर्व त्यांच्या भक्तप्रेमी मंडळींनी हा जो उचित असा षष्ट्यब्दिपूर्ति समारंभ साजरा केला हे पाहून आम्हांस समाधान होत आहे. त्यांच्या हातून देवाधर्माची, शास्त्राची, संतांची उत्तरोत्तर सेवा घडावी व यासाठी त्यांना आयुरारोग्य व उत्तम ऐश्वर्य लाभो अशी आमची श्रीचरणी प्रार्थना व आमचेही आशीर्वाद आहेत. आपणांकडूनही त्यांचे अमृतमहोत्सव, सहस्रचंद्रदर्शनशांति, रौद्रीशांति, जन्मशताब्दिमहोत्सव घडावेत अशी आमची प्रभुचरणी नित्य प्रार्थना आहे.'